## प्रकरण क्र.३

## संशोधनाची कार्यपध्दती

प्रास्ताविक -

प्रस्तुत संशोधन हे शोधक स्वरूपाचे आहे. या संशोधनात शिक्षक - प्रशिक्षकांकडून सराव पाठास कशा पद्धतीने मार्गदर्शन दिले जाते, याचा शोध घेणे व मराठीच्या पाठ नियोजनासाठीच्या मार्गदर्शनपद्धीचा अन्य विषयांच्या पाठ नियोजनासाठीच्या मार्गदर्शनपद्धती यांचा तौलनिक अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

हे संशोधन सद्य:स्थितीशी संबंधित असल्यामुळे वर्णनात्मक पद्धतीचा ( Descriptive Research ) अवलंब करणे योग्य ठरते.

जॉन बेस्टने ( १९८३ ) वर्णनात्मक संशोधनाचे हेतू स्पष्ट केलेले आहेत ते असे --

" A descriptive study describes and interprets what is. It is concerned with condition or relationships that exist, opinions that are held, processes that are going on; effects that are evident, or trends that are developing. It is priprarily concerned with the present although it often considers past events and influences as they relate to curent conditions."

जॉन बेस्टच्या मते वर्णनात्मक संशोधन प्रामुख्याने वर्तमान काळाशी निगडित असते. सद्य:स्थितीतील समस्येशी संबंधित प्रवृत्ती, परिणाम प्रक्रिया, मते, परस्परसंबंध, परिस्थिती याचा या पद्धतीने शोध घेतला जातो.

शैक्षणिक संशोधनासाठी बहुतांशी वर्णनात्मक पद्धती ही सर्वाधिक लोकप्रिय अशी संशोधन पद्धती आहे. वर्णनात्मक पद्धतीच्या अनेक पद्धती उपयुक्त आहेत. वर्णनात्मक संशोधन पद्धतीची बहुतेक सर्व वैशिष्ट्ये सर्वेक्षण पद्धतीला लागू पडतात. सर्वेक्षणाच्या तीन पायऱ्या अशा -

१) पहिली पायरी - सद्य:स्थितीची जाणीव.

२) दुसरी पायरी - उपलब्ध नवनिर्मित प्रमाणकाशी ( *Norms* ) त्या सद्य:स्थितीशी तुलना करणे.

३) तिसरी पायरी - सद्य:स्थितीमध्ये प्रगती घडवून आणण्यासाठी विविध मार्गांचा विचार करणे, उपाययोजना सुचविणे.

सर्वेक्षण पद्धतीमध्ये समस्येच्या संदर्भात विविध साधनांच्या द्वारे मोठ्या प्रमाणात माहिती मिळविली जाते. प्रस्तुत संशोधन पाठ मार्गदर्शना-विषयीचे आहे. सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठास दिले जाणारे मार्गदर्शन पारंपारिक पद्धतीचे आहे. सूक्ष्म अध्यापन,दिग्दर्शित पाठ व नियोजना--वरील व्याख्याने या नंतर नियोजनाचा कच्चा आराखडा विद्यार्थी-शिक्षक तयार करतात. हे तयार केलेले पाठ टाचण दोन । तीन वेळ तपासून लिहून घेतले जाते. पण तिचा मानसिक आराखडा विद्यार्थ्यांच्या मनात तयार झाला आहे किंवा नाही याची खात्री प्राध्यापक करून घेत नाहीत.आज मार्गदर्शनाची अशी कोणतीच शास्त्रीय पद्धती अद्याप उपलब्ध नाही. परंतु मार्गदर्शन प्रक्रिया ही नियोजन क्षमता व बौध्दिक प्रक्रियेला चालना देणारी हवी. या दृष्टिकोनातून मार्गदर्शनाकडे पाहिले जात नाही. किंबहुना मार्गदर्शनाकडे किती गांभीर्याने पहावयाचे हे ज्या त्या मार्गदर्शक प्राध्यापकावर अवलंबून असते. व्यक्ति - भिन्नतेमुळे मार्गदर्शन देण्याच्या पद्धतीत फरक आढळतो.यासाठी मार्गदर्शनाच्या शास्त्रीय पद्धतीचा शोध घेतला पाहिजे.

सद्य: मार्गदर्शक प्राध्यापक कच्च्या आराखड्यावर जे काही मार्गदर्शन देतात, त्यात पाठ्य मुद्यांचा क्रम,उद्दिष्टे व स्पष्टीकरणे,शिक्षक कृती व विद्यार्थी कृती,प्रश्नांची रचना या सर्व बाबींचा विचार करतात.त्याचा आधार घेऊनच अध्यापकाचा नवा दृष्टिकोन विचारात घेणे आवश्यक आहे. अध्यापन हे नियोजनबध्द वर्तन आहे.त्यामध्ये पाठ नियोजन व पाठ नियोजनासाठी मार्गदर्शन या गोष्टी येतात. नियोजनावर भर देण्यासाठी पाठ नियोजन , मार्गदर्शन व पाठाची पूर्व तयारी या गोष्टी काळजीपूर्वक केल्या पाहिजेत. त्या

दृष्टीने विविध विषयांच्या पाठ नियोजनाची मार्गदर्शन पध्दती, मराठी अध्यापन पद्धतीची पाठ नियोजनाची मार्गदर्शन पद्धती कशी असू शकेल यासाठी उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

ही पाठ मार्गदर्शनाची प्रक्रिया प्रामुख्याने मार्गदर्शक, प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील आंतरक्रियेव्दारे चालते. त्यामुळे याविषयाची माहिती मिळविण्याचे स्त्रोत म्हणजे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक हेच होते. आजी विद्यार्थी-शिक्षकांबरोबरच माजी विद्यार्थी-शिक्षक देखील याविषयी माहिती (कदाचित अधिक वस्तुनिष्ठ ) देऊ शकत असल्याने त्यांचाही समावेश करणे इष्ट ठरेल. ही माहिती प्रश्नावली व प्रत्यक्ष निरीक्षण वस्तुनिष्ठतेसाठी या दोन्ही पद्धतीने मिळविता येणे शक्य असल्याने संशोधिकेने दोन्ही पद्धतींचा अवलंब करण्याचे निश्चित केले.

संशोधनाची कार्यवाही पुढे विशद केलेली आहे -

कोणत्याही सर्वेक्षणासाठी तीन टप्पे असतात :--

१) न्यादर्शाची निवड,

२) सामग्री गोळा करण्यासाठी साधनांची निवड,

३) या साधनांच्या साहाय्याने नमुन्याकडून प्रत्यक्ष सामग्री गोळा करणे.

या संशोधनाचे हे टप्पे पुढीलप्रमाणे उपयोगात आणले --

न्यादर्शाची निवड --

न्यादर्श निवडीसाठी तीन कृती कराव्या लागतात त्या अशा -

१) जनसंख्येची व्याख्या करणे,

२) त्या जनसंख्येतून योग्य अशा न्यादर्श निवडीच्या पद्धतीचा उपयोग करणे,

३) प्रत्यक्ष नमुन्याची निवड.

या तिन्ही कृती प्रस्तुत संशोधनात खालीलप्रमाणे करण्यात आल्या --

१) जनसंख्येची व्याख्या -

आदर्श निवडीसाठी प्रथम जनसंख्येची व्याख्या करणे आवश्यक ठरते.

सांगली जिल्हातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पाठ मार्गदर्शक प्राध्यापक व सध्या शिक्षण घेत असलेले (१९९२-९३ ) आजी छात्राध्यापक व माजी छात्राध्यापक ( १९९१-९२) या तीन जनसंख्या होत.

१) सांगली जिल्हामधील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालये व त्यामध्ये प्रत्येकी आठ असे ४० प्राध्यापक ही जनसंख्या मानावी लागेल, ही संख्या खूपच मर्यादित असल्याने निरीक्षणापुरती या जनसंख्येचा वापर केला. मात्र संशोधनाच्या निष्कर्षांच्या सामान्यीकरणासाठी जनसंख्या अधिक व्यापक करण्यात आली व तिची व्याख्या शिवाजी विद्यापीठातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक अशी करण्यात आली.

२) आजी छात्राध्यापकांमध्ये सांगली जिल्हातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १९९२-९३ या कालखंडातील ४०० विद्यार्थी-शिक्षक.

३) माजी छात्राध्यापकांमध्ये सांगली जिल्हातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सन १९९१-९२ या कालखंडातील ४०० विद्यार्थी-शिक्षक.

२) प्रत्यक्ष नमून्याची निवड -

१) प्राध्यापक नमुन्याची निवड --

प्राध्यापक जनसंख्येतून खालील पद्धतीचे नमुन्याची निवड करण्यात आली :-

अ) निरीक्षणासाठी सांगली जिल्ह्यातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक ( परिशिष्ट क्र.१ )

ब) पाठ मार्गदर्शनाची प्रश्नावलीव्दारे माहिती गोळा करण्यासाठी एकूण जनसंख्येच्या ६० टक्के ( प्रत्येक महाविद्यालयातील प्रत्येक अध्यापन-पद्धतीचे एक प्राध्यापक ) प्राध्यापकाची निवड करण्यात आली. त्यामध्ये सांगली जिल्ह्यातील ३८ प्राध्यापक होते व बाहेरील प्राध्यापक १५० होते. सांगली जिल्ह्यातील ८० टक्के प्रश्नावल्या पहिल्या भेटीत मिळाल्या. तसेच बाहेरील प्राध्यापकांच्या प्रश्नावल्या ३७ टक्के आल्या. त्यानंतर स्मरणपत्रे पाठविली, त्यात सांगली जिल्ह्यातील सर्व प्राध्यापकांच्या प्रश्नावल्या आल्या. बाहेरील प्रश्नावल्यांना प्रतिसाद मिळाला नाही. अंतिमत: प्रश्नावल्यांची संख्या एकूण ९५ होती, यापैकी ३८ सांगली जिल्ह्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक होते, तर ५७ प्राध्यापक बाहेरील जिल्ह्यातील होते. ( परिशिष्ट क्र.२ )

२) आजी विद्यार्थी-शिक्षकांची निवड -

प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्वसाधारण ८० विद्यार्थी-शिक्षक गृहीत धरुन त्याच्या १० टक्के विद्यार्थी-शिक्षक यादृच्छिक पद्धतीने निवडले. निवडलेल्या विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रत्येक दोन अध्यापनपद्धती (मेथडस् )असतात. त्यानुसार विचार करता नमुन्यातील विद्यार्थ्यांची पद्धतीनुसार विभागणी सारणी क्र.३.१ मध्ये दिलेली आहे. ( परिशिष्ट क्र.३ )

३) माजी विद्यार्थी-शिक्षकाची निवड -

प्रत्येक महाविद्यालयाला भेटी देऊन माजी विद्यार्थी-शिक्षकांची यादी

## तक्ता क्र.३.१

## माजी विद्यार्थी-शिक्षक (सन १९७२-९३)

| क्र. | कॉलेजचे नाव | विषय | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | |
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी | इतिहास | [illegible] | [illegible] | [illegible] | |
| १) | श्रीमती गुलाबबेन शहा कॉलेज ऑफ एज्युकेशन, सांगली. | ६ | १ | २ | २ | १ | २ | २ | १६ |
| २) | महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सांगली | ३ | १ | १ | ५ | २ | २ | २ | १६ |
| ३) | [illegible] कॉलेज ऑफ एज्युकेशन, इस्लामपूर. | ४ | १ | १ | ३ | ३ | २ | २ | १६ |
| ४) | कै.मालतीदेवी [illegible] (दादा) पाटील महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय, मिरज. | ५ | १ | १ | ४ | ३ | १ | १ | १६ |
| ५) | बी.एड्. कॉलेज, विटा. | २ | १ | २ | ४ | ३ | २ | २ | १६ |
| | एकूण - | २० | ५ | ७ | १८ | १२ | ९ | ९ | ८० |

परिशिष्ट क्र. ३ मध्ये आजी विद्यार्थी-शिक्षकांची यादी दिलेली आहे.

व पत्ते मिळविले हे विद्यार्थी विविध ठिकाणी विखुरलेले असल्याने यादृच्छिक पद्धतीने निवडणे अशक्य होते म्हणून प्रासंगिक पद्धतीने नमुन्याची निवड केली. संपर्क साधण्याच्यादृष्टीने सोईच्या ठिकाणच्या विद्यार्थ्यांची निवड केली. ( परिशिष्ट क्र. ४ मध्ये माजी विद्यार्थी-शिक्षकांची यादी दिलेली आहे.)

संशोधन साधनाची निवड -

या संशोधनासाठी दोन प्रकारची साधने वापरली आहेत. पाठ-नियोजन मार्गदर्शन पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी निवड केलेली साधने -

१) पाठ मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धती.

२) प्रश्नावली.

या सर्व साधनाची माहिती पुढे देण्यात आलेली आहे.

१) पाठ मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धती -

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत असताना त्यांच्यात जी आंतरक्रिया चालते त्या आंतरक्रियेचे विश्लेषण करण्यासाठी ही गटपद्धती वापरण्यात येते. ही गटपद्धती श्री पुजारी एस.वाय,या संशोधकाने विकसित केलेली आहे. त्यात १९ गट आहेत, त्याची माहिती पुढीलप्रमाणे -

सराव पाठ मार्गदर्शनासाठी उपयुक्त असलेले घटक -

१) शांतता काळ,

२) प्राथमिक माहिती,

३) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान,

४) शैक्षणिक साधनांचा वापर,

५) प्रेरणा व हेतुकथन,

६) विषयज्ञान - कठिण शब्द,म्हणी,वाक्प्रचार,उदाहरणे व दाखले,

७) पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे,

८) अध्यापन-पद्धती - सूत्रे,पायऱ्या,उद्गामी व अवगामी पद्धती कौशल्ये,

९) प्रश्न पद्धती.
१०) शिक्षक माहिती.
११) विद्यार्थी-कृती.
१२) मूल्यमापन.
१३) स्वाध्याय.
१४) फलक लेखन.
१५) प्राध्यापकांची अपेक्षात्मक कृती.
१६) विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद.
१७) मार्गदर्शक-प्राध्यापकांचा होकारात्मक प्रतिसाद.
१८) मार्गदर्शक-प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद.
१९) अन्य.

वरील १९ घटकामध्ये १) हापहिला घटक शांतता काल असेल.२ ते १४ हे घटक प्राध्यापकांच्या रचनात्मक कृती किंवा प्राध्यापकांच्या बोलण्याच्या आशयाविषयीच्या आहेत. १५ वा घटक प्राध्यापकाचा प्रश्न, १६ वा घटक विद्यार्थ्यांचे उत्तर,१७ वा घटक प्राध्यापकाचा होकार व १८ वा घटक प्राध्यापकाचा नकार आहे. १९ वा ` अन्य घटक', यात जे बसत नाही ते सर्व.

वरील सर्व घटकांचे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे-

१) शांतता काल -

छात्राध्यापक पाठ मार्गदर्शन घेण्यासाठी ज्यावेळी प्राध्यापकाकडे जातो. प्राध्यापक पाठ टाचण हातात घेऊन त्याची पाहणी करतात ,त्यावेळी जेवढा कालावधी जातो त्यात शांतता काळ असे म्हणतात.

२)प्राथमिक माहिती -

सराव पाठ मार्गदर्शन देताना सुरवातीस प्राध्यापक छात्राध्यापकास आपला पाठ कोणत्या शाळेवर आहे ? इयत्ता,तुकडी,विषय, घटक - उपघटक, तासिका कोणती आहे ? असे विचारतात. या सर्वांचा समावेश प्राथमिक

माहितीमध्ये होतो.

३) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान -

घटकास व उपघटकास अनुसरून विद्यार्थ्यांचे गृहीत धरलेले पूर्वज्ञान बरोबर आहे का ? नसेल तर कोणते गृहीत धरले पाहिजे, पाठास अनुसरून योग्य पूर्वज्ञान असले पाहिजे याचा समावेश होतो.

४) शैक्षणिक साधनांचा वापर -

पाठास अनुसरून वापरण्यात येणारी शैक्षणिक साधने, ती योग्य आहेत का ? त्यांचा आकार, सर्व वर्गाला दिसेल अशी उठावदार असली पाहिजेत, सराव पाठामधील त्यांचे महत्त्व या सर्व बाबींचा समावेश यामध्ये होतो.

५) प्रेरणा व हेतुकथन -

प्रेरणा हा पाठातील महत्वाचा घटक आहे ( *Well began is half done* ) असे म्हटले जाते. पाठ्यांशास अनुसरून प्रेरणा असली पाहिजे. ती विद्यार्थ्यांचे अवधान वेधून घेणारी असली पाहिजे, चित्र, प्रतिकृती (मॉडेल) पृथ्वीगोल, उदाहरणाव्दारे, प्रश्न विचारून कथनाव्दारे प्रेरणा देता येते. छात्राध्यापकांने दिलेली प्रेरणा पाठास अनुसरून योग्य आहे काय ? नसेल तर कोणत्या प्रकारची प्रेरणा दिली पाहिजे या सर्व बाबींची चर्चा व आपण आज काय शिकणार आहोत हे विद्यार्थ्यांना समजणे आवश्यक असते, त्यासाठी पाठाचा हेतू सुस्पष्ट शब्दात सांगणे यालाच हेतुकथन असे म्हणतात. वरील प्रेरणा व हेतुकथन यांच्या दृष्टीने छात्राध्यापक व पाठ मार्गदर्शक प्राध्यापक यांच्यामधील चर्चेचा समावेश यामध्ये होतो.

६) विषयज्ञान -

विद्यार्थ्यांना आपण जे शिकणार आहोत त्या घटकांचे पृथक्करण करणे, जे पाठ्यमुद्दे टाचणामध्ये लिहिलेले आहेत ते बरोबर आहेत का हे पाहून,

त्या संदर्भात प्राध्यापक छात्राध्यापकांबरोबर चर्चा करतात,त्यामध्ये मार्थेच्या बाबतीत कठिण शब्द,वाक्प्रचार,म्हणी इत्यादि तसेच सर्व विषयांसाठी आवश्यक असणारी उदाहरणे व दाखले या बाबींवर छात्राध्यापक व प्राध्यापक यांच्यात चर्चा होते,त्या सर्व चर्चांचा समावेश यात होतो.

७) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे व स्पष्टीकरणे -

कोणतेही कार्य हे विशिष्ट उद्देशानेच केले जाते ,आपण जे अध्यापन करतो ते विशिष्ट उद्देश डोळ्यासमोर ठेऊनच करतो,छात्राध्यापकांनी पाठाच्या नमूद केलेल्या ( गृहीत ) उद्देशांची चर्चा,मूल्यमापन तंत्रानुसार वर्गाध्यापनाची जी उद्दिष्टे आहेत,ती ( म्हणजे ज्ञान,आकलन,उपयोजन,कौशल्य अभिरुची, अभिवृत्ती व रसग्रहण ) उद्दिष्टे व या उद्दिष्टांची स्पष्टीकरणे यांच्याबाबतच्या माहितीचा समावेश यात केलेला आहे.

८) अध्यापन पद्धती - सूत्रे,पायऱ्या,उद्गामी व अवगामी पद्धती , कौशल्ये --

जो पाठ घेतला जाणार आहे त्यासाठी कोणती अध्यापन-पद्धती वापरलेली आहे,सूत्रांचा ( Maxins) केलेला वापर,उद्गामी व अवगामी पद्धती ( गणिताच्या,बाबतीत ) कौशल्ये किती प्रमाणात वापरलेली आहेत,या संदर्भात दिले गेलेल्या मार्गदर्शनाची माहिती यामध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे.

९) प्रश्न-पद्धती -

मूल्य मापनातील प्रश्नां व्यतिरिक्त छात्राध्यापक शिक्षक कृतीत जे, पाठ्यांशास अनुसरून प्रश्न विचारतो की ज्यामुळे दोन पाठ्यमुद्यांची सांगड घातली जाते,त्या प्रश्नांच्या बाबतीत जी चर्चा केली जाते,तसेच प्रश्नांमुळे विद्यार्थ्यांना पाठात गुंतवून ठेवणे,अवधान वेधणे व नवीन ज्ञान ग्रहण करण्यात प्रवृत्त करणे यासाठी विवेचनातील प्रश्न आवश्यक ठरतात.या प्रश्नांच्या संदर्भातील चर्चा यात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

१०) शिक्षक कृती -

पाठाचे यशापयश हे शिक्षकावरच अवलंबून असते म्हणून शिक्षक कृती महत्त्वाची मानली जाते. शिक्षक वर्गात अध्यापनासाठी गेल्यापासून तो ज्या ज्या कृती करतो त्या सर्वांचा शिक्षक कृतीत समावेश होतो.शिक्षक जो घटक - उपघटक याचे अध्यापन करणार आहे,त्याचा मानसिक आराखडा सुसूत्रपणे तयार झाला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या पूर्वज्ञानावर प्रेरणा दिली आहे काय ? तसेच हेतुकथन सुस्पष्ट शब्दात लिहिले गेलेले आहे काय ? पाठ्यमुद्यास अनुसरून वापरण्यात येणारे दाखले,उदाहरणे,कठिण शब्द त्याचे अर्थ स्पष्ट करणे,वाक्यात उपयोग करून घेणे, हेतुप्रश्न देणे,त्याचे उत्तर स्वीकारून क्रमबध्द स्पष्टीकरण करणे इ.गोष्टी सुयोग्यपणे घडल्या आहेत काय ? स्पष्टीकरण हे उदाहरणे,दाखले यांनी युक्त आहे काय ? हे पाहिले पाहिजे. वेळच्यावेळी कठिण शब्द व वाक्प्रचार स्पष्ट करून ते फलकावर लिहिणे ,अंतिम विधान करून मूल्यमापनातील प्रश्न विचारणे व स्वाध्याय लिहून देणे.या सर्व बाबी क्रमबध्द घडल्या पाहिजेत, याची चर्चा यामध्ये समाविष्ट केलेली आहे.

११) विद्यार्थीकृती -

शिक्षककृतीस अनुसरून विद्यार्थी वर्तन करतात,शिक्षक प्रश्न विचारतात व विद्यार्थी उत्तरे देतात,शिक्षक मॉडेल दाखवितात व विद्यार्थी निरीक्षण करतात, शिक्षक नकाशा दाखवितात व विद्यार्थी नकाशाचे निरीक्षण करतात,शिक्षक व्याख्या विचारतात व विद्यार्थी व्याख्या सांगतात,शिक्षक फलकावरील लेखन लिहून घ्यावयास सांगतात व विद्यार्थी ते लिहून घेतात. याप्रकारे शिक्षक जी कृती करावयास सांगतील ती कृती विद्यार्थी करतात. या सर्वांचा समावेश विद्यार्थी कृतीत होतो.प्राध्यापक व छात्राध्यापक यांच्यामधील या संबंधीच्या चर्चेचा समावेश विद्यार्थी कृतीत करण्यात आलेला आहे.

१२) मूल्यमापन -

ज्या घटकाचे किंवा उपघटकाचे अध्यापन केलेले आहे,तो घटक किंवा उपघटक विद्यार्थ्यांना किती समजलेला आहे हे पडताळून पाहाणे,यालाच मूल्यमापन म्हणतात. मूल्यमापन हे उद्दिष्टानुरूप असले पाहिजे. त्यासाठी मूल्यमापनामध्ये

— किती उद्दिष्टे घेतलेली आहेत, त्या त्या उद्दिष्टाला अनुसरुन प्रश्न विचारलेले आहेत का ? प्रश्नाचा प्रकार कोणता ? तो योग्य अयोग्य या बाबतची चर्चा मूल्यमापनामध्ये केलेली आहे.

१३) स्वाध्याय -

शाळेतून विद्यार्थी घरी गेल्यानंतर शाळेमध्ये शिकलेला भाग घरी त्याने अभ्यासावा. विषयाची त्याला गोडी वाटावी, यासाठी पाठास अनुरूप असा स्वाध्याय देणे आवश्यक असते. छात्राध्यापकाने पाठास अनुसरुन दिलेला स्वाध्याय कितपत बरोबर आहे या संदर्भात प्राध्यापकाने दिलेले मार्गदर्शन स्वाध्याय या घटकात समाविष्ट केलेले आहे.

१४) फलक लेखन -

फळा हा शिक्षकाचा मित्र आहे. जे शब्दांनी व्यक्त करणे अशक्य असते, त्यासाठी फळा उपयुक्त ठरतो. तसेच आकृत्या काढण्यासाठी कठिण शब्द उदाहरणे सोडविण्यासाठी, तुलना करण्यासाठी फळा अत्यंत उपयुक्त ठरतो. छात्राध्यापक पाठ घेत असताना फलकाचा कितपत योग्य वापर करतो लेखन एका सरळ रेषेत केले पाहिजे. -हस्व, दीर्घ दृष्टया अचूक असले पाहिजे व शेवटी सारांश लेखन या संदर्भात प्राध्यापक-छात्राध्यापक यांची चर्चा येथे समाविष्ट करण्यात आलेली आहे.

१५) विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद -

मार्गदर्शक प्राध्यापकाने सराव पाठातील मुद्दयानुसार छात्राध्यापकास जे विविध प्रश्न विचारले त्या त्या मुद्दयाला अनुसरुन छात्राध्यापकाने दिलेली उत्तरे यालाच विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग असे म्हणतात. प्राध्यापक आणि छात्राध्यापक यांच्यामधील वरील स्वरुपात चाललेल्या चर्चेचा यामध्ये समावेश केलेला आहे.

12910

१७) मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद –

सराव पाठामध्ये प्राध्यापकाने उपयोगात आणलेल्या क्लृप्त्या, विचारलेले प्रश्न, उदाहरण व दाखले, कठिण शब्द, वाक्प्रचार व म्हणी, अध्यापनाची सूत्रे, फलक लेखन, मूल्यमापनातील प्रश्न स्वाध्याय यांना संबंधित पाठ मार्गदर्शक प्राध्यापकाने दिलेली मान्यता याला मार्ग दर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद असे म्हणतात. या संदर्भातील मार्गदर्शक प्राध्यापक व छात्राध्यापक यांच्यातील चर्चेचा समावेश यात केलेला आहे.

१८) मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद --

सराव पाठातील मुद्दयांना अनुसरुन छात्राध्यापकाने वापरलेल्या क्लृप्त्या, विचारलेले प्रश्न, सूत्रे, स्वाध्याय मूल्यमापनातील प्रश्न यांना मार्गदर्शक प्राध्यापकाने दिलेला नकार आणि सुचविलेला योग्य बदल यालाच मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद म्हणतात. यात या संदर्भातील पाठ मार्गदर्शक प्राध्यापक व छात्राध्यापक यांच्यातील चर्चेचा समावेश केलेला आहे.

१९) अन्य :

सराव पाठमार्गदर्शन देताना सराव पाठातील मुद्दयांव्यतिरिक्त मार्गदर्शक प्राध्यापक व छात्राध्यापक यांच्यामध्ये जी चर्चा चालते या चर्चेचा समावेश ` अन्य ` या घटकात केलेला आहे.

या गट पद्धतीचा उपयोग सामग्री मिळविण्यासाठी पुढील पद्धतीने केला --

मार्गदर्शनाचे रेकॉर्डिंग (ध्वनिमुद्रण ) केले. ते कागदावर उतरुन काढले. शांतता काळाच्या या प्रकारे खुणा केल्या. प्रत्येक वाक्याचे विश्लेषण केले. फ्लॅंडर्सच्या पद्धतीनुसार १९ घटकांचा मॅट्रिक्स तयार करुन त्याचा विश्लेषणासाठी उपयोग करुन घेतला.

मॅट्रिक्समधील हेतू :

मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना कोणत्या कृती कोणत्या क्रमाने घहतात हे समजून येते. तसेच संबंधित प्राध्यापकाने प्रत्येक घटकास अनुसरुन किती वाक्ये बोलली व एकूण वाक्यांची संख्या किती हे सुद्धा लक्षात येते. विषयानुसार मराठी, हिंदी, इंग्रजी, इतिहास, भूगोल, शास्त्र व गणित यांच्या पाठ मार्गदर्शनाचे एकत्रित मॅट्रिक्स तयार केले. ( परिशिष्ट क्र.५ मध्ये मराठीचे मॅट्रिक्स नमुन्यादाखल दिलेले आहे. )

२) प्रश्नावली --

सराव पाठाचे नियोजन करण्यासाठी वेगवेगळे मार्गदर्शक प्राध्यापक कसे मार्गदर्शन देतात, याची माहिती मिळविण्यासाठी दोन प्रकारच्या प्रश्नावल्या तयार करण्यात आल्या.

१) शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये पाठ-नियोजन-मार्गदर्शन करणाऱ्या प्राध्यापकांसाठी प्रश्नावली.

२) शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये पाठ-नियोजन-मार्गदर्शन घेणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकांसाठी प्रश्नावली.

या प्रश्नावलीमध्ये एकूण प्रश्न अनुक्रमे पंचेचाळीस व बेचाळीस आहेत. सदर प्रश्नावली मधील प्रश्न विषय समान असून, प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या दृष्टिकोनातून फक्त भाषा, रचनेत बदल केलेला आहे. ( परिशिष्ट क्र.६ व ७ मध्ये सदर प्रश्नावल्या अनुक्रमे दिलेल्या आहेत. )

या प्रश्नावलीमध्ये एकूण प्रश्नांपैकी

| | प्राध्यापक | विद्यार्थी-शिक्षक |
|---|---|---|
| बद्ध प्रश्न संख्या - | १४ | १२ |
| मुक्त प्रश्न संख्या - | ३१ | ३० |
| एकूण प्रश्न संख्या- | ४५ | ४२ |

अशा स्वरुपाची आहे.

या पश्नावलीतील प्रश्न पाठ नियोजन मार्गदर्शनाच्या एकूण १३ घटकांशी संबंधित आहेत. मार्गदर्शन घटक व संबंधित प्रश्न संख्या पुढील सारणी क्र.३.२ मध्ये दिलेली आहे -

सारणी क्र.३.२

मार्गदर्शक घटक व संबंधित प्रश्न संख्या

| अ.क्र. | मार्गदर्शक घटक | प्राध्या. प्रश्न संख्या | विद्यार्थी-शिक्षक प्रश्न संख्या |
|---|---|---|---|
| १ | पाठ टाचण तयार करण्यापूर्वी मार्गदर्शन | ३ | ३ |
| २ | पाठ टाचण तयार केल्यानंतर | २ | २ |
| ३ | पूर्वज्ञान | ३ | ३ |
| ४ | प्रेरणा । प्रस्तावना | २ | २ |
| ५ | अध्यापन मुद्दे | ८ | ६ |
| ६ | उद्दिष्टे स्पष्टीकरणे | ३ | ३ |
| ७ | शैक्षणिक साधने | ३ | ३ |
| ८ | शिक्षक कृती | ३ | ३ |
| ९ | विद्यार्थी कृती | १ | १ |
| १० | मूल्यमापन | २ | २ |
| ११ | स्वाध्याय | २ | २ |
| १२ | फलक लेखन | २ | २ |
| १३ | अन्य | ११ | १० |
| | एकूण | ४५ | ४२ |

वरील घटकानुसार प्रश्नावली तयार करून आशयाच्या संदर्भात चार तज्ज्ञांच्याकडून तपासून घेतली (त्यांची नावे परिशिष्ट ९ मध्ये दिलेली आहेत ) त्यांनी तो योग्य असल्याचा निर्वाळा दिल्याने या प्रश्नावलीची आशय सप्रमाणता स्थापित होते.मार्गदर्शकांनी दाखविलेल्या त्रुटी व त्यामधील सुचविलेल्या सुधारणा लक्षात घेऊन संशोधकाने या प्रश्नावलीची पुनर्बांधणी केली.मार्गदर्शक मा.जोशी

ए.एन.यांना दाखवून तिच्या कार्यवाहीची परवानगी घेतली.त्याप्रमाणे पूर्वचाचणी, संस्करण व नंतर तिची निश्चिती केली.

प्रश्नावलीची पूर्वचाचणी -

प्रश्नावलीने आपले इच्छित साध्य होते की नाही हे पाहाण्यासाठी व प्रश्नावलीत काही फेरफार करणे आवश्यक आहेत काय हे ठरविण्यासाठी प्रत्यक्षात प्रश्नावलीचा उपयोग करण्यास सुरुवात करण्यापूर्वी तिची पूर्वचाचणी घेणे आवश्यक असते. म्हणून प्रश्नावलीस अंतिम स्वरूप देण्यापूर्वी हा प्रश्नावलीची पूर्वचाचणी म्हणून एका प्राध्यापक व एका विद्यार्थी-शिक्षकांकडून भरून घेतली आणि प्रश्नावलीतील प्रश्न आकलनाच्यादृष्टीने नि:संदिग्ध असल्याबद्दलची खात्री करून घेतली.या प्रश्नावलीमध्ये पाठ नियोजन मार्गदर्शन पध्दतीचा अभ्यास होण्याच्या दृष्टीने प्राध्यापकांची व विद्यार्थीशिक्षकांची व्यक्तिगत सर्वसाधारण माहिती विचारली.त्यामध्ये व्यक्तीचे नाव,शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे नाव,राहण्याचा पत्ता,शैक्षणिक पात्रता,इतर पात्रता,प्राध्यापकांचा शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील अनुभव,त्यांच्या व विद्यार्थी-शिक्षकांच्या अध्यापन पद्धती तसेच प्राध्यापकांचा पाठ नियोजनाचे मार्गदर्शन देत असलेला विषय इत्यादि माहिती विचारली.

त्याचप्रमाणे प्रश्नावली भरण्यापूर्वी प्राध्यापक,विद्यार्थीशिक्षकांना मार्गदर्शक ठरणाऱ्या सूचनांचा समावेश केला.सदर प्रश्नावली सोबत सुरुवातीला प्रश्नावलीचा व संशोधनाचा हेतू असणारे आणि प्रतिवेदकांनी दिलेल्या माहितीसंबंधी सर्वस्वी गुप्तता राखण्याविषयी व केवळ तिचा संशोधन कार्यासाठीच उपयोग करण्याचे आश्वासन देणारे पत्र तयार केले.

वरील सर्व लेखन व्याकरणदृष्ट्या व शुद्धलेखनदृष्ट्या योग्य आहे की नाही हे पाहून योग्य तेथे बदल केले.त्यानंतर ही प्रश्नावली सांगली जिल्ह्यातील पाच प्राध्यापकांना दिली व त्यांच्या प्रतिसादावरून देखील ती योग्य आहे असे दिसून आले.

प्रश्नावलीचे संस्करण -

पूर्व चाचणीनंतर प्रश्नावलीचे संस्करण करावे लागले,प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाची काळजीपूर्वक तपासणी झाली आहे याची शहानिशा संस्करणात करून घेतली आहे.

पाठमार्गदर्शक प्राध्यापकांकडून पूर्ण विचारांती उत्तरे मिळावीत त्यांच्या उत्तरांबाबत अधिकात अधिक स्वातंत्र्य मिळावे म्हणून काही मुक्त व बध्द प्रश्नांचा समावेश केला.

प्रश्नावलीमध्ये काही तांत्रिक स्वरूपाचे दोष राहिले आहेत काय याची खात्री करून घेण्यासाठी प्रश्नावलीतील प्रत्येक प्रश्नाची काळजीपूर्वक तपासणी केली. प्रत्येक प्रश्नाचे संस्करण करून घेतले. प्रश्नाचा आशय,प्रश्नांचे स्वरूप,प्रश्नांचाक्रम, प्रश्नांमधील अंतर व प्रश्नांची रचना इत्यादि बाबी तपासून घेतल्या.तसेच ही प्रश्नावली व्याकरणदृष्ट्या व शुद्धलेखनदृष्ट्या योग्य आहे की नाही हे पाहून पुन्हा तपासून त्यानुसार बदल करण्यात आले.

ही प्रश्नावली स्वयं प्रशासित करता येण्यासारखी आहे,तसेच मुलाखतीसाठी देखील या प्रश्नावलीचा वापर करता येईल.यानंतर प्रश्नावलीची पहिली चाचणी सांगली जिल्हातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन-पद्धतीच्या पाच प्राध्यापकांना देण्यात आली,ती सोडविताना त्यांना कोणतीच अडचण येत नसल्याचे सांगितल्याने नंतर विद्यार्थी-शिक्षक,अन्य प्राध्यापक व अन्य जिल्हातील महाविद्यालयांमध्ये प्रश्नावल्या देण्यात आल्या.

संशोधनाची कार्यवाही -

१) प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाचे निरीक्षण -

सुरवातीला सांगली जिल्हातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राचार्यांची भेट घेतली. संशोधिकेने आपला परिचय करून दिला. भेट घेण्याचा व संशोधनाचा हेतू सांगितला.प्रत्यक्ष भेटीतच विनंती पत्रे दिली व आपल्या महाविद्यालयातील पाठ नियोजनाचे मार्गदर्शन करणाऱ्या मार्गदर्शक प्राध्यापकांचे पाठ नियोजनाचे मार्गदर्शन करत असता त्यांचे ध्वनिमुद्रण करण्याची परवानगी घेतली

मा.प्राचार्यांच्या परवानगीनंतर प्रत्येक प्राध्यापकांचा परिचय करुन घेतला. या परिचयामध्ये संशोधन विषयाचे स्वरुप स्पष्ट केले. पाठ-नियोजन-मार्गदर्शन-पद्धतीच्या अभ्यासासाठी संशोधिकेने मार्गदर्शन करत असता मार्गदर्शनाच्या ध्वनिमुद्रणासाठी त्यांच्या समयोचित मार्गदर्शनाची व सहकार्यांची अपेक्षा व्यक्त केली.

त्यानंतर प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सराव पाठाचे नियोजन करणा-या प्राध्यापककांकडून पाठाच्या तारखा घेतल्या. त्याप्रमाणे प्रत्येक महाविद्यालयातील प्रत्येक अध्यापनपद्धतीच्या पाठनियोजनाच्या मार्गदर्शक प्राध्यापकांकडून ध्वनिमुद्रणासाठी तारखा निश्चित केल्या,अशाप्रकारे प्रथम प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील पाठ-नियोजन-मार्गदर्शनाचे ध्वनिमुद्रण केले.

ध्वनिमुद्रित केलेले पाठ मार्गदर्शक कागदावर उतरुन काढले व त्याचे पाठ मार्गदर्शन विश्लेषणाच्या गट पद्धतीच्या सहाय्याने विश्लेषण केले. या विश्लेषणावरुन प्रत्येक प्राध्यापकांच्या पाठ नियोजन मार्गदर्शनाचे सारणी तक्ते (मॅट्रिक्स ) तयार केले.

यानंतर पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मार्गदर्शक,प्राध्यापकांच्या विषयवार याद्या केल्या,त्या सात विषयांच्या - मराठी,हिंदी,इंग्रजी,इतिहास, भूगोल, शास्त्र व गणित याप्रमाणे ,एका विषयाच्या पाच ते सहा प्राध्यापकांच्या पाठ मार्गदर्शनाच्या मॅट्रिक्सवरुन एकात्मिक मॅट्रिक्स तयार केले. ते सात विषयांचे - सात मॅट्रिक्स तयार झाले. या मॅट्रिक्सवरुन पाठनियोजन मार्गदर्शन पद्धतीचे विषयवार निष्कर्ष काढले.

वरील मराठी,हिंदी,इंग्रजी,इतिहास,भूगोल,शास्त्र व गणित विषयांच्या मॅट्रिक्सवरुन फ्लॅंडरच्या तंत्रानुसार प्रवाह तक्ते ( फ्लो चार्टस् ) तयार केले व फ्लो चार्टस वरुन मार्गदर्शन चक्रे तयार केली. या चक्रावरुन सात विषयांच्या अध्यापनपद्धतीच्या पाठनियोजन मार्गदर्शन पद्धतीचे निष्कर्ष काढले.

२) प्रश्नावलीचे वितरण व संग्रहण -

तसेच संशोधन साधनांमधील तयार केलेली प्रश्नावली शिवाजी विद्यापीठातील सांगली जिल्हाबाहेरील सर्व शिक्षणशास्त्र-महाविद्यालयातील प्राध्यापकांना पोस्टाने पाठविली. त्याचप्रमाणे सांगली जिल्हातील पाच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रत्यक्ष जाऊन प्रश्नावली दिली व ती भरून देण्याची विनंती केली. त्याचप्रमाणे त्याचवेळी त्याच शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील विद्यार्थी-शिक्षकांचा प्राध्यापकांकडून परिचय करून घेतला व १० टक्के विद्यार्थी-शिक्षकांना प्रश्नावली भरून देण्याचे आवाहन केले. साधारणत: १५ दिवसांनी त्या प्रश्नावल्या मिळाव्यात अशी विनंती केली.

यावेळी सदर कार्यानंतर त्या त्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या कार्यालयामधून माजी विद्यार्थी-शिक्षक (सन १९९१-९२) यादीतून संशोधिकेच्या जवळच्या परिसरातील विद्यार्थी-शिक्षकांची नावे, पत्ते घेतले. या विद्यार्थी-शिक्षकांना हस्ते, परहस्ते परिचितांकडून प्रश्नावल्या पोहोचविल्या.

साधारणत: १५ दिवसांच्या दरम्यान प्रत्येक महाविद्यालयाकडे प्रश्नावली नेण्यास येत असल्याची निश्चित तारीख कळविली. त्याप्रमाणे प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये प्रश्नावल्या भरून झाल्या आहेत का पाहण्यास गेले. ८० टक्के प्रश्नावल्या भरलेल्या मिळाल्या. उरलेल्या प्रश्नावल्याकरता पोस्टेज खर्च व २ ते ३ वेळा स्मरणपत्रे पाठविली. प्रश्नावल्या मिळाल्या नाहीत. तेव्हा प्रत्यक्ष पुन्हा भेट घेऊन स्वत:च्या उपस्थितीत संशोधिकेने त्या भरून घेतल्या. त्यामुळे त्याला मुलाखतीचे स्वरूप आले. या पद्धतीने २० टक्के प्रश्नावल्या भरून घेतल्या. अशारीतीने सांगली जिल्हातील १०० टक्के पाठ मार्गदर्शकांच्या प्रश्नावल्या मिळविल्या.

आजी छात्राध्यापकांच्या प्रश्नावल्या प्रत्येक शिक्षणशास्त्र-महाविद्यालयामध्ये १० टक्के प्रमाणे प्राप्त झाल्या. तसेच माजी छात्राध्यापकांच्याही प्रत्यक्ष हस्ते व परहस्ते पाच टक्के प्रमाणे प्रश्नावल्या प्राप्त झाल्या.

सांगली जिल्हाबाहेरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मार्गदर्शक प्राध्यापकांच्याजवळ जवळ ३७ टक्के प्रश्नावल्या पोस्टाद्वारे प्राप्त झाल्या.सदर प्रश्नावल्या मिळण्याचे काम सप्टेंबर,१९९३ अखेर पूर्ण झाले. त्यानंतर तिथे विश्लेषण,निरीक्षण व निष्कर्ष तयार केले.

या आधार सामग्रीचे संग्रहण ही संशोधन कार्यातील महत्त्वाची पायरी असून तत्पूर्वी संशोधिकेला मोठ्या प्रमाणात पूर्व तयारी करावी लागली.

या संबंधीच्या कार्यवाहीची थोडक्यात रुपरेषा सारणी क्र.३.३ मध्ये दिली आहे.

सारणी क्र.३.३

संशोधनाची रुपरेषा दाखविणारा तक्ता --

| अ.क्र. | कृती | सर्व साधारण दिनांक |
|---|---|---|
| १ | पूर्व तयारी | जानेवारी,१९९२ |
| २ | पाठाचे ध्वनिमुद्रण, चर्चा | जुलै,१९९२ |
| ३ | ध्वनिमुद्रण करणे | ऑगस्ट १९९२ ते डिसेंबर १९९२ |
| ४ | ध्वनिमुद्रण लिहून काढणे | ऑगस्ट १९९२ ते डिसेंबर १९९२ |
| ५ | मॅट्रिक्स व प्रवाह तक्ते | जानेवारी १९९३ ते फेब्रुवारी १९९३ |
| ६ | प्रश्नावली तयार करणे | जानेवारी १९९३ ते फेब्रुवारी,१९९३. |
| ७ | प्रश्नावली पाठविणे,प्रत्यक्ष देणे व मिळविणे. | मार्च १९९३ ते मे १९९३. |

वरील कार्यवाहीनुसार प्राप्त झालेली साधनसामुग्री पुढील प्रमाणे :--

१) मॅट्रिक्स - ७.
२) प्रवाह तक्ते - ७.
३) प्राध्यापकांच्या प्रश्नावल्या - ९५.
४) विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रश्नावल्या. - ६०.

या प्राप्त झालेल्या सर्व सामग्रीचे निरीक्षण व अर्थनिर्वचन पुढील प्रकरण क्र.४ मध्ये केलेले आहे.

त्याचप्रमाणे वरील सर्व सामग्रीच्या आधारे मराठी पाठ नियोजन मार्गदर्शनाचे जे निष्कर्ष आले त्यावर मराठी पाठ मार्गदर्शन करणाऱ्या अनुभवी व तज्ज्ञ प्राध्यापकांशी प्रत्यक्ष चर्चा केली ( त्यांची यादी परिशिष्ट क्र.८ मध्ये दिलेली आहे. )

या सर्व कार्यवाही नंतर मराठी पाठ मार्गदर्शनाची पद्धती व तत्त्वे निश्चित करण्यात आली.

# प्रकरण चौथे

## सामग्रीचे विश्लेषण आणि अर्थबोधन

### विभाग पहिला

**प्रस्तावना -**

मागील प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन कार्याच्या मिळालेल्या सर्व सामग्रीचे विश्लेषण व परीक्षण करून त्याचा अन्वयार्थ लावणे हा प्रस्तुत प्रकरणाचा हेतू आहे. प्रकरण क्रमांक एकचा संदर्भ घेतल्यानंतर आपणास या अभ्यास प्रकल्पाची उद्दिष्टे लक्षात येतात. ही संबंधित उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) मराठी व अन्य पद्धतीचे मार्गदर्शन कसे केले जाते, त्यांचा शोध घेणे.

२) मराठी मार्गदर्शन व अन्य विषयांसाठी मार्गदर्शनाची पद्धती यांची तुलना करणे.

३) मराठी अध्यापन मार्गदर्शनाची पद्धती निश्चित करणे.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणाची तीन विभागात विभागणी केली आहे ते असे --

१) मराठी व अन्य पद्धतीचे पाठ मार्गदर्शन

२) मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य पाठ मार्गदर्शन तुलना

३) परिणामकारक मराठी पाठ मार्गदर्शन पद्धतीची स्वरूप निश्चिती.

## विभाग-१.१ : मराठी व अन्य पद्धतीचे पाठ मार्गदर्शन -

( निरीक्षणातील घटकांच्या टक्केवारी वरुन )

सराव पाठास प्राध्यापक कशा पद्धतीने मार्गदर्शन देतात याचा शोध घेण्यासाठी सांगली जिल्ह्यातील एकूण ५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचे मार्गदर्शन प्रत्यक्षात कल्पना देऊन ध्वनिमुद्रित करुन घेतले व ते कागदावर उतरुन काढले. त्याचे विश्लेषण करुन त्यावरुन विषयवार एकत्रित मॅट्रिक्स तयार केले, ही मॅट्रिक्स फ्लॅन्डर्सच्या आंतरक्रिया विश्लेषण पद्धतीनुसार करण्यात आली व पाठ मार्गदर्शन विश्लेषण भट पद्धतीच्या १९ घटकांची टक्केवारी काढण्यात आली.

मराठी मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्र.४.१ मध्ये देण्यात आलेली आहे.

सारणी क्र. ४.१

विषय : मराठी पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतूकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पद्धती | प्रश्न पद्धती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक अध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ५ | ३८ | २२ | ३५ | ७१ | १७६ | ११६ | ४० | ४६ | ११४ | ३६ | १०९ | ३४ | ५० | १३१ | ४०४ | २२३ | ६२ | ९ |
| टक्केवारी | ०.२९ | २ | १.२७ | २.०३ | ४.१२ | १०.२२ | ६.७४ | २.३२ | २.६७ | ६.६२ | २.०९ | ६.३३ | १.९७ | २.९ | ७.६१ | २३.४७ | १२.९५ | ३.६ | ०.५२ |

निरीक्षण व अर्थ निर्वचन :

मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धतीस १ ते १४ घटक हे ` कशाविषयी ` मार्गदर्शन दिले जाते याच्याशी निगडित आहेत.

१) त्यांचे निरीक्षण केले असता असे दिसते की पाठ मार्गदर्शन करताना मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक सर्वात जास्त १०.२२ टक्के चर्चा` क्रियाज्ञाना` ची करतात.

२) या घटका खालोखाल पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (६.७४ टक्के ) ,शिक्षक-कृती (६.६२ टक्के ) व मूल्यमापन (६.३३ टक्के ) याचा क्रम येतो.

३) तसेच पूर्वज्ञान (१.२७ टक्के ) व स्वाध्याय (१.५४ टक्के ) यावर तुलनेने कमी चर्चा केली जाते.

मार्गदर्शन विश्लेषण गट पद्धती १५ ते १८ घटक हे मार्गदर्शक व विद्यार्थी-शिक्षक यांच्यातील आंतरक्रियेशी संबंधित आहेत, त्याचे निरीक्षण करता असे दिसते की --

४) मराठी पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद सर्वात जास्त घेतात (२३.४७ टक्के )

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकांची अपेक्षात्मक कृतीचे प्रमाण (७.६१ टक्के ) येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण (१२.९५ टक्के ) तर नकारात्मक प्रतिसाद (३.६७ टक्के )इतका आहे.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक -

१) विषयज्ञानावर अधिक चर्चा करतात. त्यानंतर पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, शिक्षक कृती, मूल्यमापन यावर भर देतात. पूर्वज्ञान व स्वाध्याय या घटकाकडे दुर्लक्ष करतात.

२) मार्गदर्शन काळात अपेक्षात्मक कृतीद्वारे विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतात व त्यावर होकारात्मक प्रतिसाद देतात.

हिंदी पाठ मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्रमांक ४.२ मध्ये देण्यात आलेली आहे.

सारणी क्र. ४.३

विषय : हिंदी पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ६ | ४२ | ३२ | २२ | ९० | १२४ | १३४ | ४२ | ३२ | ८६ | ४५ | ९१ | २५ | २७ | १८१ | ३४३ | १४१ | ६६ | ८ |
| टक्केवारी | ०.३ | २.७ | २.० | १.४ | ५.८ | ८.० | ८.७ | २.७ | २.० | ५.५ | २.९ | ५.९ | १.६ | १.७ | ११.७ | २२.३ | ९.१ | ४.२ | ०.५ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१ ते १४ घटकांचे निरीक्षण केले असता असे दिसते की ,

१) पाठ मार्गदर्शन करताना हिंदी अध्यापन-पद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक सर्वात जास्त चर्चा पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (८.७ टक्के ) व विषयज्ञान (८.०० टक्के )यावर करतात.

२) यानंतर मूल्यमापन (५.९ टक्के ), प्रेरणा व हेतुकथन (५.८ टक्के ) व शिक्षक कृती (५.५ टक्के ) यांचा क्रम येतो.

३) तर शैक्षणिक साधनांचा वापर (१.४ टक्के ),स्वाध्याय (१.६ टक्के ) व फलक लेखन (१.७ टक्के ) यावर कमी चर्चा होते.

१५ ते १८ या आंतरक्रिया घटकांचे निरीक्षण करता असे दिसते की --

४) हिंदी पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा सर्वात जास्त प्रतिसाद (२२.३ टक्के ) घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृतीचे प्रमाण (११.७ टक्के ) येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापकाच्या होकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण (९.१ टक्के ) तर नकारात्मक प्रतिसाद (४.२ टक्के ) इतका आहे.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक --

१) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे व विषयज्ञान या घटकांवर अधिक चर्चा करतात,त्यानंतर मूल्यमापन, प्रेरणा व हेतुकथन व शिक्षककृती यावर भर दिला जातो.

२) शैक्षणिक साधनांचा वापर, स्वाध्याय व फलक लेखन या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शन काळात अपेक्षात्मक कृतीव्दारे विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतात व त्याला होकारात्मक प्रतिसाद देतात.

इंग्रजी मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्र.४.३ मध्ये देण्यात आलेली आहे.

सारणी क्र. ४.३

विषय : इंग्रजी पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व उद्बोधन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरण | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ६ | २९ | ९ | ११ | ३४ | १५४ | ४७ | ७ | ३९ | ९७ | ११ | ६६ | ३७ | ९ | १५९ | ३७७ | १२९ | १०८ | ८ |
| टक्केवारी | ०.४४ | २.१६ | ०.६७ | ०.८२ | २.५३ | ११.४९ | ३.५ | ०.५२ | २.९१ | ७.२३ | १.०४ | ४.९२ | २.७६ | ०.६७ | ११.८६ | २८.१३ | ९.६२ | ८.०५ | ०.५९ |

65

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

मार्गदर्शन विश्लेषण मट पद्धतीत १ ते १४ घटक हे ` कशाविषयी मार्गदर्शन दिले जाते याच्याशी निगडित आहेत.

१) त्यांचे निरीक्षण केले असता असे दिसते की पाठ मार्गदर्शन करताना इंग्रजी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शन विषयज्ञान (११.४९ टक्के ) या घटकाची सर्वात जास्त चर्चा करतात.

२) या घटका-खालोखाल शिक्षक कृती (७.२३ टक्के ) व मूल्यमापन (४.९२ टक्के ) यांचा क्रम येतो.

३) तर विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (०.६७ टक्के ) शैक्षणिक साधनांचा वापर (०.८२ टक्के ), अध्यापन-पद्धती (०.५२ टक्के ), विद्यार्थी कृती (१.०४ टक्के ) आणि फलक लेखन (०.६७ टक्के ) यावर चर्चा कमी होते.

१५ ते १८ आंतरक्रिया घटकांचे निरीक्षण करता असे दिसते की,

४) इंग्रजी पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (२८.१३ टक्के ) सर्वात जास्त घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (११.८६ टक्के ) या घटकाचे प्रमाण येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापकाच्या होकारात्मक प्रतिसादाचे (९.६२ टक्के ) तर नकारात्मक प्रतिसादाचे (८.०५ टक्के ) प्रमाण येते.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन करताना प्राध्यापक --

१) विषयज्ञान या घटकावर अधिक चर्चा करतात, त्यानंतर शिक्षक कृती व मूल्यमापन यावर भर दिला जातो.

२) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, शैक्षणिक साधनांचा वापर, अध्यापन-पद्धती, विद्यार्थी कृती आणि फलक लेखन या घटकाकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शनाच्या काळात अपेक्षात्मक कृतीव्दारे विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतात व त्याला होकारात्मक प्रतिसाद देतात.

इतिहास पाठ मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्रमांक ४.४ मध्ये देण्यात आलेली आहे.

सारणी क्र. ४.४

विषय : इतिहास पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व [illegible] | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पद्धती | प्रश्न पद्धती | प्रात्यक्षिक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ५ | ६० | २१ | २६ | ६७ | ३५० | ८३ | २७ | ७० | १९१ | ३४ | ६३ | २७ | २४ | १६० | ४०१ | १३४ | ४३ | १० |
| टक्केवारी | ०.२७ | ३.३५ | १.१७ | १.४५ | ३.७४ | १९.५५ | ४.६३ | १.५ | ३.९ | १०.६१ | १.८९ | ३.५१ | १.१७ | १.३४ | ८.९३ | २२.४ | ७.४८ | २.४ | ०.५ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१ ते १४ घटकांचे निरीक्षण केले असता असे दिसते की,

१) पाठ मार्गदर्शन करताना इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विषयज्ञान (१९.५५ टक्के ) या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात.

२) या घटकाच्या खालोखाल शिक्षक कृती (१०.६१ टक्के ) व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (४.६३ टक्के ) यांचा क्रम येतो.

३) तर विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (१.१७ टक्के ), शैक्षणिक साधनांचा वापर (१.४५ टक्के ), अध्यापन-पद्धती (१.५० टक्के ), विद्यार्थी कृती (१.८९ टक्के ), स्वाध्याय (१.१७ टक्के ), फलकलेखन (१.१४ टक्के ) या घटकांवर तुलनेने कमी चर्चा होते.

१५ ते १८ घटकांचे निरीक्षण करता असे दिसते की --

४) इतिहास पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (२२.४ टक्के ) सर्वात जास्त घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकांची अपेक्षात्मक कृती (८.९३ टक्के ) या घटकाचे प्रमाण येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापकाच्या होकारात्मक प्रतिसादाचे (७.४८ टक्के ) प्रमाण आहे.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक --

१) विषयज्ञान या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात,त्यानंतर शिक्षक कृती व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर भर दिला जातो.

२) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान,शैक्षणिक साधनांचा वापर,अध्यापन-पद्धती, विद्यार्थी कृती,स्वाध्याय,फलक लेखन या घटकाकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शनाच्या कामात अपेक्षात्मक कृतीद्वारे विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतात व त्याला प्राध्यापक पूर्ण होकारात्मक प्रतिसाद देतात.

भूगोल पाठ मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्रमांक ४.५ मध्ये देण्यात आलेली आहे.

सारणी क्र. ४.१

विषय : भूगोल पाठ मार्गदर्शन घटकांची टक्केवारी

| घटक → | श्रांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व हेतुकथन | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पद्धती | प्रश्न पद्धती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ५ | २७ | २६ | ५३ | ४२ | १३७ | ११४ | २० | ६३ | १५६ | २८ | ११३ | ३१ | ६७ | २१५ | ४९७ | २०८ | ७१ | १० |
| टक्केवारी | ०.२६ | १.४३ | १.३८ | २.८१ | २.२३ | ७.२७ | ६.०५ | १.०६ | ३.३४ | ८.२८ | १.४८ | ६.० | १.६४ | ३.५५ | ११.४१ | २६.३९ | ११.०४ | ३.७७ | ०.५३ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१ ते १४ घटकांचे निरीक्षण केले असता असे दिसते की ---

१) पाठ मार्गदर्शन करताना भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृती (८.२८ टक्के ) या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात.

२) या घटकाच्या खालोखाल क्रियाज्ञान (७.२७ टक्के ), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (६.०५ टक्के ) आणि मूल्यमापन (६.०० टक्के ) यांचा क्रम येतो.

३) तर प्राथमिक माहिती (१.४३ टक्के ), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (१.३३ टक्के) अध्यापनपद्धती (१.०६ टक्के ), विद्यार्थी कृती (१.४८ टक्के ) व स्वाध्याय (१.६४ टक्के ) या घटकावर तुलनेने कमी चर्चा होते.

१५ ते १८ घटकाचे निरीक्षण करता असे दिसते की ---

४) भूगोल पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक,विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (२६.३९ टक्के ) सर्वात जास्त घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (११.४१ टक्के ) व प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (११.०४ टक्के ) या घटकांचे प्रमाण येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापकाच्या होकारात्मक प्रतिसादाचे (११.०४ टक्के ) व नकारात्मक प्रतिसादाचे (३.७७ टक्के ) प्रमाण आहे.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक ---

१) शिक्षक कृती या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात,त्यानंतर क्रियाज्ञान,पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे,मूल्यमापन या घटकांवर भर दिला जातो.

२) प्राथमिक माहिती विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान,अध्यापन पद्धती,विद्यार्थी कृती व स्वाध्याय या घटकाकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शनाच्या काळात ज्या प्रमाणात अपेक्षात्मक कृतीव्दारे विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतला जातो त्याच प्रमाणात पूर्ण होकारात्मक प्रतिसाद देतात.

शास्त्र मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्रमांक ४.६ मध्ये देण्यात आलेली आहे.

## सारणी क्र. ४.६

### विषय : शास्त्र पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ५ | २८ | २६ | ७६ | १५३ | २०७ | १०८ | ६१ | ८८ | २४९ | ५६ | ८९ | ३० | ५५ | ११७ | ४४४ | १५२ | ८४ | ८ |
| टक्केवारी | ०.२४ | १.३७ | १.२७ | ३.७३ | ७.५ | १०.१६ | ५.३ | २.९९ | ४.३२ | १२.२ | २.९९ | ४.३७ | १.४७ | २.७ | ५.१४ | २१.८ | ७.४६ | ४.१२ | ०.३९ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१ ते १४ घटकाचे निरीक्षण केले असता असे दिसते की ---

१) पाठ मार्गदर्शन करताना शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृती (१२.२ टक्के ) या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात.

२) या घटकाच्या खालोखाल विषयज्ञान (१०.१६ टक्के ) प्रेरणा व हेतुकथन (७.५ टक्के ) पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (५.३ टक्के ) यांचा क्रम येतो.

३) तर प्राथमिक माहिती (१.३७ टक्के ), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (१.२७ टक्के), स्वाध्याय (१.४७ टक्के ) या घटकावर तुलनेने कमी चर्चा होते.

१५ ते १८ घटकांचे निरीक्षण करता असे दिसते की ---

४) शास्त्र-पाठ-मार्गदर्शन देताना प्राध्यापक,विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (२१.८ टक्के ) सर्वांत जास्त घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (७.४६ टक्के ) या घटकाचे प्रमाण येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादाकरिता मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (५.१४ टक्के ) या घटकाचे प्रमाण तर प्राध्यापकाच्या नकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण (४.१२ टक्के ) आहे.

निष्कर्ष :

शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक --

१) शिक्षक कृती या घटकावर सर्वात जास्त चर्चा करतात,त्यानंतर विषयज्ञान,प्रेरणा व हेतुकथन,पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकांवर भर दिला जातो.

२) प्राथमिक माहिती,विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान व स्वाध्याय या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शनाच्या काळात अपेक्षात्मक कृती पेक्षा अधिक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतला जातो व त्यावर प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद देतात.

गणित मार्गदर्शनाच्या १९ घटकांची टक्केवारी सारणी क्रमांक ४.७ मध्ये देण्यात आलेली आहे.

## सारणी क्र. ४.७

### विषय : गणितातील पाठ मार्गदर्शन घटकाची टक्केवारी

| घटक → | शांतता काळ | प्राथमिक माहिती | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान | शैक्षणिक साधनांचा वापर | प्रेरणा व [illegible] | विषयज्ञान | पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | अध्यापन पध्दती | प्रश्न पध्दती | शिक्षक कृती | विद्यार्थी कृती | मूल्यमापन | स्वाध्याय | फलक लेखन | मार्गदर्शक प्राध्यापक अपेक्षात्मक कृती | विद्यार्थी प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापक नकारात्मक प्रतिसाद | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. | ८. | ९. | १०. | ११. | १२. | १३. | १४. | १५. | १६. | १७. | १८. | १९. |
| एकूण घटक वाक्ये | ६ | २१ | १५ | २१ | १५५ | २१५ | ९१ | ५४ | १०० | २२६ | ६१ | १०७ | २५ | ४१ | १९७ | ५६७ | २०५ | १०२ | ९ |
| टक्केवारी | ०.२ | १.१ | ०.८ | ०.९ | ७.१ | ९.७ | ४.० | २.४ | ४.४ | १०.१ | २.७ | ४.७ | १.१ | १.८ | ८.८ | २५.३ | ९.१ | ४.५ | ०.४ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१ ते १४ घटकांचे निरीक्षण केले असता असे दिसते की ---

१) पाठ मार्गदर्शन करताना गणित अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृती (१०.१ टक्के ) व क्रियायज्ञान (९.७ टक्के ) या घटकांवर सर्वात जास्त चर्चा करतात.

२) या घटकांच्या खालोखाल प्रेरणा व हेतुकथन (७.१ टक्के ) मूल्यमापन (४.७ टक्के ), प्रश्न पद्धती (४.४ टक्के ) व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे ( ४.० टक्के ) या घटकांचा क्रम येतो.

३) तर प्राथमिक माहिती (१.१ टक्के ), विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान (०.८ टक्के ), शैक्षणिक साधनांचा वापर (०.१ टक्के ), स्वाध्याय (१.१ टक्के ) व फलक लेखन (१.८ टक्के ) या घटकांवर तुलनेने कमी चर्चा होते.

१५ ते १८ घटकांचे निरीक्षण करता असे दिसते की ---

४) गणित पाठ मार्गदर्शन देताना प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद (२५.३ टक्के ) सर्वात जास्त घेतात.

५) या घटकाच्या खालोखाल प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद (९.१ टक्के ) या घटकांचे प्रमाण येते.

६) विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादाकरिता मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (८.८ टक्के ) या घटकाचे प्रमाण तर प्राध्यापकाच्या नकारात्मक प्रतिसादाचे प्रमाण (४.५ टक्के ) येते.

निष्कर्ष :

गणित अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन करताना प्राध्यापक --

१) शिक्षक कृती व क्रियायज्ञान या घटकांवर सर्वात जास्त चर्चा करतात. त्यानंतर प्रेरणा व हेतुकथन, मूल्यमापन, प्रश्नपद्धती व पाठाचा

सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकांवर भर देतात.

२) प्राथमिक माहिती, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान, शैक्षणिक साधनांचा वापर, स्वाध्याय व फलक लेखन या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

३) मार्गदर्शनाच्या काळात अपेक्षात्मक कृतीपेक्षा अधिक विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद घेतला जातो व त्यावर प्राध्यापक होकारात्मक प्रतिसाद देतात.

## विभाग ४.२ : एकत्रित प्रवाह तक्ते

सराव पाठास प्राध्यापकाव्दारे कशाप्रकारे मार्गदर्शन दिले जाते याचा शोध घेण्यासाठी घटकानुसार प्रत्येक विषयाच्या प्राध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार एकत्रित सारणी तक्ते (मॅट्रिक्स ) तयार केले. त्यानंतर सात विषयांचे सात प्रवाह तक्ते तयार केले. हे तक्ते तयार करताना फ्लॅन्डर्सच्या नियमाप्रमाणे मॅट्रिक्स मधील एक टक्का व त्यापेक्षा कमी वारंवारिता सोडून देण्यात आली.

एकत्रित प्रवाह तक्त्यावरुन प्रामुख्याने प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना त्यांच्या कोणत्या कृती कोणत्या क्रमाने घडतात हे समजण्यासाठी होतो. शिवाय मार्गदर्शनाच्या काळात घडणारी कृतीची चक्रे स्पष्ट होण्यास मदत होते.

### पाठ मार्गदर्शन चक्र :

पाठ मार्गदर्शनाच्या कोणत्या कृती कोणत्या क्रमाने घडतात याचे चित्र स्पष्ट करणा-या चक्रास पाठ मार्गदर्शन चक्र असे म्हणतात.

पाठ मार्गदर्शन चक्राचे दहा प्रकार दिसून आले, ते पुढीलप्रमाणे :---

१) पूर्ण होकारात्मक/ नकारात्मक चक्र.
२) पूर्ण होकारात्मक मोठे चक्र.
३) पूर्ण नकारात्मक मोठे चक्र.
४) पूर्ण होकारात्मक लहान चक्र.
५) पूर्ण नकारात्मक लहान चक्र.
६) अपूर्ण होकारात्मक / नकारात्मक मोठे चक्र.
७) अपूर्ण होकारात्मक मोठे चक्र.
८) अपूर्ण नकारात्मक मोठे चक्र.
९) अपूर्ण होकारात्मक लहान चक्र.
१०) अपूर्ण नकारात्मक लहान चक्र.

या चक्रांचे वर्णन थोडक्यात पुढे दिलेले आहे.

पूर्ण चक्र होकारात्मक /नकारात्मक मोठे चक्र --

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलकलेखन (१ ते १४ घटक ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन (चर्चा ) देत असताना त्या घटकाशी अनुसरुन असलेले घटक १५,१६,१७,१८ अशी क्रमबध्द चर्चा करुन पुन्हा रचनात्मक कृतीतील संबंधित घटकापर्यन्त पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आले की,त्यानी एक चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१)

१ ते १४ - १५ - १६ - १७ - १८.

(२) ५ -- १५ - १६ - १७ - १८ - ५

पूर्ण चक्राचे दोन प्रकार केलेले आहेत.

१) पूर्ण होकारात्मक मोठे चक्र --

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलक लेखन (१ ते १४ )या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन (चर्चा ) देत असताना त्या घटकाला अनुसरुन घटक क्र.१५,१६,१७ अशी क्रमबद्ध चर्चा करीत परत (रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे.) त्या घटकापर्यन्त मार्गदर्शक प्राध्यापक आले की त्यांनी एक होकारात्मक चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा. (१) १ ते १४ - १५ - १६ - १७.

१ ते १४ रचनात्मक कृतीतील घटक → प्रा.अपेक्षात्मक कृती → विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद → मार्ग.प्रा. होकारात्मक प्रतिसाद → (परत रचनात्मक कृतीतील घटक)


(२) ७ - १५ - १६ - १७ - ७

(३) १२ - १५ - १६ - १७ - १२

(२) **पूर्ण नकारात्मक मोठे चक्र :**

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलक लेखन (१ ते १४ घटक ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटका-संबंधी मार्गदर्शन (चर्चा) देत असताना त्या घटकाला अनुसरुन घटक क्र.१५,१६ व १८ अशी क्रमबद्ध चर्चा करीत पुन्हा ( रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे ) त्या घटकापर्यन्त मार्गदर्शक प्राध्यापक आले की त्यांनी एक नकारात्मक चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१) १ ते १४ - १५ - १६ - १८




(२) ४ - १५ - १६ - १८ - ४

**होकारात्मक पूर्ण चक्राचा प्रकार :**

१) **पूर्ण होकारात्मक लहान चक्र :**

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलक लेखन ( १ ते १४ ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना त्या घटकाला अनुसरुन घटक क्रमांक १५ व १६ अशा क्रमाने चर्चा करीत पुन्हा ( रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे ) त्या घटकापर्यन्त मार्गदर्शक प्राध्यापक आले की त्यांनी एक होकारात्मक लहान चक्र पूर्ण केले असे समजावे. ( घटक १६ नंतर १७ पुढे घटक १७ पर्यन्त गेले असतील तर ).

(१) उदा.१ ते १४ - १५ - १६ - (१७ )

१ ते १४ प्राध्यापकाची विद्यार्थी-शिक्षकाचा - १७
रचनात्मक → अपेक्षात्मक → प्रतिसाद
कृतीतील घटक कृती

(२) १३ - १५ - १६ - १३

नकारात्मक पूर्ण चक्राचा प्रकार --

१) पूर्ण नकारात्मक लहान चक्र -

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलक लेखन (१ ते १४ घटक )या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना त्या घटकाला अनुसरुन घटक क्रमांक १५,१६ अशा क्रमाने चर्चा करीत पुन्हा ( रचनात्मक कृतीतील ज्या घटकाशी चर्चा चालू आहे ) त्या घटकापर्यन्त आले मात्र घटक क्र.१६ नंतर पुढे घटक क्र.१८ पर्यन्त गेलेले असतील तर त्यांनी एक नकारात्मक लहान चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१) १ ते १४ - १५ - १६ - (१८)

१ ते १४ प्राध्यापकाची विद्यार्थी-
रचनात्मक कृतीतील → अपेक्षात्मक → शिक्षकाचा - १८
घटक कृती प्रतिसाद

(२) ४ → १५ → १६ - १८

अपूर्ण-होकारात्मक ,नकारात्मक मोठे चक्र -

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देत असताना शांतता काळ ते फलक लेखन (१ ते १४ घटक ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना घटक क्र.१५,१६ ,१७,१८ या क्रमाने मार्गदर्शनात्मक कृती न घडता सदर क्रम चुकविला

उदा.१) १ ते १४ - १६ - १७/१८
२) १ ते १४ - १६ - १७
३) १ ते १४ - १६ - १८

अशा क्रमाने मार्गदर्शन (चर्चा ) करीत पुन्हा रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे त्या घटकापर्यन्त येणे किंवा १ ते १४ - १५ - १६ - १७,१८ या घटकांपर्यन्तच येणे. रचनात्मक कृतीतील घटकापर्यन्त आले नाहीत तर, त्यांनी एक अपूर्ण चक्र होकारात्मक /नकारात्मक चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१)

| | | | |
|---|---|---|---|
| १ ते १४ रचनात्मक कृतीतील घटक → | विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद → | मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद १७ → | मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद |

(२) ८ - १६ - १७ - १८.

अपूर्ण चक्राचे दोन प्रकार पडतात --

१) <u>अपूर्ण होकारात्मक मोठे चक्र -</u>

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना ( १ ते १४ घटक ) शांतता काळ ते फलक लेखन या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना घटक क्र.१५,१६ व १७ या क्रमाने मार्गदर्शनात्मक कृती घडली मात्र मार्गदर्शक प्राध्यापक रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू होती त्या घटकापर्यन्त आले नाहीत तर, त्यांनी एक होकारात्मक अपूर्ण मोठे चक्र केले असे समजावे.

उदा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ ते १४ रचनात्मक → कृतीतील घटक | प्राध्यापकाची अपेक्षात्मक → कृती | विद्यार्थी-शिक्षकाचा → प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद |
| | १५ | १६ | १७ |

२) अपूर्ण नकारात्मक मोठे चक्र -

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना शांतता काळ ते फलक लेखन ( १ ते १४ घटक ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना घटक क्र.१५,१६ व १८ या क्रमाने मार्गदर्शनात्मक कृती घडली मात्र मार्गदर्शक प्राध्यापक रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू होती त्या घटकापर्यन्त आले नाहीत तर,त्यांनी एक नकारात्मक अपूर्ण मोठे चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.

| | | | |
|---|---|---|---|
| १ ते १४ रचनात्मक → कृतीतील घटक | प्राध्यापकाची अपेक्षात्मक → कृती | विद्यार्थी-शिक्षकाचा → प्रतिसाद | मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद |
| | (१५) | (१६ ) | (१८) |

होकारात्मक अपूर्ण चक्राचा प्रकार --

१) अपूर्ण होकारात्मक लहान चक्र --

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना शांतता काळ ते फलक लेखन (१ ते १४ ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना,त्या घटकाला अनुसरून घटक क्र.१५ व १७ किंवा १६ व १७ अशा क्रमाने पुन्हा रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे त्या घटकापर्यन्त पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आले की,त्यांनी एक होकारात्मक अपूर्ण चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१)

१ ते १४ रचनात्मक कृतीतील घटक → विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद → मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद → (घटकाकडे परत)

(१६) (१७)

(२) ७ - १६ - १७ - ७

नकारात्मक अपूर्ण चक्राचा प्रकार -

१) अपूर्ण नकारात्मक लहान चक्र -

पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठास मार्गदर्शन देताना शांतता काळ ते फलक लेखन ( १ ते १४ ) या रचनात्मक कृतीतील कोणत्याही एका घटकासंबंधी मार्गदर्शन देत असताना, त्या घटकाला अनुसरुन घटक,क्र.१५ व १८ किंवा क्र.१६ व १८ अशा क्रमाने पुन्हा रचनात्मक कृतीतील ज्या घटकाची चर्चा चालू आहे त्या घटकापर्यन्त पाठ मार्गदर्शक प्राध्यापक आले की, त्यांनी एक नकारात्मक अपूर्ण चक्र पूर्ण केले असे समजावे.

उदा.(१)

१ ते १४ रचनात्मक कृतीतील घटक → मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती (१५) → मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद (१८) → (घटकाकडे परत)

(२)

१ ते १४ रचनात्मक कृतीतील घटक → विद्यार्थी शिक्षकाचा प्रतिसाद → मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद → (घटकाकडे परत)

(१६) (१८)


(३) ३ - १६ - १८

वरील प्रवाह तक्त्यावरुन मिळालेल्या चक्रांच्या साहाय्याने सराव पाठ

मार्गदर्शनाचे मूल्यमापन केले, त्यामध्ये प्रवाह तक्त्याचे निरीक्षण केले असता त्यात चौरसाच्या दोन रांगा दिसतात. वरच्या चार चौरसामध्ये (१५ ते १८ ) आंतरक्रिया व खालच्या १४ चौरसांची आंतरक्रियेच्या आशयाचे (कशाकिरायी मार्गदर्शन केले जाते ) घटक येतात.

मराठी पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आकृती क्र.४.१ मध्ये दिलेला आहे.

आकृती - ४.१
मराठी पाठ मार्गदर्शन प्रवाह नक्शा.




२८

निरीक्षण -

१) मराठी पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने विषय-ज्ञानावर दीर्घकाळ चालते. (९६). यानंतर पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर चर्चा होते. (५७)
(५७).

२) वरील दोन्ही घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक विद्यार्थी-शिक्षकास त्यावर दीर्घकाळ ~~स्वतंत्र~~ देतात. (५७)

४) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रवृत्ती दिसते. (१५७)

५) मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद दीर्घ काळ (१७) व्यक्त केला जातो.

६) मराठी पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी मार्गदर्शन चक्रे --

१. ६ - १६ - १७ - ६

विषय-ज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद -
प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - विषय-ज्ञान.

(अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

२. ६ - १६ - १८ ....

विषयज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद -
प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद

(अपूर्ण नकारात्मक चक्र )

३. ७ - १६ - १७ - ७

पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - पाठाचा सर्व. उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे.

( अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

४. ७ - १६ - १८

पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद .(अपूर्ण नकारात्मक लहान चक्र )

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे, विषयज्ञान यावर होते, यापैकी विषय ज्ञानावरील चर्चा अधिक होते. या दोहोंच्या चर्चेची सांगड घालण्याचा प्रयत्न फारसा केला जात नाही.

चर्चा करताना कमी संख्येने प्रश्न विचारुन यावर विद्यार्थी-शिक्षकांना दीर्घ काळ बोलू दिले जाते. विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात. काही वेळेस नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घ काळ व्यक्त केला जातो.


मराठी पाठ मार्गदर्शनात मिळणारी मार्गदर्शन चक्रे ही अपूर्ण, लहान होकारात्मक, नकारात्मक स्वरुपाची आहेत. प्राध्यापक बोलताना विद्यार्थी अकस्मात प्रतिसाद व्यक्त करतात, हेतुत: प्रश्न विचारुन प्राध्यापक प्रतिसाद घेत नाहीत, तसेच चर्चा दीर्घ काळ चालत नाही, त्यामुळे ती लघु चर्चा होते.

पाठ मार्गदर्शनात मूल्यमापन या घटकावर मराठी पाठ मार्गदर्शक स्वत: मार्गदर्शन देतात.

हिन्दी अध्यापनपद्धतीच्या पाठ मार्गदर्शनाचा तक्ता आकृती क्रमांक ४.२ मध्ये दिलेला आहे.

आकृती ४.२

हिंदी पाठमार्गदर्शन प्रवाह नक्ता



निरीक्षण :

१) हिंदी पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने पाठाचा सर्वसाधारण उद्देश आणि उद्दिष्टे व स्पष्टीकरणावर दीर्घ काळ चालते (८५). यानंतर मूल्यमापन (५२) व प्राथमिक माहितीवर (१३) चर्चा होते.

२) वरील घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापक त्यावर प्रश्न विचारतात. दीर्घ काळ प्रश्न विचारतात. (१९)

४) त्यावर विद्यार्थी-शिक्षकास दीर्घ काळ (१०) बोलू देतात.

५) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रवृत्ती दिसते(११४)

६) त्याचप्रमाणे मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद दीर्घ काळ (१४ ) व्यक्त केला जातो.

७) हिंदी पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी चक्रे --

१. २ - १६ - १७/१८

प्राथमिक माहिती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक/नकारात्मक प्रतिसाद.

( अपूर्ण होकारात्मक/नकारात्मक लहान चक्र )

२. ७ - १५ - १६ - १७ ...

पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे- मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद .....

३. ७ - १५ - १६ - १८....

पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे - मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी - शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद .

( अपूर्ण होकारात्मक,नकारात्मक मोठे चक्र )

४. १२ - १५ - १६ - १७

मूल्यमापन मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद.
( अपूर्ण होकारात्मक मोठे चक्र )

५. १२ - १५ - १६ - १८

मूल्यमापन - मार्गदर्शक प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी - शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा नकारात्मक प्रतिसाद.
( अपूर्ण नकारात्मक मोठे चक्र )

८) हिंदी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृती (५२ )व विषयज्ञान (७०) या घटकांवर स्वत: मार्गदर्शन करतात.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे,मूल्यमापन व प्राथमिक माहिती या घटकावर होते,यापैकी पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे यावर अधिक चर्चा होते, या घटकांच्या चर्चेची सांगड घालण्याचा प्रयत्न फारसा केला जात नाही.

चर्चा करताना जास्त प्रश्न विचारून यावर विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलू दिले जाते,तसेच तितक्याच प्रमाणात होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात.काही वेळेस नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घ काळ व्यक्त केला जातो.


हिंदी पाठ मार्गदर्शनात प्रामुख्याने अपूर्ण मोठया चक्रांचे प्रमाण जास्त आहे.प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला हेतुत: प्रश्न विचारून प्रतिसाद घेतात,त्यामुळे चर्चा दीर्घ काळ चालते.

हिंदी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षककृती व विषयज्ञान या घटकांवर मार्गदर्शन करतात.

इंग्रजी पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आकृती क्र.४.३ मध्ये दिलेला आहे.

८८

आकृती - ४.३.
इंग्रजी पाठमार्गदर्शन प्रवाह नकाशा.



निरीक्षण :

१) इंग्रजी पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने विषयज्ञानावर दीर्घ काळ चालते (८३) यानंतर शिक्षक-कृती(३२), मूल्यमापन (२९) यावर चर्चा होते.

२) वरील घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापक त्यावर काही प्रश्न विचारतात(७).

४) त्यावर विद्यार्थी-शिक्षकास दीर्घ काळ बोलू देतात (८५).

५) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकाची होकारात्मक प्रवृत्ती दिसते(९७).

६) त्याचप्रमाणे इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद (२५ ) दीर्घ काळ व्यक्त केला जातो.

७) इंग्रजी पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी मार्गदर्शक चक्रे --

१. ६ - १५ - १६ - ६

विषयज्ञान - प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - विषयज्ञान .

(होकारात्मक अपूर्ण लहान चक्र )

२. ६ - १५ - १६ - १७ - ६

विषयज्ञान - प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - विषयज्ञान.

( होकारात्मक पूर्ण मोठे चक्र )

३. ६ - १६ - १७ - ६

विषयज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - विषयज्ञान.

(होकारात्मक अपूर्ण लहान चक्र )

४. १० - १६ - १०

शिक्षक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - शिक्षक कृती.

(अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

५. १२ - १६ - १२

मूल्यमापन - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - शिक्षक कृती

६. १२/१० - १६ - १७ / १८

मूल्यमापन ,शिक्षककृती-विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - प्राध्यापकाचा होकारात्मक,नकारात्मक प्रतिसाद.

(अपूर्ण होकारात्मक,नकारात्मक लहान चक्र )

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येतील --

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही प्रामुख्याने विषयज्ञान,शिक्षककृती व मूल्यमापन यावर होते.यापैकी विषयज्ञानात अधिक चर्चा होते. या घटकांच्या चर्चेची सांगड घालण्याचा प्रयत्न फारसा केला जात नाही.


चर्चा करताना कमी संख्येने प्रश्न विचारुन यावर विद्यार्थी-शिक्षकांना अधिक बोलू दिले जाते. विद्यार्थी-शिक्षकांच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात.नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घ काळ व्यक्त केला जातो.

इंग्रजी पाठ मार्गदर्शनात मिळणारी मार्गदर्शन चक्रे ही होकारात्मक अपूर्ण लहान चक्रांचे प्रमाण जास्त आहे.प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला विषय-ज्ञानाच्या बाबतीत हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेतात, पण मार्गदर्शनाच्या इतर घटकांच्या बाबतीत हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेत नाहीत.त्यामुळे प्राध्यापक बोलताना विद्यार्थी अकस्मात प्रतिसाद व्यक्त करतात,त्यामुळे होणारी चर्चा अनुक्रमे दीर्घ चर्चा व लघु चर्चा होते.

इतिहास पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आकृती क्र.४.४ मध्ये दिलेला आहे.

आकृती : ४.४

इतिहास पाठ मार्गदर्शन प्रवाह नक्शा



निरीक्षण :

१) इतिहास पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने विषयज्ञानावर दीर्घ काळ चालते (२१९) यानंतर शिक्षक कृती (९३), प्राथमिक माहिती (२६ ) यावर चर्चा होते.

२) वरील घटकांपैकी विषयज्ञान व शिक्षक कृती या घटकांचा परस्पर संबंध विचारात घेऊन चर्चा होते, तर प्राथमिक घटकाची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापक त्यावर प्रश्न विचारतात (१२), तसेच मार्गदर्शक प्राध्यापक त्यावर विद्यार्थी-शिक्षकास दीर्घकाळ बोलू देतात (२७)

४) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकाची होकारात्मक प्रवृत्ती दिसते(१२०)

५) त्याचप्रमाणे इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद दीर्घकाळ व्यक्त करतात(१०).

६) इतिहास पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी चक्रे --

१. ६ - १६ - १७ - ६

विषयज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - विषयज्ञान.

(होकारात्मक अपूर्ण लहान चक्र )

२. ६ - १५ - १६ - १७ - ६

विषयज्ञान-मार्गदर्शक प्राध्यापकाच्या अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद - विषयज्ञान.

( होकारात्मक पूर्ण मोठे चक्र )

, ३. ६ - १५ - १६ - ६

विषयज्ञान - मार्गदर्शक-प्राध्यापक-अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - विषयज्ञान.

( होकारात्मक अपूर्ण लहान चक्र )

४. १० - १६ - १७/१८

शिक्षक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक/नकारात्मक प्रतिसाद ( होकारात्मक/नकारात्मक अपूर्ण लहान चक्र )

५. २ - १६ - १७ / १८

प्राथमिक माहिती - विद्यार्थी प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक/नकारात्मक प्रतिसाद ...

(होकारात्मक/नकारात्मक अपूर्ण लहान क्र )

७) इतिहास पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणा व हेतुकथन (४०), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (३०) व मूल्यमापन (३०) या घटकावर स्वत: मार्गदर्शन करतात.

निष्कर्ष :


इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही प्रामुख्याने विषयज्ञान, शिक्षककृती व प्राथमिक माहिती यावर होते. यापैकी विषयज्ञानावर अधिक चर्चा होते. तसेच विषयज्ञान व शिक्षक कृती या घटकामध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो, पण चर्चेत प्राथमिक माहितीशी सांगड घातली जात नाही.

चर्चा करताना अधिक प्रश्न विचारून त्यावर विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलू दिले जाते. विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर मार्गदर्शक प्राध्यापक होकारात्मक प्रतिक्रिया व्यक्त करतात. मात्र नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घकाळ व्यक्त केला जातो.

इतिहास पाठ मार्गदर्शनामध्ये मिळणारी मार्गदर्शन चक्रे ही प्रामुख्याने होकारात्मक अपूर्ण लहान चक्रांचे प्रमाण जास्त आहे व होकारात्मक पूर्ण मोठे चक्र एक आहे. तसेच होकारात्मक व नकारात्मक चक्रांचे ही प्रमाण आहे. प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला विषय-ज्ञानावर काही हेतुत: प्रश्न विचारून प्रतिसाद घेतात, त्यामुळे ती चर्चा दीर्घकाळ होते व मार्गदर्शनाचे अन्य घटकांच्या चर्चेत प्राध्यापक बोलताना विद्यार्थी- शिक्षक अकस्मात प्रतिसाद व्यक्त करतात, त्यावर प्राध्यापक हेतुत: प्रश्न विचारत नाहीत, त्यामुळे ती चर्चा लघुचर्चा होते.

इतिहास पाठ मार्गदर्शनात, मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणा व हेतुकथन पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, मूल्यमापन या घटकावर मार्गदर्शन देतात.

भूगोल पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आ.क्र.४.५ मध्ये दिलेला आहे.


15
26
16
112
17
5
18
15
19
3
55
146
62
163
24
22
21
23
24
26
23
1
–
2
1
3
9
4
24
5
26
6
71
7
47
8
6
9
18
10
64
11
6
12
76
13
15
14
39

<u>निरीक्षण :</u>

१) भूगोल पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने विषयज्ञानावर दीर्घकाळ चालते (७१), यानंतर शिक्षक-कृती (६४), पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे (४७), प्राथमिक माहिती (१) यावर चर्चा होते.

२) वरील घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक त्याच्यावर दीर्घकाळ प्रश्न विचारतात (२६).

४) त्यावर विद्यार्थी-शिक्षकाला दीर्घकाळ बोलू देतात (११२).

५) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकाची होकारात्मक प्रवृत्ती दिसते (१६३).

६) भूगोल पाठ मार्गदर्शनातून दिसून येणारी चक्रे --

१. ६ - १६ - १७
विषयज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद... ( अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

२. ६ - १६ - ६
विषयज्ञान - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - विषयज्ञान.
(अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

३. ७ - १५ - १६ - १७ ...
पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे - प्राध्यापकाची अपेक्षित कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद.
(अपूर्ण होकारात्मक मोठे चक्र )

४. १० - १५ - १६ - १७ ...
शिक्षक कृती - प्राध्यापकाची अपेक्षात्मक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद.
( अपूर्ण होकारात्मक मोठे चक्र )

५. १० - १६ - १०
शिक्षक कृती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - शिक्षक कृती -
( अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

६. २ - १६ - १७

प्राथमिक माहिती - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - मार्गदर्शक प्राध्यापकाचा होकारात्मक प्रतिसाद .

( अपूर्ण होकारात्मक लहान चक्र )

७) भूगोल पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापन (७६) या घटकावर स्वत: मार्गदर्शन देतात.

निष्कर्ष :


भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही प्राथमिक माहिती, विषयज्ञान, पाठाचा सर्वसाधारण उद्देश आणि उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शिक्षक कृती या घटकांवर होते, यापैकी विषयज्ञानावर अधिक चर्चा होते. या घटकांची सांगड घालण्याचा प्रयत्न फारसा केला जात नाही.

चर्चा करताना जास्त प्रश्न विचारुन यावर विद्यार्थी-शिक्षकाला अधिक बोलू दिले जाते, तसेच विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादाला मोठ्या प्रमाणात होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात.

भूगोल पाठ मार्गदर्शनात प्रामुख्याने अपूर्ण होकारात्मक लहान चक्रांचे प्रमाण जास्त आहे. तसेच अपूर्ण होकारात्मक मोठी चक्रे काही प्रमाणात आहेत. प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला हेतुत: प्रश्न विचारुन प्रतिसाद घेतात, त्यामुळे चर्चा दीर्घकाळ चालते.

भूगोल पाठ मार्गदर्शक मूल्यमापन या घटकावर मार्गदर्शन देतात.

शास्त्र अध्यापन पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आकृती क्रमांक ४.६ मध्ये दिलेला आहे.


15
9
16
41
17
8
18
18
19
2
33
99
35
112
33
93
34
43
25
27
34
36
23
1
–
2
3
3
13
4
46
5
103
6
112
7
65
8
37
9
31
10
126
11
24
12
46
13
18
14
33
24

निरीक्षण -

१) शास्त्र पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने शिक्षककृतीवर दीर्घकाळ चालते (१२६ ) यानंतर विषयज्ञान (१२४), प्रेरणा व हेतुकथन (१०), मूल्यमापन(४६) यावर चर्चा होते.

२) वरील घटकांपैकी विषयज्ञान व शिक्षककृती या घटकांचा संबंध लक्षात घेऊन चर्चा होते, प्रेरणा व हेतुकथन, मूल्यमापन या घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकास त्यावर दीर्घकाळ बोलू देतात (४१ ).

४) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रवृत्ती दिसते(११२).

५) शास्त्र पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद दीर्घकाळ (१८) व्यक्त केला जातो.

६) शास्त्र पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी मार्गदर्शन चक्रे --

१. ५,६,१०,१२ - १६ - ५,६,१०,१२

प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, शिक्षककृती, मूल्यमापन. ⟶ विद्यार्थी शिक्षकाचा प्रतिसाद. ⟶ प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, शिक्षककृती, मूल्यमापन.

२. ५,६,१०, १२ - १६ - १७,१८.

प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, शिक्षककृती, मूल्यमापन. ⟶ विद्यार्थी शिक्षकाचा प्रतिसाद. ⟶ प्राध्यापकाचा होकारात्मक, नकारात्मक प्रतिसाद.

७) शास्त्र पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक शैक्षणिक साधन(४६) व पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर स्वत: मार्गदर्शन करतात.

निष्कर्ष :


शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, शिक्षककृती व मूल्यमापन या घटकांवर होते. यापैकी शिक्षक कृतीवर अधिक चर्चा होते. तसेच विषयज्ञान व शिक्षक कृती या घटकांमध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र प्रेरणा व हेतुकथन, मूल्यमापन या घटकांची सांगड घातली जात नाही.

चर्चा करताना कमी प्रश्न विचारून यावर विद्यार्थी-शिक्षकांना अधिक बोलू दिले जाते. विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात. काही वेळेस नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घकाळ व्यक्त केला जातो.

शास्त्र मार्गदर्शनात मिळणारी चक्रे ही प्रामुख्याने अपूर्ण होकारात्मक लहान चक्रे तसेच अपूर्ण होकारात्मक, नकारात्मक लहान चक्रे अशा स्वरुपाची आहेत. प्राध्यापक बोलताना विद्यार्थी-शिक्षक अकस्मात प्रतिसाद व्यक्त करतात, हेतुत: प्रश्न विचारून प्राध्यापक प्रतिसाद घेत नाहीत, त्यामुळे लघु चर्चा होते.

शास्त्र पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक शैक्षणिक साधने व पाठाचा सर्वसाधारण उद्देश, उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर मार्गदर्शन देतात.

गणित पाठ मार्गदर्शनाचा प्रवाह तक्ता आकृती क्र. ४.७ मध्ये दिलेला आहे.


69
166
69
220
15
16
16
66
17
9
18
22
19
5
23
38
25
51
24
24
42
29
38
1
–
2
3
3
6
4
8
5
106
6
103
7
48
8
29
9
32
10
101
11
17
12
54
13
12
14
17
26

निरीक्षण :

१) गणित पाठ मार्गदर्शनाच्या काळात होणारी चर्चा प्रामुख्याने प्रेरणा व हेतुकथनावर दीर्घकाळ चालते (१०६), यानंतर विषयज्ञान (१०३), शिक्षककृती (१०१), मूल्यमापन (५४), प्रश्न पद्धती (३२) यावर चर्चा होते.

२) वरील घटकांपैकी विषयज्ञान व शिक्षक कृती या घटकांचा संबंध लक्षात घेऊन चर्चा होते. प्रेरणा व हेतुकथन, प्रश्न पद्धती व मूल्यमापन या घटकांची चर्चा स्वतंत्रपणे होते.

३) मार्गदर्शक प्राध्यापक ,विद्यार्थी-शिक्षकास त्यावर दीर्घकाळ बोलू देतात (६६).

४) या चर्चेमध्ये मार्गदर्शक प्राध्यापकांची होकारात्मक प्रवृत्ती दिसते(२२०).

५) गणित पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांच्या होकारात्मक प्रतिसादापेक्षा नकारात्मक प्रतिसाद दीर्घकाळ (२२) व्यक्त केला जातो.

६) गणित पाठ मार्गदर्शनात दिसून येणारी मार्गदर्शन चक्रे -

१. ५,६,९,१० - १६ - ५,६,९,१०

| | | |
|---|---|---|
| प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, प्रश्न-पद्धती, शिक्षक-कृती. | विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद. | प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, प्रश्न-पद्धती, शिक्षक-कृती. |

( अपूर्ण होकारात्मक लहान चक्रे )

२. १२ - १६ - १७,१८ ....

मूल्यमापन - विद्यार्थी-शिक्षकाचा प्रतिसाद - प्राध्यापकाचा होकारात्मक ,नकारात्मक प्रतिसाद.

( अपूर्ण होकारात्मक,नकारात्मक लहान चक्रे )

७) गणित पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकांवर (४८) स्वत: मार्गदर्शन देतात.

निष्कर्ष :

गणित अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन करत असताना होणारी चर्चा ही प्रेरणा व हेतुकथन, विषयज्ञान, प्रश्न-पद्धती, शिक्षककृती व मूल्यमापन यावर होते. यापैकी प्रेरणा व हेतुकथनावर अधिक चर्चा होते. विषयज्ञान व शिक्षककृती या घटकांमध्ये सांगड घालण्याचा प्रयत्न केला जातो. मात्र प्रेरणा व हेतुकथन, प्रश्न पद्धती व मूल्यमापन या घटकांची सांगड घातली जात नाही.

चर्चा करताना कमी प्रमाणात प्रश्न विचारुन यावर विद्यार्थी-शिक्षकांना अधिक बोलू दिले जाते. विद्यार्थी-शिक्षकाच्या प्रतिसादावर होकारात्मक प्रतिक्रिया प्राध्यापक व्यक्त करतात. काही वेळेस नकारात्मक प्रतिसाद व्यक्त केल्यास तो दीर्घकाळ व्यक्त केला जातो.

गणित मार्गदर्शनात मिळणारी चक्रे ही प्रामुख्याने अपूर्ण होकारात्मक लहान स्वरुपाची आहेत. प्राध्यापक बोलताना विद्यार्थी-शिक्षक अकस्मात प्रतिसाद व्यक्त करतात, हेतुत: प्रश्न विचारुन प्राध्यापक प्रतिसाद घेत नाहीत, त्यामुळे ती लघु चर्चा होते.

गणित पाठ मार्गदर्शनात पाठ मार्गदर्शक पाठाचा सर्वसाधारण उद्देश व उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे या घटकावर मार्गदर्शन करतात.

## विभाग १.३ : प्रश्नावल्यांचे विश्लेषण व अर्थबोधन --

### प्रस्तावना :

पाठमार्गदर्शन कशा पद्धतीने दिले जाते याचा अभ्यास करण्यासाठी संशोधिकेने प्रश्नावलीचा उपयोग केला. शिवाजी विद्यापीठातील एकूण २७ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच सांगली जिल्हातील प्रत्येक शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील सध्या शिक्षण घेत असलेले सन १९९२-९३ चे आजी विद्यार्थी-,शिक्षक व मागील सन १९९१-९२ चे माजी विद्यार्थी-शिक्षक यांना प्रश्नावल्या प्रत्यक्ष व टपालाने दिल्या.

संशोधिकेने गोळा केलेल्या सामग्रीचे स्वरूप प्रकरण तीन मध्ये स्पष्ट केलेले आहे. त्यातील उद्दिष्टांच्या संदर्भात विश्लेषण या प्रकरणात केलेले आहे. विषयांनुसार सात विभाग पाडलेले आहेत.

१) मराठी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
२) हिन्दी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
३) इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
४) इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
५) भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
६) शास्त्र अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.
७) गणित अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शन.

### १) विषय - मराठी -

विविध शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील प्राध्यापक व आजी - माजी विद्यार्थी-शिक्षक यांच्याकडून आलेल्या प्रश्नावल्यांची निरीक्षणे व निष्कर्ष प्रश्नानुसार सारण्यांमध्ये दिलेले आहेत.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१ हा पाठटाचण न काढता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्रमांक ५.८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८

पाठ टाचणाशिवाय मार्गदर्शन

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मार्गदर्शन देत नाही. प्रथम टाचण काढा. | ५ | ३३.३३ |
| २ | अडचणी विचारून काही मुद्दयावर मार्गदर्शन. | ५ | ३३.३३ |
| ३ | टाचण कसे काढावे तोंडी चर्चा. | ३ | २०.०० |
| ४ | पाठ्यांशाचे संदर्भ वाचन सांगतो व टाचण काढा असे सांगतो. | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मार्गदर्शन देत नाहीत प्रथम टाचण काढा. | १२+४ | ६१.६३ |
| २ | संबंधित घटकावर चर्चा करतात व मग टाचण काढण्यास सांगतात. | ७+१ | ३०.७६ |
| ३ | घटकाची पूर्ण माहिती मिळवा ,विचार करा. व टाचण काढा,मग मार्गदर्शन. | ७+१ | ७.६१ |
| | एकूण | २६ | १०० |

टीप - सर्व सारण्यांमध्ये विद्यार्थी-शिक्षक प्रतिसादामधील पहिला अंक आजी विद्यार्थी - शिक्षकांचा व दुसरा अंक माजी विद्यार्थी-शिक्षकांचा आहे.

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढतातच संबंधित पाठावर मार्गदर्शन घेण्यास आला तर प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम टाचण काढा असे सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ६१.६३ टक्के आहे.

२) अडचणी विचारून काही मुद्द्यांवर मार्गदर्शन देतात. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ३३.३३ व ३०.७६ टक्के आहे.

३) पाठ टाचण कसे काढावे याची तोंडी चर्चा करतात. प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) पाठ्यांशाचे वाचन करा, माहिती मिळवा व टाचण काढा. याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३ टक्के व ७.६९ टक्के इतके आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

विद्यार्थी-शिक्षक पाठटाचण तयार न करताच मार्गदर्शनासाठी मार्गदर्शक प्राध्यापकांकडे गेल्यास बहुसंख्य प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत. मात्र काही प्राध्यापक अडचणी विचारून संबंधित घटकावर चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२ हा पाठटाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.९

त्रोटक पाटटाचणांसंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुन्हा टाचण पूर्ण करायला सांगतो, मार्गदर्शन त्याशिवाय नाही. | ६ | ४०. |
| २ | अर्ध्या टाचणाचे कारण, अडचण विचारून टाचण पूर्ण करा असे सांगतो. | १ | ६.६६ |
| ३ | समस्या असलेल्या मुद्दयाचे मार्गदर्शन करतो व टाचण पूर्ण करायला सांगतो. | ५ | ३३.३३ |
| ४ | काळजीपूर्वक टाचण पूर्ण करण्यासंबंधी सूचना देतो. | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | पाठ टाचण पूर्ण लिहा असे सांगतात, त्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. | १२ + ३ | ५७.६९ |
| २ | आवश्यक त्या मुद्दयाची कल्पना देतात व ते नमूद करतात मग टाचण पूर्ण करा. | ५ + ३ | ३०.७६ |
| ३ | पूर्ण टाचणाशिवाय तास घेता येणार नाही, असे सांगून सूचना देतात. | ३ + १० | ११.५३ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण सविस्तर न काढता त्रोटक टाचण घेऊन मार्गदर्शक प्राध्यापकाकडे गेल्यास मराठी विषयांचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ४०.०० टक्के व ५७.६९ टक्के आहे.

२)    समस्या । अडचणी असलेल्या मुद्द्यांचे मार्गदर्शन करून टाचण पूर्ण करायला सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३०.७६ टक्के आहे.

३)    केवळ अर्ध्या टाचणाचे कारण विचारून टाचण पूर्ण करायला सांगतात. प्राध्यापक सारणीमध्ये याचे प्रमाण अल्प आहे. (६.६६ टक्के )

४)    काळजीपूर्वक टाचण पूर्ण करायला सांगतात, सूचना देतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व ११.५३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढतात येईल.

निष्कर्ष --

पाठ टाचण सविस्तर न काढता विद्यार्थी-शिक्षक मराठी अध्यापन-पद्धतीच्या पाठ मार्गदर्शकाकडे गेल्यास बहुसंख्य प्राध्यापक टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. मात्र काही प्राध्यापक समस्या असलेल्या मुद्द्यांवर चर्चा करतात व टाचण पूर्ण करायला सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३ हा पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणाऱ्या सूचनेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१०

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वी सूचना

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | आशयपध्दती,उद्दिष्टे,शैक्षणिक साधने मूल्यमापन या बाबीचा विचार करा. | ६ | ४० |
| २ | नमुना टाचण पहा .टाचण पूर्ण शुध्द लिहा. | ५ | ३३.३३ |
| ३ | टाचण अभ्यासून काळजीपूर्वक लिहा. | २ | १३.३ |
| ४ | प्रत्येकपायरीचे महत्त्व लक्षात घ्या,सांगड घाला. | २ | १३.३ |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थीशिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे,मूल्यमापन,अध्ययन कृती साधने याकडे लक्ष दया . | ७+२ | ३४.६१ |
| २ | नमुना टाचण पहा,पाठयांश सखोल अभ्यास... | ४+२ | २३.७ |
| ३ | पाठटाचण काळजीपूर्वक लिहिणे आवश्यक आहे. | ४+१ | १५.३८ |
| ४ | पाठाच्या पाय-या लक्षात घेऊन टाचण पूर्ण करा. | ५+१ | २३.०७ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक टाचण पूर्ण करण्यापूर्वी आशय,पद्धती,उद्दिष्टे,शैक्षणिक साधने,मूल्यमापन,अध्ययन अध्यापन कृती या बाबींकडे अधिक लक्ष देण्यास सांगतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३४.६१ टक्के प्रमाण आहे.

२)    नमुना टाचण पहा,टाचण पूर्ण,शुध्द लिहा,पाठ्यांश सखोल अभ्यासा ,याचेप्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व २३.०७ टक्के आहे.

३)    प्रत्येक पायरीचे व महत्त्व लक्षात घ्या.संग्रह घाला. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १३.३ टक्के व २३.०७ टक्के आहे.

४)    पाठ टाचण काळजीपूर्वक लिहा. याचे प्रमाण अनुक्रमे १३.३ टक्के व १५.३८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष -

मराठीचे त्रोटक पाठटाचण घेऊन विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास गेल्यास ते पूर्ण करण्यापूर्वी बहुसंख्य प्राध्यापक आशय, पद्धती ,उद्दिष्टे,शैक्षणिक साधने,मूल्यमापन,अध्ययन-अध्यापन कृती या बाबींकडे लक्ष देण्याची सूचना करतात.काही प्राध्यापक मात्र नमुना टाचण पाहणे ते पूर्ण,शुद्ध ,सखोल अभ्यासू लिहिण्यासंबंधी सूचना करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४ हा पाठ मार्गदर्शनाची सुरुवात प्राध्यापक ज्या घटकांपासून करतात त्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११ मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र.४.११

### पाठ मार्गदर्शनाची सुरवात

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पूर्वज्ञानापासून | ६ | ४०.०० |
| २) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणापासून | २ | १३.३३ |
| ३) | अध्यापन मुद्दे, पाठयघटक | ४ | २६.६६ |
| ४) | प्राथमिक माहिती | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पूर्वज्ञानापासून | १०+४ | ५३.८४ |
| २) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ३+१ | १५.३८ |
| ३) | अध्यापनमुद्दे, पाठयघटक | ४+० | १५.३८ |
| ४) | प्रेरणा | ३+१ | १५.३८ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक आल्यास मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ४०.०० टक्के व ५३.८४ टक्के आहे.

२) उद्दिष्टये व स्पष्टीकरणापासून सुरवात करतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व १५.३८ टक्के आहे व ते सर्वांत कमी आहे.

३) अध्यापन मुद्दे व पाठयघटकापासून करतात याचे प्रमाण अनुक्रमे २६.६ टक्के व १५.३ टक्के आहे.

४) प्राथमिक माहितीपासून सुरवात करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण २०.०० टक्के आहे.

५) प्रेरणेपासून सुरवात करतात याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण १५.३८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी पाठमार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शक प्राध्यापकाकडे गेल्यास ते प्रथम पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनाची सुरवात करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५ हा मार्गदर्शनात चर्चा केल्या जाणाऱ्या मुद्दयांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२

मार्गदर्शनाच्या घटकांचा क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी शिक्षकांनी दिलेले घटक क्र. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२६ | १ | पूर्वज्ञान | २५० |
| २ | प्रेरणा | १२६ | २ | आशय, पाठ्य मुद्दे | २१८ |
| ३ | पूर्वज्ञान | १२२ | ३ | प्रेरणा | २१४ |
| ४ | आशय, पाठ्य-मुद्दे | ११८ | ४ | शिक्षक, विद्यार्थीकृती | १६१ |
| ५ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ९१ | ५ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १०४ |
| ६ | शैक्षणिक साधने | ६१ | ६ | संकलन | ९४ |
| ७ | संकलन | ५४ | ७ | शैक्षणिक साधने | ७६ |
| ८ | फलक लेखन | ४८ | ८ | उपयोजन | ७५ |
| ९ | उपयोजन | ४१ | ९ | फलक लेखन | ७५ |
| १० | मूल्यमापन साधने | ३९ | १० | मूल्यमापन साधने | ७० |

वरील सारणीमधील मार्गदर्शक घटकांचा दोन्ही सारणीतील क्रम भिन्न येतो, म्हणून मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने घटकांची चर्चा करतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम एकत्रित केला असता पुढील निष्कर्ष (क्रम ) काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १) पूर्वज्ञान २) प्रेरणा ,३.५) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, ३.५) आशय,पाठय मुद्दे ५) शिक्षक ,विद्यार्थी-कृती ६) शैक्षणिक साधने ७) संकलन, ८)फलक लेखन ९) उपयोजन १०) मूल्यमापन साधने याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र. ६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्दयासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३

पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- |
| १) | पूर्वज्ञान व नवीन आशय अध्यापनाचा हेतू यांची सांगड. | ६ | ४० |
| २) | पाठ्यांश कोणता व मागील इयत्तेत पूर्वी अभ्यासलेले पाठ। | ४ | २६.६६ |
| ३ | विषय प्रवेशास चित्रकथा, प्रसंग, उदाहरणे यापैकी काय घेतले ? | ३ | २०. |
| ४) | उता-यातील व्यक्ती ग्रंथ, स्थळे व त्यासंबंधीचे विद्यार्थी-शिक्षकांचे पूर्व ज्ञान | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पूर्वज्ञान पाठाशी संबंधित आहे कां ? नवीन ज्ञानाशी सांगड आहे कां ? | १२+२ | ५३.८४ |
| २) | मागील इयत्तेत हा पाठ्यघटक अभ्यासला आहे ? ती कविता, पाठ विचारतात. | ५+१ | २३.०७ |
| ३) | घटकानुसार प्रेरणा आहे का ? वयोगटानुसार चर्चा. | २+२ | १५.३८ |
| ४) | विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान आजमावतात. | १+१ | ७.६९ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पूर्वज्ञान व नवीन आशय किंवा संबंधित पाठ, अध्यापनाचा हेतू यांच्यात सांगड पाहतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५३.८४ टक्के प्रमाण आहे व ते सर्वात जास्त आहे.

२) पाठयांश कोणता व मागील इयत्तेत हा घटक अभ्यासलेला आहे का, तो पाठ, कविता विचारतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २६.६ टक्के व २३.०७ टक्के आहे.

३) विषय प्रवेशास चित्र, कथा, प्रसंग, उदाहरणे यापैकी काय घेतले, घटकानुसार वयोगटानुसार प्रेरणा आहे का ? यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १५.३८ टक्के आहे.

४) उताऱ्यातील व्यक्ती, ग्रंथ, स्थळे व त्यासंबंधीचे विद्यार्थी-शिक्षकांचे पूर्वज्ञान आजमावतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व ७.६९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक पूर्वज्ञान व नवीन आशय, पाठ, अध्यापनाचा हेतू यांची सांगड घालणे यांकडे लक्ष देतात. काही प्राध्यापक मात्र पाठयांश कोणता व त्यासारखा घटक मागील इयत्तेत अभ्यासलेला आहे का ते पाठ, कविता कोणते यावर चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.७ हा पूर्वज्ञाना-संदर्भातील प्रश्न विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्रमांक ४.१४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४

पूर्वज्ञानासंदर्भात प्रश्नविचारणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पूर्वज्ञान व प्रेरणा यांचा संबंध कसा ? प्रेरणेतून पूर्वज्ञान कसे जागृत करणार ? वातावरण निर्मिती होईल ? | ७ | ४६.६६ |
| २) | या लेखकाची अन्य पुस्तके, पाठ या उताऱ्यातील व्यक्ती, स्थळे कोणती ? असे पाठ कविता कोणत्या ? | ३ | १५.०० |
| ३) | विद्यार्थी-स्तर लक्षात घेतला आहे ? हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? | २ | १३.३३ |
| ४) | पूर्वज्ञानाची संबंधित पाठाशी सांगड घातली आहे ? पाठयांश कोणता ? | ३ | १५.०० |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | या पूर्वज्ञानाने प्रेरणा व घटकाकडे जाता येते का ? प्रेरणा कशी देणार ? वातावरण निर्मिती होईल का ? | ७+४ | ४२.३ |
| २) | या प्रकारचा पूर्वी पाठ झाला आहे का ? कोणता ? लेखक कोण ? इयत्ता कोणती ? | ३+२ | १९.२३ |
| ३) | हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? अपेक्षित उत्तर मिळेल ? न मिळाले तर काय करणार ? | ७+० | २६.९२ |
| ४) | प्रश्न विचारत नाहीत. | ३+० | ११.५३ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञाना संदर्भात विद्यार्थी-शिक्षकाला विचारत असलेल्या प्रश्नामध्ये पूर्वज्ञान व प्रेरणा यांचा संबंध कसा जोडणार ? प्रेरणेतून पूर्वज्ञान कसे जागृत करणार ? वातावरण निर्मिती होईल का ? या प्रश्नांचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ४६.६६ टक्के व ४२.३ टक्के आहे.

२) हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? विद्यार्थी स्तर लक्षात घेतला का ? अपेक्षित उत्तर मिळेल का ? व न मिळाले तर काय करणार ? अशा प्रश्नांचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व २६.९२ टक्के आहे.

३) या लेखकाची अन्य पुस्तके,पाठ कोणते, या उताऱ्यातील व्यक्ती,स्थळे कोणती ? यासारखे पाठ, कविता कोणत्या झाल्यात ? लेखक,इयत्ता कोणती या प्रकारच्या प्रश्नांचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १५.०० टक्के व १९.२३ टक्के आहे.

४) पूर्वज्ञानाची संबंधित पाठाशी सांगड घातली का ? पाठयांश कोणता ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण १५.०० टक्के आहे.

५) प्राध्यापक प्रश्न विचारीत नाहीत-याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ११.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी - पूर्वज्ञान व प्रेरणा यांचा संबंध, वातावरण निर्मिती होणे, पूर्वज्ञान जागृती या बाबींवर प्रश्न विचारतात. काही प्राध्यापक विशिष्ट पूर्वज्ञान गृहीत धरणे, विद्यार्थी स्तर व अपेक्षित उत्तर येणे न येणे यावर प्रश्न विचारतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.१५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| | प्राध्यापकाचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मागील इयत्ताची संदर्भ पुस्तके, पाठ वाचावयास सांगतो, | ८ | ५३.३३ |
| २) | मागील संदर्भ स्वत: सांगतो. | ३ | २०. |
| ३) | इयत्तेऐवजी इतर अनुभव तपासतो, कोणते प्रश्न विचारतो येतील यावर चर्चा करतो. | २ | १३.३३ |
| ४) | विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान प्रश्न विचारुन जागृत करतो | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मागील संदर्भ शोधा, अभ्यास करा, वाचा असे सांगतात. | ७+२ | ३४.६१ |
| २) | मागील संदर्भ प्राध्यापक स्वत: सांगतात. | ५+० | १९.२३ |
| ३) | इयत्तेऐवजी बाह्य अनुभव, ज्ञान यांचा उपयोग करतात. | ४+२ | २३.०७ |
| ४) | घटकाला अनुसरुन प्रश्न विचारुन सुचवितात. | ४+२ | २३.०७ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी- शिक्षकाला विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील इयत्तांचा संदर्भ देता येत नसल्यास प्राध्यापक मागील इयत्तांची पुस्तके,संदर्भ वाचा,शोधा असे सांगतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी- शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ५३.३३ टक्के व ३४.६१ टक्के आहे.

२) इयत्ते ऐवजी बाह्य अनुभव,ज्ञान तपासतात,कोणते प्रश्न विचारता येतील यावर चर्चा करतात,याचे प्राध्यापक सारणीमध्ये १३.३३ टक्के व विद्यार्थी- शिक्षक सारणीमध्ये २३.०७ टक्के प्रमाण आहे.

३) मागील संदर्भ प्राध्यापक स्वत: सांगतात,याचे दोनही सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १९.२३ टक्के आहे.

४) घटकाला अनुरूप प्रश्न विचारून विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञान जागृत करतात,याचे प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व २३.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष--

पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थी- शिक्षकाला मागील संदर्भ देता येत नसेल तर मराठी अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक संदर्भित पुस्तके पाठ वाचावयास,संदर्भ शोधावयास सांगतात,कांही प्राध्यापक इयत्तां ऐवजी इतर अनुभव तपासतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.९ हा विद्यार्थी- शिक्षकाला प्रेरणा न सुचण्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्वत: प्रेरणा सांगतो,उदाहरणे देतो. | ६ | ४०. |
| २) | काही प्रश्न विचारुन प्रेरणा देण्यास उद्युक्त करतो. | ५ | ३३.३३ |
| ३) | अधिक वाचन,विचार करा असे सांगतो. | ३ | २०. |
| ४) | मित्र मंडळीत चर्चा करा असे सांगतो. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी - शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | प्रेरणेचे अनेक प्रकार स्वत: सांगतात व योग्य निवडण्यास सांगतात . | ११+२ | ५०. |
| २) | प्राध्यापक काही प्रश्न विचारून विचाराला चालना देतात. | ७ +३ | ३८.४६ |
| ३) | अधिक विचार,वाचन करून,अभ्यास करून प्रेरणा तयार करण्यास सांगतात . | २ +१ | ११.५३ |
| | एकूण | २० +६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला योग्य प्रेरणा सुचत नसल्यास प्रेरणा स्वत: सांगतात ,अनेक उदाहरणे । प्रकार देऊन योग्य ते निवडण्यास सांगतात,याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ५०.०० टक्के आहे.

२) प्राध्यापक प्रश्न विचारुन विचारला चालना देतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३८.३६ टक्के आहे.

३) अधिक वाचन, विचार करा, अभ्यास करा असे सांगतात. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे २०.०० टक्के व ११.५३ टक्के आहे.

४) मित्र मंडळीत चर्चा करा, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणा वरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास प्रेरणा स्वत: सांगतात, अनेक उदाहरणे देतात. काही प्राध्यापक प्रश्न विचारुन विद्यार्थी-शिक्षकाच्या विचाराला चालना देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१० हा प्रेरणेसंबंधी मार्गदर्शनात प्राध्यापक ज्या बाबींचा विचार करतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१७ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१७

प्रेरणेमधील घटक क्रम

| अनु | प्राध्यापकांनी दिलेले क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | घटकाला अनुरूपता | ४३ | १ | घटकानुरूपता | ७६ |
| २ | प्रेरणा देणाऱ्या कृती | ३८ | २ | प्रेरणा देणाऱ्या कृती | ६१ |
| ३ | प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | ३३ | ३ | प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | ५५ |
| ४ | प्रस्तावनेचा परिणाम | २७ | ४ | प्रस्तावनेचा परिणाम | ४२ |

वरील सारणीमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी प्रेरणेमधील घटकांना दिलेला क्रम समान आहे,यावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देताना १) घटकाला अनुरूपता २) प्रेरणा देणाऱ्या कृती, ३) प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड, ४) प्रस्तावनेचा , प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.११ हा पाठ टाचणामध्ये मुद्दे - उपमुद्दे नसल्यासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८ मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र.४.१८

### पाठ टाचणामध्ये मुद्दे उपमुद्दे नसणे -

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मुद्दे व उपमुद्दे लिहून आणा असे सांगतो, मगच मार्गदर्शन करतो. | १२ | ८० |
| २) | ते कसे काढावे याचे मार्गदर्शन करतो मुद्दे, उपमुद्दे काढून देतो. | ३ | २० |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | मुद्दे-उपमुद्दे लिहिल्याशिवाय मार्गदर्शन नाही. | १२+४ | ६१.६३ |
| २) | विषय घटकावर चर्चा करून मुद्दे उपमुद्दे काढून देतात. | ६ + २ | ३८.४६ |
| | एकूण | २०+६ | १००. |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक टाचणामध्ये अध्यापन मुद्दे नसल्यास मुद्दे उपमुद्दे लिहून आणावयास सांगतात. त्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ८०.०० टक्के व ६१.६३ टक्के आहे.

२) विषय घटकावर चर्चा करून मुद्दे ,उपमुद्दे कसे काढावेत याचे मार्गदर्शन करतात, मुद्दे ,उपमुद्दे काढून देतात, याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के ते ३८.४६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

## निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक, पाठ-टाचणामध्ये मुद्दे ,उपमुद्दे नसल्यास मुद्दे लिहून आणल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत,काही प्राध्यापक मात्र विषयावर चर्चा करून मुद्दे उपमुद्दे काढून देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१३ हा प्रत्येक मुद्दयावरील चर्चेसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११

प्रत्येक मुद्दयावर चर्चा करणे

| | होय | नाही | आवश्यक वाटल्यास | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ११ | - | ४ | १५ |
| | ७३.३३ | | २६.६६ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १७ | ३ | - | २० |
| | २ | ४ | - | ६ |
| एकूण | ७३.०७ | २६.९२ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक अध्यापन मुद्दयावर चर्चा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ७३.३३ व ७३.०७ टक्के आहे व ते समान आहे.

२) प्रत्येक मुद्दयावर चर्चा करत नाहीत, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २६.९२ टक्के प्रमाण आहे.

३) आवश्यक वाटल्यास प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण २६.६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन मुद्दयावरील मार्गदर्शनात प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठ्य मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०
मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे

| | होय | नाही | आवश्यक वाटल्यास | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | ३ | २ | १५ |
| | ६६.६ | २०.०० | १३.३३ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात, याचे प्रमाण ६६.६ टक्के आहे.

२) अवांतर वाचन देत नाहीत, याचे प्रमाण २०.०० टक्के व

३) आवश्यक वाटले तर अवांतर वाचन, याचे प्रमाण १३.३३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी शिक्षकाला अवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठय मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधीचा होता. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१

पाठय मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारणे

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | - | २ | १५ |
| | ८६.६६ | | १३.३३ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १५ | २ | ३ | २० |
| | २ | ४ | - | ६ |
| एकूण | ६५.३८ | २३.०७ | ११.५३ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय मुद्दयावर चर्चा विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ८६.६६ टक्के व ६५.३८ टक्के आहे.

२) मुद्द्याचे स्पष्टीकरण विचारत नाहीत,याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण २३.०७ टक्के आहे.

३) कधी कधी मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व ११.५३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> --

मराठी अध्यापन-प्रध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन मुद्द्यावरील मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१५ हा मुद्द्यांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२२

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्यांचे स्पष्टीकरण न आल्यास

| | प्राध्यापकाचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्पष्टीकरण कसे करावे ते सांगतो. | ८ | ५३.३३ |
| २ | स्वत: स्पष्टीकरण देतो. | २ | १३.३३ |
| ३ | अभ्यास हवा याची जाणीव देऊन अधिक वाचन करून यायला सांगतो. | ५ | ३३.३३ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | स्पष्टीकरण कसे करावे यासाठी संदर्भ व मार्गदर्शन देतात. | १३+१ | ५३.८ |
| २ | प्राध्यापक स्वत: स्पष्टीकरण करतात. | ३ + ४ | २६.९ |
| ३ | संदर्भ पुस्तके व पाठ्यांश यांचे अधिक वाचन करून या असे सांगतात. | ४+१ | १९.२ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापपद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता आले नाही तर प्राध्यापक स्पष्टीकरण कसे करावे यासाठी मार्गदर्शन ,संदर्भ देतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ५३.३३ टक्के व ५३.८ टक्के आहे व ते समान आहे.

२) अभ्यास हवा,याची जाणीव देऊन अधिक वाचन अभ्यास करून या असे सांगतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व १९.२ टक्के आहे.

३) प्राध्यापक स्वत: ते स्पष्टीकरण करतात,याचे प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व २६.९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण देता आले नाही तर बहुसंख्य मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात, मात्र काही प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास करून यायला सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१७ हा विद्यार्थी टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न येण्यासंबंधीचा आहे. व त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्र.१६ हा प्राध्यापक स्पष्टीकरण न आल्यास सविस्तर आशय सांगतात का'या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती अनुक्रमे सारणी क्र.४.२३ व ४.२४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२३

विद्यार्थी-शिक्षकाला पाठटाचण व्यवस्थित असून स्पष्टीकरण न येणे - प्राध्यापकांचा प्रतिसाद

| अधिक तयार करायला सांगतो | अडचण विचारून त्या स्पष्टीकरणावर चर्चा करतो, संदर्भ देतो व आत्मविश्वास वाढवतो | टाचण त्यानेच काढलेय का ? याची खात्री करून घेतो | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | ७ | २ | १५ |
| ४०.०० | ४६.६ | १३.३ | १००. |

सारणी क्र.४.२४

प्राध्यापकांनी पाठ्यांश सविस्तर सांगणे

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| विद्यार्थी-शिक्षक | १८ | २ | - | २० |
| | ३ | ३ | - | ६ |
| एकूण | ८०.७६ | १९.२३ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील प्राध्यापक सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी त्याला प्रश्न विचारल्यास स्पष्टीकरण देऊ शकत नसेल तर त्याला अडचण विचारून चर्चा करतात, संदर्भ देतात व त्याचा आत्मविश्वास वाढवितात, याचे प्रमाण ४६.६ टक्के आहे.

२) प्राध्यापक सारणीमध्ये - स्पष्टीकरण न आल्यास प्राध्यापक अधिक तयारी करायला सांगतात, याचे ४०.०० टक्के प्रमाण तर

३) टाचण त्यानेच काढले असल्याची खात्री करून घेतात, याचे १३.३ टक्के प्रमाण आहे.

४) विद्यार्थी-सारणीमध्ये - प्राध्यापक स्पष्टीकरण आले नाही तर पाठ्यांश सविस्तर सांगतात, याचे प्रमाण ८०.७६ टक्के आहे.

५) पाठ्यांश सविस्तर सांगत नाहीत, याचे प्रमाण १९.२३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी पाठ टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी त्याला उत्तर आले नाही तर त्याची अडचण विचारून त्या स्पष्टीकरणावर चर्चा करतात, संदर्भ घेतात व त्याचा आत्मविश्वास वाढवितात. काही प्राध्यापक मात्र अधिक तयारी करायला सांगतात.

बहुसंख्य प्राध्यापक पाठ्यांश सविस्तर सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्यासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२५

घटकाशी निगडित आशय सांगणे -

प्राध्यापकांचा प्रतिसाद.

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| | - | ११ | ४ | १५ |
| | - | ७३.३३ | २६.६६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ - मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत,याचे प्रमाण ७३.३३ टक्के आहे.

२) कधी कधी सांगतात, याचे २६.६६ टक्के प्रमाण आहे.
३) सांगतात, याचे शून्य टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

मराठी अध्यापन-पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शन प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे. त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२६

उद्दिष्टे व स्पष्टीकरणाच्या मार्गदर्शनातील बाबीं

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे घटकाला अनुसरुन . | ७ | ४६.६६ |
| २) | नेमकी व योग्य पद्धतीने लिहिली आहेत ? | ४ | २६.६ |
| ३) | ज्ञान, आकलन, उपयोजन या क्रमाने लिहिली आहेत ? | १ | ६.६ |
| ४) | मापनीय, वर्तन बदलाच्या स्वरुपात व पातळीनुसार लिहिलीत कां ? | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | घटकानुसार आहेत कां ? | ६ + २ | ३८.४६ |
| २) | उद्दिष्टे नेमकी व योग्य लिहिली आहेत का ? | ७ + २ | ३४.६१ |
| ३) | वेळेत साध्य होणारी व उद्दिष्टे मूल्यमापन संबंध पाहतात. | ३ + ० | ११.५३ |
| ४) | वर्तन बदलाच्या स्वरूपात। | २ + २ | १५.३८ |
| | एकूण | २० + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन --

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ - मार्गदर्शन प्राध्यापक उददिष्टे आणि स्पष्टीकरणे यांचे मार्गदर्शन देताना ती घटकानुसार आहेत का हे पाहतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ४६.६६ टक्के व ३८.४६ टक्के आहे.

२) उद्दिष्टे नेमकी व योग्य लिहिली आहेत का हे पाहतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २६.६ टक्के व ३४.६१ टक्के आहे.

३) उद्दिष्टे ज्ञान, आकलन, उपयोजन या क्रमाने लिहिलीत का ? याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ६.६ टक्के आहे.

४) उद्दिष्टे मापनीय, वर्तन बदलाच्या स्वरूपात व पातळीनुसार लिहिली आहेत का हे पाहतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १५.३७ टक्के आहे.

५) वेळेत साध्य होणारी तसेच मूल्यमापन व उद्दिष्टे संबंध पाहतात, याचे विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ११.३३ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यांचे मार्गदर्शन देताना ती घटकानुसार लिहिली आहेत का हे पाहतात, तर काही प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे नेमकी व योग्य लिहिण्याकडे लक्ष देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१८ हा पाठय घटकाला अधिक उद्दिष्टयांच्या गरजे-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२७

पाठयघटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थी-शिक्षकाला अधिक उद्दिष्टे समाविष्ट करायला सांगतो. | ४ | ५३.३ |
| २) | चर्चा करून अधिक उद्दिष्टे निदर्शनास आणून देतो. | ५ | ३३.३३ |
| ३) | अधिक उद्दिष्टे स्वत: सांगतो. | २ | १३.३ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | ती काढण्यास सांगतात. | १३+० | ५०. |
| २) | चर्चेतून मार्गदर्शनातून सुचवितात, लक्षात आणून देतात. | ५ +४ | ३४.६ |
| ३) | स्वत: सांगतात किंवा टाचणात लिहितात. | २+२ | १५.३ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठयघटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती उद्दिष्टे विद्यार्थी-शिक्षकाला काढावयास सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण ५३.३ टक्के व ५०.०० टक्के आहे.

२) चर्चेतून अधिक उद्दिष्टे लक्षात आणून देतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३४.६ टक्के आहे.

३) अधिक उद्दिष्टे प्राध्यापक स्वत: सांगतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १३.३ टक्के व १५.३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय-घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास ती विद्यार्थी-शिक्षकाला काढण्यास,टाचणात समाविष्ट करण्यास सांगतात ,मात्र काही प्राध्यापक ती चर्चेतून लक्षात आणून देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारणे सांगण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२८

उद्दिष्टे व स्पष्टीकरण बदलामागील कारण सांगणे -

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | १ | १ | १५ |
| | ८६.६८ | ६.६० | ६.६० | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | २० | - | - | २० |
| | ६ | - | - | ६ |
| एकूण | १००.०० | - | - | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेल्या उद्दिष्ट व स्पष्टीकरणातील बदलामागील कारण सांगतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ८६.६ टक्के व १००.०० टक्के आहे.

२) उद्दिष्ट बदलामागील कारण सांगत नाही, प्राध्यापक सारणीमध्ये ६.६ टक्के प्रमाण आहे.

३) कधी-कधी बदलामागील कारण सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टांत बदल करत असता बदलामागील कारणे स्पष्ट करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२२,२३,२४ हे व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२०,२१,२२ हे शैक्षणिक साधने घटकांनुसार समाविष्ट न केल्यास ती दाखविणे, त्यांच्या कल्पना सुचविणे व उपलब्धतेविषयी माहिती सांगणे यासंबंधीचे आहेत. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२९

शैक्षणिक साधनासंबंधी

| | | | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ती शैक्षणिक साधने दाखविण्यास सांगतात | प्राध्यापक | | ११ | ४ | १५ |
| | | | ७३.३ | २६.६ | १००. |
| | विद्यार्थी- | | २० | - | २० |
| | शिक्षक | | ४ | २ | ६ |
| | | एकूण | २४ | - | २६ |
| | | | ९२.३ | ७.६ | १००. |
| शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात | प्राध्यापक | | १२ | ३ | १५ |
| | | | ८०.०० | २०.०० | १०० |
| | विद्यार्थी- | | २० | - | २० |
| | शिक्षक : | | ३ | ३ | ६ |
| | | एकूण | २३ | ३ | २६ |
| | | | ८८.४ | ११.५ | १०० |
| त्यांच्या उपलब्धतेची माहिती देतात | प्राध्यापक | | १४ | १ | १५ |
| | | | ९३.३ | ६.६ | १०० |
| | विद्यार्थी - | | १६ | ४ | २० |
| | शिक्षक | | ३ | ३ | ६ |
| | | एकूण | १९ | ७ | २६ |
| | | | ७३.०० | २६.९ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठय क्रियाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसल्यास --

अ) ती दालविण्यास सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण अनुक्रमे ७३.३ टक्के व ९२.३ टक्के आहे.

ब) ती दालविण्यास सांगत नाहीत, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २६.६ टक्के व ७.६ टक्के आहे.

२) शैक्षणिक साधनांच्या कल्पना प्राध्यापक -

अ) सुचविल्या, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांचे प्रमाण ८०.०० टक्के व ८८.४ टक्के आहे.

ब) सुचवित नाहीत, प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व ११.५ टक्के आहे.

३) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेची माहिती प्राध्यापक -

अ) देतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ९३.३ टक्के व ७३.०० टक्के आहे.

ब) उपलब्धतेची माहिती देत नाहीत, याचे प्रमाण अनुक्रमे ६.६ टक्के व २६.९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

मराठी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य विषयाला अनुसरून शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसल्यास ती दाखविण्यास सांगतात, त्यांच्या कल्पना सुचवितात तसेच त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२३ हा शिक्षक कृतीवरील चर्चेतील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्रमांक ४.३० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३०

शिक्षककृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | आदर्शवाचन, हेतुकथन, आशय व स्पष्टीकरण, प्रश्न, शैक्षणिक साधन इ. | ८ | ५३.३३ |
| २) | शिक्षक कृतीची प्रत्येक बाब टाचणात पाठाच्या पाय-या व कृतीचा मेळ. | १ | ६.६६ |
| ३) | पूर्वज्ञान ते स्वाध्यायापर्यंत चर्चा. | ५ | ३३.३३ |
| ४) | उद्दिष्ट प्राप्त करण्यास आवश्यक त्या कृती. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | वाचन, हेतुकथन, आशय, प्रश्न, शैक्षणिक साधन, विद्यार्थी सहभाग इ. | ७+२ | ३४.६१ |
| २) | पाठ्यमुद्दयानुसार शिक्षक कृतींचे लेखन व पाय-या. | ४+२ | २३.०७ |
| ३) | पूर्वज्ञान ते स्वाध्यायापर्यंत चर्चा करतात. | ८+० | ३०.७६ |
| ४) | विद्यार्थ्यांचे अवधान खेचणा-या कलृप्त्या. | १+२ | ११.५३ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीची चर्चा करताना शिक्षक कृतीमध्ये आदर्श वाचन, हेतुकथन, आशय व स्पष्टीकरण, प्रश्न, शैक्षणिक साधन व विद्यार्थी सहभाग या बाबी पाहतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ५३.३३ टक्के व ३४.६१ टक्के आहे.

२) पूर्वज्ञान ते स्वाध्यायापर्यंत सर्व कृतींवर चर्चा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३०.७६ टक्के आहे.

३) शिक्षककृतीची प्रत्येक बाब व पाठाच्या पाय-या व पाठय-मुद्दयानुसार शिक्षककृतीचे लेखन, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांचे प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व २३.०७ टक्के आहे.

४) उद्दिष्ट प्राप्त करण्यास आवश्यक त्या कृती पाहतो, याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण ६.६६ टक्के आहे.

५) विद्यार्थ्यांचे अवधान खेचणा-या क्लृप्त्या पाहतात, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण ११.५३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक - कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी आदर्श वाचन, हेतुकथन, आशय व स्पष्टीकरण, प्रश्न शैक्षणिक साधने, विद्यार्थी सहभाग या बाबींवर चर्चा करतात, काही प्राध्यापक पूर्वज्ञान ते स्वाध्यायापर्यंत सर्व कृतींची चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२५ हा शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३१

शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देणे -

| | होय | नाही | आवश्यक वाटल्यास | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | १ | ४ | १५ |
| | ६६.६६ | ६.६६ | २६.६६ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | १६ | - | ४ | २० |
| | २ | २ | २ | ६ |
| एकूण | ६९.२३ | ७.६९ | २३.०७ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीवर चर्चा करताना अवांतर माहिती देतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६६.६६ टक्के व ६९.२३ टक्के आहे.

२) अवांतर माहिती देत नाहीत,याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६.६६ टक्के व ७.६९ टक्के आहे.

३) आवश्यक वाटल्यास अवांतर माहिती देतात,याचे प्राध्यापक सारणीमध्ये २६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीमध्ये अवांतर माहिती देतात, काही प्राध्यापक मात्र आवश्यक वाटल्यास अवांतर माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२४ हा शिक्षक कृतीमधील मार्गदर्शनात प्राध्यापक ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३२

शिक्षक कृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथन, स्पष्टीकरण | ६८ | १ | कथन, स्पष्टीकरण | ८३ |
| २ | प्रश्न | ६४ | २ | विद्यार्थी-सहभाग | ६५ |
| ३ | विद्यार्थी-सहभाग | ४८ | ३ | प्रश्न | ६२ |
| ४ | शैक्षणिक साधने | ३४ | ४ | शैक्षणिक साधने | ५० |
| | अन्य : प्रबलन, फलक लेखन | | | | |

वरील सारणीमध्ये क्रम भिन्न दिसतो, म्हणून प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी शिक्षक कृतीमधील घटकांना दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील क्रम निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक - कृतीमध्ये महत्त्वानुसार घटकांना पुढील क्रम देतात -- १) कथन, स्पष्टीकरण, २.५ ) प्रश्न,२.५)विद्यार्थी-सहभाग , ४) शैक्षणिक साधने.

प्राध्यापकांनी याशिवाय प्रचलन व फलक लेखन या शिक्षक कृती सुचविलेल्या आहेत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबीं-संबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३३

विद्यार्थी-कृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबीं

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रश्न कसे विचारावेत, उत्तर पूर्णवाक्यात घेणे त्यादृष्टीने त्याला प्रवृत्त करणे. | ८ | ५३.३३ |
| २) | विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त सहभाग करून घेणे व विद्यार्थी कृतींचा बोध श्रवण, निरीक्षण असा करणे. | ५ | ३३.३३ |
| ३) | शिक्षक-कृतीच्या अनुषंगाने विद्यार्थी-कृती पाहतो. | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | प्रश्न, विद्यार्थी पाहून विचारणे, पूर्ण उत्तर घेणे इ. सवयी लावणे. | १०+३ | ५०. |
| २) | विद्यार्थ्यांला जास्तीत जास्त सहभागी करून घेणे विद्यार्थी-कृतींचा बोध. | ६+२ | ३०.७६ |
| ३) | विद्यार्थी कृती वर्तमानकाळी आहे का ? | ३+० | ११.५३ |
| ४) | विद्यार्थी कृती, शिक्षक कृतीनुसार पाहतात. | १+१ | ७.६९ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी कृती संबंधी चर्चा करताना प्रश्न विचारणे,उत्तर पूर्ण वाक्यात घेणे तशी त्याला सवय लावणे या बाबींवर चर्चा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ५३.३३ व ५०.०० टक्के आहे.

२) विद्यार्थ्याला जास्तीत जास्त सहभागी करून घेणे व विद्यार्थी कृतींचा उदा.श्रवण,निरीक्षण इ.बोध स्पष्ट व्हावा यावर चर्चा करतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३०.७६ टक्के आहे.

३) विद्यार्थी कृती शिक्षक कृतीच्या अनुषंगाने पाहतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ७३.३३ टक्के व ७.६९ टक्के आहे.

४) विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये विद्यार्थी कृती वर्तमानकाळी असणे, याचे प्रमाण ११.५३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष -

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-कृतीसंबंधी चर्चा करताना प्रश्न कसे विचारावेत,उत्तर पूर्ण वाक्यात घेणे तसे त्याला प्रवृत्त करणे या विषयी चर्चा करतात.काही प्राध्यापक मात्र जास्तीत जास्त विद्यार्थी-सहभाग व त्यांच्या कृतींचा बोध असणारे लेखन यावर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२७ हा मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा केल्या जाणाऱ्या गोष्टीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३४

मूल्यमापनप्रश्नावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- |
| १) | प्रश्न उद्दिष्टानुसार, पाठ्यांश, प्रश्न रचना, स्वरूप, पुरेसे प्रश्न, कुवत या बाबीं पाहतो. | १२ | ८०.०० |
| २) | प्रश्न विचार प्रवर्तक आहेत का ? | २ | १३.३३ |
| ३) | झालेल्या ज्ञानाचे मापन होते का ? | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पाठ्यांश, उद्दिष्टे व प्रश्नरचना, प्रकार पाहतात. | १४+१ | ५७.६९ |
| २) | प्रश्न उद्दिष्टानुसार आहेत का ? | ४+२ | २३.०७ |
| ३) | पाठ्यांशाचे मूल्यमापन होते का ? | २+३ | १९.२३ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनावरील प्रश्नांसंदर्भात उद्दिष्टे, पाठ्यांश, प्रश्न प्रकार, रचना, स्वरूप तसेच विद्यार्थी-कुवत या बाबींवर चर्चा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ८०.०० टक्के व ५७.६९ टक्के आहे.

२) प्रश्न विचारप्रवर्तक आहेत का हे पाहतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये १३.३३ टक्के प्रमाण आहे.

३) प्रश्न उद्दिष्टानुसार आहेत का ? याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण २३.०७ टक्के आहे.

४) मूल्यमापन प्रश्नातून पाठ्यांशाचे । विद्यार्थ्यांना मिळालेल्या ज्ञानाचे मूल्यमापन होते का ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व १९.२३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्ना संदर्भात चर्चा करताना उद्दिष्टे ,पाठयांश,प्रश्न रचना,प्रश्नांचे स्वरुप, विद्यार्थ्यांची कुवत,पुरेसे प्रश्न या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगण्याविषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३५

मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगणे

| | होय | नाही | फक्त सुरवातीला | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | ३ | ६ | १५ |
| | ४०.०० | २०.०० | ४०.०० | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | १६ | ४ | - | २० |
| | ५ | १ | - | ६ |
| एकूण | ८६.७६ | १९.२३ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ४०.०० टक्के व ८६.७६ टक्के आहे.

२) मूल्यमापनाप्रश्नांचे स्वरुप फक्त सुरवातीलाच सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) मूल्यमापन प्रश्नाचे स्वरुप सांगत नाहीत, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १९.२३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात.

मात्र काही प्राध्यापक फक्त सुरवातीला सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२९ हा स्वाध्यायावर चर्चा केल्या जाणाऱ्या बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३६

स्वाध्यायावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विषयज्ञान,उद्दिष्टे वयोगटानुसार,घटकाचे दृढीकरण करणारा. | १० | ६६.६६ |
| २) | बौद्धिक कुवत,भावनिक वाढ,मनोरंजक अभिरूचीपर,सोपा. | २ | १३.३३ |
| ३) | स्वाध्यायाचे वेगवेगळे प्रकार सांगतो | २ | १३.३३ |
| ४) | स्वाध्याय तर्काला वाव देणारा,परिणामकारक | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचाप्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | विषय,उद्दिष्टे वयोगट यानुसार घटकांचे दृढीकरण . | १०+३ | ५०. |
| २) | कृतिशीलतेला वाव देणारा व विषयाची गोडी वाढविणारा,इयत्ता ३. | ७+१ | ३०.७ |
| ३) | सृजनशील ,उपयोजनपर वृत्तिविकास साधणारा. | २+१ | ११.५३ |
| ४) | परिणामकारक,तोचतोपणा नको,माहिती उपलब्ध होणारा. | १+१ | ७.६९ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना स्वाध्याय उद्दिष्टे, विषयज्ञान,वयोगट यानुसार व घटकांचे दृढीकरण करणारा असावा, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६६.६६ टक्के व ५०.०० टक्के आहे.

२) स्वाध्याय बौद्धिक कुवत,भावनिक वाढ यानुसार तसेच तो अभिरुची,मनोरंजन वाढविणारा सोपा व कृतिशील असावा, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १३.३३ टक्के व ३०.०० टक्के आहे.

३) स्वाध्यायाचे वेगवेगळे प्रकार सांगतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण १३.३३ टक्के आहे.

४) विद्यार्थी सारणीमध्ये स्वाध्याय सृजनशील वृत्तिविकास साधणारा असावा, याचे प्रमाण ११.५३ टक्के आहे.

५) त्याचप्रमाणे स्वाध्याय व तर्काला वाव देणारा,परिणामकारक, तोच तोपणा नसणारा,सहज न उपलब्ध होणारा याप्रमाणे चर्चा करतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व ७.६९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना उद्दिष्टे ,विषयज्ञान,वयोगट व घटकाचे दृढीकरण या मुद्द्यांवर चर्चा करतात.

काही प्राध्यापक कृतिशीलता, मनोरंजकता, अभिरुची, सोपेपणा, इयत्ता याकडे लक्ष देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र.३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३७

विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणा -

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्पष्टीकरण करून बदल कसा हवा, नेमका, उपलब्ध होणारा, याचे मार्गदर्शन करतो. | ९ | ६०. |
| २) | स्वाध्याय स्वत: सांगतो, अनेक प्रकार पुढे ठेवून निवडण्यास सांगतो. | ५ | ३३.३३ |
| ३) | चिंतन, मनन करा व स्वाध्याय बदलून लिहा असे सांगतो. | १ | ६.६० |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | तो कसा असावा याचे मार्गदर्शन करून बदल सुचवितात. | ८+३ | ४२.३० |
| २) | योग्य, दुसरा स्वाध्याय लिहा अशी सूचना देतात. | ७+१ | ३०.७६ |
| ३) | स्वत: स्वाध्याय प्रकार समोर ठेवतात, सांगतात. | ५+२ | २६.९२ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी-अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करण्याची अपेक्षा असेल तर ती कसा असावा याचे स्पष्टीकरण । मार्गदर्शन करून बदल सुचवितात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६०.०० टक्के व ४२.३० टक्के आहे.

२) प्राध्यापक स्वाध्याय स्वत: सांगतात - अनेक प्रकार सांगून निवडण्यास सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व २६.९२ टक्के आहे.

३) चिंतन, मनन करा व स्वाध्याय बदलून लिहा अशी सूचना देतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६.६६ टक्के व ३०.७६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करताना सुधारणेविषयी स्पष्टीकरण, मार्गदर्शन यातून बदल सुचवितात. काही प्राध्यापक मात्र स्वाध्यायाचे अनेक प्रकार विद्यार्थी शिक्षकांसमोर ठेवून निवडण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२३ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न ३१ हा फलक लेखना वरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३८

फलक-लेखनच्या मार्गदर्शनातील बाबीं

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सुवाच्य, शुद्ध, बिनचूक, मुद्देसूद, रेखीव, आकर्षक हेतुप्रश्न, लेखन इ. | ७ | ४६.६६ |
| २) | विषय, घटक, इयत्ता, दिनांक, फलकाचे दोन भाग व मुद्दे, शब्द, आरेखन. | ५ | ३३.३३ |
| ३) | लेखन-क्रमबध्द, समर्पक शुद्ध. | ३ | २०. |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | सुवाच्य, महत्त्वाचे, मुद्दे, सरळ, रेखीव, शुद्ध. | १६+२ | ६९.२३ |
| २) | पाठाचे नाव, इयत्ता, शब्द, मुद्दे, फलकाचे दोन भाग, स्वाध्याय इ. | ३+३ | २३.०७ |
| ३) | लेखन अर्थपूर्ण व सुटसुटीत, नेमके. | १+१ | ७.६९ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापन प्रद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखन संदर्भात ज्या गोष्टींची चर्चा करतात त्यामध्ये मुद्देसूदपणा, सुवाच्च, शुध्द, रेखीव, आकर्षक लेखन, हेतुप्रश्न लिहिणे मुद्द्यांवर चर्चा करतात, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ४६.६६ टक्के व ६९.२३ टक्के आहे.

२) विषय, घटक, इयत्ता, दिनांक, शब्द, वाक्प्रचार, मुद्दे, फलकाच्या दोन भागातील लेखन व स्वाध्याय लेखन इ. बाबींवर चर्चा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व २३.०७ टक्के आहे.

३) लेखन क्रमबध्द, अर्थपूर्ण हवे, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे २०.०० टक्के व ७.६९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावरील मार्गदर्शनात मुद्देसूदपणा, सुवाच्च शुद्ध, रेखीव, आकर्षक लेखन, हेतुप्रश्न, लेखन या मुद्द्यांवर चर्चा करतात.

काही प्राध्यापक मात्र विषय, घटक, इयत्ता, दिनांक, इयत्ता व मुद्दे, उपमुद्दे, शब्द, वाक्प्रचारांचे लेखन, फलकांचे दोन भागात करणे या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३४ हा व विद्यार्थी-शिक्षक-प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३२ हा विद्यार्थी-शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनातील सुधारणांसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.३९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.३९

फलक लेखनातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | त्रुटीनुसार,सुव्यवस्थेबद्दल,दोष दाखवून सुधारणा सांगतो. | ५ | ३३.३३ |
| २) | शब्द,वाक्प्रचार आवश्य लिहा,कवीचे लेखकाचे नाव लिहा ? | २ | १३.३३ |
| ३) | लेखन दोन भागात करा रंगीत खडूचा योग्य तेथे वापर करा. | ४ | २६.६६ |
| ४) | शुद्ध,अचूक,मुद्देसूद लिहा. | ४ | २६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | लेखनाचे नियोजन हवे,दोष,त्रुटी पाहा. | ८+५ | ५० |
| २) | लेखन शुद्ध,स्पष्ट ,सरळ रेषेत,वळणदार करा. | ९+१ | ३८.४६ |
| ३) | लेखक,कवी,घटक व उपघटक लिहा. | ३+० | ११.५३ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांच्या फलक लेखन नियोजनात सुधारणा सुचविताना प्राध्यापक त्रुटीनुसार फलक लेखनाच्या सुव्यवस्थेबद्दल दोष दाखवून सुधारणा सांगतात. त्या त्रुटी दोष पहा, नियोजन करा, याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ३३.३३ टक्के व ५०.०० टक्के आहे.

२) लेखन शुद्ध ,स्पष्ट ,वळणदार,सरळ रेषेत,मुद्देसूद करा, याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये २६.६० टक्के व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ३८.३६ टक्के आहे.

३) फलक लेखन दोन भागात करा,योग्य तेथे रंगीत खडू वापरा,याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण २६.६६ टक्के आहे.

४) शब्द वाक्प्रचार,आशय,कवी । लेखकाचे नाव,घटक उपघटक लिहा. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १३.३३ टक्के व ११.५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

मराठी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखन नियोजनात त्रुटीनुसार फलक लेखनाच्या सुव्यवस्थेबद्दल ,दोष दाखवून सूचना देतात.

काही प्राध्यापक मात्र शब्द,वाक्प्रचार,लेखन दोन भागात करणे, मुद्देसूद,शुद्ध,वळणदार,सरळ रेषेत लिहिणे या विषयी सुधारणा सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.३५ हा व विद्यार्थी शिक्षक-प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३३ हा पाठ उद्या असता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास येतो यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४०

पाठ उद्या असता, मार्गदर्शन घेणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | दोन दिवस आधी मार्गदर्शन घ्यावे, पाठ रद्द. | ९ | ६०.०० |
| २) | अडचण पाहतो व मार्गदर्शन करतो पण काम वेळच्यावेळी करण्याची समज देतो. | ५ | ३३.३३ |
| ३) | विद्यार्थ्यांच्या कुवतीचा अंदाज घेऊन मार्गदर्शन करतो. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | पाठमार्गदर्शन दोन दिवस आधी घ्या, हा पाठ रद्द. | १०+३ | ५०.०० |
| २) | अडचण, कारण विचारून पुन्हा असे न करण्याची समज देऊन मार्गदर्शन करतात. | ७+२ | ३४.६१ |
| ३) | मार्गदर्शन देतात. | ३+१ | १५.३८ |
| | एकूण | २०+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक पाठ उद्या आहे आणि विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आला तर पाठ मार्गदर्शन दोन दिवस आधी घ्या हा पाठ रद्द करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६०.०० टक्के व ५०.०० टक्के आहे.

२) अडचण विचारून मार्गदर्शन करतात पण पुन्हा असे न करण्याची, वेळच्या वेळी काम करण्याची समज देतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३३.३३ व ३४.६१ टक्के आहे.

३) प्राध्यापक मार्गदर्शन देतात, याचे विद्यार्थी सारणीमध्ये प्रमाण १५.३८ टक्के आहे.

४) विद्यार्थ्यांच्या कृतीचा अंदाज घेऊन मार्गदर्शन करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये प्रमाण ६.६६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उशा आहे आणि विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आल्यास बहुसंख्य प्राध्यापक पाठ मार्गदर्शन दोन दिवस आधी घेण्याची सूचना देऊन पाठ रद्द करतात. काही प्राध्यापक मात्र अडचण विचारून व पुन्हा असे न करण्याची समज देऊन मार्गदर्शन करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्दयांना अधिक वेळ देतात त्यांच्या क्रमाविषयीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.४१ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.४१

मार्गदर्शनात प्राध्यापक अधिक वेळ देतात त्या घटकांचा क्रम -

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२९ | १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | २२६ |
| २ | पाठ्यमुद्दे | ११९ | २ | पाठ्यमुद्दे | २११ |
| ३ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ११६ | ३ | शिक्षक-विद्यार्थी कृती | २१० |
| ४ | प्रेरणा | १०४ | ४ | प्रेरणा | १५२ |
| ५ | पूर्वज्ञान | ८५ | ५ | पूर्वज्ञान | १३७ |
| ६ | मूल्यमापन साधने | ६६ | ६ | उपयोजन | १०६ |
| ७ | फलक लेखन | ६५ | ७ | शैक्षणिक साधने | १०५ |
| ८ | संकलन | ६१ | ८ | फलक लेखन | १०४ |
| ९ | शैक्षणिक साधने | ५१ | ९ | संकलन | १०० |
| १० | उपयोजन | ५० | १० | मूल्यमापन साधने | ७० |

वरील सारणीमध्ये १ ते ५ क्रम समान आहेत. पुढील ६ ते १० क्रम असमान आहेत म्हणून मार्गदर्शन प्राध्यापक ज्या घटकांना अधिक वेळ देतात त्यानुसार घटकांना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष (क्रम ) काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ज्या घटकांना मार्गदर्शनात अधिक वेळ देतात तो क्रम पुढील प्रमाणे - १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, २) पाठयमुद्दे ३) शिक्षक-विद्यार्थी कृती, ४) प्रेरणा, ५) पूर्वज्ञान, ६) फलक लेखन ७) मूल्यमापन, ७.२) शैक्षणिक साधन, ७.३) उपयोजन, १०) संकलन.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४२

मार्गदर्शनामध्ये दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कोणताही नाही | ९ | ६०. |
| २) | शैक्षणिक साधने | ४ | २६.६६ |
| ३) | उपयोजन, संकलन | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | कोणताही नाही | ६+२ | ३०.७६ |
| २) | शैक्षणिक साधने | ५+३ | ३०.७६ |
| ३) | पूर्वज्ञान | ३+० | ११.५ |
| ४) | संकलन, उपयोजन | ६+१ | २६.० |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाकडे असा कोणताही घटक नाही. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६०.०० टक्के व ३०.७६ टक्के आहे याचा अर्थ सर्व घटकांकडे लक्ष देतात.

२) शैक्षणिक साधनाकडे दुर्लक्ष होते, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २६.६६ टक्के व ३०.७६ टक्के आहे.

३) उपयोजन, संकलनाकडे दुर्लक्ष, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व २६.९ टक्के आहे.

४) प्राध्यापक पूर्वज्ञानाकडे दुर्लक्ष करतात, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण ११.५ टक्के आहे हे अल्प आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनातील सर्व घटकांकडे लक्ष देतात.

मात्र दुर्लक्ष केले तरी चालेल असे व प्राध्यापक दुर्लक्ष करतात असे घटक - शैक्षणिक साधने - मराठीच्या बाबतीत तसेच काही प्रमाणात उपयोजन व संकलन.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३६ हा पाठ मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा सहभाग घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४३

मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | - | - | १५ |
| | ६६.६६ | ३३.३३ | | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १० | १० | - | - | २० |
| | ४ | २ | | | ६ |
| एकूण | ५३.८४ | ४६.१५ | | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा सहभाग खूपच घेतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६६.६६ टक्के व ५३.८४ टक्के आहे.

२) मध्यम सहभाग घेतात, याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ४६.१५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. काही प्राध्यापक मात्र मध्यम सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थ्यांचा सहभाग घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४४

एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | २ | ५ | ७ | १ | १५ |
| | १३.३३ | ३३.३ | ४६.६ | ६.६६ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | २ | ४ | ७ | ७ | २० |
| | १ | २ | २ | १ | ६ |
| एकूण | ११.५ | २३.०० | ३४.६ | ३०.० | १००. |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका पाठ मार्गदर्शनाच्यावेळी उपस्थित असलेल्या अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा अल्प सहभाग घेतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांचे प्रमाण अनुक्रमे ४६.६ टक्के व ३४.६ टक्के आहे.

२) मध्यम सहभाग घेतात, याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३ टक्के व २३.०० टक्के आहे.

३) खूपच सहभाग घेतात, याचे प्रमाण अनुक्रमे १३.३३ टक्के व ११.५ टक्के आहे.

४) अजिबात सहभाग घेतला जात नाही, याचे प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व ३०.०० टक्के आहे.

## निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका पाठ मार्गदर्शनाच्यावेळी उपस्थित असलेल्या अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा अल्प सहभाग घेतात ,काही प्राध्यापक मध्यम सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा करतात की पूर्ण बदल करतात यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४५

पाठ-नियोजन चुकीचे असल्यास

| | आहे त्यातच सुधारणा | पूर्ण बदल | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | ३ | १५ |
| | ८०.०० | २०.०० | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | १४ | ६ | २० |
| | ६ | - | ६ |
| एकूण | ७६.९२ | २३.०७ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्यात सुधारणा करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे ८०.०० टक्के व ७६.९२ टक्के आहे.

२) पाठ नियोजन पूर्ण बदलतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व २३.०७ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांचे पाठ-नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठनियोजनात सुधारणा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० हा मार्गदर्शनाच्या काळात विद्यार्थी-शिक्षकांने चुकीची उत्तरे देण्यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४६

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिली असता

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | चूक का होते याचा विचार करून,प्रश्नोत्तर चर्चेतून बरोबर उत्तर काढून घेतो. | १० | ६६.६६ |
| २) | अधिक वाचन,अभ्यास करून मग मार्गदर्शन घेण्यास सांगतो. | ४ | २६.६६ |
| ३) | न रागावता समजावून देतो वा स्वत: सांगतो. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | न रागावता प्रश्न विचारून उत्तर काढून देतात. | १२+१ | ५०.० |
| २) | अधिक अभ्यास,वाचन करा,संदर्भ शोधा व मग या. | ५+३ | ३०.७६ |
| ३) | स्वत: उत्तर सांगतात. | ३+२ | १९.२३ |
| | एकूण | २०+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांशी चर्चा करताना त्यांनी चुकीची उत्तरे दिली तर चूक का होते याचा न रागावता विचार करतात व प्रश्नोत्तर चर्चेतून बरोबर उत्तर काढून घेतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ६६.६६ टक्के व ५०.०० आहे.

२) अधिक वाचन,अभ्यास करून मग मार्गदर्शनास या असे सांगतात,याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे २६.६६ टक्के ,३०.७६ टक्के आहे.

३) न रागावता समजावून देतात, स्वत: उत्तर सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व १९.२३ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य प्राध्यापक पाठ मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाने चुकीचे उत्तर दिल्यास न रागावता चूक का होते याचा विचार करतात व प्रश्न विचारुन बरोबर उत्तर काढून घेतात.

काही प्राध्यापक मात्र अधिक वाचन, अभ्यास करुन यायला सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न २९ हा अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधने यांच्या आग्रहा संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४७

अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधने यांचा आग्रह -

| | होय | नाही | आवश्यक वाटल्यास | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | १ | १ | १५ |
| | ८६.६१ | ६.६६ | ६.६६ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १९ | १ | - | २० |
| | ४ | २ | - | ६ |
| एकूण | ८८.४६ | ११.५३ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन अभ्यास व शैक्षणिक साधने यांचा आग्रह धरतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे ८६.६६ टक्के व ८८.४६ टक्के आहे.

२) आग्रह धरत नाहीत, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व ११.५३ टक्के आहे.

३) आवश्यक वाटल्यासच अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधने यांचा आग्रह धरतो, याचे प्राध्यापक प्रमाण ६.६६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांकडे अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधने यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४३ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ हा मराठी अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शन व अन्य विषयांच्या अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शन यातील फरकासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४८

मराठीचे पाठमार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठमार्गदर्शनातील फरक

| | होय | नाही | उत्तरे नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १५ | - | - | १५ |
| | १००.०० | | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १३ | - | ७ | २० |
| | ६ | - | - | ६ |
| एकूण | ७३.०७ | | २६.९२ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयाच्या पाठ मार्गदर्शनात फरक आहे, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक प्रमाण अनुक्रमे १००.०० टक्के व ७३.०७ टक्के आहे.

२) फरक नाही, याचे शून्य प्रमाण तर

३) उत्तरे नसणारे विद्यार्थी-शिक्षकांचे प्रमाण २६.९२ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी पाठ मार्गदर्शन व अन्य विषयाचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणते फरक आहेत ते पान क्र. ५८० ते ५८३ वर सर्व विषयांचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या मतांचा एकत्रित गोषवारा दिलेला आहे.

(२) विषय : हिंदी

हिंदी विषयाचे पाठ मार्गदर्शक व विद्यार्थी-शिक्षक यांनी प्रश्नावलीला दिलेला प्रतिसाद.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१ हा पाठ टाचण न काढता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.४९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.४९

पाठटाचणाशिवाय मार्गदर्शन

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मार्गदर्शन देत नाही, प्रथम टाचण काढा. | ६ | ४२.८५ |
| २) | टाचण कसे काढावे याचे मार्गदर्शन करतो व टाचण काढण्यास सांगतो. | ४ | २८.५७ |
| ३) | तासिकेचा घटक सांगतो व टाचण काढा असे सांगतो. | २ | १४.२८ |
| ४) | चर्चा करतो, सूचना देतो. | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मार्गदर्शन देत नाहीत, प्रथम टाचण काढा-- | ४+४ | ७२.७२ |
| २) | टाचण कसे काढावे याचे मार्गदर्शन करून... | १+१ | १८.१८ |
| ३) | घटक वाचा, विचार करा, प्रयत्न करा. | ०+१ | ९.०९ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीत हिंदी विषयाचे पाठ मार्गदर्शक टाचणाशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, याचे प्रमाण ४२.८५ टक्के व विद्यार्थी सारणीत ते ७२.७२ टक्के आहे.

२) टाचण नसेल तर ते कसे काढावे याचे मार्गदर्शन देणारे प्राध्यापक मार्गदर्शक प्राध्यापक सारणीमध्ये २८.५७ टक्के व विद्यार्थी सारणीत १८.१८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य प्राध्यापक पाठ टाचण तयार न करता मार्गदर्शनास आले असता विद्यार्थी-शिक्षकाला मार्गदर्शन देत नाहीत. मात्र काही प्राध्यापक टाचण कसे काढावे यासंबंधी मार्गदर्शन करून टाचण काढण्यास सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२ हा पाठ टाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५०

त्रोटक पाठटाचणासंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उपलब्ध स्थितीनुसार टाचणपूर्तिबाबत मार्गदर्शन करतो. | ४ | २८.५७ |
| २) | पुन्हा टाचण काढण्यास सांगतो,त्याशिवाय मार्गदर्शन नाही. | ४ | २८.५७ |
| ३) | अर्ध्या टाचणाचे कारण विचारतो व ते पूर्ण करण्यास सांगतो. | ३ | २१.४२ |
| ४) | कारण विचारून अडचण असल्यास दूर करतो व काळजीपूर्वक काढा. | ३ | २१.४२ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी - शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | आवश्यक त्या मुद्द्यांची कल्पना देतात .मुद्दे नमूद करण्याचे मार्गदर्शन करतात व पूर्ण करा असे --- | २+३ | ४५.४५ |
| २) | पुन्हा पूर्ण व सविस्तर टाचण काढा त्याशिवाय मार्गदर्शन नाही असे सांगतात. | ३+३ | ५४.५४ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठ टाचण सविस्तर न काढता त्रोटक मुद्देवजा टाचण काढल्यास मार्गदर्शक प्राध्यापक उपलब्ध स्थितीनुसार मार्गदर्शन करुन टाचण पूर्तीबाबत मार्गदर्शन करतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २८.५७ टक्के आहे.

त्याचप्रमाणे पुन्हा टाचण पूर्ण करून आणा त्याशिवाय मार्गदर्शन नाही, असे सांगणा-या प्राध्यापकांचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २८.५७ टक्के आहे हे प्रमाण समान आहे.

२) आवश्यक मुद्द्यांची कल्पना देऊन ते नमूद करण्याचे मार्गदर्शन प्राध्यापक करतात, असे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ४५.४५ टक्के आहे.

३) तर टाचण पूर्ण करा, सविस्तर काढा असे सांगतात. याचे विद्यार्थी सारणीत ५४.५४ टक्के प्रमाण आहे.

४) केवळ कारण विचारतात व टाचण पूर्ण करा, असे सांगणारे व कारण अडचण विचारुन ती दूर करून मग टाचण पूर्ण करा असे सांगणारे प्राध्यापक सारणीत समान आहेत(२१.४२ टक्के )

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षक सविस्तर पाठ टाचण तयार न करताच मार्गदर्शनासाठी मार्गदर्शक प्राध्यापकाकडे गेल्यास हिंदी अध्यापन-पद्धतीचे बहुसंख्य प्राध्यापक टाचण पूर्ण व सविस्तर काढावयास सांगून मगच मार्गदर्शन देतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३ हा पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणा-या सूचनेसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक आणि विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५१

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वीच्या सूचना

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठाच्या पायऱ्या ध्यानात घ्या, घटकाचे सखोल वाचन करा, पाठ्यमुद्दे, उद्दिष्टे यांचा विचार करा. | ६ | ४२.४५ |
| २) | टाचण काळजीपूर्वक काढावे सर्व मुद्दयांचा विचार करा. | ४ | २८.५७ |
| ३) | अवांतर माहिती मिळवा, टाचण ही आवश्यक बाब आहे. | ३ | २१.४२ |
| ४) | प्रेरणा, मुद्दे, प्रश्न, मूल्यमापन यावर सूचना देतो | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १०० |

| | विद्यार्थी - शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | पाठाच्या पायऱ्या ध्यानात घेऊन, पाठ्यघटकाचा अभ्यास करुन टाचण काढा. | ३+३ | ५४.५४ |
| २) | चुकांच्या दुरुस्तीसंबंधी सूचना. | ०+२ | १८.१८ |
| ३) | टाचण पुन्हा काढा. | २+० | १८.१८ |
| ४) | टाचण काळजीपूर्वक काढा उद्दिष्टे सफल होण्यास प्रश्न, कथन, शैक्षणिक साधने यांचा विचार करा. | ०+१ | ९.०९ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शन प्राध्यापक पाठ टाचण अर्धे असेल तर पाठाच्या पाय-या ध्यानात घ्या, घटकांचे सखोल वाचन करुन पाठमुद्दे उद्दिष्टे यांचा विचार करा. असे सांगतात याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ४२.८५ टक्के असे आहे व विद्यार्थी सारणीत ते ५४.५४ टक्के आहे.

२) टाचण काळजीपूर्वक काढा, सर्व मुद्दयांचा विचार करा. या सूचनेचे प्रमाण प्राध्यापक सारणीत २८.५७ टक्के आहे व विद्यार्थी-सारणीत ९.०९ टक्के आहे.

३) अवांतर माहिती मिळवा, टाचण ही आवश्यक बाब आहे, याचे प्राध्यापक सारणीतील २१.४२ टक्के प्रमाण आहे.

४) चुकांच्या दुरुस्तीनुसार सूचना व टाचण पुन्हा काढा, यांचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण समान आहे (१८.१८ टक्के )

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी विषयाचे त्रोटक पाठ टाचण घेऊन विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास गेल्यास बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक पाठाच्या पाय-या, व घटकाचे सखोल वाचन या बाबींकडे लक्ष देण्यास सांगतात.

प्रश्न क्र.४ हा पाठ मार्गदर्शनाची सुरवात ज्या घटकापासून प्राध्यापक करतात त्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५२

पाठमार्गदर्शनाचा सुरवातीचा घटक

| प्राध्यापकांचा प्रतिसाद | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ६ | ४२.८५ |
| २) | प्रेरणा | २ | १४.२८ |
| ३) | पूर्वज्ञान | ३ | २१.४२ |
| ४) | घटक, शाखा, इयत्ता | ३ | २१.४२ |
| | एकूण | १४ | १०० |

विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद

| | | | |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे | १ + १ | १८.१८ |
| २) | प्रेरणा | २ + १ | २७.२७ |
| ३) | पूर्वज्ञान | २ + ३ | ४५.४५ |
| ४) | अध्यापनमुद्दयापासून | ० + १ | ९.०९ |
| | एकूण | ५ + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठ टाचण मार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक हिंदी विषयाच्या पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांकडे गेल्यास मार्गदर्शक मार्गदर्शनाची सुरुवात उद्दिष्टे व स्पष्टीकरणापासून करतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ४२.८५ टक्के आहे व विद्यार्थी-सारणीत ते १८.१८ टक्के आहे.

२) पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनास सुरवात करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण अनुक्रमे २१.४२ टक्के व ४५.४५ टक्के आहे.

३) घटक, शाखा, इयत्ता इ.प्राथमिक घटकांपासून मार्गदर्शनास सुरवात करतात. याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २१.४२ टक्के आहे.

४) प्रेरणेपासून मार्गदर्शनास सुरवात करतात. याचे प्राध्यापक सारणीत प्रमाण १४.२८ टक्के व विद्यार्थी सारणीत २७.२७ टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी पाठ मार्गदर्शनासाठी विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकाकडे गेल्यास ते प्रथम पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनाची सुरवात करतात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.५ हा मार्गदर्शनातील चर्चा केल्या जाणाऱ्या मुद्दयांच्या क्रमासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५३

मार्गदर्शनातील घटकांचा क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञान | १३० | १ | पूर्वज्ञान | १०१ |
| २ | आशय वा पाठ्य-मुद्दे | १२७ | २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ८७ |
| ३ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ११७ | ३ | प्रेरणा | ८६ |
| ४ | प्रस्तावना, प्रेरणा | १०५ | ४ | आशय, पाठ्यमुद्दे | ८१ |
| ५ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ८५ | ५ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ७० |
| ६ | संकलन | ५६ | ६ | शैक्षणिक साधने | ४३ |
| ७ | फलक लेखन | ४८ | ७ | संकलन | ४१ |
| ८ | शैक्षणिक साधने | ४३ | ८ | फलक लेखन | ४० |
| ९ | मूल्यमापन साधने | ३१ | ९ | उपयोजन | २९ |
| १० | उपयोजन | ३३ | १० | मूल्यमापन साधने | २४ |

वरील सारणीमध्ये प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम भिन्न आहेत, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक, मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने घटकांची चर्चा करतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी - शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित करुन पुढील निष्कर्ष, क्रम काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १) पूर्वज्ञान, २) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, ३) आशय । पाठय-मुद्दे, ४)प्रस्तावना । प्रेरणा, ५) शिक्षक व विद्यार्थी कृती, ६) संकलन, ७) शैक्षणिक साधने, ८) फलक लेखन, ९. ५) मूल्यमापन साधने, ९.५)उपयोजन या प्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्द्यांसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.५.५४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५४

पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मुलांचा वयोगट, पाठयांश व विद्यार्थ्यांचा पूर्वानुभव. | ३ | २१.४२ |
| २) | विद्यार्थी-शिक्षकांच्या पूर्वज्ञानासंबंधी चर्चा. | ३ | २१.४२ |
| ३) | यासारखा पूर्वी पाठ, पद्य अभ्यासले आहेत कां ? कोणता ? | ६ | ४२.८५ |
| ४) | संबंधित पाठयांश, मुद्दा यांच्याशी हे पूर्वज्ञान कसे संबंधित आहे ? सांगड कुठे घातली ? | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | घटकानुसार प्रेरणा आहे कां ? प्रेरणेत गहीत पूर्वज्ञान जागृत होईल कां ? | ०+३ | २७.२७ |
| २) | विद्यार्थ्यांचे (आमचे)पूर्वज्ञान पाठाला अनुसरुन कितपत आहे ? चर्चा करतात. | ०+२ | १८.१८ |
| ३) | घटकानुसार पूर्वज्ञान आहे ? यापूर्वी कोणता पाठ, पूर्वानुभव, इयत्ता ? | ५+० | ४५.४५ |
| ४) | पूर्वज्ञान पाठाशी संबंधित आहे कां ? | ०+१ | ९.०० |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थविर्वचन :

वरील सारणीमध्ये पूर्वज्ञानावर चर्चा करताना हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक -

१) मुलांचा वयोगट,पाठयांश व त्यानुसार विद्यार्थ्यांचा पुर्वानुभव यावर चर्चा करतात,याचे प्राध्यापक सारणीमध्ये २१.४२ प्रमाण आहे.

२) प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञानावर चर्चा करतात,त्याचा अंदाज - २१.४२ (प्राध्यापक सारणी )

३) व विद्यार्थी सारणीत हे प्रमाण १८.१८ इतके आहे.

४) यासारखा पूर्वी पाठ,पद्य अभ्यासला का ? कोणता, यावर प्राध्यापक चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीत प्रमाण ४२.८५ टक्के व विद्यार्थी सारणीत ४५.४५ टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना या सारखाच पूर्वीचा पाठ,पद्य याविषयी चर्चा करतात.

काही प्राध्यापक मुलांचा वयोगट,पूर्वानुभव,पाठयांश व त्यानुसार दिलेली प्रेरणा यावर चर्चा करतात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.७ पूर्वज्ञाना संदर्भातील प्रश्न विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५५

पूर्वज्ञानासंदर्भात प्रश्न विचारणे

| प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| १) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान काय ? त्याना त्याची माहिती आहे ? | ११ | ७८.५७ |
| २) पूर्वज्ञान घटकाशी संबंधित आहे कां ? | १ | ७.१४ |
| ३) पूर्वज्ञान जागृत करण्यास काय करणार ? | २ | १८.१८ |
| एकूण | १४ | १०० |

| विद्यार्थी-शिक्षक-प्रतिसाद | | |
|---|---|---|
| १) हेच-पूर्वज्ञान का गृहीत धरले ? प्रेरणेत अपेक्षित उत्तर मिळलेल कां ? | २+२ | ३६.३६ |
| २) पूर्वज्ञान नसेल तर घटक कसा मांडणार ? | १+२ | २७.२७ |
| ३) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान काय ? त्याला कोणता पाठ झाला आहे ? कोणत्या इयत्तेत ? लेखक कोण ? इ. | २+२ | ३६.३६ |
| एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीवरुन विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान काय ? त्याला काय माहिती आहे ? त्याला कोणता पाठ झाला आहे ? कोणत्या इयत्तेत ? लेखक कोण ? इ.प्रश्न विचारणा-यांचे प्रमाण प्राध्यापक सारणीत ७८.५७ टक्के व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के असे आहे.

२) हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले,प्रेरणेत अपेक्षित उत्तर मिळले का ? याचे विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

३) पूर्वज्ञान जागृत करण्यास काय करणार ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये १८.१८ टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष--

हिंदी अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान,त्याला झालेलापाठ,इयत्ता,लेखक या मुद्यांकडे लक्ष वेधतात.

काही प्राध्यापक विशिष्ट पूर्वज्ञान गृहीत धरण्यावर व अपेक्षित उत्तर मिळणे यावर लक्ष वेधतात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५६

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | तो धडा, कविता संदर्भ पुस्तक वाचायला सांगतो. | ६ | ४२.८५ |
| २) | पुस्तक आणवून वाचायला सांगतो. | १ | ७.१४ |
| ३) | इतर अनुभव तपासतो. | ३ | २१.४२ |
| ४) | मागील इयत्ता, संदर्भ स्वत: सांगतो उदाहरणे देतो. | ४ | २८.५७ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अनेक प्रश्न विचारुन पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करतात. | १ + २ | २७.२७ |
| २) | मागील इयत्तेचा झालेला भाग स्वत: सांगतात. आठवण करुन देतात. | ४ + ३ | ६३.६३ |
| ३) | मागील पाठ्यपुस्तक वाचायला सांगतात. | ० + १ | ९.०९ |
| | एकूण | ५ + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मार्गदर्शक प्राध्यापकांनी विचारलेल्या प्रश्नाचे विद्यार्थी-शिक्षकास उत्तर संदर्भ देता येत नसल्यास मार्गदर्शक प्राध्यापक तो धडा, कविता वाचायला सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४२.८५ टक्के प्रमाण आहे.

२) मागील संदर्भ मार्गदर्शक प्राध्यापक स्वत: सांगतात, आठवण करुन देतात, याचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ६३.६३ टक्के व प्राध्यापक सारणीत २८.५७ टक्के प्रमाण आहे.

३) इतर अनुभव तपासतो - प्राध्यापक सारणीत २१.४२ टक्के व विद्यार्थी सारणीत प्रश्न विचारुन पूर्वज्ञानावर चर्चा करतात याचे प्रमाण २७.२७ टक्के आहे.

४) पुस्तके, मागील पाठ्यपुस्तके वाचावयास सांगतो, प्रमाण विद्यार्थी सारणीत ९.०९ टक्के व प्राध्यापक सारणीत ७.१४ टक्के आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

**निष्कर्ष :**

पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थी-शिक्षकाला मागील संदर्भ देता येत नसल्यास हिंदी अध्यापन-पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक तो पाठ/कविता/ संदर्भ वाचायला सांगतात मात्र काही प्राध्यापक पूर्वज्ञानातील मागील संदर्भ स्वत: सांगतात किंवा प्रश्न विचारून चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.९ हा विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५७

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत: सुचवितो, सांगतो, लिहितो | ६ | ४२.८५ |
| २ | अनेक उदाहरणे सुचवितो व प्रेरित करतो | ५ | ३५.७१ |
| ३ | प्रेरणा कशी देता येईल यावर विचार करा, वाचन करा, प्रयत्न करा. | ३ | २१.४२ |
| | एकूण | १४ | १०० |
| | **विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद** | | |
| १ | प्रेरणा स्वत: सांगतात | २ + १ | २७.२७ |
| २ | थोडा विचार करा म्हणजे सुचेल असे सांगतात, | १ + १ | १८.१८ |
| ३ | मार्गदर्शन करतात, उदाहरणे देऊन प्रेरित करतात. | २ + २ | ३६.३६ |
| ४ | अनेक प्रकार व उदाहरणे देतात त्यातून योग्य निवडण्यास सांगतात. | ० + २ | १८.१८ |
| | एकूण | ५ + ६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन हिंदी विषयाच्या विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास मार्गदर्शक प्राध्यापक स्वत: प्रेरणा सांगतात, सुचवितात,लिहितात याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ४२.८५ टक्के आहे. विद्यार्थी सारणीत ते २७.२७ टक्के आहे.

२) अनेक उदाहरणे सुचवितात याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ३५.७१ टक्के व विद्यार्थी सारणीत १८.१८ टक्के इतके आहे.

३) मार्गदर्शन करतात,उदाहरणे देऊन प्रेरणा देण्यास प्रेरित करतात याचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ३६.३६ टक्के आहे.

४) अधिक वाचा,विचार करा,प्रयत्न करा असे सांगणारे प्राध्यापक सारणीतील प्राध्यापक २१.४२ टक्के व विद्यार्थी सारणीत १८.१८ टक्के प्राध्यापक आहेत.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास प्रेरणा स्वत: सांगतात, मात्र कांही प्राध्यापक उदाहरणे सुचवितात व प्रेरणा देण्यास उद्युक्त करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१० प्रेरणे संबंधातील मार्गदर्शनात ज्या बाबींचा विचार करतात त्याच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम सारणी क्र.४.५८ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.५८

प्रेरणेतील घटक क्रम

| अ.क्र. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | घटकाला अनुरुपता | ४६ | १. | प्रेरणा देणाऱ्या कृती | ३३ |
| २. | प्रेरणा देणाऱ्या कृती | ४१ | २. | घटकाला अनुरूपता | ४६ |
| ३. | हेतुकथनाशी सांगड | २७ | ३. | हेतुकथनाशी सांगड | २८ |
| ४. | प्रेरणेचा परिणाम | २६ | ४. | प्रस्तावनेचा परिणाम | १७ |

वरील सारणीमध्ये क्र.३,४ समान व क्रम १,२ भिन्न आहेत. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देत असता, प्रेरणेमधील घटकांचा जो क्रम देतात त्या घटकांना प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यानी दिलेला क्रम एकत्रित करता पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देताना त्यातील घटकांना पुढील क्रम देतात - १.५) घटकाला अनुरुपता, १.५ ) प्रेरणा देणाऱ्या कृती, ३) प्रेरणेची हेतुकथनाशी घातलेली सांगड, ४) प्रेरणेचा परिणाम.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.११ हा पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसण्यासंबंधी आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.५९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.५९

पाठटाचणामध्ये मुद्दे,उपमुद्दे नसणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठ वाचून मुद्दे,उपमुद्दे लिहायला सांगतो. | ५ | ३५.७१ |
| २) | ते कसे काढावेत याचे मार्गदर्शन करतो. | ४ | २८.५७ |
| ३) | ते न काढण्याचे कारण विचारुन चर्चा करतो व सुचवितो। | ४ | २८.५७ |
| ४) | मुद्दे स्वत: सांगतो,टाचणात लिहितो। | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १००. |

विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद

| | | | |
|---|---|---|---|
| १) | मुद्दे पूर्ण काढून आणा,मग मार्गदर्शन असे सांगतात, | ३ + ३ | ५४.५४ |
| २) | रागावतात व टाचण परत लिहा. | १ + ० | ९.०९ |
| ३) | मुद्दे कसे काढावेत याचे मार्गदर्शन करतात. | १ + २ | २७.२७ |
| ४) | चर्चेतून सुचवितात. | ० + १ | ९.०९ |
| | एकूण | ५ + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीवरुन पाठ टाचणामध्ये मुद्दे,उपमुद्दे नसल्यास हिन्दी विषयाचे मार्गदर्शन प्राध्यापक मुद्दे उपमुद्दे लिहून आणामग मार्गदर्शन असे सांगतात,याचे प्राध्यापक सारणीत ३५.७१ टक्के व विद्यार्थी सारणीत ५४.५४ टक्के प्रमाण ओ व ते दोन्हीत जास्त आहे.

२) ते कसे काढावेत,याचे मार्गदर्शन देणारे प्राध्यापक अनुक्रमे २८.५७ व २७.२७ टक्के असे आहे व ते समान आहे.

३) मुद्दे न काढण्याचे कारण विचारुन चर्चा करणाऱ्या प्राध्यापकांचे प्राध्यापक सारणीत २८.५७ टक्के प्रमाण आहे.

४) रागावतात व परत लिहिण्यास सांगतात, चर्चेतून सुचवितात, यांचे विद्यार्थी सारणीत ९.०९ टक्के प्रमाण आहे.

५) तर स्वत: मुद्दे सांगतो, याचे प्रमाण ७.१४ टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणात मुद्दे ,उपमुद्दे नसल्यास विद्यार्थी-शिक्षकाला ते लिहून आणा व मग मार्गदर्शन घ्या असे सांगतात. मात्र काही प्राध्यापक मुद्दे, उपमुद्दे कसे काढावेत याचे मार्गदर्शन, चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१३ हा प्रत्येक मुद्दयावरील चर्चेसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६०

प्रत्येक मुद्दयावर चर्चा करणे

| | होय | नाही | सुरवातीलाच कधी कधी वाटले तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | १ | १ | १४ |
| | ८५.७१ | ७.१४ | ७.१४ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ३ | - | २ | ५ |
| | ५ | - | १ | ६ |
| एकूण | ७२.७२ | | २७.२७ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे पाठमार्गदर्शन देणारे प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीत ८५.७१ टक्के व विद्यार्थी सारणीत ७२.७२ टक्के प्रमाण आहे.

२) तर सुरवातीला, कधी-कधी प्रत्येक मुद्दयावर चर्चा करणा-या प्राध्यापकांचे प्रमाण अनुक्रमे ७.१४ टक्के व २७.२७ टक्के असे आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन मुद्दयावरील मार्गदर्शनात प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठय-मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६१

मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे

| | होय | नाही | काही वेळा आवश्यकता वाटली तरच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | ४ | ४ | १४ |
| | ४२.८५ | २८.५७ | २८.५७ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणी वरुन मार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनाच्या दरम्यान अवांतर वाचन देतात, याचे प्रमाण ४२.८५ टक्के आहे.

२) वाचन देत नाहीत, याचे २८.५७ टक्के व आवश्यकता वाटली तर अवांतर वाचन देतो याचे २८.५७ टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठय-मुद्दयावरील मार्गदर्शनाच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक १५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१४ हा पाठय मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६२

पाठय-मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारणे

| | होय | नाही | आवश्यक वाटेल तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १४ | - | - | १४ |
| | १००.०० | | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | २ ५ | - | २ २ | ११ |
| | ६३.६३ | | ३६.३६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठय मुद्दयावर चर्चा करताना हिंदी विषयाचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारतात. याचे प्रमाण १००.०० टक्के आहे(प्राध्यापक सारणीत ) व विद्यार्थी सारणीत ६३.०० टक्के आहे.

२) तर कधी कधी आवश्यक वाटले तर स्पष्टीकरण विचारतात, याचे विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

पाठय मुद्दयावर चर्चा करताना हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारतात, काही प्राध्यापक आवश्यक वाटले तरच विचारतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१६ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१५ हा मुद्द्यांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६३

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्यांचे स्पष्टीकरण न आल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्पष्टीकरण कसे करावे यावर चर्चा करतो. | ३ | २१.४२ |
| २) | स्वत: त्या मुद्दयाचे स्पष्टीकरण करतो. | ७ | ५०.० |
| ३) | घटकाचे अधिक वाचन,मनन करायला सांगतो. | ४ | २८.५७ |
| | एकूण | १४ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | प्राध्यापक स्वत: स्पष्टीकरण करतात. | १+४ | ४५.४५ |
| २) | प्रश्न,चर्चा याव्दारे स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात. | ०+१ | ९.०९ |
| ३) | उपघटकाचे वाचन करुन यायला सांगतात. | ४+१ | ४५.४५ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्याचे स्पष्टीकरण येत नसल्यास हिंदी विषयाचे प्राध्यापक स्वत: त्या मुद्द्याचे स्पष्टीकरण करतात,याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीतील ४५.४५ टक्के प्रमाण आहे व ते जास्त आहे.

२) तर घटक,उपघटकाचे अधिक वाचन करायला सांगणा-यांचे प्रमाण प्राध्यापक सारणीत २८.५७ टक्के व विद्यार्थी सारणीत ते ४५.४५ टक्के आहे.

३) स्पष्टीकरण कसे करावे याची चर्चा करणा-यांचे प्रमाण २१.४२ टक्के आहे (प्राध्यापक सारणी )

४) प्रश्न,चर्चा करुन स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात,याचे प्रमाण ९.०९ टक्के प्रमाण विद्यार्थी सारणीत आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण आले नाही तर बहुसंख्य हिंदी अध्यापन-पद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक स्वत: त्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करतात. काही प्राध्यापक अधिक वाचन करण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१७ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता न येण्यासंबंधीचा असून त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीत प्रश्न क्र.१६ हा प्राध्यापक पाठयांश सविस्तर सांगण्या-विषयीचा आहे. या विषयी सारणी क्र.४.६४ व ४.६५ मध्ये प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती आहे.

सारणी क्र.४.६४

टाचण व्यवस्थित पण, पाठ मार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न आल्यास प्राध्यापकांचा प्रतिसाद.

| स्पष्टीकरण देण्यास उद्युक्त करतो. ( चर्चेतून ) | अधिक तयारी करायला सांगतो. | पाठ टाचण त्यानेच काढले का ? याची खात्री करतो. | एकूण |
|---|---|---|---|
| ७ | १ | ६ | १४ |
| ५०.०० | ७.१४ | ४२.८५ | १००. |

सारणी क्र.४.६५

पाठयांश सविस्तर सांगण्याविषयी

| विद्यार्थी-शिक्षक | नाही | कधी-कधी | होय | एकूण |
| --- | --- | --- | --- | --- |
| | ४ | १ | - | ५ |
| | ३ | २ | १ | ६ |
| एकूण | ६३.६ | २७.२७ | ९.०९ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील प्राध्यापक सारणीमध्ये पाठ टाचण व्यवस्थित आहे पण विद्यार्थी-शिक्षकाला मार्गदर्शनाच्यावेळी प्राध्यापकांनी प्रश्न विचारल्यास स्पष्टीकरण देता येत नाही, अशावेळी हिंदी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मार्गदर्शन व चर्चेतून स्पष्टीकरण देण्यास उद्युक्त करतात, याचे प्रमाण ५०.०० टक्के आहे.

२) तर पाठ टाचण त्याने काढले का याची खात्री करुन मग टाचण तयार करायला सांगितल्याचे प्रमाण ४२.८५ टक्के आहे.

३) अधिक वाचन करा याचे ७.१४ टक्के प्रमाण आहे.

४) याचप्रमाणे विद्यार्थी-सारणीमध्ये पाठमार्गदर्शक विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता येत नसेल तेव्हा पाठाचा आशय सविस्तर सांगत नाहीत, याचे प्रमाण ६३.६३ टक्के आहे, तर कधी-कधी सांगणाऱ्याचे २७.२७ टक्के प्रमाण आहे, सांगतात, यांचे ९.०९ टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

एखादा विद्यार्थी पाठ टाचण व्यवस्थित लिहितो, पण मार्गदर्शनाच्यावेळी त्याला प्रश्नाचे स्पष्टीकरण न आल्यास प्राध्यापक चर्चेतून स्पष्टीकरण देण्यास उद्युक्त करतात. मात्र काही प्राध्यापक टाचण त्यानेच काढले का ? याची खात्री करुन घेतात.

त्याचप्रमाणे विद्यार्थी-शिक्षकाला पाठ्यांचे स्पष्टीकरण न आल्यास प्राध्यापक स्वत: आशय, पाठ्यांश सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्यासंबंधीचा आहे, याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६६

घटकाशी निगडित आशय सांगणे

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | - | ९ | ५ | १४ |
| | | ६४.२८ | ३५.७१ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये घटकाशी निगडित आशय प्राध्यापक सांगत नाहीत, याचे प्रमाण ६४.२८ टक्के आहे व हे प्रमाण जास्त आहे.

२) आशय कधी-कधी सांगतात, याचे ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत, काही प्राध्यापक कधी कधीच सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१९ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे. त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.६७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६७

उद्दिष्टे व स्पष्टीकरणाच्या मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | घटकाला अनुरूप आहेत कां ? | ७ | ५०.० |
| २) | नेमकी, योग्य व उद्दिष्टानुसार लिहिली आहेत कां ? | ६ | ४२.८५ |
| ३) | उद्दिष्टे पाठ्यमुद्दे व शिक्षक कृती यांची सांगड आहे कां ? | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | उद्दिष्टे घटकानुरुप आहेत कां ? | ०+४ | ३६.३६ |
| २) | नेमकी व ती उद्दिष्टानुरुप लिहिली कां ? | ४+२ | ५४.५४ |
| ३) | मुद्दयाला अनुसरून स्पष्टीकरणे आहेत कां ? | १+० | ९.०९ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणी वरून उद्दिष्टे व स्पष्टीकरणाचे मार्गदर्शन देताना हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक ती घटकाला अनुरूप आहेत का ? हे पाहतात ,याचे प्राध्यापक सारणीत ५०.०० टक्के प्रमाण आहे.

२) त्याचे विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

३) ती नेमकी योग्य,उद्दिष्टानुसार लिहिलीत का ? याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ४२.८५ टक्के व विद्यार्थी सारणीतील प्रमाण ५४.५४ टक्के आहे.

४) मुद्दयाला अनुसरून स्पष्टीकरण आहे का ? याचे प्रमाण विद्यार्थी सारणीत असून ते ९.०९ टक्के असून ते अल्प आहे.

५) उद्दिष्ट - पाठयमुद्दयाची व शिक्षक कृती याची संगत आहे का हे पाहणाऱ्यांचे प्राध्यापक सारणीत ७.१४ टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे याचे मार्गदर्शन देताना उद्दिष्टे घटकानुरूप,नेमकी ,योग्य असण्याकडे लक्ष देतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा पाठ्य घटकाला अधिक उद्दिष्टांच्या गरजे संबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी माहिती सारणी क्र.४.६८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६८

पाटयघटकानुसार अधिक उद्‌दिष्टांची गरज

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अधिक उद्‌दिष्टे स्वत: सुचवितो, सांगतो | ५ | ३५.७१ |
| २) | विद्यार्थ्यांला ती लिहा असे सांगतो | ५ | ३५.७१ |
| ३) | चर्चेतून ती सुचवितो | ४ | २८.५७ |
| | एकूण | १४ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | ती काढा अशी सूचना देतात | ३ + १ | ३६.३६ |
| २) | उद्‌दिष्टे स्वत: नमूद करतात। सांगतात | २ + २ | ३६.३६ |
| ३) | चर्चेतून अधिक उद्‌दिष्टे घेता येतात हे सुचवितात, लिहायला सांगतात | ० + ३ | २७.२७ |
| | एकूण | ५ + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठय घटकानुसार अधिक उद्‌दिष्टांची गरज असल्यास हिंदीचे मार्गदर्शक प्राध्यापक (१) ती स्वत: सांगतात तसेच (२) अधिक उद्‌दिष्टे लिहा असे सांगतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण समान म्हणजे ३५.७१ टक्के आहे.

२) तसेच त्यांचेच विद्यार्थी सारणीतही प्रमाण समानच, म्हणजे ३६.३६ टक्के आहे.

३) चर्चेतून सुचवितात याचेही प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण जवळ जवळ सारखेच आहे. ( अनुक्रमे २७.२७ टक्के व २७.२७ टक्के ) पण अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय-घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास काही प्राध्यापक ती स्वत: सांगतात,काही प्राध्यापक ती लिहून आणण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्यामागील कारण सांगण्यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी माहिती सारणी क्र.४.६९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.६९

उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारण सांगणे

| | होय | नाही | आवश्यक वाटले तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२<br>८५.७१ | २<br>१४.२८ | - | १४<br>१०० |
| विद्यार्थी-शिक्षक | १०+० | १+० | - | ११ ० |
| | ९०.९० | ९.०९ | | १०० |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन</u> :

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-शिक्षकांची उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलत असता त्यामागील कारण स्पष्ट करतात,याचे हिंदी विषय प्राध्यापकांचे प्रमाण ८५.७१ टक्के आहे,विद्यार्थी सारणीत ते ९०.९० टक्के असे आहे.

२) कारण स्पष्ट केले जात नाही,याचे प्राध्यापक सारणीत १४.२८ टक्के व विद्यार्थी सारणीत ९.०९ टक्के असे प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u>:

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांची उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्यामागील कारणे स्पष्ट करतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२२,२३,२४ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२०,२१,२२ हे शैक्षणिक साधने घटकानुसार समाविष्ट न केल्यास ती दाखविणे,त्यांच्या कल्पना सुचविणे उपलब्धतेची माहिती देणे या संबंधीचे आहेत.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले प्रतिसाद सारणी क्र.४.७० मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.७०

शैक्षणिक साधनासंबंधी

| प्रश्न | | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| दाखविण्यास सांगतात. | प्राध्यापक | १० | ४ | १४ |
| | | ७१.४२ | २८.५६ | १००. |
| | विद्यार्थी- | ७ | ४ | ११ |
| | शिक्षक | ६३.६३ | ३६.३६ | १०० |
| शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात. | प्राध्यापक | १३ | १ | १४ |
| | | ९२.८५ | ७.१ | १०० |
| | विद्यार्थी- | १० | १ | ११ |
| | शिक्षक | ९०.९० | ९.०९ | १००. |
| त्यांच्या उपलब्धतेची माहिती देतात. | प्राध्यापक | १३ | १ | १४ |
| | | ९२.८५ | ७.१४ | १००. |
| | विद्यार्थी- | ४ | ७ | ११ |
| | शिक्षक | ३६.३६ | ६३.६३ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाने पाठनियोजनात शैक्षणिक साधनांचा समावेश केला नसेल तर प्राध्यापक ते दाखविण्यास सांगतात, याचे प्राध्यापक सारणीत ७१.४२ व विद्यार्थी सारणीत ६३.६३ टक्के प्रमाण आहे.

२) शैक्षणिक साधनाची कल्पना सुचवितात, याचे प्राध्यापक सारणीत ९२.८५ टक्के प्रमाण आहे व विद्यार्थी सारणीत ते ९०.९ टक्के प्रमाण आहे ते समान आहे.

३) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ९२.८५ टक्के व विद्यार्थी सारणीत ते ३६.३ टक्के आहे.

४) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देत नाहीत, याचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ६३.६३ टक्के आहे.

५) शैक्षणिक साधने हाताविण्यास सांगत नाहीत, याचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ३६.३६ टक्के व प्राध्यापक सारणीत ते २८.५६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ टाचणामध्ये शैक्षणिक साधनांचा समावेश केला नसल्यास बहुसंख्य प्राध्यापक ती हाताविण्यास सांगतात, त्यांच्या कल्पना सुचवितात व त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात. मात्र काही प्राध्यापक शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२३ हा शिक्षक कृतीवरील चर्चेतील बाबीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७१

शिक्षक-कृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कथन, स्पष्टीकरण, प्रश्न, मुहावरे. | ६ | ४२.८५ |
| २) | अध्यापनपद्धती, शैक्षणिक साधने, प्रश्न, कथन. | ६ | ४२.८५ |
| ३) | पाठाचे वाचन। गायन, स्पष्टीकरण, उदाहरणे. | १ | ७.१४ |
| ४) | शिक्षककृती कमीत कमी शब्दात आहे कां ? | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | सर्व कृती लिहिल्यात कां ? | २+० | १८.१८ |
| २) | प्रेरणा ते स्वाध्यायेतर शिक्षककृतीवर चर्चा. | १+० | ९.०९ |
| ३) | हेतुप्रश्न, प्रश्न, शैक्षणिक साधन यांचा कृतीत उल्लेख आहे कां ? | २+३ | ४५.४५ |
| ४) | अध्यापन मुद्दयानुसार टाचणाच्या पाय-यांनुसार कृती आहेत कां ? | ०+३ | २७.२७ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शिक्षककृतीवर चर्चा करताना हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक कथन, स्पष्टीकरण, प्रश्न , मुहावरे या बाबीकडे लक्ष देतात, त्याचे प्रमाण ४२.८५ टक्के आहे.

२) त्याच प्रमाणे अध्यापनपद्धती शैक्षणिक साधने व प्रश्न कथन यांचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ४२.८५ टक्के आहे वरील प्रमाण सारखे आहे.

३) वाचन, गायन, स्पष्टीकरण, उदाहरणे यांचे व शिक्षक - कृती कमी शब्दांत आहे का ? याचे ७.१४ टक्के असे प्रमाण असून ते समान व अल्प आहे.

४) विद्यार्थी सारणीत हेतुप्रश्न, शैक्षणिक साधने, प्रश्न यांचा उल्लेख आहे का ? हे प्रमाण ४५.४५ टक्के आहे.

५) विद्यार्थी सारणीत अध्यापन मुद्दयानुसार व पाठाच्या पायऱ्यानुसार कृती आहे का ? याचे प्रमाण २७.२७ टक्के आहे.

६) तर सर्व कृती लिहिल्या का ? असे मोघम प्रमाण १८.१८ टक्के विद्यार्थी सारणीत आहे, तर प्रेरणोत्तेजक स्वाध्यायावर चर्चा याचे प्रमाण ९.०९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक - कृतीवर चर्चा करताना, विद्यार्थी-शिक्षकाचे नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी कथन, स्पष्टीकरण प्रश्न, मुहावरे, शैक्षणिक साधने, हेतुप्रश्न, अध्यापक मुद्दे व पायऱ्यानुसार कृती या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२५ हा शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देण्यासंबंधीचा आहे. त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७२

शिक्षककृती वरील चर्चेत अवांतर माहिती देणे

| | होय | नाही | आवश्यकता वाटली तर कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | - | २ | १४ |
| | ८५.७१ | | १४.२८ | |
| विद्यार्थी-शिक्षक | ३ | १ | - | ५ |
| | २ | ३ | २ | ६ |
| एकूण | ४५.४५ | ३६.३६ | १८.१८ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात.याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८५.७१ टक्के प्रमाण आहे.

२) अवांतर माहिती आवश्यक वाटली तर देतात,याचे १४.२८ टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थी सारणीमध्ये अवांतर माहिती देत नाहीत,येथे प्रमाण ४५.४५ टक्के आहे.

४) अवांतर माहिती देतात, याचे प्रमाण ३६.३६ टक्के आहे.

५) विद्यार्थी सारणीत आवश्यकता वाटली तर देतात, याचे प्रमाण १८.१८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन खालील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

हिंदी अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला चर्चेच्या दरम्यान अवांतर माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२७ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात शिक्षक-कृतीमधील ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात, त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम सारणी क्र.४.७३ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.७३

शिक्षक कृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथन , स्पष्टीकरण | ५९ | १ | शिक्षकाचे कथन, स्पष्टीकरण | ४२ |
| २ | प्रश्न | ५४ | २ | प्रश्न | २७ |
| ३ | शैक्षणिक साधने | ५३ | ३ | शैक्षणिक साधने | २२ |
| ४ | विद्यार्थी-सहभाग | ४७ | ४ | विद्यार्थी-सहभाग | २१ |
| ५ | अन्य- (१) चेतक बदल<br>(२) अभिनय,<br>(३) फलक लेखन. | | | | |

वरील सारणीमध्ये मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृतीमध्ये ज्या घटकांना महत्त्व देतात त्यानुसार प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम समान आहेत, त्यानुसार पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृतीच्या मार्गदर्शनामध्ये घटकांच्या महत्त्वानुसार पुढील क्रम देतात --

१. कथन, स्पष्टीकरण,

२. प्रश्न,

३. शैक्षणिक साधने,

४. विद्यार्थी-सहभाग.

या शिवाय सुचविलेले घटक - चेतक बदल, अभिनय, फलक लेखन.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७४

विद्यार्थी-कृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांचा शाब्दिक व शारीरिक । कृतीयुक्त सहभाग यावर चर्चा. | ५ | ३५.७१ |
| २) | विद्यार्थ्यांची उत्तरे विद्यार्थी कृतीत आहेत का ? तसेच त्यांच्या कृती-श्रवण, निरीक्षण इ. | ४ | २८.५७ |
| ३) | विविध कृतींवर चर्चा - श्रवण, निरीक्षण, भाषण पठण, लेखन भाषा शुद्धता इ. | ३ | २१.४२ |
| ४) | योग्य उत्तर देण्यास, शुद्ध भाषणास प्रवृत्त करावे. | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | प्राध्यापक पाठटाचणात कृतियुक्त विद्यार्थी-सहभाग पाहतात, सहभाग कोण-कोणत्या ठिकाणी ती कृती घेतली ? सहभाग वाढवा इ. | १+३ | ३६.३६ |
| २) | विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन उदा. मूक वाचन, उच्चार, पूर्णवाक्य, बोट वर करणे. | ०+३ | २७.२७ |
| ३) | शिक्षककृती प्रमाणे विद्यार्थी कृती आहेत का ? उदा. उत्तर देतो, श्रवण करतो, या कृती पाहतात. | ४+० | ३६.३६ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-कृतीतील महत्त्वाच्या बाबींवर चर्चा करताना हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थ्यांचा शाब्दिक व शारीरिक । कृतीयुक्त सहभाग यावर अधिक चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ३८.७१ टक्के आहे व विद्यार्थी सारणीमध्ये कृतीयुक्त सहभाग वाढविण्यावर प्राध्यापक मार्गदर्शन करतात, याचे प्रमाण ३६.३६ टक्के आहे व यात समानता असून ते अधिक आहे.

२) विद्यार्थ्यांची उत्तरे विद्यार्थी कृतीत आहेत का ? त्याच्या कृती आहेत का ? याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २८.५७ टक्के आहे व विविध कृतीवर चर्चा, याचे प्रमाण २१.४२ टक्के आहे.

३) तर विद्यार्थी सारणीमध्ये शिक्षक कृती प्रमाणे विद्यार्थी कृती आहेत का ? उदा.श्रवण करतो, उत्तर देतो इ.यांचे प्रमाण ३६.३६ टक्के आहे.

४) विद्यार्थ्यांना चांगल्या सवयी लावण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करतात, याचे प्राध्यापक सारणीतील १४.२८ टक्के व विद्यार्थी सारणीतील २७.२७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

हिंदी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-कृतीसंबंधी चर्चा करताना शारीरिक, कृतियुक्त, शाब्दिक सहभाग या बाबींवर चर्चा करतात, काही प्राध्यापक शिक्षक कृतीनुसार विद्यार्थी कृती व त्यात उत्तरे या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२९ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२७ हा मूल्यमापनातील प्रश्ना संदर्भात चर्चा केल्या जाणाऱ्या बाबी । गोष्टी संबंधी आहे. त्याविषयी प्राध्यापक
व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७५

मूल्यमापन-प्रश्नांतील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रश्न-रचना व प्रकार यावर चर्चा, रचना सुटसुटीत सोपी, प्रकार विचारप्रवर्तक. | ४ | २८.५७ |
| २) | उद्दिष्टानुसार, पाठ्यांशाला पूरक प्रश्न आहेत कां ? | ७ | ५०.०० |
| ३) | अध्यापनातील प्रश्न मूल्यमापनात नकोत. | २ | १४.२८ |
| ४) | बौद्धिक विकासाबरोबर भावनिक विकास व क्रियाकौशल्यास पूरक. | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | प्रश्न पाठ्यांशानुसार व उद्दिष्टानुसार आहेत कां ? | ३+२ | ४५.४५ |
| २) | प्रश्न प्रकार - दीर्घ, लघु, उच्च इ. ते एकसुरी नकोत. | ०+४ | ३६.३६ |
| ३) | संकलनातील प्रश्न अचूक आहेत ? उपयोजनामध्ये वाचन, गायन वाक्प्रचार इ. आहे कां ? | २+० | १८.१८ |
| | एकूण | ५+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नां संदर्भात मार्गदर्शन करताना प्रश्न उद्दिष्टानुसार व पाठयांशाला पूरक आहेत का ? यावर चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत ते ३६.३६ टक्के आहे.

२) मूल्यमापनात प्रश्न प्रकार कोणते, प्रश्न रचना कशी आहे, यावर चर्चा करणारे प्राध्यापक सारणीत २८.५७ टक्के व विद्यार्थी-सारणीत ४५.४५ टक्के असे प्रमाण आहे.

३) अध्यापनातील प्रश्न मूल्यमापनात यावे - १४.२८ टक्के .

४) संकलनातील प्रश्न अचूक, उपयोजनास वाचन, गायन व वाक्प्रचार इ.आहेत का ? १८.१८ टक्के, तसेच बौद्धिक, भावनिक विकास साधणारे प्रश्न असावे याचे प्रमाण ७.१४ टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात मूल्यमापनातील प्रश्नांचे संदर्भात चर्चा करताना उद्दिष्टे ,पाठयांश या बाबी पाहतात, काही प्राध्यापक प्रश्नांची अचूकता, प्रश्न रचना, प्रकार या बाबीं पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगण्या- - विषयीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७६

मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगणे

| | होय | नाही | सुरुवातीलाच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ७ | ४ | ३ | १४ |
| | ५०.०० | २८.५७ | २१.४२ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | ७२ | ११ | - | ८३ |
| | ८१.८१ | १८.१८ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मूल्यमापन प्रश्नाचे स्वरुप मार्गदर्शक प्राध्यापक सांगतात, याचे प्राध्यापक सारणीत ५०.०० टक्के प्रमाण तर विद्यार्थी सारणीत ते ८१.८१ टक्के आहे व ते दोन्हीत सर्वाधिक आहे.

२) विद्यार्थी सारणीत व प्राध्यापक सारणीत मूल्यमापनाचे स्वरुप सांगत नाहीत, याचे अनुक्रमे १८.१८ टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

३) फक्त सुरवातीलाच प्रश्नाचे स्वरुप सांगतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २१.४२ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२९ हा स्वाध्यायावर मार्गदर्शन देताना चर्चा केल्या जाणा-या बाबीसंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७७

स्वाध्यायावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठ्यघटकाचे दृढीकरण करणारा. | २ | १४.२८ |
| २) | विषयज्ञानावर,उद्दिष्टांवर आधारित आहे ? | ५ | ३५.७१ |
| ३) | पाठ्यघटकानुसार,सोपा,छोटा,उपलब्ध होणारा, श्रवण,भाषण,पठण,लेखन यांच्या विकासाला वाव देण्यास योग्य. | ५ | ३५.७१ |
| ४) | वयोगट,कल्पकता,मनोरंजकता,निर्मिति-क्षम इ. | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पाठ्यांशानुसार,मनोरंजक,निर्मितीला वाव देणारा. | २+१ | २७.२७ |
| २) | स्वाध्याय अध्ययनपर,दृढीकरणपर,परिणामकारक | १+१ | १८.१८ |
| ३) | आशय,उद्दिष्टे व दृढीकरण यानुरूप | ०+४ | ३६.३६ |
| ४) | स्वाध्यायाकडे लक्ष देत नाहीत | २+० | १८.१८ |
| | एकूण | ५+६ | १००. |

वरील सारणीवरून हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यावर चर्चा करताना स्वाध्याय उद्दिष्ट,आशय व त्याचे दृढीकरण करणारा आहे का ? यावर चर्चा करतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीत ३५.७१ टक्के व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के आहे व ते आवश्यक वाटते आहे.

२) स्वाध्याय पाठ्यघटकानुसार, छोटा, सोपा, उपलब्ध होण्यासारखा व श्रवण, भाषण, पठण, लेखन विकास वाढविणारा असावा याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ३५.७१ टक्के आहे.

३) वयोगट, कल्पकता, मनोरंजकता, निर्मितीक्षम, याचे प्रमाणे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत अनुक्रमे १४.२८ टक्के व २७.२७ टक्के आहे.

४) प्राध्यापक सारणीत पाठ्य घटकाचे दृढीकरण करणारा, याचे १४.२८ टक्के प्रमाण आहे व विद्यार्थी सारणीत स्वाध्याय अध्ययनाचे दृढीकरण करणारा व परिणामकारक आहे, याचे प्रमाण १८.०० टक्के आहे.

५) स्वाध्यायाकडे फारसे लक्ष देत नाहीत, याचे विद्यार्थी - सारणीतील प्रमाण १८.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना उद्दिष्टे, आशय व आशयाचे दृढीकरण या बाबी पाहतात, काही प्राध्यापक स्वाध्याय सोपा, छोटा, उपलब्ध होणारा व श्रवण, भाषण, पठण लेखन यांचा विकास साधणारा हवा या दृष्टीने पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणेसंबंधीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७८

विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सुधारणेसंबंधी मार्गदर्शन करतो. चर्चेतून बदल सुचवितो. | ७ | ५०. |
| २) | वेगवेगळे प्रकार समोर ठेवतो । सुचवितो व निवडीस संधी देतो. | ५ | ३५.७१ |
| ३) | स्वाध्याय स्वत: सांगतो. | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्वाध्यायात बदल । सुधारणा करा अशी सूचना देतात. | २+२ | ३६.३६ |
| २) | सुधारणा स्वत: करतात . | १+० | ९.०९ |
| ३) | स्वाध्यायावर मार्गदर्शन । चर्चा करतात, तो कसा हवा याचे उदा. देतात. | २+३ | ४५.४५ |
| ४) | फारसे पाहात नाहीत . | ०+१ | ९.०९ |
| | एकूण | ५+६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायामध्ये सुधारणा अपेक्षित असेल तर त्याच्या सुधारणे संबंधी

मार्गदर्शन , चर्चा करून बदल सुचवितात, याचे प्राध्यापक सारणीतील ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीतील ४५.४५ टक्के प्रमाण आहे ते जवळ जवळ सारखे आहे.

२) वेगवेगळे प्रकार, स्वरूप समोर ठेवतात व त्यातून निवडण्यास वाव देतात, याचे प्राध्यापक सारणीत ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

३) प्राध्यापक स्वाध्याय बदला अशी सूचना देतात, याचे विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

४) स्वाध्याय स्वत: सांगतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-सारणीतील प्रमाण १४.२८ टक्के व ९.०९ टक्के आहे ते अल्प आहे.

५) फारसे लक्ष देत नाहीत, याचे प्रमाण ९.०९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करताना मार्गदर्शन ,चर्चा करून बदल सुचवितात. काही प्राध्यापक मात्र स्वाध्याचे प्रकार समोर ठेवून त्यातून निवडण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ३३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.७९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.७९

फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मुद्देसूदपणा, शुद्धलेखन, लेखनाचे नियोजन रंगीत खडू इ. | १० | ७१.४२ |
| २) | शब्द, मुहावरे, हेतुप्रश्न, घटकाचे नाव तारीख इ. | ३ | २१.४२ |
| ३) | अक्षार आकारबद्ध पुरेसे, नेटके लेखन. | १ | ७.१४ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मुद्दे, लेखन शुद्धता, नियोजन. | ३ + ४ | ६३.६३ |
| २) | पाठाचे नाव, अधोरेखन, शब्द, मुहावरे, शुद्ध लेखन. | १ + २ | २७.२७ |
| ३) | लेखन - फलकाच्या दोन भागात, एकात शब्द दुसऱ्यात वाक्य इ. | १ + ० | ९.०९ |
| | एकूण | ५ + ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावर मार्गदर्शन देताना फलक लेखनात मुद्दे, लेखन शुद्ध , नियोजनबद्ध व रंगीत खडूचे नियोजन या बाबी पाहतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण ७१.४२ टक्के व ६३.६३ टक्के आहे.

२) शब्द,मुहावरे,घटकाचे नाव,तारीख या बाबींवर चर्चा करणाऱ्याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत अनुक्रमे २१.४२ टक्के व २७.२७ टक्के असे प्रमाण आहे व ते जवळ जवळ सारखे आहे.

३) अक्षरासंबंधी - आकारबद्ध ,नेटके , फलकाच्या दोन भागात लेखन याचे प्राध्यापक सारणीत ७.१४ टक्के व विद्यार्थी सारणीत ९.०१ टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावरील मार्गदर्शनात मुद्देसूदपणा,शुद्धता,नियोजनबद्धता, रंगीत खडूचे नियोजन या बाबींवर चर्चा करतात, तर काही प्राध्यापक शब्द, मुहावरे,घटकाचे नाव,तारीख इ.बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा विद्यार्थी शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनातील सुधारणे संबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८०

फलक-लेखनातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | फलकाचे दोन भाग करुन मुद्दे व शब्द दोन भागात लिहा. | ४ | २८.५७ |
| २) | त्रुटीनुसार आवश्यक सुधारणा करतो. | ३ | २१.४२ |
| ३) | घटक, उपघटक लिहा. | २ | १४.२८ |
| ४) | लेखन मुद्दयांच्या क्रमानुसार दोन भागात व योग्य तिथे अधोरेखन करा. | ५ | ३५.७१ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | फलक लेखन दोन भागात करा. | ०+४ | ३६.३६ |
| २) | फलकलेखन योग्य, सरळ, अंतर ठेवून वळणदार, सुंदर करा. | ०+२ | १८.१८ |
| ३) | फलकलेखनाचे नियोजन करा. | २+० | १८.१८ |
| ४) | लेखन मुद्देसूद करा. | ३+० | २७.२७ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विभागाचे मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनातील सुधारणा सुचविताना प्राध्यापक सारणीतील फलकाचे दोन भाग करुन मुद्दे व शब्द दोन भागात लिहा, या सूचनेचे प्रमाण २८.५७ टक्के आहे व विद्यार्थी सारणीत ते ३६.३६ टक्के आहे.

२) लेखन मुद्दयांच्या क्रमानुसार करा, ते दोन भागात व योग्य तिथे अधोरेखीत करा, याचे प्राध्यापक सारणीत ३५.७१ टक्के प्रमाण आहे व विद्यार्थी सारणीत २७.२७ टक्के आहे.

३) प्राध्यापक सारणीत -

त्रुटीनुसार सुधारणा करतो - प्रमाण २१.४२ टक्के
घटक, उपघटक लिहा - १४.२८ टक्के.

४) विद्यार्थी सारणीत -

फलक लेखन सरळ रेषेत, योग्य अंतर ठेऊन,
वळणदार, सुंदर करा - १८.१८ टक्के व फलक
लेखनाचे नियोजन करा - १८.१८ टक्के .

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक-लेखन नियोजनातील सुधारणेत फलकाच्या दोन भागात मुद्दे व शब्द-लेखन करणे, मुद्दयांच्या क्रमानुसार लेखन या बाबी सांगतात.

काही प्राध्यापक घटक, उपघटक, अक्षर यावर लक्ष देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ मध्ये पाठ उद्या असता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा

आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८१
पाठ उद्या असता मार्गदर्शन घेणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रथम रागावतो, योग्य वेळी मार्गदर्शन घेण्यास सांगतो. | ७ | ५० |
| २) | जाबाबदारीची जाणीव देऊन पाठ रद्द करतो. | २ | १४.२८ |
| ३) | पाठ्यघटक व शिक्षककुवत पाहून मार्गदर्शन. | २ | १४.२८ |
| ४) | मार्गदर्शन न घेण्याचे कारण विचारुन ते योग्य वाटल्यास मार्गदर्शन. | ३ | २१.४२ |
| | एकूण | १४ | १०० |

| | विद्यार्थी - शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | पाठमार्गदर्शनासंबंधी सूचना । समज देऊन मार्गदर्शन करतात. | २+२ | ३६.३६ |
| २) | मार्गदर्शन देत नाहीत, निष्काळजीपणाबद्दल रागावतात, पाठ रद्द करतात. | २+४ | ५४.५४ |
| ३) | अडचण विचारतात, योग्य असेल तर मार्गदर्शन करतात. | १+० | ९.०९ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उघा आहे व विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनासाठी आला असता प्रथम रागावतात, योग्यवेळी मार्गदर्शन घेण्यासंबंधी समज देतात व नंतर मार्गदर्शन करतात, याचे प्राध्यापक सारणीतील ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

२) जबाबदारीची, निष्काळजीपणाची जाणीव देऊन पाठ रद्द करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण १४.२८ टक्के व ५४.५४ टक्के असे प्रमाण आहे.

३) अडचण विचारून योग्य असेल तर मार्गदर्शन देतात, याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २१.४२ टक्के व विद्यार्थी सारणीतील ९.०९ टक्के असे प्रमाण आहे.

४) प्राध्यापक सारणीत - पाठ्य घटक व विद्यार्थी-शिक्षकाची कुवत पाहून मार्गदर्शन देतात. याचे प्रमाण १४.२८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास आला तर बहुसंख्य प्राध्यापक प्रथम रागावतात, योग्य वेळी काम करण्याची समज देतात व नंतर पाठ मार्गदर्शन मात्र करतात ,काही प्राध्यापक पाठ रद्द करतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.३६ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्द्यांना अधिक वेळ देतात त्याच्या क्रमाविषयीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक

व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.८२ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.८२

मार्गदर्शनात अधिक वेळ दिला जाणाऱ्या मुद्द्यांचे क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२१ | १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १०९ |
| २ | पाठ्य-मुद्दे | ११२ | २ | पाठ्य-मुद्दे | ८९ |
| ३ | शिक्षक कृती व विद्यार्थीकृती | १०९ | ३ | शिक्षक,विद्यार्थीकृती | ८९ |
| ४ | प्रेरणा | ९१ | ४ | पूर्वज्ञान | ७८ |
| ५ | पूर्वज्ञान | ८८ | ५ | प्रेरणा | ७२ |
| ६ | संकलन | ६४ | ६ | फलक लेखन | ४६ |
| ७ | मूल्यमापन साधने | ५० | ७ | शैक्षणिक साधने | ४३ |
| ८ | उपयोजन | ४९ | ८ | संकलन | ३९ |
| ९ | फलक लेखन | ४७ | ९ | उपयोजन | ३४ |
| १० | शैक्षणिक साधने | ४४ | १० | मूल्यमापन साधने | २५ |

वरील सारणीमध्ये क्र.१ ते ४ समान आहेत, पुढील क्रम भिन्न आहेत. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाला अधिक वेळ देतात त्या घटकांना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले महत्त्वानुसार क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्षा क्रम काढता येईल.

निष्कर्ष -

हिंदी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात अधिक वेळ दिल्या जाणा-या घटकांचा क्रम - १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे,२) पाठमुद्दे, ३) शिक्षक, विद्यार्थी कृती, ४) प्रेरणा, ५) पूर्वज्ञान,६) संकलन,७) फलक लेखन, ८.१) मूल्यमापन साधने, ८.२) उपयोजन ,८.३) शैक्षणिक साधने याप्रमाणे देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकासंबंधिचा आहे. त्यासंबंधी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८३

मार्ग दर्शनामध्ये दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कोणताही नाही | १० | ७१.४२ |
| २) | पूर्वज्ञान,प्रेरणा,शैक्षणिक साधने | २ | १४.२८ |
| ३) | संकलन | २ | १४.२८ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | कोणताही नाही. | ३ + १ | ३६.३६ |
| २) | पूर्वज्ञान,संकलन,उपयोजन | १ + १ | १८.१८ |
| ३) | फलकलेखन | ० + २ | १८.१८ |
| ४) | मूल्यमापनसाधने. | १ + २ | २७.२७ |
| | एकूण | ५ ६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन मार्गदर्शन दिल्या जाणा-या घटकांपैकी हिंदी विषय मार्गदर्शक प्राध्यापकांनी फारसे लक्ष दिले नाही तरी चालेल असा कोणताही घटक नाही, याचे प्राध्यापक सारणी ७१.४२ टक्के व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

२) प्राध्यापक सारणीमध्ये -

१) पूर्वज्ञान, प्रेरणा व शैक्षणिक साधने या घटकांकडे लक्ष दिले नाही तरी चालेल, याचे १४.२८ टक्के व

२) संकलनाकडे फारसे लक्ष दिले नाही तरी चालेल, याचे १४.२८ टक्के असे समान प्रमाण आहे.

३) विद्यार्थी सारणीमध्ये -

१) पूर्वज्ञान, संकलन, उपयोजन या घटकाकडे फारसे लक्ष देत नाहीत, याचे १८.१८ व

२) फलक लेखन या घटकाकडे फारसे लक्ष देत नाहीत, याचे १८.१८ असे प्रमाण आहे.

४) मूल्यमापन साधनांकडे लक्ष देत नाहीत, याचे २७.२७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्या सर्व घटकांकडे लक्ष देतात, मात्र काही प्राध्यापक पूर्वज्ञान, प्रेरणा, शैक्षणिक साधने, संकलन या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.३८ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली प्रश्न क्र.३६ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा प्राध्यापक जो सहभाग घेतात त्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८४
मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | ७ | - | १ | १४ |
| | ४२.८५ | ५०.०० | | ७.१४ | १००. |
| विद्यार्थी- | ६ | ४ | १ | - | ११ |
| शिक्षक | ५४.५४ | ३६.३६ | ९.०९ | | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूप सहभाग घेतात.याचे विद्यार्थी सारणीत ५४.५४ टक्के व प्राध्यापक सारणीत ४२.८५ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात,याचे प्राध्यापक सारणीत ५०.०० व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के प्रमाण आहे.

३) अल्प सहभाग घेतात.याचे विद्यार्थी सारणीत ९.०९ टक्के प्रमाण आहे.

४) अजिबात सहभाग घेत नाहीत,याचे प्राध्यापक सारणीत ७.१४ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्या वेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थ्यांच्या सहभागाविषयीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८५

मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | - | ४ | ७ | ३ | १४ |
| | | २८.५७ | ५०.०० | २१.४२ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | - | ५ | २ | ४ | ११ |
| | | ४५.४५ | १८.१८ | ३६.३६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मार्गदर्शनाच्यावेळी हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक व अन्य विद्यार्थी-शिक्षकांचे अल्प प्रमाणात सहभाग घेतात, याचे प्राध्यापक सारणीत ५०.०० टक्के प्रमाण आहे व विद्यार्थी सारणीत ते १८.१८ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात, याचे विद्यार्थी सारणीतील ४५.४५ टक्के व प्राध्यापक सारणीत ते २८.५७ टक्के प्रमाण आहे.

३) सहभाग अजिबात नाही, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण अनुक्रमे २१.४२ टक्के व ३६.३६ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका

मार्गदर्शनामध्ये अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा मध्यम ते अल्प सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा की पूर्ण बदल करण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८६

पाठनियोजन चुकीचे असल्यास

| | आहे त्यातच सुधारणा | पूर्ण बदल | कधी-कधी फार चूक असेल तर पूर्ण बदल | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | - | २ | १४ |
| | ८५.७१ | | १४.२८ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | - | ६ | - | |
| | ५ | - | १ | ६ |
| एकूण | ४५.४५ | ४५.४५ | ९.०९ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या पाठनियोजनात सुधारणा करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८५.७१ टक्के प्रमाण आहे.

२) विद्यार्थी सारणीमध्ये विद्यार्थ्यांचा पाठ-नियोजनामध्ये मार्गदर्शक प्राध्यापक आहे त्यात बदल करतात व पूर्ण बदल करतात, याचे प्रमाण समान आहे ( ४५.४५ टक्के )

३) फार चुकल्यास पूर्ण बदल, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत अनुक्रमे १४.२८ टक्के व ९.०९ टक्के असून ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांचे पाठ-नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ नियोजनात सुधारणा करतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.४० हा मार्गदर्शनांच्या काळात विद्यार्थी शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली असता संबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८७

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | अधिक वाचन,अभ्यास करा, नंतर मार्गदर्शन घ्या. | ६ | ४२.८५ |
| २) | योग्य उत्तर सांगतो, त्यांचा ` स्व ` दुखवत नाही. | ४ | २८.५७ |
| ३) | चुकीच्या उत्तराचे कारण विचारात घेऊन पूरक प्रश्नातून योग्य उत्तर काढून घेतो. | ४ | २८.५७ |
| | एकूण | १४ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | रागावतात-मुलांना चुकीचे शिकविणार ? | ०+१ | ९.०९ |
| २) | योग्य उत्तर । स्पष्टीकरण स्वत: देतात, चूक निदर्शनास आणतात. | २+२ | ३६.३६ |
| ३) | प्रश्न विचारुन बरोबर उत्तर । स्पष्टीकरण काढून घेतात. | ०+१ | ९.०९ |
| ४) | घटकाचे सखोल वाचन करा व मग मार्गदर्शनाला या असे ... | ३+२ | ४५.४५ |
| | एकूण | ५+६ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांशी चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांना अधिक वाचन,अभ्यास करा व मग मार्गदर्शन घेण्यास या असे सांगतात. याचे प्रमाण प्राध्यापक सारणीत ४२.८५ टक्के व विद्यार्थी सारणीत ४५.४५ टक्के असे आहे ते दोन्ही सारणीत सर्वाधिक समान आहे.

२) योग्य उत्तर - स्पष्टीकरण स्वत: सांगणा-यांचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २८.५७ टक्के व विद्यार्थी सारणीत ३६.३६ टक्के आहे.

३) चुकीच्या उत्तराचे कारण विचारात घेऊन पूरक प्रश्न विचारून योग्य उत्तर विद्यार्थी-शिक्षकाकडून काढून घेतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीतील प्रमाण अनुक्रमे २८.५७ टक्के व ९.०९ टक्के आहे.

४) रागावतात - मुलांना चुकीचे शिकविणार काय ? याचे विद्यार्थी सारणीतील प्रमाण ९.०९ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास बहुसंख्य प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास करा व मग मार्गदर्शनास या असे सांगतात, काही प्राध्यापक मात्र योग्य उत्तर स्वत: सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांच्या आग्रहासंबंधीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८८

अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधने यांचा आग्रह

| | होय | नाही | आवश्यक वाटले तर धरतो | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | - | १ | १४ |
| | ९२.८५ | | ७.१४ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ५ | - | १ | ६ |
| | ५ | - | - | ५ |
| एकूण | ९०.९० | | ९.० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये हिंदी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत अनु.९२.८५ टक्के व ९०.९० टक्के प्रमाण आहे ते जवळ जवळ समान व सर्वाधिक आहे.

२) घटकाच्या आवश्यकतेनुसार वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतो, याचे प्रमाण अनुक्रमे ७.१४ व ९.०९ टक्के आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरून खालील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

हिंदी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाकडे अधिक वाचन,अभ्यास शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४१ हा मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचा अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन यातील फरकासंबंधीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी -शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.८९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.८९

मराठीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनातील फरक --

| | फरक आहे | फरक नाही | उत्तरे नसलेले | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | ४ | - | १४ |
| | ७१.४२ | २८.५७ | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | २ | २ | २ | ६ |
| | ३ | - | २ | ५ |
| एकूण | ४५.४५ | १८.१८ | ३६.३६ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) मराठी अध्यापपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयाचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमधील प्रमाण अनुक्रमे ७१.४२ टक्के व ४५.४५ टक्के आहे.

२) फरक नाही, म्हणणा-यांचे प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे २८.५७ टक्के व १८.१८ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापन पद्धती व अन्य अध्यापन-पद्धती याच्या मार्गदर्शनात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणकोणते फरक आहेत ते पुढील पान क्र. ५४० ते ५४३ वर सर्व विषयांच्या प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांच्या मतांचा एकत्रित गोषवारा दिलेला आहे.

## (३) विषय - इंग्रजी

इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक व विद्यार्थी-शिक्षक यांनी प्रश्नावलीला दिलेला प्रतिसाद.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१ हा पाठटाचण न काढता मार्गदर्शन घेण्या-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र. ४.९० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.९०

पाठटाचण न काढता मार्गदर्शन

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठटाचण न आणण्याचे कारण विचारतो, ते आवश्यक आहे असे सांगतो, मार्गदर्शन देत नाही. | ७ | ७० |
| २) | घटक, इयत्ता पाहून घटकाचे विश्लेषण करतो व कच्चे टाचण काढा असे ..... | २ | २० |
| ३) | टाचण स्वतः तयार करून घेतो. | १ | १० |
| | एकूण - | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मार्गदर्शन देत नाहीत. प्रथम टाचण काढा, वाचन करा असे सांगतात. | ३ + २ | ५० |
| २) | संबंधित घटकावर चर्चा करतात व टाचण काढायला सांगतात. | ३ + ० | ३० |
| ३) | अडचणी विचारतात, त्याचे निरसन करून टाचण काढायला सांगतात. | १ + १ | २० |
| | एकूण - | ७ - ३ | १०० |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन :</u>

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक टाचणाशिवाय मार्गदर्शन देत नाहीत, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७०·०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ५०·०० टक्के प्रमाण आहे व ते दोन्हीमध्ये जास्त आहे·

२) पाठटाचण नसेल तर घटक, इयत्ता पाहून त्यावर चर्चा करतात व कच्चे टाचण काढा असे सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०·०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ३०·०० टक्के प्रमाण आहे·

३) अडचणी विचारतात व त्याचे निरसन करतात· टाचण काढा असे सांगतात, याचे विद्यार्थी सारणीत २०·०० टक्के प्रमाण आहे·

४) प्राध्यापक टाचण स्वत: तयार करून घेतात याचे प्राध्यापक सारणीत १०·०० टक्के प्रमाण आहे· ते अल्प आहे·

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल·

<u>निष्कर्ष :</u>

विद्यार्थी-शिक्षक पाठटाचण तयार न करताच मार्गदर्शनासाठी मार्गदर्शक प्राध्यापकाकडे गेला असता बहुतांशी मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत· मात्र काही प्राध्यापक घटकावर चर्चा करून टाचण काढण्यास सांगतात·

प्रश्नावलीतील प्रश्न क्र· २ हा पाठटाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधीचा आहे· त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र·४·९१ मध्ये दिलेली आहे·

सारणी क्र.४.११

त्रोटक पाठटाचणासंबंधी

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन नाही. | ३ | ३० |
| २) | टाचणातील उणिवा पाहून मार्गदर्शन करतो व टाचण पूर्ण करण्यास सांगतो. | ५ | ५० |
| ३) | वैयक्तिक मार्गदर्शन करतो, टाचणासंबंधी सूचना देतो. | २ | २० |
| | एकूण - | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | टाचण सविस्तर पूर्ण करा, ते केल्याशिवाय मार्गदर्शन नाही. | ४ + १ | ५० |
| २) | स्वतः अपूर्ण मुद्दे लिहून देतात. | ० + २ | २० |
| ३) | पूर्ण टाचणाशिवाय पाठ व्यवस्थित होणार नाही, सूचना देऊन मार्गदर्शन करतात. | १ + ० | १० |
| ४) | अपूर्ण, त्रोटक भागावर मार्गदर्शन करतात व टाचण काढा ..... | २ + ० | २० |
| | एकूण - | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक पाठटाचण सविस्तर न काढता त्रोटक मुद्दे फक्त काढल्यास टाचण पूर्ण करा, त्याशिवाय मार्गदर्शन नाही असे सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ३०.०० टक्के व ५०.०० टक्के प्रमाण आहे.

२) टाचणातील उणीवा, त्रोटक भागांवर मार्गदर्शन करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ते प्रमाण २०.०० टक्के आहे.

३) वैयक्तिक मार्गदर्शन करतो, टाचणासंबंधी सूचना देतो याचे प्रमाण २०.०० टक्के आहे ( प्राध्यापक सारणी )

४) स्वत: अपूर्ण मुद्दे लिहीतात याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीतील प्रमाण २०.०० टक्के आहे.

५) सूचना देऊन मार्गदर्शन करतात याचे विद्यार्थी सारणीमध्ये [illegible].०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

पाठटाचण सविस्तर न काढता विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकाकडे मार्गदर्शनास गेल्यास इंग्रजी अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत, काही प्राध्यापक अपूर्ण भागावर मार्गदर्शन करतात व टाचण पूर्ण करण्यास सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३ हा पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणाऱ्या सूचनेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.९२

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वीच्या सूचना

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १) | पाठटाचणातील प्रत्येक पायरी स्पष्ट व्हावी. | | ५ | ५० |
| २) | सूचना द्याव्या लागत नाहीत.(कृतिसत्रे घेतो) | | १ | १० |
| ३) | शिक्षक व्हायचे त्याने नियम पाळावेत अन्यथा मार्गदर्शन मिळणार नाही. | | १ | १० |
| ४) | सखोल अभ्यास करा. | | १ | १० |
| ५) | नमुना टाचण पाहा. | | २ | २० |
| | | एकूण | १० | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | | |
|---|---|---|---|---|
| १) | पाठटाचण अत्यंत आवश्यक बाब आहे ते काळजीपूर्वक काढा काढा | | १ + ० | १० |
| २) | पाठ्यांशानुसार, पाठ्यमुद्दे व त्याचे स्पष्टीकरण लिहा. | | १ + २ | ३० |
| ३) | उद्दिष्टे, मूल्यमापन अध्ययन, अध्यापन, कृतीकडे लक्ष द्या. | | २ + ० | २० |
| ४) | पाठाच्या पायऱ्या ध्यानात घ्या, सखोल अभ्यास करा. | | १ + १ | २० |
| ५) | नमुना टाचण (अमुक विद्यार्थ्याचे) पाहा. | | २ + ० | २० |
| | | एकूण - | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठमार्गदर्शक अर्थी टाचण पूर्ण करण्याविषयी पाठटाचणातील प्रत्येक पायरी स्पष्ट व्हावी याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीत २०.०० टक्के आहे.

२) पाठ्यांशानुसार, पाठ्य-मुद्दे व त्याचे स्पष्टीकरण लिहा याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण आहे.

३) नमुना टाचण पाहा याचे दोन्ही सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) शिक्षक व्हायचे तर नियम पाळावेत अन्यथा मार्गदर्शन मिळणार नाही - १०.०० टक्के.

५) सखोल अभ्यास करा - १०.०० टक्के.

६) उद्दिष्टे ,मूल्यमापन व अध्ययन कृती याकडे लक्ष द्या - २०.०० टक्के.

७) पाठटाचण अत्यंत आवश्यक बाब आहे ते काळजीपूर्वक काढा - १०.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :
------

इंग्रजी पाठाचे त्रोटक टाचण घेऊन विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शक प्राध्यापकाकडे मार्गदर्शनास गेल्यास प्राध्यापक पाठ टाचणातील पायऱ्या, पाठ्यांश, मुद्दयांचे स्पष्टीकरण व पाठटाचण नमुने या बाबींकडे अधिक लक्ष देण्यास सांगतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४ हा पाठमार्गदर्शनाची सुरवात ज्या घटकापासून प्राध्यापक करतात त्या संबंधीच आहे, त्याविषयी प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.९३

पाठमार्गदर्शनाचा सुरवातीचा घटक

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे व स्पष्टीकरण | २ | २० |
| २) | पूर्वज्ञान | ४ | ४० |
| ३) | पाठ्यमुद्दे | २ | २० |
| ४) | प्राथमिक माहिती, घटक, इयत्ता, शाळा इत्यादी | २ | २० |
| | एकूण | १० | १०० |

| अ.क्र. | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ० + २ | २० |
| २) | पूर्वज्ञानापासून | ३ + १ | ४० |
| ३) | अध्यापन मुद्दे पाहून | २ + ० | २० |
| ४) | प्रेरणा | २ + ० | २० |
| | एकूण | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक/विद्यार्थी-शिक्षक पाठमार्गदर्शनास गेल्यास मार्गदर्शनाची सुरूवात पूर्वज्ञानापासून करतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे. प्रमाण समान, सर्वाधिक आहे.

२) त्यानंतर प्रेरणेपासून, अध्यापन मुद्यापासून, पाठ्यमुद्यापासून व प्राथमिक माहितीपासून या सर्व घटकांचे दोन्ही सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे, ते भिन्न आहे.

३) उद्दिष्टे व स्पष्टीकरणापासून सुरुवात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत २०.०० टक्के प्रमाण आहे. ते समान आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

इंग्रजी पाठमार्गदर्शनासाठी विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकाकडे गेल्यास ते प्रथम पूर्वज्ञानापासून मार्गदर्शनास सुरुवात करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५ हा मार्गदर्शनात चर्चा केल्या जाणा-या मुद्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९४ मध्ये दिलेली आहे.

<u>सारणी क्र.४.९४</u>

<u>मार्गदर्शनाच्या घटकांचा क्रम</u>

| अ.क्र. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अ.क्र. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ८७ | १. | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ८३ |
| २. | पूर्वज्ञान | ८६ | २. | पूर्वज्ञान | ७३ |
| ३. | प्रस्तावना / प्रेरणा | ७५ | ३. | प्रस्तावना / प्रेरणा | ७७ |
| ४. | आशय / पाठ्य मुद्दे | ७४ | ४. | शिक्षक-विद्यार्थी कृती | ६३ |
| ५. | शिक्षक-विद्यार्थी कृती | ५९ | ५. | आशय / पाठ मुद्दे | ६० |
| ६. | शैक्षणिक साधने | ४३ | ६. | शैक्षणिक साधने | ४४ |
| ७. | संकलन | ३६ | ७. | फलक लेखन | ४२ |
| ८. | मूल्यमापन साधने | ३३ | ८. | संकलन | ३२ |
| ९. | फलक लेखन | २९ | ९. | उपयोजन | ३१ |
| १०. | उपयोजन | २७ | १०. | मूल्यमापन साधने | २१ |

१) वरील सारणीमध्ये प्राध्यापक सारणी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेल्या क्रमामध्ये १ ते ३ क्रम समान आहेत. पुढील क्रम भिन्न आहेत, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने घटकांची चर्चा करतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित केला असता खालील क्रम । निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे २) पूर्वज्ञान ३) प्रेरणा ४) आशय । पाठ्यमुद्दे, ५) शिक्षक,विद्यार्थी कृती ६) शैक्षणिक साधने ७) संकलन, ८) फलक लेखन, ९) मूल्यमापन साधने १०) उपयोजन याप्रमाणे घटकांना क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक ६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्दयासंबंधीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९५ मध्ये दिलेली आहे.

## सारणी क्र.४.९५

### पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | घटनेमागील पाठाची पार्श्वभूमी, आशयानुषंगिक ज्ञान. | २ | २० |
| २) | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान नवीन ज्ञानाशी संबंधित आहे का ? | ४ | ४० |
| ३) | मागील इयत्तेत विद्यार्थी काय शिकला ? या पाठात संबंध कुठे घातला. | ३ | ३० |
| ४) | वयोगट, आकलनशक्ती. | १ | १० |
| | एकूण - | १० | १०० |
| | **विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद** | | |
| १) | घटकानुसार, पूर्वज्ञानाशी आशय सुसंगत आहे का ? आशयाशी पूर्वज्ञान सुसंगत, संबंधित आहे का ? | २ + २ | ४० |
| २) | पूर्वीची इयत्ता, कोणता पाठ अभ्यासला आहे ? | ५ + १ | ६० |
| | एकूण - | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पूर्वज्ञानावर चर्चा करताना इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान नवीन ज्ञानाशी सुसंगत आहे का ? याविषयी चर्चा करतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के आहे व ते समान आहे.

२) घटनेमागील पार्श्वभूमी / पाठाची पार्श्वभूमी व आशय यावर चर्चा करणाऱ्यांचे प्रमाण २०.०० टक्के प्राध्यापक सारणीमध्ये आहे.

३) विद्यार्थी मागील इयत्तेत काय शिकला / कोणता पाठ अभ्यासला यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक सारणीत ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत ६०.०० टक्के आहे.

४) वयो मट व आकलन शक्तीवर चर्चा करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना बहुतांशी प्राध्यापक विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान नवीन आशयाशी सुसंगत असणे, मागील इयत्तेतील पाठ याकडे लक्ष देतात. काही प्राध्यापक पाठाची पार्श्वभूमी व आशयानुषंगिक ज्ञान यासंबंधी चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न ७ हा पूर्वज्ञाना संदर्भातील प्रश्न विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.९६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.९६

पूर्वज्ञानासंदर्भात प्रश्न विचारणे

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान कोणते असेल | ३ | ३० |
| २) | पाठ कशावर आधारित आहे ? विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान कसे जागृत कराल ? | ३ | ३० |
| ३) | पूर्वज्ञान नवीन घटकाशी जोडता येईल का ? त्यांचे पूर्वानुभव काय असतील ? अपेक्षाप्रमाणे नसेल तर काय कराल. | ४ | ४० |
| | एकूण - | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | गृहीत धरलेल्या पूर्वज्ञानासंबंधी कोणता पाठ, कविता झाली आहे ? कोणत्या इयत्तेत ? लेखक ? | ३ + ० | ३० |
| २) | विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्यांनी ती घटना पाहिली ? त्यांना काय माहिती आहे ? | ३ + ० | ३० |
| ३) | हे पूर्वज्ञान तुम्ही कोणत्या दृष्टीने गृहीत धरले आहे ? पाठ्यांश अभ्यासला ? उत्तर मिळेल का ? | ० + २ | २० |
| ४) | पूर्वज्ञान नसेल तर घटक कसा मांडणार ? | ० + २ | २० |
| | एकूण - | ६ + ४ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठ मार्गदर्शक विचारत असलेल्या प्रश्नांचे प्रमाणे -

अ) पूर्वज्ञान घटकाशी जोडता येईल का ? त्याचे पूर्वानुभव काय असतील ? अपेक्षाप्रमाणे ते नसेल तर काय कराल ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

ब) विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान कोणते असेल - ३०·०० टक्के·

क) पाठ कशावर आधारित आहे - ३०·०० टक्के·

ड) विद्यार्थी सारणीमध्ये गृहित धरलेल्या पूर्वज्ञानासंबंधी कोणता पाठ / कविता झाली आहे ? कोणत्या इयत्तेत, कोणत्या लेखकाचा ? त्याचे प्रमाण ३०·०० टक्के·

इ) विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्यांनी ती घटना पाहिली आहे का ? त्यांना काय माहिती आहे - ३०·०० टक्के·

ई) हे पूर्वज्ञान तुम्ही कोणत्या दृष्टीने गृहित धरले आहे ? उत्तर मिळेल का ? पाठ्यांश अभ्यासला का ? - २०·०० टक्के

च) विद्यार्थ्याला पूर्वज्ञान नसेल तर घटक कसा मांडणार ? २०·०० टक्के·

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल·

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करताना पूर्वज्ञान घटकाशी जोडणे, विद्यार्थ्यांचे पूर्वज्ञान / पूर्वानुभव, अपेक्षेप्रमाणे नसेल तर, पाठ कशावर आधारित आहे, गृहित पूर्वज्ञानासंबंधीचा झालेला पाठ, कविता, इयत्ता, लेखक, विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव इत्यादी बाबींकडे लक्ष देतात· काही प्राध्यापक पूर्वज्ञान गृहित धरण्याची दृष्टी, पाठयांशाचा अभ्यास, अपेक्षित उत्तर न आल्यास, तसेच पूर्वज्ञान नसल्यास घटकाशी मांडणी यावर चर्चा करतात·

प्रश्नावली मधील प्रश्न क्र·८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे· त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र·४·९७ मध्ये दिलेली आहे·

सारणी क्र.४.९७

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मागील इयत्तांची पुस्तके व उपघटकांशी निगडित संदर्भ वाचायला सांगतो. | ४ | ४० |
| २) | आपल्या हेतुशी निगडीत प्रश्न विचारुन मार्गदर्शन करतो. | ३ | ३० |
| ३) | स्वत: तो घटक, इयत्ता सांगतो. | २ | २० |
| ४) | तुटपुंज्या ज्ञानावर अध्यापन परिणामकारक होणार नाही, याची समज देतो. | १ | १० |
| | एकूण - | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मागील अभ्यासक्रम पाहा. पुस्तके वाचा, शोधा असे सांगतात. | २ + ० | २० |
| २) | अनेक प्रश्न विचारुन पूर्वज्ञानासंबंधी चर्चा, मार्गदर्शन करतात. | २ + २ | ४० |
| ३) | स्वत: ते संदर्भ घटक इयत्ता सांगतात. आठवण करुन देतात. | ३ + १ | ४० |
| | एकूण - | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषय अध्यापन पध्दतीचे पाठ मार्गदर्शक विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर, संदर्भ देता येत नसेल तर मार्गदर्शक प्राध्यापक मागील इयत्ताची पुस्तके, उपघटकाशी निगडित संदर्भ, अभ्यासक्रम वाचायला सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०•०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये २०•०० टक्के प्रमाणे आहे•

२) प्रश्न विचारून मार्गदर्शन करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०•०० टक्के विद्यार्थी सारणीत ४०•०० टक्के प्रमाण आहे•

३) संदर्भ इयत्ता, पाठ स्वतः सांगतात, आठवण करून देतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०•०० टक्के व विद्यार्थी सारणीत ४०•०० टक्के प्रमाण आहे•

४) तुटपुंज्या ज्ञानावर अध्यापन परिणामकारक होणार नाही याची समज देतात• याचे प्राध्यापक सारणीमध्ये १०•०० टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे•

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल•

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थी-शिक्षकाला मागील संदर्भ देता येत नसल्यास हेतुशी निगडित प्रश्न विचारून पूर्वज्ञानासंबंधी चर्चा / मार्गदर्शन करतात•

काही प्राध्यापक मागील इयत्तांची पुस्तके, अभ्यासक्रम संदर्भ वाचायला सांगतात• काही प्राध्यापक संदर्भ पाठ इयत्ता स्वतः सांगतात•

प्रश्नावलीतील प्रश्न क्र॰९ हा विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसण्यासंबंधीचा आहे॰ त्याविषयी प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र॰४॰९८ मध्ये दिलेली आहे॰

सारणी क्र॰४॰९८

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| अ॰क्र॰ | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | ती कशी घ्यावी याविषयी मार्गदर्शन करतो॰ प्रश्न विचारून clue देतो॰ | ६ | ६० |
| २) | अधिक विचार, वाचन करायला सांगतो॰ | २ | २० |
| ३) | घटक, इयत्ता, विद्यार्थ्यांचे अनुभव यावर चर्चा करतो॰ | १ | १० |
| ४) | स्वतः प्रेरणा सांगतो॰ | १ | १० |
| | | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अनेक प्रेरणा सुचवितात व योग्य वाटेल ती निवडण्यास सांगतात॰ | २ + २ | ४० |
| २) | ती कशी वापरावी याविषयी लेखी, तोंडी मार्गदर्शन करतात व प्रेरणा देण्यास उद्युक्त करतात॰ | ५ + १ | ६० |
| | | एकूण - ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणी वरून इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास प्रेरणा कशी द्यावी याविषयी मार्गदर्शन करतात. प्रश्न, उदाहरणे देऊन प्रेरणा देण्यास उद्युक्त करतात (क्ल्यू) देतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६०.०० टक्के प्रमाण आहे. ते समान व जास्त आहे.

२) अनेक प्रेरणा सुचवितात. योग्य ती निवडायला सांगतात. याचे विद्यार्थी सारणीमधील प्रमाण ४०.०० टक्के आहे.

३) अधिक विचार, वाचन करायला सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) घटक, इयत्ता, विद्यार्थ्यांचे अनुभव यावर चर्चा करतात, ते स्वतः प्रेरणा सांगतात. याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण १०.०० टक्के आहे व ते अल्प आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास प्रेरणा कशी द्यावी याविषयी मार्गदर्शन करतात. प्रश्न, उदाहरणे देऊन प्रेरणा देण्यास उद्युक्त करतात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१० प्रेरणेसंबंधातील मार्गदर्शनात ज्या बाबींचा विचार करतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम सारणी क्र.४.९९ मध्ये दिलेला आहे.

सारणी क्र. ४.१९

प्रेरणेमधील घटक क्रम

| अ.क्र. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अ.क्र. | विद्यार्थी शिक्षकांनी दिलेले घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | घटकाला अनुसरता | ३२ | १. | प्रेरणा देणाऱ्या कृती | ३४ |
| २. | प्रेरणा देणाऱ्या कृती | ३० | २. | घटकाला अनुसरता | २८ |
| ३. | प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | २० | ३. | प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | २३ |
| ४. | प्रेरणेचा परिणाम | १८ | ४. | प्रेरणेचा परिणाम | १५ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये क्र.३ व ४ यामध्ये समानता आहे व क्र.१ व २ क्रम भिन्न आहेत, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देत असताना प्रेरणेमधील घटकांना जो क्रम देतात त्या घटकांना प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम एकत्रित करता पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठमार्गदर्शक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देताना पुढील क्रम देतात :

१.५) घटकाला अनुसरता
१.५) प्रेरणा देणाऱ्या कृती
३) प्रस्तावनेची हेतुकथनाशी घातलेली सांगड
४) प्रेरणेचा परिणाम

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.११ हा पाठटाचणामध्ये मुद्दे उपमुद्दे नसण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१०० मध्ये दिलेली आहे.

### सारणी क्र.४.१००

### पाठटाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसल्यास

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मुद्दे, उपमुद्दे, लिहा असे सांगतो व मग मार्गदर्शन देतो. | ४ | ४० |
| २) | पाठ्यांश वाचायला सांगतो. | १ | १० |
| ३) | ते कसे काढावेत याचे मार्गदर्शन करतो. आशय विश्लेषण करतो. | ५ | ५० |
| | एकूण - | १० | १०० |
| | **विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद** | | |
| १) | मुद्दे लिहा अशी सूचना देतात. | ४ + २ | ६० |
| २) | त्याशिवाय टाचण-मंजुरी नाही. | | |
| २) | कोणते मुद्दे यावेत यावर चर्चा करतात व लिहायला सांगतात. | २ + १ | ३० |
| ३) | स्वत: ते मुद्दे लिहितात. | १ + ० | १० |
| | एकूण - | ७ + ३ | १०० |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन</u> :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे प्राध्यापक पाठटाचणात मुद्दे, उपमुद्दे नसल्यास विद्यार्थी-शिक्षकाला ते कसे काढावेत याचे मार्गदर्शन, आशय विश्लेषण करून सांगतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०•०० टक्के प्रमाण व विद्यार्थी सारणीत ते ३०•०० टक्के आहे•

२) मुद्दे, उपमुद्दे लिहा त्याशिवाय टाचणास मार्गदर्शन व मंजुरी नाही याचे प्राध्यापक सारणीत ४०•०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीत ६०•०० टक्के प्रमाण आहे•

३) प्राध्यापक सारणीत - पाठ्यांश वाचायला सांगतो - १०•०० टक्के•

४) विद्यार्थी सारणीत - स्वतः प्राध्यापक मुद्दे लिहितात - १०•०० टक्के असे प्रमाण आहे•

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल•

<u>निष्कर्ष</u> :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठटाचणात मुद्दे, उपमुद्दे नसल्यास मुद्दे, उपमुद्दे लिहून आणल्याशिवाय मार्गदर्शन व टाचण मंजुर करुत नाहीत•

काहीप्राध्यापक मुद्दे, उपमुद्दे कसे काढावेत याचे आशय विश्लेषण करून मार्गदर्शन करतात•

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र•१२ हा प्रत्येक मुद्द्यावरील चर्चेसंबंधीचा आहे• त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र•४•१०१ मध्ये दिलेली आहे•

सारणी क्र.४.१०९

प्रत्येक मुद्द्यावरील चर्चा करणे

| | होय | नाही | आवश्यकतेनुसार कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | - | १० |
| | १००.०० | | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ५ + २ | २ + १ | - | ७ + ३ |
| एकूण - | ७०.०० | ३०.०० | - | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक मुद्यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीतील प्रमाण अनु.क्र.१००.०० टक्के व ७०.०० टक्के आहे व ते दोन्हीत जास्त आहे.

२) प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करीत नाहीत. याचे विद्यार्थी सारणीत ३०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन मुद्द्यावरील चर्चेत प्रत्येक मुद्द्यावर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र•१४ हा पाठ्य मुद्द्यावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देण्यासंबंधीचा आहे• त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र•४•१०२ मध्ये दिलेली आहे•

सारणी क्र•४•१०२

मुद्द्यावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे

| | होय | नाही | काही वेळा आवश्यकता वाटली तरच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ५ | २ | ३ | १० |
| | ५०•०० | २०•०० | ३०•०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात, याचे ४०•०० टक्के प्रमाण आहे•

२) अवांतर वाचन देत नाहीत - ३०•०० टक्के व काहीवेळा आवश्यकता वाटली तर देतो - ३०•०० टक्के प्रमाण आहे•

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल•

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात व काही प्राध्यापक आवश्यकता वाटली तरच अवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठ्यमुद्द्याचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१०३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१०३

पाठ्य मुद्द्याचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधी

| | होय | नाही | आवश्यकता वाटली तरच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ९ | - | १ | १० |
| | ९०.०० | | १०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ६ + ३ | १ + ० | | ७ + ३ |
| एकूण - | ९०.०० | १०.०० | - | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक पाठ्य मुद्द्यावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्याचे स्पष्टीकरण विचारतात याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ९०.०० टक्के आहे. ते समान व सर्वाधिक आहे.

२) प्राध्यापक सारणीमध्ये आवश्यक वाटले तर विचारतो - १०·०० टक्के आहे·

३) विद्यार्थीसारणीमध्ये विचारत नाहीत याचे १०·०० टक्के असे प्रमाण आहे ते अल्प आहे·

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल·

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन-पध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य मुद्दयांवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात·

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र·१६ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र·१५ हा मुद्दयांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे· त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र·४·१०४ मध्ये दिलेली आहे·

सारणी क्र·४·१०४

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण न आल्यास

| अ·क्र· | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतो· | १ | १० |
| २) | स्वत:च ते स्पष्टीकरण करतो | २ | २० |
| ३) | उपप्रश्न विचारून मुद्दयाच्या स्पष्टीकरणाकडे आणतो· | ४ | ४० |
| ४) | तो घटक पुन्हा वाचायला सांगतो· सखोल अभ्यास करा·-- | ३ | ३० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | अभ्यास चांगला करा, पुस्तके डिक्शनरी पहा· असे सांगतात | ३ + ० | ३० |
| २) | स्वत: ते स्पष्टीकरण करतात· | १ + ० | १० |
| ३) | स्पष्टीकरण कसे करावे, याचे मार्गदर्शन करतात, सुचवितात· | ३ + २ | ५० |
| ४) | प्रश्न विचारून, चर्चा करून स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात· | ० + १ | १० |
| | एकूण - | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापन प्रयुक्तीचे मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या मुद्द्याचे स्पष्टीकरण येत नसल्यास प्रश्न, उपप्रश्न विचारून मुद्द्यांच्या स्पष्टीकरणाप्रत आणतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत १०.०० टक्के प्रमाण आहे.

२) स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात याचे विद्यार्थी-सारणीत ५०.०० टक्के प्रमाण व प्राध्यापक सारणीत १०.०० टक्के प्रमाणे आहे.

३) तो घटक पुन्हा वाचायला चांगला अभ्यास करायला सांगतात. याचे प्राध्यापक सारणीत व विद्यार्थी सारणीत ३०.०० टक्के प्रमाण असे समान प्रमाण आहे.

४) प्राध्यापक स्वतः त्या मुद्द्याचे स्पष्टीकरण करतात. याचे प्राध्यापक सारणीत २०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत १०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्याचे स्पष्टीकरण आले नाही तर स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात. काही प्राध्यापक प्रश्न, उपप्रश्न विचारून विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरणाप्रत आणतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र. १७ हा मार्गदर्शनाच्यावेळी टाचण व्यवस्थित असूनही विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण न येण्यासंबंधीचा आहे व त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीत प्रश्न क्र. १६ प्राध्यापक स्पष्टीकरण न आल्यास सविस्तर आशय सांगण्याविषयीचा आहे. त्याविषयी सारणी क्र.४.१०५ व ४.१०६ मध्ये प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती आहे.

सारणी क्र.४.१०५

टाचण व्यवस्थित पण पाठ्मार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न आल्यास

| अ.क्र. | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रथम छोटे प्रश्न विचारतो, चर्चा करतो, आशयावर मार्गदर्शन करतो. | ५ | ५० |
| २) | परत टाचण अभ्यासण्यास, घटक वाचण्यास सांगतो. | ३ | ३० |
| ३) | टाचण त्यानेचच काढले आहे का, याची शहानिशा करतो. | २ | २० |
| | एकूण - | १० | १०० |

सारणी क्र.४.१०६

पाठ्यांश सविस्तर सांगण्याविषयी

| विद्यार्थी-शिक्षक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| | ५ | २ | ७ |
| | ३ | - | ३ |
| एकूण - | ८०.०० | २०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

प्राध्यापक सारणीमध्ये -

१) पाठटाचण व्यवस्थित लिहिले पण मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता आले नाही तर इंग्रजी पाठमार्गदर्शक छोटे छोटे प्रश्न विचारुन चर्चा करतात व आशयावर मार्गदर्शन करतात याचे प्रमाण ६०.०० टक्के आहे.

२) पाठटाचण अभ्यासण्यास, घटक परत वाचण्यास सांगतात याचे प्रमाण ३०·०० टक्के आहे·

३) टाचण विद्यार्थी-शिक्षकानेच (मार्गदर्शनास आलेल्या) काढले आहे का ? याची शहानिशा करतात· 20 %

विद्यार्थी सारणीमध्ये -

४) पाठटाचण व्यवस्थित लिहिले पण मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाला प्रश्नाचे स्पष्टीकरण देता आले नाही तर प्राध्यापक आशय सविस्तर सांगतात याचे प्रमाण ८०·०० टक्के व सांगत नाहीत याचे प्रमाण २०·०० टक्के आहे·

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल·

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी पाठटाचण व्यवस्थीत लिहितो पण मार्गदर्शनाच्या वेळी उत्तर आले नाही तर प्रश्न चर्चा करून आशयावर मार्गदर्शन करतात· त्याचप्रमाणे बहुसंख्य प्राध्यापक पाठाचा आशय सविस्तर सांगतात·

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र·१८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्याविषयीचा आहे· या विषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र·४·१०७ मध्ये दिलेली आहे·

सारणी क्र·४·१०७

घटकाशी निगडित आशय सांगणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | २<br>२०·०० | ७<br>७०·०० | १<br>१०·०० | १०<br>१०० |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :



१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत याचे प्रमाण ७०·०० टक्के आहे·

२) आशय सांगतात याचे प्रमाण २०·०० टक्के आहे·

३) कधी कधी सांगतात याचे प्रमाण १०·०० टक्के आहे·

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल·

## निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत·

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र·१९ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र·१७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे· त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र·४·१०८ मध्ये दिलेली आहे·

### सारणी क्र·४·१०८

### उद्दिष्टे व स्पष्टीकरणामधील बाबी

| अ·क्र· | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सर्व उद्दिष्टांचा समावेश व क्रम· | २ | २० |
| २) | घटकाला अनुरूप आहेत ? | ४ | ४० |
| ३) | शैक्षणिक अनुभूती व मूल्यमापन | १ | १० |
| ४) | आशय, वर्णन बदलाची भाषा, दृश्यता | ३ | ३० |
| | एकूण - | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रसाद | | |
| १) | उद्दिष्टे साध्य होण्यासारखी आहेत का ? | २ - ० | २० |
| २) | पाठ्यघटकाला सापेक्षी आहेत ? | ५ - १ | ६० |
| ३) | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे योग्य लिहिली आहेत का ? | ० - २ | २० |
| | एकूण - | ७ - ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरून इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक उद्दिष्टे व स्पष्टीकरणाचे मार्गदर्शन देताना उद्दिष्टे घटकाला अनुसरून / साजेशी आहेत का ? हे पाहतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के विद्यार्थी सारणीमध्ये ६०.०० टक्के प्रमाण आहे.

२) आशय, वर्तन बदलाची भाषा व दृश्य बदल आहे का हे पा पाहणाऱ्यांचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण आहे.

३) सर्व उद्दिष्टांचा समावेश व क्रम आहे का ? याचे २०.०० टक्के प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये आहे.

४) शैक्षणिक अनुभूती व मूल्यमापन या बाबी पाहणारे १०.०० टक्के प्रमाण आहे.

५) विद्यार्थी सारणीमध्ये उद्दिष्टे व स्पष्टीकरणावर मार्गदर्शन देताना - उद्दिष्टे साध्य होण्यासारखी आहेत का ? याचे प्रमाण २०.०० टक्के व उद्दिष्टे व स्पष्टीकरणे योग्य लिहिली आहेत का ? याचे प्रमाण २०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे याचे मार्गदर्शन करतात व ते करताना घटकानुसारता, वर्तन बदलाची भाषा व दृश्य वर्तन, बदल या बाबी पाहतात.

काही प्राध्यापक सर्व उद्दिष्टांचा समावेश, क्रम व ती योग्य लिहिणे, साध्य होणारी या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र०२० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र०१८ हा पाठ्य घटकाला अधिक उद्दिष्टांच्या गरजे संबंधीचा आहे० त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र०४०१०९ मध्ये दिलेली आहे०

सारणी क्र०४०१०९

पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज

| अ०क्र० | उपाध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | स्वतः ती सांगतो, टाचणात नमूद करतो० | ५ | ५० |
| २) | अधिक उद्दिष्टे लिहायला सांगतो० | ३ | ३० |
| ३) | त्यावर चर्चा करुन सुचवितो० | १ | १० |
| ४) | इंग्रजीत ती निश्चितच असतात० | १ | १० |
| | | एकूण - १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | उद्दिष्टे स्वतः सांगतात / लिहितात० | ३ - २ | ५० |
| २) | ती काढा अशी सूचना देतात० | २ - १ | ३० |
| ३) | चर्चेतुन अधिक उद्दिष्टे घेऊ शकतो हे सुचवितात० | २ - ० | २० |
| | | एकूण - ७ - ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास इंग्रजी विषयाचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक ती स्वतः सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत ५०००० टक्के असे समान जास्त प्रमाण आहे०

२) ती अधिक उद्दिष्टे लिहा / काढा अशी सूचना देणाऱ्या प्राध्यापकांचे अनुक्रमे ३०००० टक्के व ३०००० टक्के प्रमाण आहे०

३) चर्चा, मार्गदर्शनातून अधिक उद्दिष्टे सुचवितात याचे प्रमाण अनुक्रमे १०.०० टक्के व २०.०० टक्के आहे.

४) इंग्रजीत उद्दिष्टे निश्चितच असतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये १०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य-घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास उद्दिष्टे स्वत: सांगतात. काही प्राध्यापक ती उद्दिष्टे काढा / लिहा अशी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्या मागील कारण सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११०

उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलामागील कारण सांगणे

| | होय | नाही | क्वचित | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ७ | २ | १ | १० |
| | ७०.०० | २०.०० | १०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ६ | १ | - | ७ |
| | २ | - | १ | ३ |
| एकूण - | ८०.०० | १०.०० | १०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाची उद्दिष्टे स्पष्टीकरणामध्ये बदल करत असता प्राध्यापक त्या मागील कारण सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ७०.०० टक्के व ८०.०० टक्के प्रमाण आहे. ती जास्त आहेत.

२) उद्दिष्टे स्पष्टीकरणे बदला मागील कारण सांगत नाहीत याचे प्राध्यापक सारणीत २०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत १०.०० टक्के प्रमाण आहे.

३) क्वचित, आवश्यक वाटले तर सांगतात याचे प्रमाण १०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणामध्ये बदल करत असता त्यामागील कारण सांगत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२२, २३, २४ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२०, २१ व २२ हे शैक्षणिक साधने घटकानुसार समाविष्ट न केल्यास ती दाखविणे, त्यांच्या कल्पना सुचविणे व उपलब्धतेविषयी माहिती देण्यासंबंधीचे आहेत. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले प्रतिसाद सारणी क्र.४.१११ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१११

शैक्षणिक साधनासंबंधी

| प्रश्न | | होय | नाही | एकूण |
| --- | --- | --- | --- | --- |
| दाखविण्यास सांगतात | प्राध्यापक | १० | - | १० |
| | | १००.०० | | १००/- |
| | विद्यार्थी-शिक्षक | ९ | १ | १० |
| | | ९०.०० | १०.०० | १०० |
| शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात | प्राध्यापक | ९ | १ | १० |
| | | ९०.०० | १०.०० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | ९ | १ | १० |
| | | ९०.०० | १०.०० | १०० |
| त्यांच्या उपलब्धतेची माहिती देतात | प्राध्यापक | १० | - | १० |
| | | १००.०० | | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | ८ | २ | १० |
| | | ८०.०० | २०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषय अध्यापन पध्दतीचे मार्गदर्शन प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य-विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर -

अ) ती दाखविण्यास सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे १००•०० टक्के व ९०•०० टक्के प्रमाण आहे•

ब) दाखविल्यास सांगत नाहीत याचे विद्यार्थी सारणीमध्ये १०•०० टक्के प्रमाण आहे•

अ) शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ९०•०० टक्के प्रमाण आहे•

ब) शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवित नाहीत याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत १०•०० टक्के प्रमाण आहे•

अ) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात याचे प्राध्यापक सारणीत १००•०० टक्के व विद्यार्थी सारणीत ८०•०० टक्के प्रमाण आहे•

ब) उपलब्धते विषयी माहिती देत नाहीत याचे विद्यार्थी सारणीत २०•०० टक्के प्रमाण आहे•

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल•

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे बहुसंख्य पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी—शिक्षकाने पाठ्यविषयाला अनुसरून शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर ती शैक्षणिक साधने दाखविण्यास सांगतात• त्यांच्या उपलब्धते विषयी माहिती देतात, त्याचप्रमाणे शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात•

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र•२५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र•२३ हा शिक्षक कृतीपरील पर्यंतील बाबीसंबंधीचा आहे• त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र•४•११२ मध्ये दिलेली आहे•

सारणी क्र.४.११२

शिक्षक-कृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | कथन, प्रश्न, स्पष्टीकरण, शब्दपरिचय, उदाहरणे. | ३ | ३० |
| २) | घटकांच्या उद्दिष्टानुसार प्रश्नांची उत्तरे येतात का ? | २ | २० |
| ३) | विद्यार्थ्यांच्या कृतियुक्त सहकार्याची कोणती योजना आहे, वस्तु, उदाहरणे इ. | ५ | ५० |
| | एकूण | १० | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | विषय-विवेचन, शैक्षणिक अनुभूती. | २+० | २० |
| २) | प्रेरणा, हेतुप्रश्न व कॉम्प्रेहेन्सिव्ह प्रश्न. | १+० | १० |
| ३) | सर्व पाय-या प्रेरणा ते स्वाध्याय व मुद्दयानुसार सर्व कृती आहेत का ? | २+१ | ३० |
| ४) | शैक्षणिक साधने नवीन शब्दांसाठी वस्तु, उदाहरणे, कृती, चेतक विविधता. | २+२ | ४० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये शिक्षक कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक विद्यार्थ्यांचा कृतीयुक्त सहभाग घेण्याची कोणती योजना शिक्षककृतीत आहे उदा. नवीन शब्दांसाठी शैक्षणिक साधने, वस्तु, उदाहरणे कृती, स्ट्रक्चर, चेतक विविधता या बाबी पाहतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे. ती सारणीत जास्त आहेत.

२) प्राध्यापक सारणीमध्ये कथन, प्रश्न, स्पष्टीकरण, शब्दपरिचय, उदाहरणे या कृती पाहतात, याचे ३०.०० टक्के प्रमाण आहे.

३) सर्व पाय-या - प्रेरणा ते स्वाध्याय अखेर, मुद्दयानुसार कृती आहेत का ? याचे विद्यार्थी सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण आहे.

४) त्याच प्रमाणे विषय विवेचन व शैक्षणिक अनुभूती प्रश्न या कृतीचे प्रमाण २०.०० टक्के आहे. ( प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये )

५) विद्यार्थी सारणीमध्ये प्रेरणा, हेतुप्रश्न, कॉम्प्रिहेन्सिव्ह प्रश्न पाहतात, याचे प्रमाण १०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षककृतीपैकी विद्यार्थ्यांचा सहभाग घेणा-या कृती, शब्द परिचयाची शैक्षणिक साधने, वस्तु, उदाहरणे, कृती व स्ट्रक्चर, चेतक विविधता या बाबी पाहतात. काही प्राध्यापक कथन, प्रश्न, शब्द परिचय, पाठाच्या पाय-या, प्रेरणा ते स्वाध्यायाखेर, मुद्दयानुसार कृती या चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२५ हा शिक्षक-कृतीवरील चर्चेत अंतर्गत माहिती

देण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११३

शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देणे

| | होय | नाही | कधी-कधी आवश्यकते-प्रमाणे | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | - | ४ | १० |
| | ६०.०० | | ४०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ४ | ३ | - | ७ |
| | २ | १ | - | ३ |
| एकूण | ६०.०० | ४०.०० | | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषय अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक विद्यार्थ्यांला अवांतर माहिती देतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ६०.०० टक्के प्रमाण आहे.

२) विद्यार्थ्याला अवांतर माहिती कधी कधी देतो, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देत नाहीत, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला चर्चेच्या दरम्यान अवांतर माहिती देतात. काही प्राध्यापक ती घटकाच्या आवश्यकतेनुसार कधी कधी देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली--तील प्रश्न क्र.२४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात शिक्षक कृतीमधील ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम सारणी क्र.४.११४ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.११४

शिक्षक-कृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथन । स्पष्टीकरण | ५९ | १ | विद्यार्थी-सहभाग | ३१ |
| २ | प्रश्न | ५४ | २ | कथन । स्पष्टीकरण | २९ |
| ३ | विद्यार्थी-सहभाग | ५३ | ३ | प्रश्न | २३ |
| ४ | शैक्षणिक साधने | ४७ | ४ | शैक्षणिक साधने | २२ |
| | अन्य : फलक लेखन, ड्रिलिंग | | | | |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये क्र.४ शिवाय सर्व क्रमांमध्ये भिन्नता आहे, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीमध्ये ज्या घटकाला महत्त्व देतात त्यानुसार प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित करता पुढील क्रम व निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृतीच्या मार्गदर्शनामध्ये घटकांच्या महत्त्वानुसार पुढील क्रम देतात :-

१. कथन । स्पष्टीकरण,

२. विद्यार्थी सहभाग,

३. प्रश्न,

४. शैक्षणिक साधने.

या शिवाय सुचविलेले घटक - फलक लेखन व ड्रिलिंग.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११५

विद्यार्थी-कृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थी प्रतिसाद पूर्ण लिहावे. | ३ | ३० |
| २) | पाठात भाग न घेणाऱ्याकडे लक्ष द्या म्हणजे सर्वांचा सहभाग आवश्यक. | २ | २० |
| ३) | विद्यार्थ्यांचा कृतियुक्त,शारीरिक मानसिक सहभाग. | ५ | ५० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग | | |
| १) | पाठटाचणात फक्त हेतुप्रश्न विचारात घेतात,विद्यार्थी कृती पाहात नाहीत. | १+० | १० |
| २) | विद्यार्थ्यांचा प्रतिसाद यावा,तो नमूद केला कां ? | ०+१ | १० |
| ३) | कृतियुक्त सहभाग,पाठ टाचणात तो कोणकोणत्या ठिकाणी घ्यावा यावर मार्गदर्शन, क्रियाशीलात अवधान खेचणे इ. | ४+२ | ६० |
| ४) | विद्यार्थी कृतीत फ्लिकर्स,शैक्षणिक साधने,उत्तरे,वाचन,गायन. | २+० | २० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणी वरुन इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक विद्यार्थी कृतीवर चर्चा करताना - विद्यार्थ्यांचा कृतियुक्त, शारीरिक, मानसिकदृष्टया सहभाग घेण्याविषयी मार्गदर्शन करतात. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ५०.०० टक्के व ६०.०० टक्के आहे.

२) विद्यार्थी कृतीत विद्यार्थी प्रतिसाद पूर्ण लिहावेत. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण आहे तर विद्यार्थी सारणीत ते १०.०० टक्के आहे.

३) पाठात सर्वांना सहभागी करावे ,सहभागी न होणा-याकडे लक्ष द्यावे. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) विद्यार्थी सारणीमध्ये विद्यार्थी कृतीत ड्रिलिंग वर्क, शैक्षणिक साधने, उत्तरे, वाचन, गायन या बाबींवर चर्चा करतात. याचे प्रमाण २०.०० टक्के आहे.

५) पाठ टाचणात फक्त हेतु प्रश्नांचा विचार करतात. विद्यार्थी कृती पाहत नाहीत, याचे विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-कृतिसंबंधी चर्चा करताना विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग, शारीरिक ,मानसिकदृष्टया सहभाग, कोणकोणत्या ठिकाणी, अवधान खेचणे, या विषयी चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२९ हा व विद्यार्थी शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२७ हा मूल्यमापनातील प्रश्नां संदर्भात चर्चा केल्या जाणा-या गोष्टीसंबंधीचा आहे. त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११६

मूल्यमापन प्रश्नांतील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रश्न रचना | १ | १० |
| २) | पाठ्यांशाला पूरक,आशयगर्भ,उद्दिष्टानुसार | ७ | ७० |
| ३) | प्रश्न छोटे,सुलभ,आकलनपर | २ | २० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | प्रश्न-रचना,प्रकार,संख्या | १+१ | २० |
| २) | उद्दिष्टानुगामी,पाठ्यघटकानुरूप, व्याकरण शुद्ध प्रश्न | २+२ | ४० |
| ३) | ज्ञानावर - ३,आकलन-२,स्वाध्याय-१ असे प्रश्न आहेत कां ? | ४+० | ४० |
| | | ७+३ | १०० |
| | एकूण | १० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नां संदर्भात मार्गदर्शन करताना प्रश्न पाठ्यांशाला पूरक, आशयगर्भ व उद्दिष्टानुसार आहेत का यावर चर्चा करतात,याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७०.०० टक्के प्रमाण व विद्यार्थी सारणीमध्ये ते ४०.०० टक्के असे आहे.

२) प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्न ज्ञानावर-३, आकलनावर - २ व स्वाध्यायात-१ याप्रमाणे आहेत का पाहतात,याचे विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) प्रश्न रचना,प्रकार,संख्या पाहण्याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये १०.०० टक्के तर विद्यार्थी सारणीत ते २०.०० टक्के आहे.

४) प्रश्न छोटे, सुलभ अचूक आकलनपर आहेत का याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक प्रश्न पाठयांश पूरक, आशयगर्भ, उद्दिष्टानुगामी असणे या बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक ज्ञान, आकलन, स्वाध्याय, प्रश्न रचना, प्रकार संख्या या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगण्या - विषयीचा आहे, त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११७
मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगणे

| | होय | नाही | सुरुवातीलाच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ७ | - | ३ | १० |
| | ७०.०० | | ३०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक : | ७ | - | - | ७ |
| | २ | - | १ | ३ |
| एकूण | ९ | - | १ | १० |
| | ९०.०० | | १०.०० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनावर चर्चा करताना मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ९०.०० टक्के प्रमाण आहे ते दोन्हीमध्ये जास्त आहे.

२) फक्त सुरवातीलाच मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप सांगतात. याचे प्राध्यापक सारणीतील ३०.०० टक्के व विद्यार्थी सारणीतील प्रमाण १०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात.

काही प्राध्यापक फक्त सुरवातीलाच सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२९ हा स्वाध्यायावर चर्चा केल्या जाणाऱ्या बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११८

स्वाध्याय मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विषयज्ञान,उद्दिष्टे यावर घटकासंबंधित, माहितीपर. | ५ | ५० |
| २) | पाठयघटकांचे दृढीकरण करणारा | २ | २० |
| ३) | कृतिपर,कल्पक,अभिरूचीपर आहे ? | ३ | ३० |
| | एकूण | १० | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | मुख्य आशय व उद्दिष्टे यावर आहे ? | २+२ | ४० |
| २) | पाठयांशाचे दृढीकरण,तयारी करणारा, उपयोजनपर. | २+० | २० |
| ३) | वेळेत होणारा,वाचन,लेखन,पाठांतर असा मापनक्षम व आकर्षक | २+० | २० |
| ४) | फारसे लक्ष देत नाहीत | १+१ | २० |
| | एकूण | ७+३ | २० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना स्वाध्याय, मुख्य आशय ( विषय ) उद्दिष्टे यावर आहे का ? यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे ती सर्वात जास्त आहेत.

२) स्वाध्याय कृतीपर, कल्पक, अभिरुचीपर आहे का ? याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ३०.०० टक्के आहे.

३) पाठ्य घटकाचे दृढीकरण करणारा स्वाध्याय आहे का यावर चर्चा करणाऱ्यांचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के व विद्यार्थी-सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे ते समान आहे.

४) विद्यार्थी सारणीमध्ये प्राध्यापक स्वाध्याय वेळेत होणारा वाचन, लेखन पाठांतरातून मापनक्षम आकर्षक आहे का ? याचे २०.०० टक्के व फारसे स्वाध्यायाकडे प्राध्यापक लक्ष देत नाहीत, याचे २०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक आशय, उद्दिष्टे या मुद्द्यावर चर्चा करतात. काही प्राध्यापक अभिरुची, कल्पकता व पाठ्य घटकांचे दृढीकरण या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणे संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.११९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११९

स्वाध्यायातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | वेगवेगळ्या स्वाध्यायांचे स्वरुप चर्चेतून समोर ठेवतो. | ६ | ६० |
| २) | स्वाध्याय स्वत: सांगतो. | ३ | ३० |
| ३) | मुलांची क्षमता उद्दिष्टे लक्षात घेऊन बदल करा असे सांगतो. | १ | १० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | बदलून स्वाध्याय स्वत: सांगतात, टाचणात लिहितात. | २+१ | ३० |
| २) | मार्गदर्शन/चर्चेतून कोणती सुधारणा हवी ते सांगतात, प्रकार सांगतात. | ३+१ | ४० |
| ३) | स्वाध्यायात बदल करा अशी सूचना देतात. | २+१ | ३० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषय अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असतील तर मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेतून मार्गदर्शनातून कोणती सुधारणा हवी ते ,वेगवेगळे स्वाध्याय प्रकार समोर ठेवतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे ते जास्त आहे.

२) स्वाध्याय स्वत: बदल करुन सांगतात,याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीतील प्रमाण ३०.०० टक्के आहे ते समान आहे.

३) स्वाध्याय बदला असे सांगतात, याचे प्राध्यापक सारणीतील १०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीतील ३०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करताना चर्चेतून कोणती सुधारणा अपेक्षित आहे ते सांगतात. स्वाध्यायाचे वेगवेगळे प्रकार समोर ठेवतात,काही प्राध्यापक स्वत: स्वाध्याय बदलून सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२०

फलकलेखनाच्या मार्गदर्शनातील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | हस्ताक्षर-चांगले, लेखन शुद्ध, मुद्देसुद सरळ रेषेत, रंगीत खडूचा योग्यप्रसंगी वापर. | ४ | ४० |
| २) | मुद्दयांचे लेखन नियोजनबद्ध, व्याख्यांना अधोरेखन. | ३ | ३० |
| ३) | फलक लेखन नेमके, अचूक, सुवाच्च्य व अर्थपूर्ण, मुद्देसूद. | ३ | ३० |
| | एकूण | १० | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | लेखन शुद्ध, स्पष्ट, आकारबद्ध मुद्देसूद, सरळ रेषेत, रंगीत खडूचा वापर इ. | ४+२ | ६० |
| २) | फळ्याचे दोन भाग करुन प्रश्न, अपरिचित शब्द लिहावेत, महत्त्वाचे मुद्दे व नियोजनपूर्वक मांडणी. | १+१ | २० |
| ३) | स्पेलींग अचूक, शब्द, विरामचिन्हे, कॅपिटल अक्षरे योग्य तिथे व अंतर योग्य. | २+० | २० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावर मार्गदर्शन करताना हस्ताक्षर चांगले, लेखन शुद्ध ,मुद्देसुद,सरळ रेषेत रंगीत खडूंचा प्रसंगोचित वापर व स्पष्ट, आकारबद्ध असावे.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४०.०० टक्के व ६०.०० टक्के प्रमाण आहे.

२) मुद्दयांचे लेखन नियोजनबद्ध,व्याख्याना अधोरेखन,याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण.

३) फलक लेखन अचूक नेमके सुवाच्य अर्थपूर्ण,मुद्देसूद,याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०.०० टक्के प्रमाण.

४) फलक लेखन फळ्याचे दोन भाग करून प्रश्न व अपरिचित शब्द लिहावेत, महत्वाच्या मुद्दयांची नियोजनपूर्वक मांडणी याचे विद्यार्थी-सारणीत २०.०० टक्के प्रमाण आहे.

५) तर स्पेलिंग अचूक,शब्द ,वाक्प्रचार योग्य ठिकाणी, कॅपिटल अक्षरे व योग्य अंतर,याचे २०.०० टक्के प्रमाण.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक-लेखनावरील मार्गदर्शनात फलक लेखन चांगले,सुवाच्य,सरळ रेषेत, आकारबद्ध ,योग्य अंतर,अचूक,नेमके, मुद्देसूद,व्याख्यांचे अधोरेखन, रंगीत खडू इ. बाबींवर चर्चा करतात.

काही प्राध्यापक योग्यवेळी कॅपिटल अक्षरे, फलकाचे दोन भाग करून लेखन, याबाबीवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा विद्यार्थी-शिक्षकांने केलेल्या फलक लेखन नियोजनातील सुधारणे संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२१

फलक लेखनातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | शुद्ध लेखनाचे नियम पाहा, फलकावर सर्व मुद्दे थोडक्यात यावेत. | १ | १० |
| २) | फलक लेखनाचे नियोजन हवे, अक्षर सुवाच्च्य काढा. | ६ | ६० |
| ३) | फलकावर शक्य झाल्यास चित्र काढा. | १ | १० |
| ४) | फलकाच्या दोन भागात मुद्दे, प्रश्न लिहा. | २ | २० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | फलकाच्या दोन भागात मुद्दे व संकलन - उत्तरे लिहा. | २+१ | ३० |
| २) | शुद्धलेखनाचे नियम अभ्यास, विरामचिन्हे योग्य तिथे लिहा. | २+० | २० |
| ३) | सर्व मुद्दे फलकावर यावेत ते थोडक्यात असावेत, वेळेत बसणारे असावेत. | २+२ | ४० |
| ४) | नियोजनातील त्रुटीनुसार सुधारणा सुचवितात. | १+० | १० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयांचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांने केलेल्या फलक लेखन नियोजनात सुधारणा करताना फलक लेखनाचे नियोजन हवे,अक्षर सुवाच्य काढा, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६०.०० टक्के प्रमाण आहे.

२) फलकाच्या दोन भागात मुद्दे व प्रश्न लिहा, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-सारणीमध्ये २०.०० टक्के व ३०.०० टक्के प्रमाण आहे.

३) शुद्धलेखनाचे नियम पहा, याचे प्राध्यापक सारणीमध्ये १०.०० टक्के विद्यार्थी सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) सर्व मुद्दे फलकावर यावेत, ते थोडक्यात असावेत वेळेत बसणारे हवेत. याचे विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

५) प्राध्यापक सारणी-फलकावर शक्य झाल्यास चित्र काढा - १०.०० टक्के प्रमाण.

६) विद्यार्थी सारणीत नियोजनातील त्रुटीनुसार सुधारणा, याचे प्रमाण १०.०० टक्के.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक फलकाच्या दोन भागात मुद्दे व संकलनातील प्रश्न लिहिणे, शुद्धलेखन व सर्व मुद्दे फलकावर येण्यासंबंधी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ हा पाठ उद्या असता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास येतो या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२२

पाठ उद्या असता मार्गदर्शन घेणे.

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पाठ रद्द, मार्गदर्शन देत नाही. | २ | २० |
| २) | मार्गदर्शन न घेण्याचे कारण विचारतो ते योग्य असेल तर मार्गदर्शन करतो. | ४ | ४० |
| ३) | विद्यार्थी हुशार व पाठ्यघटक सोपा असेल तर मार्गदर्शन देतो. | २ | २० |
| ४) | पाठटाचण २ दिवस आधी तपासून घ्यावे, पुनरावृत्ती झाल्यास मार्गदर्शन देणार नाही. | २ | २० |
| | एकूण | १० | १०० |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | कारण विचारुन योग्य वाटल्यास पाठमार्गदर्शन देतात. | ५+० | ५० |
| २) | पाठमार्गदर्शन देतात, तयारी करा असे सांगतात. | ०+२ | २० |
| ३) | अडचण विचारतात व मार्गदर्शन देतात | २+० | २० |
| ४) | मार्गदर्शन दोन दिवस आधी घ्यावे, उशीर नको अशी सूचना देऊन मार्गदर्शन देतात. | ०+१ | १० |
| | एकूण | ७+३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उशा आहे व विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आला तर मार्गदर्शन न घेण्याचे कारण विचारतात व ते योग्य असेल तर मार्गदर्शन करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत ७०.०० टक्के प्रमाण आहे.

२) पाठ रद्द करतात, याचे २०.०० टक्के प्रमाण (प्राध्यापक सारणी ).

३) हुशार विद्यार्थी व पाठ्य घटक सोपा असेल तर मार्गदर्शन करतात - २०.०० टक्के.

४) पाठ टाचण दोन दिवस आधी तपासून घ्यावे, पुनरावृत्ती झाल्यास मार्गदर्शन मिळणार नाही अशी सूचना देतात अनु. २०.०० टक्के व १० टक्के प्रमाण. ५) अडचण विचारून मार्गदर्शन देतात विद्यार्थीसारणीमध्ये (२)(३) २०.टक्के प्रमाण.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक पाठ उशा आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास आला तर बहुसंख्य प्राध्यापक उशीरा येण्याचे कारण विचारून योग्य वाटले तर मार्गदर्शन करतात.

काही प्राध्यापक मात्र पाठ रद्द करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्द्यांना अधिक वेळ देतात त्यांच्या क्रमाविषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१२३ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१२३

मार्गदर्शनात अधिक वेळ दिला जाणा-या मुद्दयांचे क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ८६ | १ | पाठ्य-मुद्दे | ८८ |
| २ | शिक्षक व विद्यार्थी कृती | ८० | २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ८७ |
| ३ | पाठ्य-मुद्दे | ७७ | ३ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ८० |
| ४ | प्रेरणा | ६९ | ४ | प्रेरणा | ५८ |
| ५ | पूर्वज्ञान | ५८ | ५ | पूर्वज्ञान | ५३ |
| ६ | संकलन | ४९ | ६ | फलक लेखन | ४५ |
| ७ | मूल्यमापन साधने | ४० | ७ | शैक्षणिक साधने | ४० |
| ८ | शैक्षणिक साधने | ३८ | ८ | संकलन | ३८ |
| ९ | उपयोजन | ३३ | ९ | उपयोजन | ३७ |
| १० | फलक लेखन | २५ | १० | मूल्यमापन साधने | २३ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये क्रम भिन्न आहेत, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाला अधिक वेळ देतात त्या घटकांना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेल्या महत्त्वानुसार क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष / क्रम काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात अधिक वेळ देतात त्यानुसार दिलेला घटक क्रम - १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे २) पाठ मुद्दे ३) शिक्षक व विद्यार्थी कृती, ४) प्रेरणा, ५) पूर्वज्ञान ६) संकलन ७) शैक्षणिक साधने ८) फलक लेखन ९) मूल्यमापन साधने १०) उपयोजन याप्रमाणे देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकांसंबंधीचा आहे. त्यासंबंधी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२४
मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | पूर्वज्ञान व उपयोजन. | ५ | ५० |
| २) | कोणताही नाही. | ५ | ५० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | कोणताही नाही. | २ + २ | ४० |
| २) | पाठ्यमुद्दे व मूल्यमापन साधने. | २ +० | २० |
| ३) | संकलन. | २ + ० | २० |
| ४) | प्रेरणा. | १ + ० | १० |
| ५) | पूर्वज्ञान, उपयोजन. | ० +१ | १० |
| | एकूण | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक पूर्वज्ञान व उपयोजन या घटकाकडे फारसे लक्ष दिले नाही तरी चालेल.असे म्हणतात, याचे ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे.

२) दुर्लक्ष करण्यासारखा कोणताही घटक नाही, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थी सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक फारसे लक्ष देत नाहीत,असे घटक व प्रमाण पुढीलप्रमाणे -

१) पाठ्य मुद्दे, मूल्यमापन साधने - २०.०० टक्के.

२) संकलन - २०.०० टक्के.

३) प्रेरणा - १०.०० टक्के प्रमाण अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन घटकातील सर्व घटकांकडे लक्ष देतात.मात्र कांही प्राध्यापक पूर्वज्ञान,उपयोजन या घटकांकडे फारसे लक्ष देत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा प्राध्यापक जो सहभाग घेतात त्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२५
मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ (६०) | ३ (३०) | १ (१०) | - | १० (१००) |
| विद्यार्थी-शिक्षक: | ४ | ३ | - | - | ७ |
| | २ | - | १ | - | ३ |
| एकूण | ६०.०० | ३०.०० | १०.०० | - | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ६०.०० टक्के प्रमाण आहे ते समान आहे.

२) मध्यम सहभाग घेतात.याचे दोन्ही सारणीमध्ये समान प्रमाण आहे ३०.०० टक्के.

३) अल्प सहभाग घेतात.याचेही दोन्ही सारणीमध्ये समान प्रमाण आहे १०.०० टक्के.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात,काही प्राध्यापक मध्यम सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांच्या सहभागासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२६

एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | - | ४ | ३ | ३ | १० |
| | | ४०.०० | ३०.०० | ३०.०० | १०० |
| विद्यार्थी शिक्षक | | | | | |
| | - | २ | २ | ३ | ७ |
| | - | २ | १ | - | ३ |
| एकूण | | ४०.०० | ३०.०० | ३०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापन प्रद्धतीचे पाठ मार्गदर्शन प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा मध्यम सहभाग घेतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये समान प्रमाण आहे.- ४०.०० टक्के.

२) अल्प सहभाग घेतात याचेही दोन्ही सारणीत समान प्रमाण आहे - ३०.०० टक्के.

३) अजिबात सहभाग नाही याचे दोन्ही सारणीत ३०.०० टक्के प्रमाण आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका मार्गदर्शनाच्यावेळी अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा मध्यम सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा की पूर्ण बदल करण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२७

पाठ नियोजन चुकीचे असल्यास सुधारणा

| | सुधारणा | पूर्ण बदल | कधी कधी पूर्ण बदल | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ८ | - | २ | १० |
| | ८०.०० | | २०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | ६ | १ | - | ७ |
| | 2 | - | 1 | 3 |
| एकूण | ८ | १ | १ | १० |
| | ८०.०० | १०.१० | १०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या पाठनियोजनात सुधारणा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये समान व सर्वाधिक प्रमाण आहे ८०.०० टक्के.

२) कधी कधी पूर्ण बदल करावा लागतो, करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे.

३) पूर्ण बदलतात, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचे पाठनियोजन चुकीचे वाटल्यास, आहे त्या पाठनियोजनात सुधारणा करतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० हा मार्गदर्शनाच्या काळात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली असता संबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२८

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिल्यास -

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | सूचक, पूरक प्रश्न विचारतो व बरोबर उत्तराप्रत आणतो. | ३ | ३० |
| २) | सुधारण्यासाठी अधिक अभ्यास करा, त्याचे मार्गदर्शन करतो. | ५ | ५० |
| ३) | चुकांची दुरुस्ती स्वत: करतो. | २ | २० |
| | एकूण | १० | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | रागवत नाहीत पण, परकीय भाषा अभिव्यक्ती लक्षात घ्या असे मार्गदर्शन देतात. | ३ + १ | ४० |
| २) | चुकांची दुरुस्ती स्वत: करतात. | २ + २ | ४० |
| ३) | सुधारण्यासाठी अधिक अभ्यास करा. | २ + ० | २० |
| | एकूण | ७ + ३ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी अध्यापनाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांशी चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला अधिक अभ्यास करा असे सांगतात.याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

२) न रागावता सूचक , पूरक प्रश्न विचारुन बरोबर उत्तराप्रत आणतात.याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के प्रमाण आहे.

३) चुकी दुरुस्ती स्वत: करतात,याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के आहे.

या निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इंग्रजी पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास अधिक अभ्यास करण्यास सांगतात,काही प्राध्यापक मात्र न रागावता प्रश्न विचारुन बरोबर उत्तराप्रत आणतात व परकीय भाषाभिव्यक्ती लक्षात घेण्याचे मार्गदर्शन करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांच्या आग्रहासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१२९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१२९

अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधने यांचा आग्रह --

| | होय | नाही | घटकाला आवश्यक वाटले तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | - | १० |
| | १००.०० | | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | ७ | - | - | ७ |
| | २ | १ | - | ३ |
| एकूण | ९०.०० | १०.०० | - | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इंग्रजी विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन ,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे १००.०० टक्के व ९०.०० टक्के प्रमाण आहे.

२) अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरत नाहीत,याचे विद्यार्थी सारणीमध्ये १०.०० टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

**निष्कर्ष :**

इंग्रजी अध्यापन पध्दतीचे मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन, अभ्यास, शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ हा मराठी अध्यापन-पद्धतीचे मार्गदर्शन व अन्य विषयांच्या अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शन यातील फरका-संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३०

मराठीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनातील फरक

| | आहे | नाही | उत्तरे नाहीत ते | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | - | १० |
| | १००.०० | | | १००· |
| विद्यार्थी-शिक्षक : | | | | |
| | ३ | २ | २ | ७ |
| | २ | - | १ | ३ |
| एकूण | ५०.०० | २०.०० | ३०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये फरक आहे. याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे १००.०० टक्के व ९०.०० टक्के प्रमाण आहे.

| | | |
|---|---|---|
| २) फरक नाही २०.०० टक्के | ) | विद्यार्थी सारणीमध्ये |
| ३) उत्तरे न देणारे ३०.०० टक्के | ) | आहेत. |

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणकोणते फरक आहेत ते पुढील पृष्ठ क्र. ५८० ते ५८३ वर सर्व विषयांच्या प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांच्या मतांचा गोषवारा दिलेला आहे.

(४) विषय : इतिहास

इतिहास विषय अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी प्रश्नावलीला दिलेला प्रतिसाद.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१ हा पाठ टाचण न काढता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३१
पाठ टाचणाशिवाय मार्गदर्शन

| प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|
| १) पाठटाचण कसे काढावे यांचे मार्गदर्शन करतो | ३ | २०.०० |
| २) मार्गदर्शन देत नाही. प्रथम कच्चे टाचण काढा असे सांगतो. | ८ | ५३.३३ |
| ३) पाठयांश संदर्भ वाचन सांगतो | ३ | २०.०० |
| ४) अडचणी विचारून त्यावर मार्गदर्शन करतो | १ | ६.६६ |
| एकूण | १५ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) टाचण कसे काढावे याचे मार्गदर्शन करतात | ३+३ | २१.४२ |
| २) मार्गदर्शन देत नाहीत, प्रथम टाचण काढा, घटक वाचा, प्रयत्न करा असे---- | ७+७ | ५०. |
| ३) घटकावर चर्चा करतात. | ४+० | १४.२८ |
| ४) अडचणी विचारून त्यांचे निरसन करतात व मग टाचण काढा... | ४+० | १४.२८ |
| एकूण | १८+१० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास विषयाचे पाठ मार्गदर्शक टाचणाशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ५०.०० टक्के प्रमाण आहे व ते दोन्हीमध्ये जास्त आहे.

२) पाठ टाचण कसे काढावे याचे मार्गदर्शन करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २१.४२ टक्के प्रमाण आहे व ते समान आहे.

३) पाठयांश वाचन, संदर्भ वाचन सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

४) अडचणी विचारून त्यांचे निरसन करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.५६ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये १४.२८ टक्के प्रमाण आहे.

५) घटकावर चर्चा करतात याचे विद्यार्थी सारणीमध्ये १४.२८ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण तयार न करताच पाठ मार्गदर्शनासाठी प्राध्यापकाकडे आला तर इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक कच्चे टाचण काढून आणल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२ हा पाठ टाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३२

त्रोटक पाठटाचणासंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | समस्या विचारतो, त्या मुद्दयांचे मार्गदर्शन करतो, टाचण पूर्ण करण्यास मदत करतो. | ५ | ३३.३३ |
| २) | टाचण पूर्ण करुन या, त्याशिवाय मार्गदर्शन नाही असे सांगतो. | ९ | ६०.०० |
| ३) | काळजीपूर्वक टाचण काढण्याविषयी सूचना देतो. | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | आवश्यक त्या मुद्दयांची कल्पना देतात, मुद्दे नमूद करतात व टाचण पूर्ण करायला सांगतात | ८ + ४ | ४२.८५ |
| २) | टाचण रद्द करुन दुसरे टाचण तयार करायला सांगतात, पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. | ७ + ६ | ४६.४२ |
| ३) | टाचण सविस्तर काढल्याशिवाय पाठ व्यवस्थित घेता येणार नाही, अशा सूचना देऊन मार्गदर्शन करतात. | ३ + ० | १०.७१ |
| | एकूण | १८ + १० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरून इतिहास अध्यापन प्रद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचण सविस्तर न काढता त्रोटक मुद्देवजा काढल्यास टाचण पूर्ण करून आणल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ६०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४६.४२ टक्के आहे व ते जास्त आहे.

२) समस्या विचारतात त्या मुद्दयांचे मार्गदर्शन करतात आवश्यक मुद्दे नमूद करतात व टाचण पूर्ण करण्यास सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-सारणीतील प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ४२.८५ टक्के आहे.

३) टाचण सविस्तर, काळजीपूर्वक काढण्याविषयी सूचना देतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ६.६६ टक्के व १०.७१ टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

पाठ टाचण सविस्तर न काढता विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकांकडे मार्गदर्शनासाठी गेल्यास इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक टाचण पूर्ण केल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. काही प्राध्यापक मात्र समस्या विचारून त्यांचे मार्गदर्शन करतात. टाचण पूर्ण करण्यास सांगतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३ हा पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणाऱ्या सूचनेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३३

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वी सूचना

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रत्येक पायरीचे पूर्वज्ञान,उद्दिष्टे-स्पष्टीकरणे, शिक्षककृति यांचे महत्त्व लक्षात घ्या | ७ | ४६.६६ |
| २ | नमुना टाचणे पाहा,आत्मविश्वास वाढवा | २ | १३.३३ |
| ३ | मुद्देसूदपणा,अचूकपणा,व्यवस्थितपणा हवा. | १ | ६.६६ |
| ४ | अवांतर माहिती मिळवा,पाठयांश वाचा, उदाहरणे,साधने वापरा. | ५ | ३३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञान,उद्दिष्टे-स्पष्टीकरणे,मूल्यमापन व अध्यापन कृतीकडे लक्ष द्या. | ८+५ | ४६.४२ |
| २ | पाठयांशाचे सखोल वाचन करा,संदर्भ पाहा | ४+३ | २५. |
| ३ | नमुना टाचणे पाहा | १+२ | १०.७१ |
| ४) | पाठयमुद्दे,त्यांचे स्पष्टीकरण शुद्ध लिहा, टाचण ही आवश्यक बाब आहे,अचूकपणा हवा. | ५+० | १७.८९ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरून इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अर्धे टाचण पूर्ण करण्याविषयी-पाठ टाचणात प्रत्येक पायरी-पूर्वज्ञान,

उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शिक्षक कृती, मूल्यमापन व अध्यापन कृतीकडे लक्ष द्या, याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४६.६६ टक्के प्रमाण असून ते समान व जास्त आहे.

२) अवांतर माहिती मिळवा - संदर्भ व पाठ्यांशाचे सखोल वाचन करा, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) नमुना टाचणे पहा - याचे प्राध्यापक सारणीमध्ये १३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये १०.७१ टक्के प्रमाण.

४) याशिवाय - मुद्देसूदपणा, व्यवस्थितपणा, अचूकपणा हवा - ६.६६ टक्के (प्राध्यापक सारणी ).

५) पाठ्य मुद्दे व स्पष्टीकरण शुध्द लिहा, टाचण ही आवश्यक बाब आहे, अचूकपणा हवा याचे १७.८५ टक्के प्रमाण विद्यार्थी सारणीत आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष --

इतिहास अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक त्रोटक टाचण पूर्ण करण्यापूर्वी विद्यार्थी-शिक्षकाला पाठाच्या पायऱ्या, पूर्वज्ञान, उद्दिष्टये व स्पष्टीकरणे, शिक्षक कृती, मूल्यमापन अध्ययन, अध्यापन कृती या बाबींकडे लक्ष देण्यास सांगतात. काही प्राध्यापक अवांतर माहिती, संदर्भ पाठ्यांशाचे सखोल वाचन व नमुना टाचणे याकडे लक्ष वेधतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४ हा पाठ मार्गदर्शनाची सुरुवात ज्या घटकापासून प्राध्यापक करतात त्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र. ४.१३४

पाठ मार्गदर्शनाचा सुरुवातीचा घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञान | ८ | ५३.३३ |
| २ | प्रस्तावना | २ | १३.३३ |
| ३ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ३ | २०.०० |
| ४ | पाठ्यमुद्दे | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | पूर्वज्ञान | ८+५ | ४६.४२ |
| २ | अध्यापन पद्धती | १+३ | १४.२८ |
| ३ | प्रस्तावना | ५+१ | २१.४२ |
| ४ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ३+० | १०.७१ |
| ५ | प्राथमिक घटक - उपघटक, इयत्ता, शाळा, इयत्ता. | १+१ | ७.१४ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास गेल्यावर मार्गदर्शनाची सुरुवात पूर्वज्ञानापासून करतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ५३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४६.४२ टक्के आहे, ते जास्त आहे.

२) प्रस्तावनेपासून सुरवात करतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये १३.३३ टक्के व २१.४२ टक्के आहे.

३) उद्दिष्टे व स्पष्टीकरणापासून सुरवात करणारे २०.०० टक्के ते १०.७१ टक्के.

४) पाठ्य मुद्दयापासून सुरवात करणारे १३.३३ टक्के .

विद्यार्थी सारणीमध्ये --

५) अध्यापन-पद्धती पासून सुरवात करणारे १४.२८ टक्के .

६) प्राथमिक माहिती - घटक, उपघटक, इयत्ता, शाळा यापासून सुरवात करणारे - ७.१४ टक्के.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शनासाठी विद्यार्थी-शिक्षक प्राध्यापकाकडे गेल्यास ते प्रथम पूर्वज्ञानापासून सुरवात करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५ हा मार्गदर्शनात चर्चा केल्या जाणाऱ्या मुद्दयांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३५
मार्गदर्शनाच्या घटकांचा क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञान | १४६ | १. | पूर्वज्ञान | २५५ |
| २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२७ | २. | प्रस्तावना | २२३ |
| ३ | आशय । पाठ्य मुद्दे | १२४ | ३. | आशय - पाठ्य मुद्दे | २१६ |
| ४ | प्रस्तावना । प्रेरणा | १०७ | ४. | उद्दिष्टे स्पष्टीकरणे | २१० |
| ५ | शिक्षक-विद्यार्थी-कृती | ९३ | ५. | शिक्षक-विद्यार्थीकृती | १७६ |
| ६ | फलक लेखन | ५३ | ६. | शैक्षणिक साधने | १२२ |
| ७ | संकलन | ५२ | ७. | संकलन | १०२ |
| ८ | शैक्षणिक साधने | ४९ | ८. | फलक लेखन | ९३ |
| ९ | उपयोजन | ४० | ९. | उपयोजन | ७८ |
| १० | मूल्यमापन साधने | ३६ | १०. | मूल्यमापन साधने | ७० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये क्र.१,३,५,७,९ व १० क्रम समान आहेत. इतर क्रम भिन्न आहेत म्हणून - मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने घटकांची चर्चा करतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक यांनी दिलेला क्रम एकत्रित केला असता खालील क्रम । निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १) पूर्वज्ञान,२) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे,२.२) आशय । पाठ्य मुद्दे,२.३) प्रेरणा, ५) शिक्षक-विद्यार्थी कृती, ६,१) फलक लेखन, ६.२) संकलन, ६.३)शैक्षणिक साधने, ९) उपयोजन,१०) मूल्यमापन याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्दयासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३६

पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञानावर प्रस्तावना कशी केली | १ | ०६.६६ |
| २ | पूर्वज्ञानाची नवीन ज्ञानाशी सांगड घालता येते ? | ७ | ४६.६६ |
| ३ | विद्यार्थ्यांने पूर्वी अभ्यासलेला पाठ, इयत्ता पूर्वानुभव सांगा | ५ | ३३.३३ |
| ४ | पाठयांश कोणता व विद्यार्थ्यांला विषयज्ञान कितपत आहे. | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | विद्यार्थी-शिक्षकाला पाठयांशानुसार काय पूर्वज्ञान आहे ? | ०+३ | १०.७१ |
| २ | पूर्वज्ञानानुसार घटक पाहतात व आशयाशी सांगड आहे का ? | ८+६ | ५०.०० |
| ३ | पूर्वीची इयत्ता पाठ, दैनंदिन अनुभव या पाठापूर्वी कोणता अभ्यास | ९+० | ३२.१४ |
| ४ | वयोगट | १+१ | ७.१४ |
| | एकूण | १८+१० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन पूर्वज्ञानावर चर्चा करताना इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थ्यांचे गृहीत धरलेले पूर्वज्ञान नवीन ज्ञानाशी । आशयाशी सुसंगत आहे का ? याविषयी चर्चा करतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४६.६६ टक्के व विद्यार्थी सारणीत ५०.०० टक्के प्रमाण आहे ते जास्त आहे.

२) विद्यार्थ्यांने पूर्वी अभ्यासलेला पाठ, इयत्ता, पूर्वानुभव यासंबंधी चर्चा करतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ३२.१४ प्रमाण आहे ते जवळ जवळ सारखे आहे.

३) पाठयांश कोणता ? विद्यार्थी-शिक्षकाला विषयज्ञान कितपत आहे ? पाठयांशानुसार पूर्वज्ञान कितपत आहे हे पाहतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये १३.३३ टक्के व १०.७१ टक्के प्रमाण आहे.

४) प्राध्यापक सारणीमध्ये पूर्वज्ञानावर प्रस्तावना कशी केली ते पाहतात. याचे ६.६६ टक्के प्रमाण आहे.

५) विद्यार्थी सारणीमध्ये वयोगट पाहतात याचे प्रमाण ७.१४ टक्के आहे. ती अल्प आहेत.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पूर्वज्ञान व नवीन ज्ञान । आशय यांची सुसंगती, अभ्यासलेला पाठ, इयत्ता, पूर्वानुभव या बाबी पाहतात, काही प्राध्यापक पाठयांश व त्यावरील विद्यार्थी-शिक्षकांचे ज्ञान व पूर्वज्ञान यासंबंधी चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.७ हा पूर्वज्ञाना संदर्भातील प्रश्न विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३७

पूर्वज्ञाना संदर्भातील प्रश्न विचारणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कोणत्या इयत्तेत ? कोणत्या कालखंडातील हा इतिहास आहे ? पाठ्यांशापूर्वीचे ज्ञान कोणते. | ५ | ३३.३३ |
| २ | हेच पूर्वज्ञान कां गृहीत धरले ? प्रेरणा निर्माण होईल कां ? घटकाशी जोडता येईल कां ? | ९ | ६०.०० |
| ३ | प्रश्न विचारत नाही. | १ | ६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्यांना काय माहिती आहे ? | १+५ | २१.४२ |
| २ | हेच पूर्वज्ञान कां गृहीत धरले ? प्रेरणा निर्माण होईल कां ? | ११+३ | ५०.०० |
| ३ | प्रश्न विचारत नाहीत | ४+२ | २१.४२ |
| ४ | घटकानुसार कशी प्रेरणा देणार ? शैक्षणिक साधन वापरणार ? | २+० | ७.१४ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानाच्या संदर्भात हेच पूर्वज्ञान का गृहीत धरले ? प्रेरणा निर्माण होईल का ? घटकाशी संबंध जोडता येईल का ? याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६०.०० टक्के व ५०.०० टक्के आहे ते जास्त आहे.

२) कोणत्या इयत्तेत ? कोणत्या कालखंडातील हा इतिहास आहे ? पाठ्यांशा पूर्वीचे विद्यार्थ्यांचे ज्ञान कोणते ? याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण ३३.३३ टक्के आहे.

३) विद्यार्थ्यांचा दैनंदिन अनुभव कोणता ? त्याला काय माहिती आहे ? याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २१.४२ टक्के प्रमाण आहे.

४) प्रश्न विचारत नाहीत - दोन्ही सारणीमध्ये अनुक्रमे ६.६६ टक्के व २१.४२ टक्के प्रमाण आहे.

५) घटकानुसार प्रेरणा कशी देणार ? शैक्षणिक साधन वापरणार ? याचे विद्यार्थी सारणीमध्ये ७.१४ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करताना विशिष्ट पूर्वज्ञान, त्यावरील प्रेरणा, घटकाशी संबंध या बाबी पाहतात. काही प्राध्यापक मागील इयत्ता, कालखंडाप्रमाणे इतिहास व नवीन पाठ्यांशा पूर्वीचे ज्ञान, दैनंदिन अनुभव या बाबींवर प्रश्न विचारतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३८

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पाठ्यांश परत वाचायला सांगतो. | ४ | २६.६६ |
| २ | पूरक प्रश्न विचारतो. | ४ | २६.६६ |
| ३ | स्वत:च संदर्भ सांगतो. | ५ | ३३.३३ |
| ४ | मागील इयत्तांची, संदर्भपुस्तके यांचे वाचन देतो व ते शोधायला सांगतो. | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | ज्ञानाचा अपमान करतात | १ + ० | ०३.५७ |
| २ | अनेक प्रश्न विचारुन चर्चा करतात | ६ + ३ | ३२.१४ |
| ३ | स्वत: संदर्भ सांगतात | ६ + ४ | ३५.७१ |
| ४ | मागील पाठ्यपुस्तके वाचायला, संदर्भ शोधायला सांगतात. | ५ + ३ | २८.५७ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन प्रद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर। संदर्भ देता येत नसेल तर स्वत: संदर्भ सांगतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

२) अनेक प्रश्न विचारुन चर्चा मार्गदर्शन करतात त्याचे प्रमाण अनुक्रमे ३२.१४ व २६.६६ टक्के आहे.

३) मागील पाठयपुस्तके,संदर्भ,पुस्तके यांचे वाचन देतात व संदर्भ शोधायला सांगतात यांचे प्रमाण १३.३३ टक्के व २८.५७ टक्के आहे.

४) विद्यार्थी-शिक्षकांच्या ज्ञानाचा अपमान करतात - विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये याचे प्रमाण ३.५७ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष:

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थी-शिक्षकाला मागील संदर्भ येत नसल्यास स्वत: तो संदर्भ सांगतात,काही प्राध्यापक पूरक प्रश्नाव्दारे चर्चा करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.९ हा विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१३९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१३९

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत: प्रयत्न करा असे सांगतो, घटक वाचा इ. | ३ | २०.०० |
| २ | स्वत: प्रेरणा सांगतो. | ४ | २६.६६ |
| ३ | प्रश्न विचारुन विचाराला चालना देतो. | ५ | ३३.३३ |
| ४ | प्रेरणेचे प्रकार सांगतो, मार्गदर्शनातून सुचवितो, अनुरूप ती निवडा असे ... | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | घटकाचे अधिक वाचन, विचार करायला सांगतात, प्रयत्न करा, सुचेल इ... | ३ + ० | १०.७१ |
| २ | स्वत: प्रेरणा सांगतात | ४ + २ | २१.४२ |
| ३ | प्राध्यापक प्रश्न विचारुन चालना देतात विचार उघुक्त करतात. | १ + १ | ०७.१४ |
| ४ | प्रेरणा सुचवितात, योग्य ती तयार करा, मार्गदर्शनातून स्वरुपाबद्दल सुचवितात. | १० + ७ | ६०.७१ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास प्रश्न विचारुन विचाराला चालना देतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ७.१४ टक्के प्रमाण आहे.

२) प्रेरणेचे प्रकार सांगतात, मार्गदर्शनातून योग्य ती प्रेरणा निवडण्यास सुचवितात त्याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व ६०.०० टक्के आहे.

३) स्वत: प्रेरणा सांगतात याचे प्रमाण अनुक्रमे २६.६६ टक्के व २१.४२ टक्के आहे.

४) घटकाचे वाचन करा, प्रयत्न करा याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १०.७१ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न विचारुन विचाराला चालना देतात. काही प्राध्यापक प्रेरणेचे प्रकार सांगतात व मार्गदर्शनातून योग्य प्रेरणा निवडण्यास सुचवितात.

प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१० हा प्रेरणे संबंधातील मार्गदर्शनात ज्या बाबींचा विचार करतात त्यांच्या क्रमा संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१४० मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१४०

प्रेरणेमधील घटक क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला घटक क्रम. | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्रस्तावना देणाऱ्या कृती | ४४ | १ | घटकाला अनुरुपता | ७४ |
| २ | घटकाला अनुरुपता | ४३ | २ | हेतुकथनाशी प्रेरणेची सांगड. | ६६ |
| ३ | हेतुकथनाशी प्रेरणेची सांगड | ३४ | ३ | प्रेरणा देणाऱ्या कृती | ४४ |
| ४ | प्रेरणेचा परिणाम | २९ | ४. | प्रेरणेचा परिणाम | ४० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीत क्र.४ शिवाय सर्व क्रम भिन्न आहेत. म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देत असता प्रेरणेमधील घटकांना जो क्रम देतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम एकत्रित करता पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देतात १) घटकाला अनुरुपता २) प्रेरणा देणाऱ्या कृती ३) हेतु - - कथनाशी प्रेरणेची घातलेली सांगड ४) प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.११ हा पाठ टाचणामध्ये मुद्दे,उपमुद्दे नसण्यासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४१

पाठ टाचणामध्ये मुद्दे ,उपमुद्दे नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चर्चा करुन मुद्दे कसे काढावेत याचे मार्गदर्शन करुन लिहायला सांगतो. | २ | १३.३३ |
| २ | मुद्दे,उपमुद्दे लिहा अशी सूचना देतो. | १० | ६६.६६ |
| ३ | स्वत: मुद्दे तयार करतो,सांगतो. | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मुद्दे,उपमुद्दे कसे काढावेत चर्चेतून निदर्शनास आणतात. | ३ + ३ | २१.४२ |
| २ | मुद्दे,उपमुद्दे लिहायला सांगतात व त्यानंतर तपासतात. | ११ + ७ | ६४.२८ |
| ३ | मुद्दे,उपमुद्दे टाचणात लिहितात. | ४ + ० | १४.२८ |
| | एकूण | १८ +१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणामध्ये विद्यार्थी-शिक्षकाने मुद्दे,उपमुद्दे लिहिलेले नसल्यास मुद्दे, उपमुद्दे लिहा अशी सूचना देतात ते लिहिल्यानंतर टाचण तपासतात,याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६६.६६ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६४.२८ टक्के प्रमाण आहे. ते सर्वाधिक आहे.

२)     चर्चा करुन ते कसे काढावेत याचे मार्गदर्शन करतात व मुद्दे निदर्शनास आणतात याचे वरील दोन्ही सारणीमध्ये अनुक्रमे १३.३३ टक्के व २१.४२ टक्के असे प्रमाण आहे.

३) प्राध्यापक स्वत: मुद्दे टाचणात लिहितात याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व १४.२८ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणामध्ये मुद्दे,उपमुद्दे नसल्यास मुद्दे,उपमुद्दे लिहा अशी सूचना देतात,नंतरच मार्गदर्शन देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१३ हा प्रत्येक मुद्दयावरील चर्चेसंबंधीचा आहे,त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४२
प्रत्येक मुद्दयावरील चर्चा

| | होय | नाही | आवश्यक वाटते तेव्हा करतो. | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १४ | - | १ | १५ |
| | ९३.० | | ६.६६ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १५ | ३ | - | १८ |
| | ६ | ४ | - | १० |
| एकूण | ७५.०० | २५.०० | - | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास विषयाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ९३.०० टक्के व ७५.०० टक्के प्रमाण आहे व ते जास्त आहे.

२) प्रत्येक मुद्दयावर चर्चा करत नाहीत. याचे विद्यार्थी सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) आवश्यकता वाटते तेव्हा, कधी कधी प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन प्रद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१४ हा पाठयमुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अंवातर वाचन देण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४३

मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे.

| | होय | नाही | काही वेळा गरज वाटली तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | ३ | - | १५ |
| | ८०.०० | २०.०० | | १००. |

निरीक्षण व अर्थनिवर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात याचे सारणीमध्ये ८०.०० प्रमाण आहे.

२) चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देत नाही. याचे २०.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठय मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४४

पाठय मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारणे

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | २ | १५ |
| | ८६.६६ | १३.३३ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | |
| | १२ | ६ | १८ |
| | ८ | २ | १० |
| एकूण | ७१.४२ | २८.५७ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक पाठय-मुद्दयावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ८६.६६ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७१.४२ टक्के प्रमाण आहे.

२) पाठय मुद्दयावर चर्चा करताना स्पष्टीकरण विचारत नाहीत याचे अनुक्रमे १३.३३ टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठय मुद्दयावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण विचारतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१५ हा मुद्दयांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४५

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण न आल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुद्दयांचे स्पष्टीकरण स्वत: करतो. | ६ | ४०. |
| २ | स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन उदाहरणे, दाखले देऊन चर्चा करतो. | ६ | ४०. |
| ३ | घटकाचे वाचन,अभ्यास करुन पुन्हा या असे सांगतो. | ६ | २०. |
| | एकूण | १८ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मुद्दयाचे स्पष्टीकरण स्वत: करतात. | ३ + ७ | ३५.७१ |
| २ | प्रश्न विचारुन,चर्चा करुन,स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात. | ० + ३ | १०.७१ |
| ३ | ... कसे करावे ते समजावून सांगतात. | ९ + ० | ३२.१४ |
| ४ | खूप रागावतात,टाचण कसे लिहिले, कुणाचे पाहिले ? अभ्यास,वाचन करा,स्पष्टीकरण क्षमता वाढवा असे ... | ६ + ० | २१.४२ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला विचारलेल्या मुद्दयाचे स्पष्टीकरण देता येत नसल्यास स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन ,उदाहरणे दाखले देऊन चर्चा करतो याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के व ३२.१४ टक्के प्रमाण आहे ते जास्त आहे.

२) मुद्दयाचे स्पष्टीकरण प्राध्यापक स्वत: करतात.याचे प्रमाण अनुक्रमे ४०.०० टक्के व ३५.७१ टक्के आहे. जवळ जवळ सारखे आहे.

३) घटकाचे वाचन,अभ्यास करुन या,टाचण कसे लिहिले,कुणाचे पाहिले ? स्पष्टीकरण क्षमता वाढवा असे सांगतात.याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व २१.४२ टक्के आहे व ते जवळ जवळ सारखे आहे.

४) प्रश्न विचारुन,चर्चा करुन स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात.याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १०.७१ टक्के प्रमाण आहे व ते अल्प आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयाचे स्पष्टीकरण आले नाही तर स्पष्टीकरण कसे करावे याचे उदाहरणे,दाखले देऊन मार्गदर्शन करतात,काही प्राध्यापक त्या मुद्दयाचे स्पष्टीकरण स्वत: करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१७ हा मार्गदर्शनाच्यावेळी टाचण व्यवस्थित असूनही विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण न येण्यासंबंधीचा आहे व त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्र.१६ हा प्राध्यापक स्पष्टीकरण न आल्यास सविस्तर आशय सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती अनुक्रमे सारणी क्र.४.१४६ व ४.१४७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४६

टाचण व्यवस्थित पण मार्गदर्शनाच्या वेळी स्पष्टीकरण न आल्यास --

प्राध्यापकांचा प्रतिसाद

| स्पष्टीकरणाविषयी चर्चा करतो, संदर्भ देतो, मार्गदर्शन करतो. | प्रश्न विचारुन विचार प्रवृत्त करतो व त्याची अभिव्यक्ती वाढवितो. | टाचण त्यानेच काढले की नाही याची खात्री करतो व अभ्यास करुन या असे.. | एकूण |
|---|---|---|---|
| २ | ७ | ६ | १५ |
| १३.३३ | ४६.६६ | ४०.०० | १००. |

सारणी क्र.४.१४७

पाठ्यांश सविस्तर सांगणे

| विद्यार्थी-शिक्षक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| | १४ | ४ | १८ |
| | ७ | ३ | १० |
| एकूण | ७५.०० | २५.०० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

प्राध्यापक सारणीमध्ये --

१) पाठ टाचण व्यवस्थित लिहिले पण मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता आले नाही तर इतिहास अध्यापन पद्धतीचे

पाठमार्गदर्शक प्राध्यापक प्रश्न विचारुन विद्यार्थ्यांला विचार प्रवृत्त करतात व त्याची अभिव्यक्ती, क्षमता वाढविण्याचा प्रयत्न करतात. याचे प्रमाण ४६.६६ टक्के आहे.

२) पाठ टाचण त्याने काढले का ? याची खात्री करुन घेतात व अभ्यास करुन या असे सांगतात. याचे प्रमाण ४०.०० टक्के आहे.

३) स्पष्टीकरणाविषयी चर्चा करतात, संदर्भ देतात, मार्गदर्शन करतात. याचे प्रमाण १३.३३ टक्के आहे.

विद्यार्थी-शिक्षक सारणी--

१) विद्यार्थी-शिक्षकांना स्पष्टीकरण देता येत नाही अशा वेळी मार्गदर्शक प्राध्यापक आशय सविस्तर सांगतात. याचे प्रमाण ७५.०० टक्के आहे.

२) सांगत नाहीत. याचे प्रमाण २५.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी पाठ-टाचण व्यवस्थित लिहितो पण मार्गदर्शनाच्यावेळी त्याला उत्तर आले नाही तर प्रश्न विचारुन विचारप्रवृत्त करतात व त्याची अभिव्यक्ती वाढविण्याचा प्रयत्न करतात. काही प्राध्यापक टाचण त्यानेच काढले का ? याची खात्री करुन अभ्यास करायला सांगतात.

तसेच बहुसंख्य प्राध्यापक पाठाचा आशय सविस्तर सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्या विषयीचा आहे, त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.१.१४८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४८

घटकाशी निगडित आशय सांगणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ६ | ६ | ३ | १५ |
| | ४०.०० | ४०.०० | २०.०० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगतात व सांगत नाहीत याचे प्रमाण समान आहे (४०.०० टक्के )

२) कधी कधी सांगतात याचे प्रमाण २०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत, मात्र काही प्राध्यापक सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न १७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबीसंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१४९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१४९

उद्दिष्टे व स्पष्टीकरणातील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | उद्दिष्टे घटकानुरुप आहेतका ? | ६ | ४०.०० |
| २) | नेमकी व योग्य लिहिली आहेत का ? एकावेळी एक, वर्तन बदलाच्या स्वरुपात एकवचनी. | ४ | २६.६६ |
| ३) | उद्दिष्टांचा क्रम पाहतो ज्ञान,आकलन | ३ | २०.०० |
| ४) | ३५ मिनिटात साध्य होतील का ? | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १) | पाठयघटकाला अनुरुप आहेत कां ? | ७ +३ | ३५.०० |
| २) | नेमकी व योग्य लिहिली आहेत कां ? एकावेळी एक, एकवचनी वर्तमानकाळी विधान इ. | ४ + ६ | ३५.०० |
| ३) | उद्दिष्टांचा क्रम,ज्ञान आकलन,उपयोजन यानुसार आहेत का ? | ५ + १ | २१.४२ |
| ४) | मूल्यमापनाव्दारे साध्य होणारी आहेत कां ? | २ + ० | ०७.१४ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शक-प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणाचे मार्गदर्शन देताना उद्दिष्टे घटकाला अनुरुप आहेत का ? हे पाहतात,याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी- सारणीमध्ये ३५.०० टक्के आहे.

२) नेमकी व योग्य लिहिली आहेत का ? उदा. एकावेळी एक, एकवचनी, वर्तमानकाळी व वर्तन बदलाच्या स्वरुपात याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २६.६६ टक्के व विद्यार्थी शिक्षक सारणीतील प्रमाण ३५.०० टक्के आहे.

३) उद्दिष्टांचा क्रम - ज्ञान, आकलन, उपयोजन यानुसार आहे का ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २१.४२ टक्के आहे.

४) मूल्यमापनाव्दारे ती ३५ मिनिटात साध्य होणारी आहेत का ? याचे दोन्ही सारणीतील प्रमाण १३.३३ टक्के व ७.१४ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यांचे मार्गदर्शन देताना घटकानुरुपता, ती नेमकी व योग्य एकावेळी एक, एकवचनी, वर्तमानकाळी, वर्तन बदलाच्या स्वरुपात लिहिणे या बाबी पहातात, काही प्राध्यापक उद्दिष्टांचा क्रम पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा पाठय घटकाला अधिक उद्दिष्टांच्या गरजेसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५०

पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्वत: अधिक उद्दिष्टे सांगतो, टाचणात नोंदवितो. | ४ | २६.६६ |
| २ | तशी सूचना देऊन टाचणात लिहायला सांगतो | ४ | २६.६६ |
| ३ | मार्गदर्शनातून चर्चेतून अधिक उद्दिष्टे घेता येतील हे निदर्शनास आणतो. | ७ | ४६.६६ |
| | एकूण | १५ | १००.०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | स्वत: उद्दिष्टे काढून देतात | ४+४ | २८.५७ |
| २ | अधिक उद्दिष्टे आवश्यक आहेत, ती लिहा,अशी सूचना देतात. | ९+३ | ४२.८५ |
| ३ | मार्गदर्शनातून ती निदर्शनास आणतात. | ५+३ | २८.५७ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टयांची गरज असल्यास मार्गदर्शनातून, चर्चेतून अधिक उद्दिष्टे घेता येतील हे निदर्शनास आणून देतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ४६.६६ टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे. ( सरासरी ३५.५ टक्के )

२) अधिक उद्दिष्टे आवश्यक आहेत अशी सूचना देऊन ती लिहायला सांगतात. याचे प्रमाण अनुक्रमे २६.६६ टक्के व ४२.८५ टक्के आहे. (सरासरी ३४.७ टक्के )

३) अधिक उद्दिष्टे प्राध्यापक स्वत: सांगतात । टाचणात ती नोंदवितात. याचे प्रमाण २६.६६ टक्के व २८.५७ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टयांची गरज असल्यास ती मार्गदर्शनातून, चर्चेतून निदर्शनास आणून देतात, काही प्राध्यापक मात्र अधिक उद्दिष्टे लिहा अशी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्यामागील कारण सांगण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५१

उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदला मागील कारण सांगणे --

| | होय | नाही | क्वचित | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १५ | - | - | १५ |
| | १००.०० | | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १५ | ३ | - | १८ |
| | ८ | - | २ | १० |
| एकूण | ८२.०० | १०.७१ | ७.१४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांनी लिहिलेली उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्यामागील कारणे सांगतात याचे प्रमाण १००.०० टक्के आहे. विद्यार्थी सारणीमध्ये ते ८२.०० टक्के आहे.

२) उद्दिष्टे बदलण्यामागील कारणे सांगत नाहीत.याचे विद्यार्थी सारणीमध्ये १०.७१ टक्के आहे.

३) क्वचित सांगतात याचे प्रमाण ७.१४ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणामध्ये बदल करत असता त्या मागील कारण सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२२,२३,व २४ हे व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२०,२१,२२ हे शैक्षणिक साधने घटकानुसार समाविष्ट न केल्यास ती दाखविणे,त्यांच्या कल्पना सुचविणे व उपलब्धतेविषयी माहिती देण्या-संबंधीचे आहेत. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५२
शैक्षणिक साधनासंबंधी

| प्रश्न | | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| दाखविण्यास सांगतात | प्राध्यापक | १५ | - | १५ |
| | | १००.०० | | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | २५ | ३ | २८ |
| | | ८९.२८ | १०.७१ | १०० |
| शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात. | प्राध्यापक | १५ | - | १५ |
| | | १००.०० | | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | २६ | २ | २८ |
| | | ९२.८५ | ७.१४ | १०० |
| त्याच्या उपलब्धतेची माहिती देतात. | प्राध्यापक | १५ | - | १५ |
| | | १००.०० | | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षक | २३ | ५ | २८ |
| | | ८२.१४ | १७.८५ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक घटकाला अनुसरुन विद्यार्थी-शिक्षकाने घटकाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर -

अ) ती दालविण्यास सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १००.०० टक्के व ८९.०० टक्के प्रमाण आहे.

ब) दालविण्यास सांगत नाहीत याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीत १०.७१ टक्के प्रमाण आहे.

क) शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १००.०० टक्के व ९२.८५ टक्के प्रमाण आहे.

ड) शैक्षणिक साधनाच्या कल्पना सुचवित नाहीत याचे विद्यार्थी सारणीमध्ये ७.१४ टक्के प्रमाण आहे.

इ) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये १००.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ८२.१४ टक्के प्रमाण आहे.

ई) उपलब्धतेविषयी माहिती देत नाहीत याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १७.८५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन खालील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शकप्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर शैक्षणिक साधने दाखविण्यास सांगतात, त्यांच्या कल्पना सुचवितात तसेच त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२५ हा व विद्यार्थी शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न २३ हा शिक्षक कृतीवरील चर्चेतील बाबींसंबंधी आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५३

शिक्षक कृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
| --- | --- | --- | --- |
| १ | पाठाच्या पाय-यानुसार शिक्षक कृती स्वाध्यायासेर आहेत का ? | ४ | २६.६६ |
| २ | पाठ्यांशाला अनुसरुन प्रश्न, शैक्षणिक साधने कुठे कुठे आहेत ? | २ | १३.३३ |
| ३ | पाठ्यमुद्दयाचा क्रम, त्यानुसार कथन, स्पष्टीकरण, तक्ते, प्रश्न या कृती आहेत का ? | ६ | ४०.०० |
| ४ | आशयानुसार अध्ययन अनुभव कोणते, ते योग्य की अयोग्य ? | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | प्रश्न, प्रबलन, विद्यार्थी-सहभाग, शैक्षणिक साधने कुठे वापरली आहेत ? | ३ +५ | २८.५७ |
| २ | प्रेरणा ते स्वाध्यायासेर सर्व कृती | १० + ० | ३५.७१ |
| ३ | पाठ्यमुद्दे व त्यानुसार कृती | ३ + ५ | २८.५७ |
| ४ | मूल्यमापनातील प्रश्न शिक्षक कृतीतील आहेत का ? | २+ ० | ०७.१४ |
| | एकूण | १८ +१० | १००. |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन</u> :

१) वरील सारणीमध्ये शिक्षक कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य मुद्दयांच्या क्रम, त्यानुसार कथन, स्पष्टीकरण व तक्ते, प्रश्न यानुसार

कृती लिहिली आहे का हे पाहतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

२) सर्व पाय-यांनुसार शिक्षक कृती - प्रेरणा ते स्वाध्यायासेर आहेत का ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये व विद्यार्थी सारणीमध्ये २६.६६ टक्के व ३५.०० टक्के असे प्रमाण आहे.

३) पाठ्यांशाला अनुसरुन प्रश्न, शैक्षणिक साधने कुठे कुठे आहेत ? याचे प्राध्यापक, विद्यार्थी सारणीमध्ये १३.३३ टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

४) मूल्यमापनातील प्रश्न शिक्षक-कृतीमध्ये आहेत का ? याचे प्रमाण विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७.१४ टक्के आहे.

५) आशयानुसार अध्ययन अनुभव कोणते ? ते योग्य की अयोग्य ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये २०.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक, शिक्षक कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृती, पैकी पाठ्यांश, क्रमानुसार कथन स्पष्टीकरण, तक्ते, प्रश्न व कृती या बाबी पाहतात.

काही प्राध्यापक प्रेरणा ते स्वाध्यायासेर कृती, आशयानुसार अध्ययन अनुभवाची योग्यायोग्यता पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२५ हा शिक्षक कृती वरील चर्चेत अवांतर माहिती देण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५४

शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १४ | १ | - | १५ |
| | ९३.३३ | ६.६६ | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १४ | ४ | - | १८ |
| | ५ | ३ | २ | १० |
| एकूण | ६७.८५ | २५.०० | ७.१४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ९३.३३ टक्के व ६७.८५ टक्के प्रमाण आहे.

२) अवांतर माहिती देत नाहीत याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६.६६ टक्के व २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) कधी कधी याचे विद्यार्थी सारणीमध्ये ७.१४ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठाचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला चर्चेच्या दरम्यान अवांतर माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२४ हा प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृती-मधील ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-

शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१५५ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१५५

शिक्षक कृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला घटक क्रम | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथन । स्पष्टीकरण | ६८ | १ | कथन । स्पष्टीकरण | ९४ |
| २ | विद्यार्थी सहभाग | ५१ | २ | विद्यार्थी सहभाग | ६६ |
| ३ | प्रश्न | ४६ | ३ | प्रश्न | ६५ |
| ४ | शैक्षणिक साधन | ४० | ४ | शैक्षणिक साधन | ५७ |
| ५ | अन्य : प्राध्यापकांनी सुचविलेले घटक -- १) फलक लेखन, २) चेतक बदल, ३) वेळेचे नियोजन . | | | | |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये दोन्ही घटक क्रम समान आहेत,यावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक-कृतीमध्ये महत्त्वानुसार १) कथन । स्पष्टीकरण,२) विद्यार्थी सहभाग,३) प्रश्न , ४) शैक्षणिक साधन याप्रमाणे क्रम देतात. तसेच प्राध्यापकांनी फलक लेखन,चेतक बदल,वेळेचे नियोजन हे अन्य घटक सुचविलेले आहेत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५६

विद्यार्थी-कृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | विद्यार्थीकृतीचा बोध शिक्षककृतीनुसार आहे ? उदा.कथन-श्रवण,दिग्दर्शन-निरीक्षण. | ९ | ६० |
| २) | विद्यार्थी सहभाग-शाब्दिक,कृतीयुक्त असणे | ५ | ३३.३३ |
| ३ | विद्यार्थी सवयी विषयी एकावेळी एकाचे-उत्तर घेणे इ. | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | शिक्षककृतीनुसार विद्यार्थी-कृती | १०+२ | ४२.८५ |
| २ | अवधान क्लृप्त्या,प्रश्न-विचार प्रवर्तक कृती,फलक निरीक्षण. | ३ + ० | १०.७१ |
| ३ | विद्यार्थी सहभाग कुठे कुठे ,कसा घ्यावा कृतियुक्त सहभाग | ५ + ५ | ३५.७१ |
| ४ | एकावेळी एकाचे उत्तर स्वीकारणे | ० + ३ | १०.७१ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी कृतींचा बोध शिक्षक कृतीनुसार झाला आहे का ? उदा.कथन - निरीक्षण करतात याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ६०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४२.८५ टक्के आहे.

२) विद्यार्थी सहभाग-कृतीयुक्त,शाब्दिक,सहभाग कुठे,कुठे कसा घ्यावा याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ३३.३३ टक्के व ३५.७१ टक्के असे समान आहे.

३) प्रश्न विचार प्रवर्तक,अवधान कलृप्त्या,कृती निरीक्षण कशी यावर चर्चा याचे प्रमाण विद्यार्थी सारणीत १०.७५ टक्के आहे.

४) विद्यार्थी सक्रीयतेसाठी-एकावेळी एकाचे उत्तर घेणे इ.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६.६६ टक्के व १०.७१ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-कृतीसंबंधी चर्चा करताना विद्यार्थी कृतीचा बोध शिक्षक-कृतीनुसार (उदा.कथन,श्रवण,दिग्दर्शन निरीक्षण या बाबींवर ) चर्चा करतात. काही प्राध्यापक विद्यार्थी सहभाग (शाब्दिक ,कृतीयुक्त ) व त्याची ठिकाणे या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२७ हा मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा केल्या जाणाऱ्या गोष्टींसंबंधीचा आहे.त्यासाठी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५७

मूल्यमापन प्रश्नांवरील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रश्नप्रकार-लघु,दीर्घ,सोपे,कठीण असे स्वरुप पाहतो. | ६ | ४० |
| २ | प्रश्न उद्दिष्टाधिष्ठित आहेत का ? | ४ | २६.६६ |
| ३ | पाठ्यघटकाचा अधिक समावेश असणारे, गामामूत,एका प्रश्नात एक संकल्पना. | ४ | २६.६६ |
| ४ | प्रश्नाची माघा,रचना वयोगटानुसार | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | प्रश्न प्रकार,सर्व प्रकारचे,प्रश्न क्रमानुसार वस्तुनिष्ठ,लघु,दीर्घ,उच्च इ. | ५+७ | ४२.८५ |
| २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणानुसार प्रश्न आहेत कां ? ज्ञान,आकलन. | ५+२ | २५.०० |
| ३ | पाठ्यांश आत्मसात केला आहे कां ? पडताळणी घेणारे प्रश्न. | ६+१ | २५.०० |
| ४ | संकलनात पाठ्यांशाचा गोषवारा व उपयोजनात वस्तुनिष्ठ इ. | २+० | ०७.१४ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन --

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात मार्गदर्शन करताना प्रश्न प्रकार लघुत्तरी,दीर्घोत्तरी,

कठिण, सोपे, वस्तुनिष्ठ, उच्च स्तरीय, निम्न स्तरीय, यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के ४२.८५ टक्के प्रमाण आहे ते जवळ जवळ सारखे आहे.

२) प्रश्न उद्दिष्टयानुसार आहेत का ? ज्ञान, आकलन इ. याचे प्राध्यापक विद्यार्थी सारणीमध्ये २६.६६ टक्के व २५.०० टक्के प्रमाण आहे व ते समान आहे.

३) पाठयांशाचा अधिक समावेश असणारे नामामृत व एका प्रश्नात एक संकल्पना असणारे पाठयांशाची पडताळणी घेणारे प्रश्न आहेत का ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २६.६६ टक्के व २५.०० टक्के प्रमाण असून ते जवळ जवळ सारखे आहे.

४) प्रश्नाची भाषा व रचना, वयोगटानुसार यावर चर्चा ६.६६ टक्के व संकलनात पाठयांशाचा गोषवारा येणारे, उपयोजनात वस्तुनिष्ठ प्रश्न याचे प्रमाण ७.१४ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा करताना प्रश्न प्रकार - लघुत्तरी, दीर्घोत्तरी, कठिण, सोपे, वस्तुनिष्ठ, उच्च निम्नस्तर या बाबींवर चर्चा करतात.

काही प्राध्यापक उद्दिष्टानुसार प्रश्न, प्रश्नामध्ये अधिक पाठयांश, एकावेळी एक संकल्पना या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगण्याविषयीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यानी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५८

मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप सांगणे

| | होय | नाही | सुरुवातीला | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | - | ३ | १५ |
| | ८०.०० | | २०.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १६ | २ | - | १८ |
| | ७ | ३ | - | १० |
| एकूण | ८२.१४ | १७.८५ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन -

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ८०.०० टक्के व ८२.१४ टक्के प्रमाण आहे.

२) मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप सांगत नाहीत. याचे प्रमाण विद्यार्थी-सारणीमध्ये १७.८५ टक्के आहे.

३) फक्त सुरुवातीलाच सांगतो याचे प्राध्यापक सारणीतील प्रमाण २०.०० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगतात, काही प्राध्यापक सुरवातीलाच सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२९ हा स्वाध्यायावर चर्चा केल्या जाणा-या बाबींसंबंधीचा

आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१५९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१५९

स्वाध्यायावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पाठ्यघटकाचे दृढीकरण करणार,घटकानुरुप | ६ | ४० |
| २ | क्रियाची गोडी वाढविणारा मनोरंजक | ३ | २० |
| ३ | वयोगटाला पेलणारा,उद्दिष्ट साध्य करणारा | ३ | २० |
| ४ | इतर माहिती देणारा,सर्जनशील | ३ | २० |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | घटकावर,त्याचे दृढीकरण करणारा | ८+८ | ५७.१४ |
| २ | स्वाध्याय प्रकार,तो कसा हवा | ६+० | २१.४२ |
| ३ | वयोगटानुसार,आवड निर्माण करणारा | ३+१ | १४.२८ |
| ४ | चर्चा फारशी नाही | १+१ | ०७.१४ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना स्वाध्याय पाठ्यघटकानुसार,त्याचे दृढीकरण करणारा आहे का ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये ४०.०० टक्के व ५७.१४ टक्के प्रमाण आहे.

२) स्वाध्यायांचे प्रकार - तो कसा असावा याचे प्रमाण विद्यार्थी सारणीमध्ये २१.४२ टक्के प्रमाण आहे.

३) वयोगटानुसार,उद्दिष्ट साध्य करणारा,आवड निर्माण करणारा याचे प्राध्यापक विद्यार्थी सारणीमध्ये २०.०० टक्के व १४.२८ टक्के आहे.

४) इतर माहिती देणारा,सर्जनशील - २०.०० टक्के.

५) विषयाची गोडी वाढविणारा मनोरंजक - २०.०० टक्के.

६) फारशी चर्चा करत नाहीत - विद्यार्थी सारणी - ७.१४ टक्के.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना बहुसंख्य प्राध्यापक पाठ्यघटकानुसार,त्याचे दृढीकरण,स्वाध्याय प्रकार याविषयी चर्चा करतात,तर काही प्राध्यापक वयोगट,उद्दिष्टे,अभिरुची,सर्जनशीलता,मनोरंजकता या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यानी दिलेली माहिती सारणी क्र.-४.१६० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६०
विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | सुधारणेसंबंधी मार्गदर्शन,तो कसा असावा यावर चर्चा करतो,सुचवितो. | ७ | ४६.६६ |
| २ | स्वाध्याय नेमक्या शब्दात लिहा, सुधारणा करा असे.. | २ | १३,३३ |
| ३ | स्वाध्यायाचे अनेक प्रकार पुढे ठेवतो. | ४ | २६.६६ |
| ४ | स्वत: स्वाध्याय सांगतो,लिहितो | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | तो कसा हवा याचे मार्गदर्शन करतात. | ८+४ | ४२.८५ |
| २ | बदल । सुधारणा करा असे सांगतात. | ५+६ | ३९.२८ |
| ३ | स्वत: बदल सांगतात. | ५+० | १७.८५ |
| | एकूण | १८+१० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करण्यासाठी-सुधारणेसंबंधी मार्गदर्शन देतात, तो कसा असावा याची चर्चा करुन सुचवितात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ४६.६६ टक्के व ४२.८५ टक्के प्रमाण आहे ते जास्त व जवळ जवळ सारखे आहे.

२) स्वाध्यायात सुधारणा करा, नेमक्या शब्दात लिहा अशा सूचना देतात याचे प्राध्यापक विद्यार्थी सारणीमध्ये १३.३३ टक्के व ३९.२८ टक्के प्रमाण आहे.

३) स्वत: स्वाध्याय सांगतात । लिहितात, याचे प्रमाण १३.३३ टक्के व १७.८५ टक्के आहे.

४) प्राध्यापक सारणीमध्ये - स्वाध्यायांचे प्रकार पुढे ठेवतो - २६.६६ टक्के.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा करण्यासाठी मार्गदर्शन देऊन अपेक्षित सुधारणा सुचवितात, तर काही प्राध्यापक स्वाध्याय बदलण्याविषयी केवळ सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६१

फलक लेखनावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | फलकलेखन कौशल्याच्या सर्व पैलूवर | १ | ०६.६६ |
| २ | फलकावर महत्त्वाचे मुद्दे,उपमुद्दे यावेत, संकलनात सारांश यावा,विधान नको . | ६ | ४०.०० |
| ३ | फलक लेखन अचूक,सुवाच्य,प्रमाणबद्धअक्षर आकृती व नावे,मुद्देसूदपणा इ. | ५ | ३३.३३ |
| ४ | फलकाच्या दोन भागात लेखन-रंगीत खडूंचा वापर इ. | ३ | २०.०० |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | फलकावर वर्ग,विषय,घटक,मुद्दे इ. | ३ + ० | १०.७१ |
| २ | लेखन । अक्षर शुद्ध,स्पष्ट,चांगले आकारबद्ध,सरळरेषेत व मुद्देसूद. | ३ + ६ | ३२.१४ |
| ३ | मुद्देसूद,महत्त्वाचे सन,व्यक्ती,संकलनातील उत्तरे यावीत इ. | ८ + २ | ३५.७१ |
| ४ | दोन भागात लेखन करावे,रंगीत खडूंचा यथोचित वापर | ४ + २ | २१.४२ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीवरुन इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखन मार्गदर्शनात फलकावर महत्त्वाचे मुद्दे,उपमुद्दे,संकलनात

पाठयांश, सारांश यावा, सन, व्यक्ती इ.चे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४०.०० टक्के व ३५.७१ टक्के आहे.

२) लेखन अचूक, सुवाच्च, प्रमाणबद्ध, मुद्देसूद, चांगले, सरळ रेषेत, आकृती व नावे याचे प्रमाण अनुक्रमे ३३.३३ टक्के व ३२.१४ टक्के आहे.

३) फलक लेखन फलकाच्या दोन भागात करावे, रंगीत खडूचा यथोचित वापर याचे प्रमाण अनुक्रमे २०.०० टक्के व २१.४२ टक्के आहे.

४) फलक लेखन कौशल्याच्या सर्व पैलूंवर चर्चा - प्रमाण प्राध्यापक सारणीत ६.६६ टक्के.

५) फलकावर वर्ग, विषय, घटक व मुद्दे याचे विद्यार्थी सारणीत १०.७१ टक्के प्रमाण.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

**निष्कर्ष :**

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावरील मार्गदर्शनात फलकावरील महत्त्वाचे मुद्दे, उपमुद्दे, संकलनाचा पाठयांश, सन, व्यक्ती इ.बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक लेखन अचूक, सुवाच्यता, मुद्देसूदपणा, सरळ रेषेत, आकृती व नावे तसेच फलकाच्या दोन भागात लेखन, रंगीत खडूचा यथोचित वापर या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा विद्यार्थी-शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनातील सुधारणे संबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६२

फलक लेखन सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | त्रुटीनुसार सुव्यवस्थेत बदल उदा.मुद्देसूद, अचूकपणा इ. | ६ | ४०.०० |
| २ | आशयानुसार लेखनात विविधता असावी | २ | १३.३३ |
| ३ | सरळरेषेत,वळणदार,उपमुद्दे यावेत विधान स्वरूप नको. | ६ | ४०.०० |
| ४ | फलक लेखन दोन भागात करा ते मुद्देसूद हवे,अनावश्यक काम टाळा. | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | फलकावर मुद्दे,उपमुद्दे,सन,घटना लिहा. | ४+४ | २८.५७ |
| २ | लेखन सरळ रेषेत यावे. | ४+० | १४.२८ |
| ३ | मुद्दे थोडक्यात,शुद्ध लिहा. | ७+४ | ३९.२८ |
| ४ | फलक लेखन नियोजनबद्ध करा. दोन भागात मुद्दे,संकलन उत्तरे. | ३+२ | १७.८५ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापन पद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनात त्रुटीनुसार सुव्यवस्थेत बदल करतात.उदा.फलकावर मुद्दे,उपमुद्दे यावेत,सन,घटना,लिहा. बिनचूक लिहा यावे

प्राध्यापक सारणीमध्ये ४०.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २८.५७ टक्के प्रमाण आहे.

२) लेखन सरळ रेषेत,वळणदार,मुद्दे,उपमुद्दे लिहा ,विधान स्वरुप नको. याचे प्राध्यापक सारणीत ४०.०० टक्के व विद्यार्थी सारणीत ३९.२८ टक्के प्रमाण आहे.

३) लेखन सरळ रेषेत यावे - विद्यार्थी-शिक्षक सारणी १४.२८ टक्के.

४) फलक लेखन नियोजनबद्ध करा - दोन भागात - मुद्दे व संकलन उत्तरे लिहा. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीत अनुक्रमे ६.६६ टक्के व १७.८५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनातील त्रुटीनुसार - मुद्दे, उपमुद्दे,सन,घटना यांची बिनचूकता,लेखन सरळ रेषेत,वळणदार,मुद्देसूद वा विधानस्वरुप नको, दोन भागात करणे यासंबंधी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ हा पाठ उद्या असता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास येतो या संबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६३
पाठ उद्या असता मार्गदर्शन घेणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | टाचण स्वीकारत नाही. मार्गदर्शन देत नाही पाठ रद्द करतो. | ९ | ६०.०० |
| २ | रागावतो, दोन दिवस आधी मार्गदर्शन घेण्याची सूचना देतो पण मार्गदर्शन करतो. | ५ | ३३.३३ |
| ३ | विद्यार्थी-कुवत व पाठयांश पाहून निर्णय घेतो. | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | दोन दिवस आधी मार्गदर्शन घ्यावे, पुन्हा असे झाले तर गय केली जाणार नाही, पाठमार्गदर्शन वेळेवर घ्या वेळेत का आला नाहीत ? इ. नंतर मार्गदर्शन करतात. | १३ + ४ | ६०.७१ |
| २ | पाठ रद्द करतात. मार्गदर्शन देत नाहीत. | ५ + ६ | ३९.२८ |
| | एकूण | १८ + १० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आल्यास टाचण स्वीकारत नाहीत, पाठाची तयारी होणार नाही म्हणून पाठ रद्द करतात, मार्गदर्शन देत नाहीत याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६०.०० टक्के व ३९.२८ टक्के प्रमाण आहे.

२) दोन दिवस आधी मार्गदर्शन घ्यावे पुन्हा असे झाले तर गय केली जाणार नाही अशा सूचना देऊन मार्गदर्शन करतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ३३.३३ टक्के व ६०.७१ टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थी कुवत व पाठ्यांश पाहून निर्णय घेतो याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास आला तर मार्गदर्शन न करता पाठ रद्द करतात, तयारी होणार नाही असे सांगतात, काही प्राध्यापक मात्र रागावतात दोन दिवस आधी मार्गदर्शन घेण्याची व पुन्हा असे न करण्याची सूचना देऊन मार्गदर्शन करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्द्यांना अधिक वेळ देतात त्यांच्या क्रमाविषयीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१६४ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१६४

मार्गदर्शनात प्राध्यापक अधिक वेळ देतात त्यानुसार घटक क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम. | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | शिक्षक-विद्यार्थी-कृती | १५६ | १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | २५१ |
| २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १३६ | २ | पाठ्य मुद्दे | २३७ |
| ३ | पाठ्य मुद्दे | ११५ | ३ | शिक्षक विद्यार्थी-कृती | २०६ |
| ४ | मूल्यमापन साधने | ८६ | ४ | पूर्वज्ञान | १८४ |
| ५ | पूर्वज्ञान | ८४ | ५ | प्रेरणा | १४३ |
| ६ | प्रेरणा | ८१ | ६ | संकलन | ११२ |
| ७ | शैक्षणिक साधने | ६४ | ७ | फलक लेखन | १०८ |
| ८ | संकलन | ५० | ८ | शैक्षणिक साधने | ९९ |
| ९ | फलक लेखन | ५० | ९ | उपयोजन | ८५ |
| १० | उपयोजन | ३६ | १० | मूल्यमापन साधने | १४ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमधील क्रमभिन्नतेमुळे मार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाला अधिक वेळ देतात त्या घटकांना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष । क्रम काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक ज्या घटकाला अधिक वेळ देतात,त्यानुसार घटकाला पुढील क्रम देतात १) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे,२)शिक्षक-कृती व विद्यार्थी-कृती,३) पाठ्य मुद्दे,४)पूर्वज्ञान,५)प्रेरणा,६.५)मूल्यमापन साधने, ६.५)संकलन,८) शैक्षणिक साधने,९)फलक लेखन,१०)उपयोजन.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६५

मार्गदर्शनामध्ये दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कोणताही नाही | ९ | ६०.०० |
| २ | मूल्यमापन साधने | २ | १३.३३ |
| ३ | संकलन | २ | १३.३३ |
| ४ | उपयोजन | २ | १३.३३ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | कोणताही नाही | ३+ ० | १०.७१ |
| २ | पाठ्यमुद्दे | ९ + ४ | ४६.४२ |
| ३ | संकलन,उपयोजन,प्रेरणा | १ + ३ | १४.२८ |
| ४ | फलक लेखन,पूर्वज्ञान,संकलन,उपयोजन | ३+ १ | १४.२८ |
| ५ | मूल्यमापन साधने, उपयोजन | २+२ | १४.२८ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) या सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शन घटकातील ज्या घटकावर फारसे लक्ष दिले नाही तरी चालेल असा कोणताही घटक नाही याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे ६०.०० टक्के व ४६.४२ टक्के आहे.

२) प्राध्यापक सारणीमध्ये दुर्लक्ष केले तरी चालेल असे घटक -

अ) मूल्यमापन साधने - प्रमाण १३.३५ टक्के .

ब) संकलन प्रमाण - प्रमाण १३.३३ टक्के.

क) उपयोजन - प्रमाण १३.३३ टक्के.

३) विद्यार्थी सारणीमध्ये - प्राध्यापक ज्या घटकाकडे दुर्लक्ष करतात ते घटक --

अ) पाठय मुद्दे - १०.७१ टक्के.

ब) संकलन,उपयोजन,प्रेरणा याचे प्रमाण - १४.२८ टक्के.

क) फलक लेखन,पूर्वज्ञान,संकलन,उपयोजन- १४.२८ टक्के

ड) मूल्यमापन साधने,उपयोजन - १४.२८ टक्के.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

बहुसंख्य इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनातील सर्व घटकांकडे लक्ष देतात. मात्र काही प्राध्यापक मूल्यमापन साधने,संकलन,उपयोजन,फलक लेखन, पाठय-मुद्दे,पूर्वज्ञान या घटकाकडे फारसे लक्ष देत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३८ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा प्राध्यापक जो सहभाग घेतात त्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६६

मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी शिक्षकाचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ११ | ३ | १ | - | १५ |
| | ७३.३३ | २०.० | ६.६६ | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | | |
| | ४ | ११ | ३ | - | १८ |
| | ५ | ५ | - | - | १० |
| एकूण | ३२.१४ | ५७.१४ | १०.७१ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७३.३३ टक्के व ३२.१४ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात याचे दोन्ही सारणीमध्ये २०.०० व ५७.१४ टक्के सहभाग घेतात.

३) अल्प सहभाग घेतात अनुक्रमे ६.६६ टक्के व १०.७१ टक्के प्रमाण.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकाचा खूपच सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांच्या सहभागासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६७

स्का मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | स्कूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | - | ७ | ८ | - | १५ |
| | | ४६.६६ | ५३.३३ | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | | |
| | - | ५ | ७ | ६ | १८ |
| | - | ४ | ३ | ३ | १० |
| स्कूण | | ३२.१४ | ३५.७१ | ३२.१४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी प्रत्यक्ष मार्गदर्शन घेणाऱ्या विद्यार्थी-शिक्षकाशिवाय अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा अल्प सहभाग घेतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५३.३३ टक्के व ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात. याचे अनुक्रमे ४६.६६ टक्के व ३२.१४ टक्के प्रमाण आहे.

३) अजिबात सहभाग घेत नाही. याचे प्रमाण विद्यार्थी सारणीमध्ये ३२.१४ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्का मार्गदर्शनाच्यावेळी अन्य विद्यार्थी-शिक्षकाचा अल्प सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा की पूर्णबदल

करतात.यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६८

पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास

| | सुधारणा | पूर्ण बदल | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ८ | ३ | ४ | १५ |
| | ५३.३३ | २०.०० | २६.६६ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १० | ८ | - | १८ |
| | ४ | ६ | - | १० |
| एकूण | ५०.०० | ५०.०० | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात सुधारणा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५३.३३ टक्के व ५०.०० टक्के प्रमाण आहे.

२) पाठ टाचण पूर्णपणे बदलतात. याचे २०.०० टक्के ते ५०.०० टक्के प्रमाण आहे.

३) कधी कधी पूर्ण बदलतो. याचे प्राध्यापक सारणीत २६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात विद्यार्थी-शिक्षकाचे पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात सुधारणा करतात,काही प्राध्यापक पूर्ण बदल करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० हा मार्गदर्शनाच्या काळात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली असतासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१६९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१६९

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिली असता -

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अधिक अभ्यास,वाचन,करा,चुकीची उत्तरे देऊ नये तयारी करुन या. | ५ | ३३.३३ |
| २ | न रागावता थोडीशी हिंट देतो,पूरक प्रश्न विचारुन दुरुस्ती करुन घेतो. | ९ | ६०.०० |
| ३ | योग्य उत्तर स्वत: देतो | १ | ०६.६६ |
| | एकूण | १५ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | कडक प्रतिक्रिया - आपल्याजवळ नाही तर विद्यार्थ्यांला काय देणार ? रागावतात,टर उडवितात. | ७+३ | ३५.७१ |
| २ | अधिक अभ्यास करा,माहिती मिळवा, पाठाची पूर्ण तयारी करा व मग या. | ५+३ | २८.५७ |
| ३ | मार्गदर्शन करुन समजावून देतात | ४+४ | २८.५७ |
| ४ | योग्य उत्तर स्वत: सांगतात. | २+० | ०७.१४ |
| | एकूण | १८+१० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाशी चर्चा करताना त्यांनी चुकीची उत्तरे दिल्यास न रागावता थोडीशी हिंट देतो, पूरक प्रश्न विचारुन दुरुस्ती करुन घेतो याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६०.०० टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

२) अधिक अभ्यास वाचन करा, चुकीची उत्तरे देऊ नयेत, तयारी करुन मग या याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे ३३.३३ टक्के व २८.५७ टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थ्यांस योग्य उत्तरे स्वत: प्राध्यापक सांगतात - प्रमाण अनुक्रमे ६.६६ टक्के व ७.१४ टक्के.

४) विद्यार्थी-सारणीमध्ये - कडक प्रतिक्रिया असते - आपल्याजवळ नाही तर विद्यार्थ्यांला काय देणार ? रागावतात, टर उडवितात याचे ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास कडक शब्दात अधिक वाचन, अभ्यास करण्यास सांगून मग मार्गदर्शनास येण्याची सूचना देतात. खूप रागावतात ,टर उडवितात, आपल्याजवळ नाही तर विद्यार्थ्यांला काय देणार ? अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात, काही प्राध्यापक मात्र पूरक प्रश्नांद्वारे दुरुस्ती करुन घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा अधिक वाचन, अभ्यास व शैक्षणिक साधन यांच्या आग्रहासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७०

अधिक वाचन, अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह

| | होय | नाही | घटकाला आवश्यक वाटेल तर | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १४ | १ | - | १५ |
| | ९३.३३ | ६.६६ | | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १८ | - | - | १८ |
| | १० | - | - | १० |
| एकूण | १००.०० | | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये इतिहास अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ९३.३३ टक्के व १००.०० टक्के प्रमाण आहे.

२) आग्रह धरत नाहीत याचे प्राध्यापक सारणीत ६.६६ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ हा मराठी अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शन व अन्य विषयांच्या अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन यातील फरकासंबंधीचा आहे.त्याविषयी

प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यानी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७१

मराठीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यातील फरक --

| | आहे | नाही | उत्तरे नाहीत | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ५ | - | १० | १५ |
| | ३३.३३ | | ६६.६६ | १०० |
| विद्यार्थी शिक्षक | | | | |
| | ८ | - | १० | १८ |
| | २ | - | ८ | १० |
| एकूण | ३५.७१ | | ६४.२८ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये फरक आहे याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३३.३३ टक्के व ३५.७१ टक्के प्रमाण आहे.

२) उत्तरे नसणारे - दोन्हीत ६६.६६ टक्के व ६४.२८ टक्के.

३) फरक नाही याचे दोन्हीमध्ये शून्य प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयाचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणते फरक आहेत ते पुढील पान क्र. ५८० ते ५८३ वर सर्व विषयांच्या प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या एकत्रित मतांचा गोषवारा दिलेला आहे.

(५) विषय - भूगोल

भूगोल अध्यापनपध्दतीच्या पाठ मार्गदर्शक प्राध्यापकांकडून व विद्यार्थी-शिक्षकांकडून प्रश्नावलीला आलेला प्रतिसाद खालील प्रमाणे :--

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१ हा पाठ टाचण न काढता मार्गदर्शन घेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७२

पाठटाचणाशिवाय मार्गदर्शन

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | मार्गदर्शन देत नाही, प्रथम कच्चे टाचण काढा | ८ | ५०.०० |
| २) | पाठ टाचणासंबंधीच्या अडचणी विचारतो, त्यांचे निरसन करतो, तोंडी चर्चा । मार्गदर्शन करतो. | ६ | ३७.५ |
| ३) | पाठ्यांश वाचून संदर्भीय वाचन करायला सांगतो. | २ | १२.५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | मार्गदर्शन देत नाहीत, घटकाचा सखोल अभ्यास करा व टाचण काढण्याचा प्रयत्न करा म्हणतात. | ६+३ | ५६.२५ |
| २) | पाठटाचण कसे काढावे त्यादृष्टीने चर्चा करतात. प्रश्नातून पाठ्यांशातील व पाठटाचणातील मुद्दे लक्षात आणून देतात. | ६+१ | ४३.७५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ नियोजन मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण न काढताच संबंधित पाठावर मार्गदर्शन घेण्यास आला तर प्राध्यापक मार्गदर्शन देत नाहीत - प्रथम टाचण काढा, पाठाचे सखोल वाचन करा, पाठ टाचण काढण्याचा प्रयत्न करा असे सांगतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५०.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ५६.२५ टक्के प्रमाण आहे.

२) पाठ टाचण तयार करण्यासंबंधीच्या अडचणी विचारतात त्यांचे निरसन करतात, तोंडी चर्चा । मार्गदर्शन देतात, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३७.५ टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

३) पाठ्यांश पाहून संदर्भीय वाचन करायला सांगतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण तयार न करताच मार्गदर्शनासाठी भूगोल पाठ मार्गदर्शकाकडे गेल्यास ते मार्गदर्शन देत नाहीत, प्रथम कच्चे टाचण काढा, पाठाचे सखोल वाचन करायला सांगतात, मात्र काही प्राध्यापक अडचणी विचारुन तोंडी चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२ हा पाठ टाचण त्रोटक काढून नेण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७३

त्रोटक पाठटाचणासंबंधी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अर्धे टाचण काढण्याचे कारण विचारतो, ते पूर्ण करायला सांगतो, सूचना देतो, तपासत नाही. | १० | ६२.५० |
| २ | समस्या विचारतो; त्या मुद्द्यांचे मार्गदर्शन करुन टाचण पूर्ण करण्यास मदत करतो. | ६ | ३७.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | पाठटाचण पूर्ण, सविस्तर काढून आणायला सांगतात, त्याशिवाय तपासत नाहीत. | ७ +४ | ६८.७५ |
| २ | अपूर्ण, त्रोटक भागावर मार्गदर्शन करतात, स्वत: भर घालून मग टाचण पूर्ण करायला.. | ५ +० | ३१.२५ |
| | एकूण | १२+४ | १००.०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनाचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचण फारसे सविस्तर न काढता त्रोटक, मुद्देवजा काढलेले असेल तर विद्यार्थी-शिक्षकाला ते टाचण पूर्ण, सविस्तर काढून आणायला सांगतात, त्याशिवाय तपासत नाहीत, याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६२.५० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६८.७५ प्रमाण आहे ते दोन्ही सारणीमध्ये जास्त आहे.

२) समस्या विचारतात, त्या मुद्दयांचे मार्गदर्शन करतात व भर घालून टाचण पूर्ण करायला मदत करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ३७.५० टक्के व ३१.२५ टक्के असे आहे, ते जवळ जवळ सारखे आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

पाठ टाचण सविस्तर न काढता त्रोटक टाचण घेऊन विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनासाठी गेल्यास बहुसंख्य भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक टाचण पूर्ण, सविस्तर काढून आणल्याशिवाय मार्गदर्शन देत नाहीत. मात्र कांही प्राध्यापक समस्या विचारतात, त्या मुद्दयावर चर्चा करतात, त्यात भर घालून टाचण पूर्ण करायला सांगतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३ हा पाठ टाचण पूर्ण करण्यापूर्वी मिळणाऱ्या सुचनेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७४

पाठटाचण पूर्ण करण्यापूर्वी सूचना

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १) | प्रत्येक पायरीचे महत्त्व लक्षात घ्या व टाचण काळजीपूर्वक, पाठयांश वाचून लिहा. | ४ | २५.०० |
| २) | पाठटाचण मुद्देसूद, त्याचप्रमाणे पूर्वज्ञान, उद्दिष्टे-स्पष्टीकरण व शिक्षक-विद्यार्थी कृती, मूल्यमापन याचा विचार करा. | ९ | ५६.२५ |
| ३) | अवांतर वाचनातून उदाहरणे, साधने यांचा उल्लेख करा | ३ | १८.७५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १) | पाठाच्या पायऱ्या ध्यानात घेऊन, पाठयघटकाचे सखोल वाचन करुन टाचण काढा. | २+१ | १८.७५ |
| २) | दिलेल्या पाठयांशानुसार मुद्दे, उद्दिष्टे, मूल्यमापन व अध्ययन-अध्यापन कृती पाहा. | ९+३ | ७५.०० |
| ३) | पाठटाचणाचा नमुना पाहा. | १+० | ०६.२५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक टाचण पूर्ण करण्यापूर्वी पाठ टाचण मुद्देसूद त्याप्रमाणे पूर्वज्ञान-उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, शिक्षक-विद्यार्थी कृती व मूल्यमापन यांचा विचार करा व टाचण पूर्ण करा अशी सूचना देतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ५६.२५ टक्के व विद्यार्थी-सारणीमध्ये ७५.०० टक्के प्रमाण आहे.

२) पाठाच्या पायऱ्या लक्षात घ्या, पाठ्यांशाचे सखोल वाचन करुन टाचण तयार करा, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ते २५.०० टक्के व १८.७५ टक्के असे प्रमाण आहे.

३) अवांतर वाचन, उदाहरणे, साधने यांचा उल्लेख करा, याचे प्राध्यापक सारणीमध्ये १८.७५ टक्के प्रमाण आहे.

४) पाठ टाचणाचा नमुना पहा, याचे विद्यार्थी सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ टाचण त्रोटक असल्यास मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला पाठ टाचणात मुद्देसूदपणा, उद्दिष्टे, पूर्वज्ञान, शिक्षक-विद्यार्थी कृती व मूल्यमापन या बाबींकडे लक्ष देण्यास सांगतात. काही प्राध्यापक पाठाच्या पायऱ्या, पाठ्यांशाचे सखोल वाचन करुन टाचण पूर्ण करण्याकडे लक्ष वेधतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४ हा पाठ मार्गदर्शनाची सुरवात ज्या घटकापासून प्राध्यापक करतात त्या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७५

पाठमार्गदर्शनाची सुरवात

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रेरणा | १ | ०६.२५ |
| २ | पूर्वज्ञान | ८ | ५०.०० |
| ३ | उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे | १ | ०६.२५ |
| ४ | आशय । पाठ्यमुद्दे | २ | १२.५१ |
| ५ | प्राथमिक माहिती | ४ | २५.०० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | प्रेरणा | १ + १ | १२.५० |
| २ | पूर्वज्ञान | ७ + ० | ४३.७५ |
| ३ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | ३ + ० | १८.७५ |
| ४ | आशय । पाठ्यमुद्दे | ०+२ | १२.५० |
| ५ | प्राथमिक माहितीपासून | १ + १ | १२.५० |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ मार्गदर्शनास विद्यार्थी-शिक्षक आल्यास मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ४३.७५ टक्के असे प्रमाण आहे.

२) आशय । पाठ्य मुद्दयापासून मार्गदर्शनास सुरवात करतात. याचे दोन्ही सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

३) प्राथमिक माहिती पासून सुरवात करतात. याचे अनुक्रमे २५.०० टक्के व १२.५ टक्के प्रमाण आहे.

४) उद्दिष्टे व स्पष्टीकरणापासून सुरवात करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ६.२५ टक्के व १८.७५ टक्के आहे.

५) प्रेरणेपासून सुरवात करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ६.२५ टक्के व १२.५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाची सुरवात पूर्वज्ञानापासून करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.५ हा मार्गदर्शनात चर्चा केल्या जाणाऱ्या मुद्दयांच्या क्रमासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७६
मार्गदर्शनाच्या घटकांचा क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम. | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञान | १४१ | १ | पूर्वज्ञान | १५२ |
| २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १३२ | २ | प्रेरणा | १३० |
| ३ | आशय । पाठय मुद्दे | १३१ | ३ | पाठय मुद्दे | १२७ |
| ४ | प्रस्तावना | १२१ | ४ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १२२ |
| ५ | शिक्षक-विद्यार्थी कृती | ९९ | ५ | शिक्षक-विद्यार्थी कृती | १०० |
| ६ | शैक्षणिक साधने | ७८ | ६ | संकलन | ६० |
| ७ | संकलन | ५४ | ७ | शैक्षणिक साधने | ५२ |
| ८ | मूल्यमापन साधने | ४५ | ८ | फलक लेखन | ५० |
| ९ | फलक लेखन | ४५ | ९ | उपयोजन | ४५ |
| १० | उपयोजन | ४२ | १० | मूल्यमापन साधने | ४४ |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

वरील सारणीमध्ये क्र.१,३,५ समान आहेत. इतर क्रमामध्ये भिन्नता आहे, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये ज्या क्रमाने घटकांची चर्चा करतात त्या घटकांचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील क्रम । निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये १)पूर्वज्ञान, २) आशय । पाठ्य-मुद्दे,३.५) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, ३.५ )प्रस्तावना । प्रेरणा, ५) शिक्षक-विद्यार्थी कृती, ६.५) शैक्षणिक साधने, ६.५) संकलन, ८) फलक लेखन, ९) मूल्यमापन साधने, १०) उपयोजन याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.६ हा पूर्वज्ञान चर्चेमधील मुद्दयांसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७७
पूर्वज्ञानाच्या चर्चेमधील मुद्दे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूर्वज्ञानाची नवीन घटकांशी सुसंगती पाहतो | २ | १२.२५ |
| २ | अपेक्षित पूर्वज्ञानावर प्रेरणा नेमकी दिली का ? | २ | १२.२५ |
| ३ | पाठ्यांश कोणता ? त्यानुसार पूर्वी अभ्यासातील पाठ,मागील इयत्ता,पूर्वानुभव | १२ | ७५.०० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षक प्रतिसाद | | |
| १ | पूर्वज्ञान घटकाशी सुसंगत आहे का ? | ६+० | ३७.५० |
| २ | घटक व प्रेरणा यांच्याशी सांगड असते का ? | १+२ | १८.७५ |
| ३ | यापूर्वी कोणता पाठ्यांश ? त्याचप्रमाणे पूर्वीच्या इयत्तेतील संदर्भ - - | ४+१ | ३१.२५ |
| ४ | विद्यार्थी-शिक्षकांचे पूर्वज्ञानासंबंधीचे ज्ञान आजमावतो. | १+१ | १२.५० |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पाठ्यांश कोणता आहे त्यानुसार पूर्वी अभ्यासलेला पाठ, मागील इयत्ता, पूर्वानुभव यावर चर्चा करतात.याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७५.०० टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३१.२५ टक्के प्रमाण आहे.

२) पूर्वज्ञानाची नवीन ज्ञानाची, घटकाशी सुसंगतता किंवा सांगड पाहतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १२.५ टक्के व ३७.५ टक्के प्रमाण आहे.

३) अपेक्षित पूर्वज्ञानावरील घटक व प्रेरणा नेमकी दिली आहे का ? याचे प्रमाण अनुक्रमे १२.५ टक्के व १८.७५ टक्के आहे.

४) विद्यार्थी-शिक्षकाचे पूर्वज्ञानासंबंधीचे ज्ञान आजमावतात याचे विद्यार्थी सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानावर चर्चा करताना पाठ्यांश व त्यानुसार पूर्वी अभ्यासलेला पाठ, मागील इयत्ता पूर्वानुभव या बाबींवर लक्ष देतात. काही प्राध्यापक नवीन ज्ञान, घटकाशी पूर्वज्ञानाची सांगड पाहतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.७ हा पूर्वज्ञाना संदर्भातील प्रश्न विचारण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७८

पूर्वज्ञानासंदर्भात प्रश्न विचारणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | हे पूर्वज्ञान तुम्ही कोणत्या दृष्टीने,का गृहीत धरले ,प्रेरणा निर्माण होईल. | ५ | ३१.२५ |
| २ | मागील इयत्तेचा संदर्भ,आशयाचा पूर्वानुभव कोणता ? यातील संदर्भ प्रसंग सांगा. | ८ | ५०.०० |
| ३ | पूर्वज्ञान नवीन घटकाशी जोडता येईल का ? | ३ | १८.७५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | या गृहीत धरलेल्या ज्ञानावर यापूर्वी कोणता पाठ झाला आहे ? कोणत्या इयत्तेत ? इ. | ९+० | ५६.२५ |
| २ | हेच पूर्वज्ञान तुम्ही कां गृहीत धरले ? पाठ्यांश अभ्यासला आहे ? | २+२ | २५.०० |
| ३ | विद्यार्थ्यांला काय पूर्वज्ञान आहे ? सांगा पाहू, तो काय शिकला आहे ? | ०+२ | १२.५० |
| ४ | प्रश्न विचारत नाहीत | १+० | ०६.२५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञाना संदर्भात विद्यार्थी-शिक्षकाला विचारत असलेल्या प्रश्नांमध्ये - या गृहीत धरलेल्या पूर्वज्ञानावर यापूर्वी कोणता पाठ विद्यार्थ्यांना झाला आहे ? कोणत्या

इयत्तेत ? आशयाचा पूर्वानुभव कोणता ? इ. चे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५६.२५ टक्के व ५०.०० टक्के प्रमाण आहे व ते जास्त आहे.

२) हेच पूर्वज्ञान तुम्ही का गृहीत धरले ? पाठयांश अभ्यासला आहे का ? प्रेरणा निर्माण होईल का ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी- शिक्षक सारणीमध्ये ३१.२५ टक्के व २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) विद्यार्थ्यांला काय पूर्वज्ञान आहे ? सांगा पाहू तो काय शिकला आहे ? याचे विद्यार्थी- शिक्षक सारणीमध्ये १२.५० टक्के प्रमाण आहे.

४) पूर्वज्ञान नवीन घटकाशी जोडता येईल का ? याचे १८.७५ टक्के प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये आहे.

५) प्रश्न विचारत नाहीत. याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी चर्चा करताना गृहीत पूर्वज्ञानासंदर्भातील पूर्वीचा पाठ, इयत्ता, आशयाचा पूर्वानुभव यावर प्रश्न विचारतात; काही प्राध्यापक विशिष्ट पूर्वज्ञान गृहीत धरणे त्यातून प्रेरणा निर्माण करणे यासंबंधी चर्चा करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.८ हा विशिष्ट पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१७९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१७९

पूर्वज्ञानासंबंधी मागील संदर्भ न येणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | संदर्भ शोधा अभ्यास करा असे सांगतो. | ५ | ३१.२५ |
| २ | स्वत: संदर्भ देतो, स्पष्टीकरण करतो. | २ | १२.५० |
| ३ | मार्गदर्शन करतो, पूरक प्रश्न विचारतो व औपचारिक माहिती देतो. | ९ | ५६.२५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | ह्या घटकाचा मागील इयत्तांचा संदर्भ शोधायला, वाचायला सांगतात. | ६+१ | ४३.७५ |
| २ | स्वत: संदर्भ सांगतात. | १+१ | १२.५० |
| ३ | पूर्वज्ञानासंबंधी मार्गदर्शन करतात, प्रश्न-चर्चा करतात. | ५+२ | ४३.७५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानाबद्दल मागील संदर्भ विद्यार्थी-शिक्षकाला देता येत नसल्यास - तो संदर्भ शोधायला, अभ्यासायला सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३१.२५ टक्के व ४३.७५ टक्के आहे.

२) तो संदर्भ प्राध्यापक स्वत: सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये समान प्रमाण आहे (१२.५ टक्के )

३) पूर्वज्ञानासंबंधी मार्गदर्शन, पूरक प्रश्न विचारून चर्चा, औपचारिक माहिती देतात. याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ५६.२५ टक्के व ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पूर्वज्ञानासंबंधी विद्यार्थी-शिक्षकाला मागील संदर्भ देता येत नसल्यास पूरक प्रश्न विचारणे, औपचारिक माहिती देऊन मार्गदर्शन चर्चा करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.९ हा विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८०

विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पूरक प्रश्न, उदाहरणे देऊन कल्पू देतो, सूचवितो, विचारप्रवृत्त करतो. | १३ | ८१.२५ |
| २ | उदाहरणे देऊन निवड करावयास सांगतो. | १ | ०६.२५ |
| ३ | स्वत: प्रेरणा सांगतो. | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मार्गदर्शनातून, प्रश्न चर्चेतून सुचवितात. | ६+२ | ५०.०० |
| २ | प्राध्यापक स्वत: प्रेरणा सांगतात. | २+० | १२.५० |
| ३ | त्या घटकाचा अधिक अभ्यास करा, प्रयत्न करा, सुचेल, असे सांगतात. | १+१ | १२.५० |
| ४ | अन्य दैनंदिन घटना, चित्रे, नकाशा यांचा वापर, नमुने प्रकार सांगतात. | ३+१ | २५.०० |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला योग्य प्रेरणा सुचत नसल्यास - पूरक प्रश्न, मार्गदर्शन यातून उदाहरणे देतात. वस्तु देऊन विचारप्रवृत्त करतात, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ८१.२५ टक्के व ५०.०० टक्के प्रमाण आहे ते सर्वात जास्त आहे.

२) प्राध्यापक त्या घटकाचा अभ्यास करा, प्रयत्न करा असे सांगतात. याचे विद्यार्थी सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

३) स्वत: प्रेरणा सांगतात. याचे दोन्ही सारणीत १२.५ टक्के प्रमाण आहे.

४) उदाहरणे देऊन निवड करण्यास सांगतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

५) अन्य दैनंदिन घटना, चित्र, नकाशा यांचा वापर, नमुने व प्रेरणेचे प्रकार सांगतात याचे विद्यार्थी सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला प्रेरणा सुचत नसल्यास पूरक प्रश्न, मार्गदर्शन यातून विचारप्रवृत्त करतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१० हा प्रेरणेसंबंधातील मार्गदर्शनात ज्या बाबींचा विचार करतात त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली क्रम सारणी क्र.४.१८१ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१८१

प्रेरणेमधील घटक क्रम --

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेला घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेला घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | घटकाला अनुरुपता | ५५ | १ | प्रेरणा देणाऱ्या कृती | ५६ |
| २ | प्रेरणा देणाऱ्या कृती | ५४ | २ | घटकाला अनुरुपता | ४७ |
| ३ | प्रेरणेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | ३० | ३ | प्रेरणेची हेतुकथनाशी घातलेली सांगड | ३३ |
| ४ | प्रस्तावनेचा परिणाम | २१ | ४ | प्रेरणेचा परिणाम | २५ |

वरील सारणीमध्ये क्र.३ व ४ हे समान आहेत व १,२ क्रमांक भिन्न आहेत, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देत असता, प्रेरणेमधील घटकांना जो क्रम देतात त्या घटकांचा प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेला क्रम एकत्रित करुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

इतिहास अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक प्रेरणेसंबंधी मार्गदर्शन देताना १.५) घटकाला अनुरुपता, १.५) प्रेरणा देणाऱ्या कृती, ३) हेतुकथनाशी प्रेरणेची घातलेली सांगड, ४) प्रेरणेचा परिणाम याप्रमाणे क्रम देतात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.११ हा पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८२

पाठटाचणामध्ये मुद्दे-उपमुद्दे नसणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मुद्दे,उपमुद्दे लिहा,अशी सूचना देतो | १० | ६२.५० |
| २ | चर्चा करून त्यांच्याकडूनच मुद्दे तयार करून लिहायला सांगतो. | ४ | २५.०० |
| ३ | स्वत: ते मुद्दे,उपमुद्दे लिहितो,सांगतो. | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मुद्दे,उपमुद्दे लिहायला सांगतात तपासत नाहीत. | ६ +३ | ५६.२५ |
| २ | मुद्दे काढण्यासंबंधी मार्गदर्शन करून लिहायला सांगतात. | ३ + १ | २५.०० |
| ३ | मुद्दे स्वत: लिहितात. | ३ + ० | १८.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणामध्ये मुद्दे, उपमुद्दे नसल्यास मुद्दे,उपमुद्दे लिहायला सांगतात,त्याशिवाय तपासत नाहीत.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६२.५ टक्के व ५६.२५ टक्के असे प्रमाण आहे.

२) चर्चा । मार्गदर्शन करून मुद्दे सुचवितात,तयार करून घेतात व मग लिहायला सांगतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) प्राध्यापक स्वत: ते मुद्दे,उपमुद्दे लिहितात । सांगतात याचे दोन्ही सारणीमध्ये १२.५ टक्के व १८.७५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक पाठ टाचणात मुद्दे उपमुद्दे, नसल्यास ते लिहायला सांगतात,त्याशिवाय टाचण तपासत नाहीत. मात्र काही प्राध्यापक मार्गदर्शनातून मुद्दे सुचवितात.

प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१३ हा प्रत्येक मुद्दयावरील चर्चेसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८३

प्रत्येक मुद्दयावरील चर्चा

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | २ | १ | १६ |
| | ८१.२५ | १२.५० | ६.२५ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १२ | - | - | १२ |
| | ३ | - | १ | ४ |
| एकूण | ९३.७५ | | ६.२५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ८१.२५ टक्के व ९३.७५ टक्के प्रमाण आहे.

२) प्रत्येक मुद्दयावर चर्चा करत नाहीत.याचे विद्यार्थी प्राध्यापक सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

३) कधी-कधी प्रत्येक मुद्दयावर चर्चा, याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अध्यापन-मुद्दयावरील चर्चेत प्रत्येक मुद्दयावर चर्चा करतात.

प्रश्नावलीतील प्रश्न क्र.१४ हा पाठमुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८४

मुद्दयावरील चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देणे

| | होय | नाही | आवश्यकता वाटली तरच | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | १ | ३ | १६ |
| | ७५.०० | ६.२५ | १८.७५ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन:

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक चर्चेच्या दरम्यान विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर वाचन देतात. याचे प्रमाण ७५.०० टक्के आहे.

२) अवांतर वाचन देत नाहीत. याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

३) आवश्यकता वाटली तर अवांतर वाचन देतात. याचे प्रमाण १८.७५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला चर्चेच्या दरम्यान अवांतर वाचन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१४ हा पाठ्य-मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारण्यासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८५
पाठ्य-मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारणे

| | होय | नाही | कधी कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १३ | २ | १ | १६ |
| | ८१.२५ | १२.५ | ६.२५ | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १० | २ | - | १२ |
| | ४ | - | - | ४ |
| एकूण | ८७.५ | १२.५ | - | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक पाठ मुद्द्यावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्द्यांचे स्पष्टीकरण विचारतात.याचे दोन्ही सारणींमध्ये ८१.२५ टक्के व ८७.५ टक्के प्रमाण आहे.

२) स्पष्टीकरण विचारत नाहीत.याचे दोन्ही सारणींमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

३) कधी-कधी स्पष्टीकरण विचारतो.याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य-मुद्दयावर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण विचारतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१६ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१५ हा मुद्दयांचे स्पष्टीकरण विद्यार्थी-शिक्षकाला न येण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८६ मध्ये आहे.

सारणी क्र.४.१८६

विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण न आल्यास -

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन देतो, उदाहरणे, दाखले देतो व प्रश्न विचारून प्रवृत्त करतो. | ५ | ३१.२५ |
| २ | घटकाचे पुन्हा वाचन करा व मार्गदर्शन घ्या. | ७ | ४३.७५ |
| ३ | स्वत: त्या मुद्दयांचे स्पष्टीकरण करतो | ४ | २५.०० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | प्रश्न, चर्चा यातून स्पष्टीकरणास प्रवृत्त करतात, उदाहरणे, दाखले देतात. | ४+२ | ३७.५० |
| २ | अधिक वाचन करा, अभ्यासून टाचण काढा व मग या. | ६+१ | ४३.७५ |
| ३ | प्राध्यापक स्वत: स्पष्टीकरण करतात | २+१ | १८.७५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

<u>निरीक्षण व अर्थनिर्वचन</u> :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण देता आले नाही तर घटकाचे पुन्हा वाचन करा व मग मार्गदर्शन घ्या असे सांगतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे ते जास्त आहे.

२) प्रश्न चर्चा, उदाहरणे दाखले देऊन स्पष्टीकरण कसे करावे याचे मार्गदर्शन करतात व स्पष्टीकरणास विचारप्रवृत्त करतात. याचे दोन्ही सारणीमध्ये ३१.२५ टक्के व ३७.५ टक्के प्रमाण आहे .

३) प्राध्यापक स्वत: स्पष्टीकरण करतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.० व १८.७५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

<u>निष्कर्ष</u> :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला मुद्दयांचे स्पष्टीकरण देता आले नाही तर घटकाचे पुन्हा वाचन करा व नंतर मार्गदर्शन घ्या असे सांगतात , मात्र काही प्राध्यापक प्रश्न, चर्चा, उदाहरणे, दाखले देऊन विद्यार्थी-शिक्षकाला विचारप्रवृत्त करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१७ हा मार्गदर्शनाच्यावेळी टाचण व्यवस्थित असूनही विद्यार्थी-शिक्षकाला स्पष्टीकरण न येण्यासंबंधीचा आहे व त्यावर विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्र.१६ हा प्राध्यापक स्पष्टीकरण न आल्यास सविस्तर आशय सांगण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती अनुक्रमे सारणी क्र.४.१८७ व ४.१८८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८७

पाठटाचण व्यवस्थित पण पाठमार्गदर्शनाच्यावेळी स्पष्टीकरण न आल्यास --

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | स्पष्टीकरणाविषयी चर्चा, संदर्भ देऊन मार्गदर्शन देतो. | १२ | ७५.०० |
| २ | स्वत: स्पष्टीकरण देतो. | २ | १२.५० |
| ३ | टाचण त्यानेच काढले का ? याची खात्री करतो. | १ | ०६.२५ |
| ४ | घटक, संदर्भ यांचे वाचन करा असे सांगतो. | १ | ०६.२५ |
| | एकूण | १६ | १००. |

सारणी क्र.४.१८८

पाठ्यांश सविस्तर सांगण्याविषयी

| विद्यार्थी-शिक्षक | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| | १० | २ | १२ |
| | ३ | १ | ४ |
| एकूण | ८१.२५ | १८.७५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण व्यवस्थित लिहितो पण मार्गदर्शनाच्यावेळी प्रश्न विचारल्यास स्पष्टीकरण देऊ शकत नसल्यास स्पष्टीकरणाविषयी चर्चा,संदर्भ देऊन मार्गदर्शन देतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ७५.०० टक्के प्रमाण आहे.

२) स्वत: स्पष्टीकरण करतात,याचे प्रमाण १२.५ टक्के आहे.

३) टाचण विद्यार्थी-शिक्षकानेच काढले का ? याची खात्री करुन घेतात याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

४) घटक,संदर्भ यांचे वाचन करा असे सांगतात. याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

५) त्याप्रमाणे स्पष्टीकरण न आल्यास पाठ्यांश सविस्तर सांगतात. याचे विद्यार्थी सारणीमधील प्रमाण ८१.२५ टक्के आहे.

६) पाठ्यांश सविस्तर सांगत नाहीत याचे प्रमाण १८.७ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एखादा विद्यार्थी-शिक्षक पाठ टाचण व्यवस्थित लिहितो पण मार्गदर्शनाच्यावेळी उत्तर आले नाही तर स्पष्टीकरणाविषयी चर्चा,संदर्भ देऊन मार्गदर्शन करतात,त्याचप्रमाणे पाठ्यांश सविस्तर सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा घटकाशी निगडित आशय सांगण्यासंबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१८९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१८९
घटकाशी निगडित आशय सांगणे

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | ५ | ११ | १६ |
| | ३१.२५ | ६८.७५ | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत याचे प्रमाण ६८.७५ टक्के आहे.

२) घटकाशी निगडित आशय सांगतात याचे प्रमाण ३१.२५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक घटकाशी निगडित आशय सांगत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र.१७ हा उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यावरील मार्गदर्शनातील बाबी संबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.११०

उद्दिष्टे व स्पष्टीकरणामधील बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे घटकानुरुप आहेत का ? काय काय साध्य करावयाचे आहे ? | २ | १२.५० |
| २ | उद्दिष्टे नेमकी व योग्य लिहिलीत का ? एकावेळी एक कृती, एकवचनी इ. | ५ | ३१.२५ |
| ३ | उद्दिष्टे क्रम घटकानुसार - ज्ञान,आकलन... | ७ | ४३.७५ |
| ४ | ३५ मिनिटात साध्य होतील का ? वय, वर्ग, पाठ्यांचा संदर्भ इ. | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |

| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
|---|---|---|---|
| १ | पाठ्य घटकाला अनुसरुन आहेत का ? | ९+० | ५६.२५ |
| २ | नेमकी,योग्य लिहिलीत का ? पूर्ण वाक्य, वर्तमान,एकवचनी इ. | ०+३ | १८.७५ |
| ३ | वर्तनबदलाच्या स्वरुपात ती आहेत का ? | १+० | ०६.२५ |
| ४ | उद्दिष्टांचा मूल्यमापन प्रश्नांशी संबंध पाहतात. | २+१ | १८.७५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शकप्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणाचे मार्गदर्शन देताना उद्दिष्टांचा क्रम,घटकानुसार ज्ञान, आकलन आहेत का ? पाहतात याचे प्राध्यापक सारणीमध्ये ४३.७५ टक्के व विद्यार्थी-सारणीमध्ये ५६.२५ टक्के प्रमाण आहे.

२) उद्दिष्टे घटकानुसार आहेत का ? काय काय साध्य करायचे आहे ? याचे प्राध्यापक सारणीत १२.५ टक्के प्रमाण आहे.

३) उद्दिष्टे नेमकी व योग्य लिहिली आहेत का ? एकावेळी एक कृती, वर्तमान, एकवचन, कृतिशील इ. निकर्षा यांचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३१.२५ टक्के व १८.७५ टक्के प्रमाण आहे.

४) उद्दिष्टे ३५ मिनिटांत साध्य होणारी आहेत का ? वय, दर्जा पाठय-संदर्भ - याचे प्राध्यापक सारणीत १२.५ टक्के प्रमाण आहे.

५) वर्तन बदलाच्या स्वरूपात ती आहेत का ? याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीत ६.२५ टक्के प्रमाण आहे.

६) उद्दिष्टांचा मूल्यमापन प्रश्नांशी संबंध पाहतात. याचे विद्यार्थी सारणीत १८.७५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक उद्दिष्टे व स्पष्टीकरणे यांचे मार्गदर्शन देताना उद्दिष्टांचा क्रम, घटकानुरूपता, ज्ञान, आकलन, उपयोजन इ. बाबी पाहतात. काही प्राध्यापक उद्दिष्टे नेमकी, योग्य एकावेळी एक कृती, एकवचनी इ. निकष पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१८ हा पाठय घटकाला अधिक उद्दिष्टांच्या गरजेसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९१

पाठयघटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चर्चा मार्गदर्शन यातून लक्षात आणून देतो. | ७ | ४३.७५ |
| २ | स्वत: सांगतो,टाचणात लिहितो. | ४ | २५.०० |
| ३ | टाचणामध्ये ती उद्दिष्टे लिहा अशी सूचना देतो. | ४ | २५.०० |
| ४ | नेमकीच देतो. त्यामुळे अधिक गरज नाही. | १ | ०६.२५ |
| | एकूण | | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | चर्चेतून,मार्गदर्शनातून अधिक उद्दिष्टे घेता येतील हे सुचवितात. | ४+३ | ४३.७५ |
| २ | अधिक उद्दिष्टे काढा,लिहा असे सांगतात । सूचना देतात. | ६+१ | ४३.७५ |
| ३ | प्राध्यापक ती सांगतात,टाचणात लिहितात. | २+० | १२.५० |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठमार्गदर्शक प्राध्यापक पाठय घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असेल तर त्यावर चर्चा । मार्गदर्शन करून ती सुचवितात. याचे प्राध्यापक,विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

२) प्राध्यापक ती उद्दिष्टे काढा । लिहा अशी सूचना देतात. याचे प्राध्यापक सारणीत २५.०० टक्के तर विद्यार्थी सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

३) प्राध्यापक स्वत: अधिक उद्दिष्टे सांगतात याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व १२.५ टक्के आहे.

४) प्राध्यापक सारणीमध्ये उद्दिष्टे नेमकीच देतो त्यामुळे अधिक उद्दिष्टांची गरज नाही याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे बहुसंख्य पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ्य घटकानुसार अधिक उद्दिष्टांची गरज असल्यास चर्चा, मार्गदर्शन करुन ती सुचवितात.तर काही प्राध्यापक ती लिहा अशी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.१९ हा विद्यार्थी-शिक्षकाच्या उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलण्या-मागील कारण सांगण्यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९२

उद्दिष्टे आणि स्पष्टीकरणे बदलामागील कारणे सांगणे

| | आहे | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १५ | १ | - | १६ |
| | ९३.७५ | ६.२५ | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १२ | - | - | १२ |
| | ४ | - | - | ४ |
| एकूण | १००.०० | | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक

प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांनी उद्दिष्टे व स्पष्टीकरणे बदलत असता त्यामागील कारणे सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ९३.७५ टक्के व विद्यार्थी-सारणीमध्ये १००.०० टक्के प्रमाण आहे.

२) उद्दिष्टे बदलण्यामागील कारण सांगत नाहीत. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाला उद्दिष्टे व स्पष्टीकरणामध्ये बदल करत असता त्यामागील कारणे सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२२,२३,२४ हे व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२०,२१,२२ हे शैक्षणिक साधने घटकानुसार पाठ टाचणात समाविष्ट न केल्यास ती दाखवणे, त्यांच्या कल्पना सुचविणे व त्यांच्या उपलब्धतेची माहिती देणे या संबंधीचे आहेत. त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९३

शैक्षणिक साधनासंबंधी

| | | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| दाखविण्यास सांगतात | प्राध्यापक | १६ | - | १६ |
| | | १००.०० | | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षक | १६ | - | १६ |
| | | १००.०० | | १००. |
| शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात | प्राध्यापक | १६ | - | १६ |
| | | १००.०० | | १००. |
| | विद्यार्थी- | १६ | - | १६ |
| | शिक्षक | १००.०० | | १००. |
| त्याच्या उपलब्धते-विषयी माहिती | प्राध्यापक | १६ | - | १६ |
| | | १००.०० | | १००. |
| देतात. | विद्यार्थी- | १० | ६ | १६ |
| | शिक्षक | ६२.५० | ३७.५० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसल्यास -

अ) ती दालविण्यास सांगतात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १००.०० टक्के प्रमाण आहे.

ब) शैक्षणिक साधनांच्या कल्पना सुचवितात याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १००.०० टक्के प्रमाण आहे.

क) शैक्षणिक साधनांच्या उपलब्धतेविषयी माहिती देतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे १००.०० टक्के व ६२.५० टक्के प्रमाण आहे.

ड) उपलब्धतेविषयी माहिती देत नाहीत याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ३७.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने पाठ्य-विषयाला अनुसरुन शैक्षणिक साधनांचा समावेश नियोजनात केला नसेल तर ती दालविण्यास सांगतात,त्याच्या कल्पना सुचवितात तसेच त्यांच्या उपलब्धतेविषयी माहिती सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२५ व विद्यार्थी प्रश्नावलीतील प्रश्न क्र.२३ हा शिक्षक कृतीवरील चर्चेतील बाबीसंबंधी आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९४

शिक्षक कृतीमधील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अध्यापनमुद्दयानुसार कृती व टाचणातील पाय-यानुसार कृती. | ४ | २५.०० |
| २ | पाठयांशानुसार प्रश्न साधने,उदाहरणे स्पष्टीकरणे आहेत कां ? | ३ | १८.७५ |
| ३ | सर्व पाय-यांनुसार कृतींची नोंद | ८ | ५०.०० |
| ४ | पद्धती,दिग्दर्शन ,पाठयक्रमानुसार आहे ? | १ | ०६.२५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | अध्यापन मुद्दे व कृती पाय-यांनुसार | ३ + १ | २५.०० |
| २ | पाठयांश,प्रश्न,साधने इ. | ४ + १ | ३१.२५ |
| ३ | सर्व पाय-यांवरील कृतींची नोंद | ५ + २ | ४३.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीची चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीपैकी ती कृती सर्व पाय-यांनुसार आहे का ? कृतींची नोंद आहे का ? याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के व ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

२) अध्यापन मुद्दयांनुसार व टाचणातील पाय-यांनुसार कृती आहेत का ? याचे प्राध्यापक सारणीत २५.०० टक्के व विद्यार्थी सारणीमध्येही तेच प्रमाण आहे.

३) पाठ्यांशानुसार प्रश्न साधने,उदाहरणे,स्पष्टीकरणे आहेत का ? याचे अनुक्रमे १८.७५ टक्के व ३१.२५ टक्के प्रमाण आहे.

४) पद्धती,दिग्दर्शन पाठक्रमानुसार आहे का ? प्राध्यापक सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीवर चर्चा करताना विद्यार्थी-शिक्षकाने नियोजनात लिहिलेल्या शिक्षक कृतीमध्ये पाठाच्या पाय-या,कृतींची नोंद या बाबींवर चर्चा करतात,काही प्राध्यापक पाठ्यांशानुसार प्रश्न,साधने,उदाहरणे यावर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र.२५ हा शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देण्यासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९५ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९५

शिक्षक कृतीवरील चर्चेत अवांतर माहिती देणे

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १४ | - | २ | १६ |
| | ८७.५० | | १२.५० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १० | १ | १ | १२ |
| | २ | १ | १ | ४ |
| एकूण | ७५.०० | १२.५० | १२.५० | १०० |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक

शिक्षक कृतीमध्ये विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात, याचे प्राध्यापक सारणीत ८७.५० टक्के व विद्यार्थी सारणीमध्ये ७५.०० टक्के प्रमाण आहे.

२) अवांतर माहिती देत नाहीत. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १२.५० टक्के प्रमाण आहे.

३) कधी कधी आवश्यकता असेल तरच अवांतर माहिती देतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १२.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीमधील बर्वेत विद्यार्थी-शिक्षकाला अवांतर माहिती देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.१७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली-मधील प्रश्न क्र.२४ हा प्राध्यापक मार्गदर्शनामध्ये शिक्षक कृतीमधील ज्या बाबींना अधिक महत्त्व देतात, त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.१९६ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.१९६
शिक्षक कृतीमधील घटकांचा महत्त्वानुसार क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम. | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | कथन । स्पष्टीकरण | ७३ | १ | विद्यार्थी सहभाग | ४८ |
| २ | प्रश्न | ५८ | २ | कथन । स्पष्टीकरण | ४४ |
| ३ | विद्यार्थी सहभाग | ५७ | ३ | प्रश्न | ३९ |
| ४ | शैक्षणिक साधने | ४६ | ४ | शैक्षणिक साधने | ३३ |
| | अन्य : फलक लेखन, अध्यापन पध्दती, दिग्दर्शन . | | | | |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

वरील सारणीमध्ये क्र.४ मध्ये समानता आहे, इतर क्रम भिन्न आहेत म्हणून मार्गदर्शनामध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक-प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी शिक्षक कृतीमधील घटकांना दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील क्रम । निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक शिक्षक कृतीमध्ये महत्त्वानुसार पुढील क्रम देतात :--

१) कथन । स्पष्टीकरण, २.५ ) प्रश्न, २.५) विद्यार्थी सहभाग, ४) शैक्षणिक साधने, त्याचप्रमाणे याशिवाय फलक लेखन,अध्यापन पद्धती, दिग्दर्शन हे घटक प्राध्यापकांनी सुचविलेले आहेत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२६ हा विद्यार्थी कृतीवरील मार्गदर्शनातील बाबींसंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९७
विद्यार्थीकृतीमधील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विद्यार्थीवयोगटानुसार भाषा,शाब्दिक, कृतीयुक्त,सर्वांचा सहभाग,प्रश्न ,साधने या व्दारा सहभाग. | ७ | ४३.७५ |
| २ | विद्यार्थ्यांच्या कृतीचा बोध आहे का ? | ३ | १८.७५ |
| ३ | कोणकोणत्या ठिकाणी ,कसा सहभाग घ्यावा? | १ | ०६.२५ |
| ४ | विद्यार्थीकृती शिक्षककृतीनुसार आहे का ? | ५ | ३१.२५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | आशयाला धरुन कृती आहे का ? | १ + १ | १२.५० |
| २ | शाब्दिक,कृतीयुक्त सहभाग,अवधान कलृप्त्या, प्रश्न,साधने इ. | ७ + २ | ५६.२५ |
| ३ | कोणकोणत्या ठिकाणी विद्यार्थी-सहभाग घेता येईल ? | १ + १ | १२.५० |
| ४ | श्रवण,निरीक्षण करतात असा बोध होतो का ते पाहतात. | ३ + ० | १८.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी कृतीसंबंधी चर्चा करताना विद्यार्थीवयोगटानुसार भाषा, शाब्दिक, कृतीयुक्त सहभाग, सर्वांचा सहभाग, यासाठी प्रश्न, शैक्षणिक साधने या विषयी चर्चा करतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४३.७५ व ५६.२५ टक्के प्रमाण आहे.

२) विद्यार्थ्यांच्या कृतीचा बोध होतो का ? उदा. श्रवण, निरीक्षण करतात इ. याचे प्रमाण अनुक्रमे दोन्ही सारणीत १८.७५ टक्के आहे.

३) कोणकोणत्या ठिकाणी कसा विद्यार्थी सहभाग घेता येईल यावर चर्चा करतात. याचे प्रमाण अनुक्रमे ६.२५ टक्के व १८.७५ टक्के आहे.

४) विद्यार्थी कृती शिक्षक कृतीनुसार आहे का ? याचे प्राध्यापक सारणीत ३१.२५ टक्के प्रमाण आहे.

५) आशयाला धरुन कृती आहे का ? याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीत १२.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-कृती संबंधी चर्चा करताना विद्यार्थ्यांचा वयोगट व भाषा, शाब्दिक व कृतीयुक्त सहभाग, सर्व विद्यार्थ्यांचा सहभाग, त्यासाठी प्रश्न, शैक्षणिक साधने या बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक शिक्षक कृतीनुसार विद्यार्थी कृती अशी चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली मधील प्रश्न क्र.२७ हा मूल्यमापन प्रश्ना संदर्भात चर्चा केल्या जाणाऱ्या गोष्टीसंबंधीचा आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९८

मूल्यमापनप्रश्नावरील मार्गदर्शनातील चर्चेच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | प्रश्न विचारप्रवर्तक,अचूक,योग्य व सर्व महत्त्वाच्या मुद्द्यावर आहेत का ? | ६ | ३७.५० |
| २ | उद्दिष्टाधिष्ठित आहेत का ? वर्तनबदल तपासता येणारे आहेत का ? | ७ | ४३.७५ |
| ३ | प्रश्न-रचना व प्रश्न प्रकार - वस्तुनिष्ठ, लघुत्तरी,कठीण,सोपे इ. | ३ | १८.७५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | संकलनात शिकविलेला गोषवारा व उपयोजनात वस्तुनिष्ठ प्रश्न आहेत का ? | १+० | ०६.२५ |
| २ | प्रश्न उद्दिष्टानुसार आहेत का ? पाठ्यांशाची पडताळणी होते का ? | ६+१ | ४३.७५ |
| ३ | प्रश्न प्रकार,रचना,सर्व प्रकारचे प्रश्न क्रमानुसार वस्तुनिष्ठ,लघु,दीर्घ इ. | ४+३ | ४३.७५ |
| ४ | ज्ञान,आकलन,उपयोजन क्रमानुसार प्रश्न आहेत का ? | १+० | ०६.२५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ-मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्ना संदर्भात चर्चा करताना प्रश्न उद्दिष्टानुसार , वर्तन बदल तपासता येणारे व पाठ्यांशाची पडताळणी घेणारे आहेत का ? हे

पाहतात. याचे दोन्ही सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

२) प्रश्न प्रकार, रचना पाहतात - वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी क्रमानुसार आहेत का ? याचे प्रमाण अनुक्रमे १८.७५ टक्के व ४३.७५ टक्के आहे.

३) प्रश्न विचार प्रवर्तक, अचूक, योग्य - सर्व महत्त्वाच्या मुद्दयांवर आहेत का ? याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३७.५ टक्के प्रमाण आहे.

४) विद्यार्थी सारणीमध्ये -

अ) संकलनात शिकविलेला गोषवारा व उपयोजनात वस्तुनिष्ठ प्रश्न आहेत का ? त्याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

ब) ज्ञान, आकलन, उपयोजन या क्रमानुसार प्रश्न आहेत का ? याचे प्रमाण ६.२५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नासंदर्भात चर्चा करताना प्रश्न उद्दिष्टानुसार, वर्तन बदल तपासता येणारे व पाठ्यांशाशी पडताळणी या बाबींवर चर्चा करतात. काही प्राध्यापक प्रश्न प्रकार, रचना - वस्तुनिष्ठ, लघुत्तरी, दीर्घोत्तरी क्रमानुसार असणे या बाबी पाहतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३० हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.२८ हा मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगण्यासंबंधीचा आहे. त्यासंदर्भात प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.१९९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.१९९

मूल्यमापनातील प्रश्नांचे स्वरुप सांगणे

| | होय | नाही | कधी-कधी | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १० | - | ६ | १६ |
| | ६२.५० | | ३७.५० | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | १२ | - | - | १२ |
| | १ | ३ | - | ४ |
| एकूण | ८१.२५ | १८.७५ | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप सांगतात. याचे प्रमाण अनुक्रमे ६२.५० टक्के व ८१.२५ टक्के आहे.

२) मूल्यमापनातील स्वरुप सांगत नाहीत, याचे विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १८.७५ टक्के प्रमाण आहे.

३) मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप कधी-कधी सांगतो. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३७.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात मूल्यमापनातील प्रश्नाचे स्वरुप सांगतात ,काही प्राध्यापक कधी तरी सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावली--तील प्रश्न क्र.२९ हा स्वाध्यायावर चर्चा केल्या जाणाऱ्या बाबीसंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्रमांक ४.२०० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२००

स्वाध्यायावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पाठयघटकानुसार प्रश्न, शिक्षककृती, मूल्यमापन यातील प्रश्न असावा. | ७ | ४३.७५ |
| २ | वयोगटानुसार, सोपा, कृतिप्रधान, छोटा दृढीकरण करणारा, घटक, उद्दिष्टे यानुसार स्वाध्याय हवा. | ७ | ४३.७५ |
| ३ | सर्जनशील, कल्पक, मनोरंजक, अभिरुची वाढविणारा. | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | पाठयघटकानुसार, सारांश, गोषवारा येणारा. | ७ + २ | ५६.२५ |
| २ | कृतियुक्त, नकाशा आकृती काढण्यावर भर, निरीक्षणशक्ती वाढविणारा. | ५ + २ | ४३.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोलअध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना स्वाध्याय पाठयघटकानुसार, शिक्षक कृती व मूल्यमापन यातील प्रश्न असणारा, पाठयांशाचा सारांश, गोषवारा येणारा आहे का ? यावर चर्चा करतात. याचे प्राध्यापक, विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ४३.७५ टक्के व ५६.२५ टक्के प्रमाण आहे.

२) स्वाध्याय वयोगटानुसार, सोपा, कृतिप्रधान, नकाशा, आकृती काढण्यावर भर, निरीक्षण शक्तीस वाढविणारा व पाठयघटकाच्या

उद्दिष्टावर, पाठ्य घटकाच्या दृढीकरणास उपयुक्त असावा. याचे दोन्ही सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

३) सर्जनशील, कल्पक, मनोरंजक, अभिरुचीपर याचे प्राध्यापक सारणीमध्ये १२.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायावर चर्चा करताना पाठ्य, घटकानुरुपता, शिक्षक कृती व मूल्यमापनातील प्रश्न नसणे, पाठ्यांशाचा गोषवारा येणारा स्वाध्याय या बाबींवर चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३० हा विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणेसंबंधीचा आहे. त्यासंबंधी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०१ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०१

विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | चर्चा, मार्गदर्शनातून विविध प्रकार समोर ठेवतो, दुरुस्ती सुचवितो. | ८ | ५० |
| २ | स्वतः स्वाध्याय देतो. | ४ | २५. |
| ३ | स्वाध्यायात बदल करा सूचना देतो. | ४ | २५. |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | चर्चा, मार्गदर्शन करुन सुधारणा सुचवितात, अपेक्षित काढून घेतात. | ५+२ | ४३.७५ |
| २ | सुधारणा । बदल करा अशी सूचना देतात. | ५+२ | ४३.७५ |
| ३ | स्वतः स्वाध्यायात बदल । सुधारणा करतात. | २+० | १२.५० |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोलअध्यापन-पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने दिलेल्या स्वाध्यायात सुधारणा व्हावी अशी अपेक्षा करत असतील तर ते चर्चा । मार्गदर्शन करुन सुधारणा सुचवितात, प्रकार समोर ठेवतात व अपेक्षित काढून घेतात. याचे प्रमाण प्राध्यापक व विद्यार्थी सारणीमध्ये अनुक्रमे ५०.०० टक्के व ४३.७५ टक्के आहे.

२) स्वाध्यायात सुधारणा । बदल करा.अशी सूचना देतात.याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ४३.७५ टक्के आहे.

३) स्वतः स्वाध्यायात बदल । सुधारणा करतात.याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व १२.५० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक स्वाध्यायात सुधारणा अपेक्षित असतील तर चर्चा,मार्गदर्शन करुन सुधारणा सुचवितात,प्रकार समोर ठेवतात व अपेक्षित स्वाध्याय काढून घेतात.,तर काही प्राध्यापक बदल करण्याची केवळ सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३१ हा फलक लेखनावरील मार्गदर्शनातील बाबीसंबंधीचा आहे,त्या विषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०२

फलकलेखनावरील मार्गदर्शनाच्या बाबी

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | फलकावर सर्व मुद्दे,उपमुद्दे पाठयांश सारांश या बाबी. | ४ | २५.०० |
| २ | लेखन शुद्ध ,नेमके,सुवाच्य,प्रमाणबद्ध, दोन भागात. | ६ | ३७.५० |
| ३ | फलक लेखन कौशल्याच्या सर्व पैलूंवर चर्चा | ३ | १८.७५ |
| ४ | रंगीत खडू,शिरोरेषा,सरळ रेषेत,अक्षर स्पष्ट इ. | ३ | १८.७५ |
| | एकूण | १६ | १०० |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | फलकावर सर्व मुद्दे,उपमुद्दे,पाठयांश यावा. | ५ + २ | ४३.७५ |
| २ | लेखन-शुद्ध,सुवाच्य,नेमके हवे. | ७ + ० | ४३.७५ |
| ३ | रंगीत खडू,अक्षर स्पष्ट इ.वर चर्चा करतात. | ० + २ | १२.५० |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धती पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखन संदर्भात चर्चा करताना फलकावर लेखन शुद्ध ,नेमके,सुवाच्य, प्रमाणबद्ध व्हावे,लेखन फलकाच्या दोन भागात करावे याचे प्राध्यापक सारणीमध्ये ३७.७५ व विद्यार्थी शिक्षक सारणीमध्ये ४३.७५ टक्के आहे.

२) फलकावर सर्व मुद्दे,उपमुद्दे पाठयांश सारांश यावा याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ४३.७५ टक्के आहे.

३) प्राध्यापक सारणीमध्ये फलक लेखन कौशल्याच्या सर्व पैलूंवर चर्चा याचे प्रमाण १८.७५ टक्के आहे.

४) रंगीत खडू, शिरोरेषा, सरळरेषेत, लेखन स्पष्ट इ. बाबींवर चर्चा, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १८.७५ व १२.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखनावरील मार्गदर्शनात फलक लेखन शुद्ध, नेमके, सुवाच्य, प्रमाणबद्ध, दोन भागात ते करणे या बाबींवर चर्चा करतात, काही प्राध्यापक फलक लेखनात सर्व मुद्दे, उपमुद्दे, पाठांश, सारांश यावा या दृष्टीने चर्चा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३२ हा विद्यार्थी-शिक्षकाने केलेल्या फलक लेखन नियोजनातील सुधारणेसंबंधी आहे, त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०३ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०३
फलकलेखनातील सुधारणा

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | अक्षर सरळरेषेत काढा, रंगीत खडूने अधोरेखन करा फलकाचे दोन भाग करा. | ६ | ३७.५० |
| २ | नियोजन मुद्देसूद करणे, लेखन मर्यादित हवे, ते कमी करा इ. | ८ | ५०.०० |
| ३ | त्रुटीनुसार सुव्यवस्थेबद्दल सुधारणा | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | लेखन नियोजनबद्ध मुद्देसूद करा लेखन मर्यादित, क्रमबद्ध, आकृती, मुद्दे दोन भागात इ. | ८ + १ | ५६.२५ |
| २ | फलक लेखन सरळरेषेत, रंगीत खडूचा वापर करा, दोन भागात लेखन हवे इ. | ४ + ३ | ४३.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धती पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाच्या फलक लेखनात सुधारणा सुचवितात. त्यात फलक लेखन नियोजनबद्ध, मुद्देसूद, करावे लेखन मर्यादित हवे, क्रमबद्ध करा, आकृती व मुद्दे फलकाच्या दोन भागात करा. याचे प्राध्यापक व विद्यार्थी सारणीत प्रमाण अनुक्रमे ५०.०० टक्के व ५६.२५ टक्के आहे.

२) फलक लेखन सरळ रेषेत, रंगीत खडूचा वापर, दोन भागात करा. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये प्रमाण अनुक्रमे ३७.५० टक्के व ४३.७५ टक्के आहे.

३) त्रुटीनुसार सुव्यवस्थेबद्दल सुधारणा सुचविती, याचे प्राध्यापक सारणीमध्ये १२.५० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शनात मार्गदर्शक प्राध्यापक फलक लेखन सुधारणेसंबंधी नियोजनबद्धता, मुद्देसूदपणा, मर्यादित, क्रमबद्ध लेखन व आकृती व मुद्दे दोन भागात लिहिण्यासंबंधी सूचना देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३५ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३३ हा पाठ उद्या असता विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास येतो या संबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०४

पाठ उभा असता मार्गदर्शन घेणे

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | कडक शब्दात समज,घाई-गर्दीत तयारी होत नाही.तीन दिवस आधी मार्गदर्शन घ्या,पाठ रद्द,मार्गदर्शन नाही. | १० | ६२.५० |
| २ | रागावतो पण पुन्हा असे न करण्याची समज देऊन मार्गदर्शन करतो. | ४ | २५.०० |
| ३ | विद्यार्थी कसा आहे,विषय सोपा आहे का ? हे पाहून मार्गदर्शन करतो. | २ | १२.५० |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | मार्गदर्शन चार दिवस आधी घ्यावे, मुदत संपली,पाठ रद्द असे सांगतात. | ८+३ | ६८.७५ |
| २ | मार्गदर्शन देतात,सवडीप्रमाणे उभा करुन ठेवतात,पुन्हा असे होऊ नये असे सांगतात. | ४+१ | ३१.२५ |
| | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उभा आहे आणि विद्यार्थी-शिक्षक पाठ मार्गदर्शनास आला तर - कडक शब्दात समज देतात. ३-४ दिवस आधी मार्गदर्शन घ्या,घाई गर्दीत पाठाची तयारी होत नाही,मार्गदर्शन न देता पाठ रद्द करतात.याचे प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६२.५० व ६८.७५ टक्के प्रमाण आहे.

२) रागावतात पण पुन्हा असे न करण्याची समज देतात व त्यांच्या सवडीने, उभा करुन ठेवून मार्गदर्शन देतात.याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३१.२५ टक्के आहे.

३) प्राध्यापक सारणीमध्ये विद्यार्थी कसा आहे ,किंवा सोपा आहे का ? पाहून मार्गदर्शन करतात.याचे प्रमाण १२.५० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक पाठ उद्या आहे व विद्यार्थी-शिक्षक मार्गदर्शनास आला तर मार्गदर्शक ३-४ दिवस आधी घेण्याची समज देऊन पाठ रद्द करतात,काही प्राध्यापक रागावतात पण मार्गदर्शन देतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३४ हा प्राध्यापक मार्गदर्शनात ज्या मुद्दयांना अधिक वेळ देतात, त्यांच्या क्रमासंबंधीचा आहे. त्यासंबंधी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेले क्रम सारणी क्र.४.२०५ मध्ये दिलेले आहेत.

सारणी क्र.४.२०५

मार्गदर्शनात अधिक वेळ दिला जाणाऱ्या मुद्दयांचे क्रम

| अनु. | प्राध्यापकांनी दिलेले घटक क्रम | गुण | अनु. | विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले घटक क्रम. | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १४३ | १ | पाठ्य मुद्दे | १४३ |
| २ | पाठ्य मुद्दे | १३३ | २ | उद्दिष्टे व स्पष्टीकरणे | १३६ |
| ३ | शिक्षक, विद्यार्थी कृती | १३० | ३ | शिक्षक-विद्यार्थी कृती | १३२ |
| ४ | पूर्वज्ञान | ९४ | ४ | प्रेरणा | ९७ |
| ५ | प्रेरणा | ९१ | ५ | पूर्वज्ञान | ९१ |
| ६ | शैक्षणिक साधने | ६७ | ६ | मूल्यमापन साधने | ८२ |
| ७ | फलक लेखन | ६१ | ७ | फलक लेखन | ६६ |
| ८ | संकलन | ५९ | ८ | संकलन | ६४ |
| ९ | उपयोजन | ५८ | ९ | उपयोजन | ५० |
| १० | मूल्यमापन साधने | ५७ | १० | शैक्षणिक साधने | ४७ |

वरील सारणीमध्ये क्र.३ व ७ ते ९ यामध्ये समानता व इतर क्रमांकामध्ये भिन्नता आहे, म्हणून मार्गदर्शक प्राध्यापक ज्या घटकाला अधिक वेळ देतात, त्या घटकांना प्राध्यापकांनी व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेले क्रम एकत्रित केले असता पुढील निष्कर्ष (क्रम ) काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनात अधिक वेळ देतात त्यानुसार पुढील घटक क्रम देतात १.५) उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, १.५) पाठ्य मुद्दे, ३) शिक्षक विद्यार्थी कृती, ४.५) पूर्वज्ञान,४.५) प्रेरणा,६.५) शैक्षणिक साधने, ६.५) मूल्यमापन साधने, ७) फलक लेखन ८) संकलन ८) उपयोजन .

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३७ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३५ हा मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटकासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०६ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०६

मार्गदर्शनातील दुर्लक्षित घटक

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | कोणताही नाही | | ११ | ६८.७५ |
| २ | उपयोजन,संकलन | | २ | १२.५० |
| ३ | फलक लेखन | | २ | १२.५० |
| ४ | विद्यार्थीकृती व संकलन | | १ | ०६.२५ |
| | | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | | |
| १ | कोणताही नाही | | ६+२ | ५०.० |
| २ | संकलन,उपयोजन | | २+१ | १८.७५ |
| ३ | फलक लेखन | | २+० | १२.५० |
| ४ | पूर्वज्ञान,मूल्यमापन साधने | | २+१ | १८.७५ |
| | | एकूण | १२+४ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक ज्या मार्गदर्शन घटकाकडे दुर्लक्ष करतात असा कोणताही घटक नाही, असे म्हणण्याचे प्रमाण प्राध्यापक सारणीमध्ये ६८.७५ टक्के व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ५०.०० टक्के आहे.

२) संकलन,उपयोजन याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १२.५ टक्के व १८.७५ टक्के प्रमाण आहे.

३) फलक लेखन दोन्ही सारणीत १२.५ टक्के प्रमाण आहे.

४) प्राध्यापक सारणीत विद्यार्थी-कृती व संकलन याकडे दुर्लक्ष केले तरी चालेल याचे ६.२५ टक्के प्रमाण आहे.

५) विद्यार्थी सारणीमध्ये पूर्वज्ञान व मूल्यमापन साधने याचे १८.७५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापनपद्धतीचे बहुसंख्य मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्या सर्व घटकांकडे लक्ष देतात,काही प्राध्यापक मात्र उपयोजन,संकलन व फलक लेखन या घटकांकडे दुर्लक्ष करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३८ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३६ हा मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा जो सहभाग घेतात त्यासंबंधीचा आहे.त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०७ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०७

मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | खूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | ४ | - | - | १७ |
| | ७५.०० | २५.०० | | | |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | | |
| | ६ | ६ | - | - | १२ |
| | - | ४ | - | - | ४ |
| एकूण | ३७.५० | ६२.५० | | | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा खूपच सहभाग घेतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ७५.०० टक्के व ३७.५० टक्के प्रमाण आहे.

२) मध्यम सहभाग घेतात. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ६२.५० टक्के आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक मार्गदर्शनाच्यावेळी विद्यार्थी-शिक्षकांचा खूपच सहभाग घेतात, काही प्राध्यापक मात्र मध्यम सहभाग घेतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३७ हा एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांच्या सहभागासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०८ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०८

एका मार्गदर्शनात अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा सहभाग

| | सूपच | मध्यम | अल्प | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | - | १० | २ | ४ | १६ |
| | | ६२.५० | १२.५० | २५.०० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | | |
| | - | ४ | ३ | ५ | १२ |
| | - | २ | २ | - | ४ |
| एकूण | - | ३७.५० | ३१.२५ | ३१.२५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका पाठ मार्गदर्शनाच्यावेळी उपस्थित असलेल्या अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा मध्यम सहभाग घेतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ६२.५० टक्के व ३७.५० टक्के प्रमाण आहे.

२) अल्प सहभाग घेतात. याचे प्रमाण अनुक्रमे १२.५० व ३१.२५ टक्के आहे.

३) अजिबात सहभाग घेत नाहीत. याचे प्रमाण अनुक्रमे २५.०० टक्के व ३१.२५ टक्के आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक एका मार्गदर्शनाच्यावेळी अन्य विद्यार्थी-शिक्षकांचा मध्यम सहभाग घेतात, काही प्राध्यापक अजिबात सहभाग घेत नाहीत.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.३८ हा पाठ नियोजन चुकीचे वाटल्यास त्यातच सुधारणा की पूर्ण बदल यासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२०९ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२०९

पाठ नियोजन कृतीचे वाटल्यास

| | आहे त्यात सुधारणा | पूर्ण बदल | वर्गारंभी पूर्ण बदल | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | ११ | ३ | २ | १६ |
| | ६८.७५ | १८.७५ | १२.५० | १०० |
| विद्यार्थी-शिक्षक | | | | |
| | ८ | ४ | - | १२ |
| | २ | - | २ | ४ |
| एकूण | ६२.५ | २५.०० | १२.५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे नियोजन कृतीचे वाटल्यास आहे त्यात बदल करतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ६८.७५ टक्के व ६२.५ टक्के प्रमाण आहे.

२) पूर्ण बदल करतात.याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १८.७५ टक्के व २५.०० टक्के प्रमाण आहे.

३) वर्गारंभीच पूर्ण बदल नंतर सुधारणा. याचे दोन्ही सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल अध्यापन पद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाचे नियोजन कृतीचे वाटल्यास आहे त्या पाठ टाचणात सुधारणा करतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४० हा मार्गदर्शनाच्या काळात विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिली असता संबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षकांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२१० मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१०

विद्यार्थी-शिक्षकाने मार्गदर्शनात चुकीची उत्तरे दिल्यास

| | प्राध्यापकांचा प्रतिसाद | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दुरुस्ती करा चुकीची उत्तरे देऊ नका, तुमच्या विद्यार्थ्यांनि तसे केले तर काय कराल ? | ३ | १८.७५ |
| २ | पुन्हा तयारी करुन,वाचन,अभ्यास करुन या | ४ | २५.०० |
| ३ | योग्य उत्तर स्वत: सांगतो | २ | १२.५० |
| ४ | न रागावता थोडीशी हिंट देतो व दुरुस्ती करुन घेतो. | ७ | ४३.७५ |
| | एकूण | १६ | १००. |
| | विद्यार्थी-शिक्षकांचा प्रतिसाद | | |
| १ | त्या मुद्दयाचे,घटकाचे वाचन करा व नंतर या. | २+ ३ | ३१.२५ |
| २ | उत्तर स्वत: सांगतात। | १ + ० | ०६.२५ |
| ३ | योग्य मार्गदर्शन,चालना देऊन उत्तराप्रत आणतात. | ७+ ० | ४३.७५ |
| ४ | नाराजी व्यक्त करतात,रागावतात,मुलांना चुकीचे शिकविणार ? | २+ १ | १८.७५ |
| | एकूण | १२ + ४ | १००. |

## निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकांशी चर्चा करताना त्यानी चुकीची उत्तरे दिली तर - न रागावता योग्य मार्गदर्शन देऊन विचाराला चालना देऊन दुरुस्ती करुन घेतात. याचे दोन्ही (प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक ) सारणीमध्ये ४३.७५ टक्के प्रमाण आहे.

२) त्या मुद्दयाचे,घटकाचे वाचन,अभ्यास करुन नंतर मार्गदर्शनास या, याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये २५.०० टक्के व ३१.२५ टक्के प्रमाण आहे.

३) नाराजी व्यक्त करतात,रागावतात व चुकीचे उत्तरे देऊ नका, विद्यार्थ्यांना चुकीचे शिकविणार काय ? तुमच्या विद्यार्थ्यांनी चुकीची उत्तरे दिली तर काय कराल ? याचे प्राध्यापक,विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये १८.७५ टक्के प्रमाण आहे व ते समान आहे.

४) उत्तर स्वत: प्राध्यापक सांगतात. याचे प्राध्यापक सारणीमध्ये ६.२५ टक्के व विद्यार्थी- शिक्षक सारणीमध्ये १२.५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

## निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक विद्यार्थी-शिक्षकाने चुकीची उत्तरे दिल्यास न रागावता योग्य मार्गदर्शन देऊन विचाराला चालना देतात व दुरुस्ती करुन घेतात,काही प्राध्यापक मात्र त्या मुद्दयाचे घटकाचे अधिक वाचन करुन नंतर मार्गदर्शनास येण्यास सांगतात.

प्राध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.४२ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीतील प्रश्न क्र.३९ हा अधिक वाचन अभ्यास व शैक्षणिक साधन यांच्या आग्रहासंबंधीचा आहे. त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२११ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२११

अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह

| | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | १५ | १ | १६ |
| | ९३.७५ | ६.२५ | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | | | |
| | ११ | १ | १२ |
| | ४ | - | ४ |
| एकूण | ९३.७५ | ६.२५ | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये भूगोल अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात. याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये ९३.७५ टक्के प्रमाण आहे व ते समान आहे.

२) आग्रह धरत नाहीत. याचे दोन्ही सारणीमध्ये ६.२५ टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरुन पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

भूगोल पाठ मार्गदर्शक प्राध्यापक अधिक वाचन,अभ्यास,शैक्षणिक साधन यांचा आग्रह धरतात.

प्राध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४३ व विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावलीमधील प्रश्न क्र.४१ हा मराठी अध्यापन पद्धतीचे मार्गदर्शक व अन्य विषयांच्या अध्यापन-पद्धतीचे पाठ-मार्गदर्शन यातील फरका संबंधीचा आहे,त्याविषयी प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांनी दिलेली माहिती सारणी क्र.४.२१२ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्र.४.२१२

मराठी व अन्य विषयांच्या पाठ मार्गदर्शनातील फरक

| | फरक आहे | नाही | उत्तरे नसणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| प्राध्यापक | १२ | ४ | - | १६ |
| | ७५.०० | २५.०० | | १००. |
| विद्यार्थी-शिक्षक | २ | - | १० | १२ |
| | २ | - | २ | ४ |
| एकूण | २५.०० | | ७५.०० | १००. |

निरीक्षण व अर्थनिर्वचन :

१) वरील सारणीमध्ये मराठी व अन्य विषय यांच्या पाठ मार्गदर्शनामध्ये फरक आहे,याचे प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक सारणीमध्ये अनुक्रमे ७५.०० टक्के व २५.०० टक्के प्रमाण आहे.

२) प्रश्नाचे उत्तर नसणारे अनुक्रमे शून्य टक्के व ७५.०० टक्के प्रमाण आहे.

३) फरक नाही याचे प्रमाण प्राध्यापक सारणीत २५.०० टक्के प्रमाण आहे.

वरील निरीक्षणावरून पुढील निष्कर्ष काढता येईल.

निष्कर्ष :

मराठी अध्यापनपद्धतीचे पाठ मार्गदर्शन व अन्य विषयांचे पाठ मार्गदर्शन यात फरक आहे.

वरील निष्कर्षानुसार कोणकोणते फरक आहेत ते पुढील पान क्र. ५६०ते५८३ वर सर्व विषयांच्या प्राध्यापक व विद्यार्थी-शिक्षक यांच्या मतांचा एकत्रित गोषवारा दिलेला आहे.